

गोदावरीचे पाणी वापरण्यासाठी अयोग्य;बंदी आणा शेवटचे पान

रविवार गांवकरी उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक



नंदिनीच्या पात्रातील पाचशे किलो कचरा जमा शेवटचे पान

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ वर्ष ८६ ■ अंक : ३६ ■ नाशिक, रविवार, २७ एप्रिल २०२५ ■ किंमत रु. ५.०० ■ पाने = १६ ■ नाशिक ■ शहर-जिल्हा

महत्त्वाचे ▶▶▶▶

### जम्मू-काश्मीरमध्ये ट्रेकिंगला स्थगिती

**नवी दिल्ली :** पहल-गाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमधील ट्रेकिंग मोहिमांना पुढील आदेशापर्यंत स्थगित देण्यात आली आहे. स्थानिक अधिकाऱ्यांनी पहलगामच्यावरच्या भागात, चंदनवारी, अरु, बेताब व्हॅली आणि बैसरन व्हॅलीसह पर्यटक आणि ट्रेकर्स मोहीम आधीच थांबवली आहे. पहल-गामच्या सर्व वरच्या भागात कोणत्याही प्रकारच्या पर्यटन मोहिमा, ट्रेकिंगवर सध्या पूर्णपणे बंदी घालण्यात आली आहे.स्थानिक मार्गदर्शक, पोर्टर, होमस्टे मालक आणि दुकानदार जे प्रामुख्याने ट्रेकिंग हंगामावर अवलंबून असतात त्यांना या निर्णयाचा आर्थिक फटका बसणार आहे. पर्यटकांना फक्त अधिकृत आणि सुरक्षित क्षेत्रांना भेट देण्याचा आणि स्थानिक अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोरपणे पालन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

### रेहमानला दोन कोटींचा दंड

**नवी दिल्ली :** लोकप्रिय गायक ए. आर. रेहमान आणि फिल्म प्रॉडक्शन कंपनी मद्रास टॉकीजवर पोन्नियन सेलवन २ मधील वीरा राजा वीरा या गाण्यावर कॉपी राइटचा आरोप करण्यात आला आहे. दिल्ली हायकोर्टाने या प्रकरणात रहेमान आणि मद्रास टॉकीज यांना दंड म्हणून २ कोटी रुपये जमा करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शास्त्रीय गायक फैयाज वसिफुद्दीन डागर यांनी दाखल केलेल्या याचिकेनंतर हा वाद समोर आला आहे. त्याने न्यायालयात दावा केला की वीरा राजा वीरा हे गाणे त्याचे वडील नासिर फैयाजुद्दीन डागर आणि काका झहीरुद्दीन डागर यांनी सादर केलेल्या शिव स्तुती सारखेच आहे. गाण्याचे सूर आणि भावना शिव स्तुतीमधून कॉपी केल्या आहेत.

### मनसेचे निमंत्रण; भाजपची नाराजी

**मुंबई :** मुंबईत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून शनिवारी (दि. २६) प्रतिपालिका सभागृह भरवण्यात आले होते. मनसेचे यासाठी शिवसेना ठाकरे गटालाही आमंत्रित केल्याने भाजपने सहभागी होण्यास नकार देते पत्र लिहित आपली भूमिका मांडली आहे. पत्रात म्हटले आहे की, ज्या उबाठा गटाने गेली २५ वर्षे मुंबई महापालिकेत पराकोटीचा भ्रष्टाचार केला ज्यामुळेच मुंबईतील समस्यांनी आक्राळ विक्राळ रूप धारण केले आहे; त्यांच्याच सोबत मुंबईकरांच्या समस्यांबावत चर्चेत सहभागी होऊन काय साध्य होईल?.

### शिवसेना- मनसे युती दृष्टीक्षेपात?

**मुंबई :** महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये मागील काही दिवसांपासून मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उबाठा पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे हे एकत्र येणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत.

अशातच शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने केलेली सोशल मिडिया एक्सवरील पोस्ट चर्चेत आली आहे. वेळ आलीये, एकत्र येण्याची मुंबई आणि महाराष्ट्रासाठी शिवसैनिक तयार आहे मराठी अस्मितेच्या रक्षणासाठी, अशा आशयाची पोस्ट शिवसेना ठाकरेंच्या पक्षाच्या अधिकृत पेजवरून करण्यात आली आहे. राज ठाकरे,उद्धव ठाकरे सध्या परदेशी दौऱ्यावर आहेत.

# महाराष्ट्रात ५०२३ पाकिस्तानी, त्यातील १०७ जण बेपत्ता

## फक्त ५१ पाकिस्तान्यांकडे वैध व्हिसा, कागदपत्रे

**नवी दिल्ली : जम्मू काश्मीरमधील पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशातील सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांना केंद्र सरकारने दिलेली मुदत संपुष्टात आल्यानंतर एकही पाकिस्तानी नागरिक देशात थांबू नये, याची खात्री करावी, अशी सूचना दिली आहे. शाह यांच्या आदेशानंतर महाराष्ट्रात संपूर्ण पोलीस यंत्रणा कामाला लागली असून महाराष्ट्रातील ४८ शहरात एकूण ५०२३ पाकिस्तानी नागरिक आढळून आले आहेत.**

पाकिस्तानी नागरिकांना जारी केलेले १८ प्रकारचे सर्व व्हिसा २७ एप्रिलपासून रद्द करण्यात आल्याची घोषणा केंद्र सरकारने केली होती. यानंतर अमित शाह यांनी देशातील सर्व मुख्यमंत्र्यांना फोन करत पाकिस्तानी नागरिकांना शोधून काढा आणि तात्काळ परत जातील याची खात्री करा, असे निर्देश दिले आहेत. त्यानंतर महाराष्ट्रातील ४८ शहरात एकूण ५०२३ पाकिस्तानी नागरिक आढळून आले आहेत. यात नागपूर शहरात सर्वाधिक २ हजार ४५८ पाकिस्तानी आढळले असून ठाणे शहरात ११०६ पाकिस्तानी नागरिक सापडले आहेत. तर मुंबईत १४ पाकिस्तानी नागरिक राहत असल्याची माहिती समोर आली आहे. यामधील फक्त ५१ पाकिस्तान्यांकडे वैध कागदपत्रे मिळाली आहेत.

महाराष्ट्रात आलेले १०७ पाकिस्तानी नागरिक बेपत्ता झाल्याचे आढळून आले आहे. गृहराज्यमंत्री योगेश कदम म्हणाले की, ज्या पाकिस्तानी नागरिकांच्या व्हीजाची मुदत संपली आहे. भारतीय यंत्रणांना त्यांच्याशी संपर्क करुन त्यांना परत पाकिस्तानला पाठवणे सुरू केले आहे. यातील १०७ नागरिकांशी संपर्क होत नाही किंवा ते सापडत नाही. सार्क व्हीजा आणि शॉर्ट टाईम व्हीजावर असलेल्यांना मात्र दोन दिवसांत म्हणजे २८ तारखेपर्यंत भारत सोडण्यास सांगण्यात आले आहे. वैद्यकीय उपचारांसाठी आहेत त्यांना दोन दिवस वाढवून देण्यात आले असून त्याना ३० तारखेपर्यंत भारत देश सोडायचा आहे. राज्यातील पाकिस्तानी नागरिकांची माहिती गोळा करणे सुरु असून त्यामुळे आकडेवारी बदलू शकते.

### परत पाठविण्याची कार्यवाही युद्धस्तरावर : फडणवीस



महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, महाराष्ट्रातील पाकिस्तानी नागरिकांची यादी प्राप्त केली असून महाराष्ट्रात प्रत्येक पोलिस स्थानकाला त्याची सूचना दिली जात आहे. कोणताही पाकिस्तानी नागरिक ४८ तासांपेक्षा अधिक काळ महाराष्ट्रात राहू नये, याची काळजी घेतली जात आहे. या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवली जात असून, जो कुणी अधिक काळ वास्तव्य करताना आढळेल, त्याच्यावर कठोर कारवाई करण्यात येईल. देशावरील संकटकाळात कायमच सर्व राजकीय पक्ष सोबत राहिले, पण, उबाठाने जे छोटे मन दाखविले, त्याला या देशातील जनता कधीच माफ करणार नाही.

### कोणत्या जिल्ह्यात किती पाकिस्तानी?

अकोला : २२, अहिल्यानगर : १४, अमरावती ११७, छत्रप-ती संभाजीनगर : ५८, बुलढाणा : ७, ६ धुळे : ६, गोंदिया : ५, जळगाव : ३९३, जालना : ५ कोल्हापूर : ५८, लातूर : ८, २६, नाशिक : ८, नागपूर : २४५८, नांदेड : ४, नंदुरबार : १०, नवी मुंबई : २३९ , परभणी : ३, पालघर : १, पिंपरी चिंचवड : २९०, पुणे : ११४ , रायगड : १७, रत्नागिरी : ४, सातारा : १, सांगली : ६, कोल्हापूर : १७, ठाणे : ११०६, वाशिम : ६ यवतमाळ : १४

### पाच दहशतवाद्यांची घरे उद्‌ध्वस्त

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने काश्मीरमध्ये लपून बसलेल्या दोन दहशतवाद्यांची घरे उद्‌ध्वस्त केल्यानंतर आता आणखी तीन दहशतवाद्यांची घरे जमीनदोस्त केली. पुलवामा भागात एहसान उल हक शेख या दहशतवाद्याचे, कुलगाममध्ये झकीर अहमद गानियाचे तर शोपियाँमध्ये शाहीद अहमद कुटे या दहशतवाद्याचे घर पाडण्यात आले. यापूर्वी शुक्रवारी आसिफ शेख आणि आदिल गुरी यांचें घर पाडण्यात आले होते. पहलगाममध्ये सर्च ऑपरेशन सुरू असून काश्मीरच्या बांदिपोरा भागात कुलनार इथे चकमकीत एक दहशतवादी ठार मारण्यात आला. तर दोन सैनिक जखमी झाले. परिसराला वेढा घालून अजूनही शोध मोहीम सुरू आहे.



### एकतर पाणी वाहणार किंवा रक्त : भुट्टो

**नवी दिल्ली :** पाकिस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री आणि पाकिस्तान पीपल्स पार्टीचे प्रमुख बिलावल भुट्टो झरदारी यांनी एका जाहीर सभेला संबोधित करताना सिंधू पाणी कराराबाबत भारताला थेट धमकी दिली. ते म्हणाले, मला सिंधू नदीच्या काठावर उभे राहून भारताला सांगायचे आहे की सिंधू आमची आहे आणि ती आमचीच राहील. एकतर आमचे पाणी या नदीतून वाहेल किंवा त्यांचे रक्त त्यातून वाहेल. भारताची लोकसंख्या आपल्यापेक्षा जास्त असू शकते, पण पाकिस्तानचे लोक धाडसी आहेत. आम्ही सीमेवर आणि पाकिस्तानच्या आतही लढू. आमचा आवाज भारताला योग्य उत्तर देईल. त्यांचे हे विधान भारताविरुद्ध हिंसाचाराला उघडपणे चिथावणी देणारे आहे. दहशतवादाचा निषेध करण्याऐवजी, पाकिस्तानचे राजकीय नेतृत्व आक्रमक राष्ट्रवादाला प्रोत्साहन देत आहे.

# पाणी अडवले तर संपूर्ण ताकदीनिशी प्रत्युत्तर देऊ

## पाकची तोडीस तोड उत्तर देण्याची भाषा



**नवी दिल्ली :** काश्मीरमधील पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने सिंधू नदी कराराला स्थगिती दिली आहे. यावर पाकिस्तानचे प्रधानमंत्री शहाबाज शरीफ यांनी भारताने पाणी अडवले तर संपूर्ण ताकदीनिशी प्रत्युत्तर देऊ असे म्हणत भारताच्या प्रत्येक हल्ल्याला तोडीस तोड उत्तर देण्याची भाषा सुरू केली आहे. तर पाकिस्तानी पीपल्स पार्टीचे प्रमुख बिलावल भुट्टो यांनी सिंधूत पाणी नसेल तर रक्त वाहील, असा इशारा दिला आहे.

पहलगाम हल्ल्यात इस्लामाबादच्या भूमिकेबाबत भारताच्या आरोपांवर पाकिस्तानचे पंतप्रधान शहाबाज शरीफ यांनी भारताचे सर्व आरोप फेटाळून लावत हे कोणत्याही विश्वासार्ह तपास व पुराव्याशिवाय केले गेले असल्याचे म्हटले आहे. भारताकडून आरोपांची मालिका थांबवली पाहिजे. पहलगाम दहशतवादी हल्ल्याची चौकशी करण्याचे आवाहन करत शरीफ सरकारने हल्ल्याचा निषेध केला आहे. दुसरीकडे पहलगाम हल्ल्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या लष्कर ए तोयबाची छाया असणाऱ्या द रेजिस्टन्स फोर्सचे म्होरके पाकिस्तानात मोकाट फिरत आहेत. शाहबाज शरीफ म्हणाले, भारताने आरोप थांबवावेत. त्याच्या कोणत्याही कृतीला पूर्ण ताकदीने प्रत्युत्तर जाईल. इस्लामाबाद कोणत्याही तटस्थ पारदर्शक चौकशीत सहभागी होण्यास तयार आहे. परिस्थिती काहीही असो त्यांचा देश कधीही आपल्या सन्मानाची तडजोड करणार नाही. यावेळी शहाबाद यांनी २०१९ च्या बालाकोट हल्ल्याचा आणि पाकिस्तानच्या प्रत्युत्तराच्या कारवाईचाही उल्लेख केला. शहाबाद म्हणाले की पाकिस्तानने जोरदार प्रत्युत्तर देऊन आपली लष्करी क्षमता आधीच सिद्ध केली आहे. भविष्यात होणाऱ्या कोणत्याही दुर्दैवी घटनेला अशाच प्रकारची प्रतिक्रिया मिळेल, अशी धमकीही त्यांनी दिली. पाकिस्तानी सैन्याला देशाचे रक्षण करण्यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

### टीआरएफने जबाबदारी नाकारली

दरम्यान, भारताच्या कठोर पवित्र्यानंतर दहशतवादी संघटनाची पाचावर धारण बसली असून पहलगाम हल्ल्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या टीआरएफने आता घूमजाव केला आहे. आधी हल्ल्याची जबाबदारी स्वीकारणाऱ्या टीआरएफने आता हल्ल्याची जबाबदारी नाकारणारे पत्रक जारी केले आहे.



# पोप फ्रान्सिस यांना अखेरचा निरोप

**व्हॅटिकन सिटी :** मानवतेचा पूजारी अशी जगभरात ओळख निर्माण केलेले ख्रिश्चन कॅथालिक धर्मगुरु पोप फ्रान्सिस यांना काल भावनिक वातावरणात अखेरचा निरोप देण्यात आला. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्यासह जगभरातील नेत्यांनी उपस्थित राहून पोप यांना आदरांजली वाहिली. पोप फ्रान्सिस यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी २१ एप्रिल रोजी निधन झाले होते. व्हॅटिकनमध्येच दफनविधीची गेल्या अनेक दशकांची परंपरा बाजूला ठेवत व्हॅटिकनच्या बाहेर काही अंतरावर बॅसिलिका येथे त्यांचा दफनविधी करण्यात आला. शतकानुशतकाची परंपरा असलेल्या व्हॅटिकनमध्ये दफनविधी करण्याला फाटा देण्यात आला. कारण पोप यांनीच रोमच्या सांता मारिया येथील बॅसिलिकामध्ये आपल्याला दफन करावे, अशी अंतिम इच्छा व्यक्त केली होती. गेल्या तीन दिवसांत व्हॅटिकनमध्ये जगभरातील नेत्यांनी पोप यांच्या पार्थिवाचे अंतिम दर्शन घेतले. भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, डोनाल्ड ट्रम्प, फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्यूएल मॅक्रॉन, तसेच युरोपीय व आफ्रिकनसह ५४ देशांचे राष्ट्रप्रमुख पोप यांना अखेरचा निरोप देण्यासाठी उपस्थित होते. अंत्यसंस्कारासाठी व्हॅटिकन आणि इटालियन प्रशासनाने कडेकोट सुरक्षा व्यवस्था केली होती. सुमारे दोन लाख लोक या अंतिम संस्काराला उपस्थित होते. अतिशय भावनिक वातावरणात पोप यांना अखेरचा निरोप देण्यात आला. भारतीय वेळेनुसार दुपारी १.३० च्या सुमारास अंत्यसंस्काराच्या सोहळ्याला सुरुवात झाली.

# शहा येथे भरदिवसा सराईत गुंड कांदळकरचा खून

## तडीपारी आधीच चौदा तरुणांनी वाजवला 'गेम', चार जण अटकेत



**सिन्नर : प्रतिनिधी** तडीपार सराईत गुंड भैय्या उर्फ प्रवीण गोरक्षनाथ कांदळकर (वय २७ रा. शहा) याची गावातीलच १४ जणांच्या टोळक्याने घरात घुसून बेदम मारहाण करत हत्या केल्याची घटना शनिवारी (दि.२६) सकाळी अकराच्या सुमारास घडली. याप्रकरणी १४ जणांवर खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. संध्याकाळी उशिरापर्यंत वावी पोलिसांनी चौघांना ताब्यात घेतले होते.

कांदळकर हा दोन वर्षाच्या तडीपारीची शिक्षा भोगून घरी आला होता. शहा गावातीलच गोराणे नामक कुटुंबीयांशी त्याचे भैरवनाथाच्या यात्रेत वाद झाले होते. तेव्हापासून दोन्ही गटात एकमेंकावर कुरघोडी करण्याचे काम सुरू होते. शनिवारी सकाळी सौरभ गोराणे, दिनेश गोराणे, वाळीबा गोराणे, शरद गोराणे, विजय गोराणे, सचिन बागल, राहुल बागल, अतुल गोराणे, आबा गोराणे, रवींद्र गोराणे, वैभव गोराणे, दगू साप्ते (पाहुणा अस्तगावकर), गणेश सोनवणे, सर्जेराव गोराणे (सर्वजण रा. शहा ता. सिन्नर) हे हातात कोयता, कुऱ्हाडी, लोखंडी रॉड, लाकडी दांडे घेऊन त्याच्या घरात शिरले. सर्वांनी कांदळकरला जबर मारहाण केली. त्यानंतर त्याला बाहेर ओढून आणत अंगणात टाकून देत पळ काढला.

दरम्यान, जखमी अवस्थेत भैया कांदळकर याला त्याचे वडील आणि चुलत भावाने तातडीने वावी प्राथमिक आरोग्य /-.. ४

# दहशतवाद्यांना धडा शिकवणे आमचा धर्म : सरसंघचालक

## हल्लेखोरांवर कठोर कारवाईची अपेक्षा




**मुंबई :** अहिंसा हा आमचा स्वधर्म आहे. मात्र, दहशतवाद्यांना धडा शिकवणे हा देखील आमचा धर्म आहे. आम्ही आमच्या शेजारील देशाचे नुकसान करत नाही पण ते चुकीच्या दिशेने जात असतील तर प्रजेचे रक्षण करणे हे राजाचे कर्तव्य आहे. राजा आपले कर्तव्य बजावणार, अशा शब्दात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अध्यक्ष मोहन भागवत यांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला आहे.

भागवत म्हणाले, रावणाचा वध त्याच्या कल्याणासाठी /-.. ४

# नाशिकचा संदर्भकोष हरपला; मधुकर झेंडे यांचे निधन

**नाशिक : प्रतिनिधी**



नाशिकचा संदर्भकोष अशी ओळख प्राप्त केलेले मधुकर झेंडे ( वय ८८) यांचे शनिवारी ( दि.२६) पहाटे वृद्धापकाळाने निधन झाले. नाशिकच्या सुमारे ७० वर्षांची वाटचाल मुखोद्गत असलेले मधुकर झेंडे हे समाज सेवी म्हणून ओळखले जायचे. नाशिकच्या अमरधाम येथे त्यांचा अंत्यविधी झाला. त्यांच्या पश्चात मुलगा राजेंद्र, मुलगी रेखा व रत्ना, जावई प्रकाश पाटील व आल्हाद वाघ, सून, नातू, पणतू असा परिवार आहे.

नाशिक महानगरपालिकेचे जनसंपर्क अधिकारी या पदाहून ते २८ वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झाले. त्यानंतरही सुमारे १० वर्षे /-.. ४

# नांदगाव-मनमाडमध्ये महायुतीत त्रिकोणी संघर्षाची नांदी

राज्यातील सत्ताधारी महायुतीत भाजपा, शिवसेना (शिंदे) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) हे तीन पक्ष असले, तरी नांदगाव-मनमाडच्या राजकारणात हे तीनही पक्ष एकत्र दिसत नाहीत. अलीकडच्या काही वर्षांत नांदगाव म्हटले, तर भुजबळ विरुध्द कांदे असा सामना पाहायला मिळत आला आहे. यामध्ये भाजपाचे स्थान नगण्य होते. शिवसेनेचे (शिंदे) विद्यमान आमदार सुहास कांदे यांना मनमाड, नांदगाव नगरपालिकांसह सर्वच संस्था ताब्यात घ्यायच्या आहेत, तर भुजबळ परिवाराचाही तोच प्रयत्न आहे. त्यासाठी माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ, आमदार. पंकज भुजबळ आणि माजी खासदार समीर भुजबळ पुन्हा एकदा कामाला लागले आहेत. यामध्ये महायुतीतील भाजपाची एन्ट्री झाली आहे. मनमाड शहरात आणि नांदगाव तालुक्यात दखलपात्र कामगिरी भाजपाला आतापर्यंत करता आलेली नाही. शिवसेना ठाकरे गटाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष

गांवकरी सण्डे अँकर

गणेश धात्रक यांनी समर्थकांसह प्रवेश केल्याने भाजपाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत.

**समीर भुजबळ सक्रिय**

नांदगाव विधानसभा मतदारसंघातून अपक्ष म्हणून निवडणूक लढविण्यासाठी समीर भुजबळ यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुंबई प्रदेश अध्यक्षपदाचा राजीनामा दिला होता. छगन भुजबळ यांनी सत्तेच्या माध्यमातून आपले पुत्र पंकज यांना विधान परिषद मिळवून दिल्यानंतर समीर भुजबळ यांची राजकीय सोय लावण्यासाठी त्यांनी नांदगाव मतदारसंघावर नजर ठेवली होती. महायुतीत ही जागा आपल्याला मिळणार नाही, हे लक्षात घेऊन समीर भुजबळ यांनी राजीनामा देऊन निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला. त्यांना छगन भुजबळ यांचा उघड नव्हे, तर छुपा पाठिंबा असल्याचे लपून राहिले नव्हते. या निवडणुकीत समीर भुजबळ यांनी प्रचंड ताकद लावून सुहास कांदे यांच्याशी दोन हात केले खरी पण



त्यांच्या पदरी पराभवच आला. यानंतर ते पराभवाची मीमांसा करत बसले आता ते पुन्हा सक्रिय होत असताना गणेश धात्रक यांच्या प्रवेशाने भाजपाची येथे प्रथमच ताकद वाढली आहे.

**ते पक्षात आहेत की नाही?**

समीर भुजबळ सध्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये आहेत की नाही, हाच मोठा प्रश्न आहे. विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर मुंबई प्रदेश अध्यक्षपदाचा दिलेला राजीनामा स्वीकारण्यात आला नसल्याने आपण पक्षातच असल्याचा दावा समीर भुजबळ यांचा आहे. राजीनामा दिल्यानंतरही आपण पक्षाच्या मुंबई येथे झालेल्या काही कार्यक्रमांत सहभागी /-.. ४

### सुहास कांदेंचा विरोध

समीर भुजबळ यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात थारा मिळू नये, अशी भूमिका आमदार सुहास कांदे यांनी घेतली आहे. अजित पवारांनी त्यांचा राजीनामा त्याचवेळी स्वीकारला होता. जो कोणी युतीधर्म मोडेल, युतीच्या विरोधात उमेदवारी करेल त्याला पक्षातून काढून टाकले जाईल, त्यानुसार समीर भुजबळांची पक्षाने हकाटपट्टी केलेली आहे. महायुतीच्या विरोधात असणाऱ्यांना पक्षातून काढून टाकलेल्यानंतर परत घेण्याचे धोरण महायुतीचे नाही, असा दावा कांदे यांनी केला आहे. आगामी नगरपालिका आणि इतर संस्थांच्या निवडणुकांत समीर भुजबळ तापदायक ठरतील म्हणून त्यांना पक्षाबाहेर ठेवण्यासाठी कांदे यांचे प्रयत्न असल्याचे दिसत आहेत. अर्थात, कांदे यांनी कितीही विरोध केला, तरी अंतिम निर्णय अजित पवार हेच घेतील. शेवटी हा त्यांचा पक्षांतर्गत प्रश्न आहे. समीर भुजबळ यांना हिरवा कंदील मिळाला, तर नांदगावमध्ये पुन्हा एकदा कांदे विरुध्द भुजबळ असा राजकीय संघर्ष पाहायला मिळेल.

## महत्त्वाचे



### पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ सटाणा शहर बंदची हाक

**सटाणा :** काश्मीरमधील पहलगाम येथे मंगळवारी झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला तर पंधराहून अधिक जण जखमी झाले आहेत. अनेक निष्पाप पर्यटकांचे प्राण गेले. या घटनेच्या निषेधार्थ सटाणा शहर आज रविवार दि. २७ रोजी बंदची हाक देण्यात आली आहे. सटाणा शहरातील शिवतीर्थ येथे एकत्र येत या हल्ल्याचा निषेध करत मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात येणार आहे यानंतर शिवतीर्थ ते तहसील कार्यालय दरम्यान पायी मार्चाचे आयोजन करण्यात आले असून तहसीलदारांना निवेदन दिल्यानंतर मोर्चाची सांगता करण्यात येणार आहे. ह्या निषेध मोर्चात सर्वांनी सहभागी व्हावे असे आवाहन करण्यात आले आहे. ह्या मोर्चाचे निवेदन पोलीस निरीक्षण यांना देतांना पंकज सोनवने, मंगेश खैरनार, मंगेश भामरे, गुन्रा राजपूत, गजेंद्र सोनवणे, विलास दंडगव्हाळ, पंकज ततार, अमित पगार, भैया माळी आदिसह नागरिक उपस्थित होते.



### श्रुती चव्हाण यांची यूपीएससीत झेप

**चांदवड :** तालुक्यातील शिवाजी नगर (मतेवाडी) येथील २१ वर्षीय श्रुती संतोष चव्हाण यांनी पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी परीक्षेत ५७३ वा क्रमांक पटकावून लक्षणीय यश संपादन केले आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आमदार डॉ. राहुल आहेर यांनी श्रुती यांची त्यांच्या चांदवड येथील निवासस्थानी भेट घेऊन प्रशंसा केली आणि त्यांचा सत्कार केला. याप्रसंगी भाजपचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब वाघ, भाजप तालुकाध्यक्ष मनोज शिंदे, युवा मोर्चा तालुकाध्यक्ष शांताराम भवर, संदीप काळे, देशमाने सर, राहुल हांडगे, गणेश महाले, संतोष चव्हाण, सौरभ महाराज जाधव यांच्यासह स्थानिक नागरिक उपस्थित होते. श्रुती चव्हाण यांच्या या यशाने चांदवड तालुक्याचे नाव राज्यभर पोहोचले असून, त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

### निफाडच्या प्रांतधिकारीपदी ॲड. मंगरुळे

**निफाड :** निफाडच्या प्रांताधिकारी असलेल्या हेमांगी पाटील यांची पदोन्नती झाल्याने त्यांच्या जागेवर निफाड येथे उपजिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून कार्यरत असलेले डॉ. शशिकांत मंगरुळे हे सोमवारी पद्भार स्वीकारणार आहेत. त्यानी २००८ ते २०१० या कालावधीत सिन्नर येथे तहसीलदार म्हणून सेवा बजावली तर २०१३ ते २०१६ या काळात निफाड प्रांताधिकारी म्हणून सेवेत होते. निवडणूक अधिकारी म्हणून विधानसभा, लोकसभा या कामाचा दांडगा अनुभव त्यांना आहे. करोना काळात संगमनेर येथे प्रांताधिकारी म्हणून कार्यरत असतांना आईच्या निधनानंतर अंत्यविधी केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी प्रशासकीय सेवेत ते हजर होते. नागरिकांच्या जनतेच्या आरोग्याची काळजी म्हणून हजर होणाऱ्या या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्याचा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी त्यावेळी कौतुक केले होते.



### प्रांतधिकारी पाटील यांचा निरोप समारंभ

**निफाड :** निफाड येथील प्रांतधिकारी हेमांगी पाटील यांची पदोन्नती होऊन त्यांची बदली झाली. त्यानिमित्त तहसील कार्यालय निफाड येथे निरोप व शुभेच्छा समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे, सिन्नरचे तहसीलदार सुरेंद्र देशमुख, नायब तहसीलदार राहुल मुळीक, नायब तहसीलदार सागर मुदंडा, नायब तहसीलदार दीपाली खेडेकर, दुय्यम निबंधक दीपाली जगताप तसेच कार्यालयातील अधिकारी, कर्मचारी, तलाठी, मंडळ अधिकारी, पोलीस पाटील संघटनेचे जिल्हाध्यक्ष आणि वकील संघाचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी पाटील यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. उपस्थित सर्वांनी त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



### बीसीएस कॉम्प्युटर आधुनिकतेची जोड : डॉ. शिंदे

**निफाड :** विद्यार्थ्यांनी आपल्या कुटुंब समाजासाठी चांगले कार्य करण्याचे व पुढील उच्च शिक्षण घेऊन चांगली नोकरी व व्यवसायासाठी शुभेच्छा देत, हे विद्यार्थी पुढे अनेक क्षेत्रात यशस्वी वाटचाल करून निश्चितच निफाड महाविद्यालय व मविप्र संस्थेचा नावलौकिक शुद्ध बिजापोटी फळे रसाळ गोमटी या उक्तीप्रमाणे सार्थ करतील, असा विश्वास प्राचार्य डॉ. ए. के. शिंदे यांनी व्यक्त केला. ते कर्मविर गणपत दादा मोरे निफाड महाविद्यालयात 'तृतीय वर्ष संगणक विज्ञान' विभागाचा निरोप समारोपाच्या कार्यक्रम प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते निफाड व परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक युगात स्पर्धा करता यावी आणि बदलत्या काळासोबत समायोजन साधत, पारंपरिक शिक्षणासोबत वैज्ञानिकतेची कास धरता यावी म्हणून, निफाड महाविद्यालयाने २०२२ साली बी.सी.एस. कॉम्प्युटर सायन्स ही नवी शाखा सुरू केली. त्याचे फलित म्हणजे कॉम्प्युटर सायन्सची पहिली बॅच यावर्षी बाहेर पडत आहे. यावेळी महाविद्यालयाचे नवनियुक्त प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी अध्यक्षीय मनोगतात निफाड गाव, परिसर व महाविद्यालयाचा सांस्कृतिक व शैक्षणिक वारसा विशद केला. परीक्षा विभाग प्रमुख डॉ. प्रवीण ढेपले, डॉ. सुसान लारेन्सिया, प्रा. योगेश कडलक यांनी मनोगत व्यक्त करत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. प्रास्ताविक श्रद्धा गवळी यांनी तर सूत्रसंचालन प्रांजली खैर आणि आभार वैशाली गायकवाड व जानवी अहिरे यांनी मानले, कार्यक्रमासाठी डॉ. आर. डी. शिंदे, डॉ. सुरेखा जाधव, डॉ. महेश बनकर, प्रा. प्रवीण शार्दुल, प्रा. ज्ञानेश्वर मोगल, प्रा. एन.डी. सोनटक्के, सर्व प्राध्यापक वर्ग, प्राध्यापकेतर कर्मचारी व उपस्थित होते.

# पशुसंवर्धन विभाग तांत्रिक कामकाजामध्ये दिंडोरी तालुका प्रथम

## १५ तालुक्यातील २६५ पशुवैद्यकीय दवाखान्यांना कामकाजाचे लक्षांक

**दिंडोरी : अशोक केंग**

नाशिक जिल्ह्यातील पशुसंवर्धन विभागामध्ये जिल्हा परिषद अंतर्गत एकूण १५ तालुक्यात २६५ पशुवैद्यकीय दवाखाने आहेत. सदर १५ तालुक्यांपैकी सर्व तालुक्यांना तांत्रिक कामकाजाचे लक्षांक वाटप करण्यात आले होते. त्यानुसार दिंडोरी तालुक्यातील पशुसंवर्धन विभागातील तांत्रिक कामकाज मागील वर्षाच्या तुलनेत वाढले आहे. जिल्ह्यामध्ये तालुक्यांना दिलेल्या लक्षांकनुसार तांत्रिक कामकाजामध्ये दिंडोरी तालुक्याचा प्रथम क्रमांक आला आहे.

दिंडोरी तालुक्यातील पशुगणना, लसीकरण पूर्ण झाले असून नावीन्यपूर्ण योजना, विशेष घटक योजना, राष्ट्रीय पशुधन अभियान यामध्ये प्रभावीपणे कामकाज झाले आहे. तसेच १०० दिवस कार्यक्रमाअंतर्गत तालुक्यातील सर्व दवाखान्यांमध्ये सोलर पॅनल बसविण्यात आले



दिंडोरी : भास्कर रेंगडे, डॉ चंद्रकांत हजारी, डॉ. भगवान पाटील यांनी जिल्ह्यात तांत्रिक कामकाजात दिंडोरी तालुका प्रथम क्रमांक आल्याबद्दल अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या. (छाया : अशोक केंग)

आहेत. पशुसंवर्धन विभाग पंचायत समिती दिंडोरी येथे सेवानिवृत्त सहाय्यक आयुक्त डॉ. शहाजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अभिलेख वर्गिकरण, निर्लेखन पुर्ण करण्यात येऊन तालुक्यातील सर्व पशुवैद्यकीय संस्था प्रमुखांना मार्गदर्शनासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कामधेनू मिशन योजनेतंर्गत ५ दवाखाने दुरुस्ती करण्यात येऊन पाच दवाखान्यात संगणक प्रणाली बसविण्यात आली आहे. तसेच जनावरांच्या आजाराचे योग्य व वेळेत निदान होण्यासाठी दिंडोरी येथे प्रयोगशाळेची निर्मिती करण्यात आली आहे. जिल्हापरिषद पशुसंवर्धन विभागातर्फे ३ गावांमध्ये जनावरांना उपचारासाठी नवीन खोडे बसविण्यात आली आहे. तसेच तालुक्यातील सर्व पशुवैद्यक यांच्या मोबाईलमध्ये श.रिंर्ही र्रीं कार्यान्वित करण्यात आले आहे. सदर ॲपमुळे पशुवैद्यक यांच्या वेळेची बचत होऊन तात्काळ पशुंवर उपचार करण्यास सुलभ होत आहे.

कामधेनू दत्तक योजनेअंतर्गत तालुक्यातील २ गावे दत्तक घेण्यात आली आहे. लस, औषधे यांची शितसाखळी व्यवस्थित राहण्यासाठी तालुक्यातील १८ दवाखान्याना नव्याने फ्रिज देण्यात आले आहेत. तालुक्यात पशुवैद्यकीय दवाखान्यामार्फत जंतनाशक शिबिरांचे आयोजन करुन जंतनाशक औषधे वाटप करण्यात आली. या सर्व बाबींमुळे प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन नाशिक डॉ. बी. आर. नरवाडे, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. प्रशांत धर्माधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संजय शिंदे, सहाय्यक आयुक्त डॉ. सुनील धांडे यांच्या हस्ते दिंडोरी तालुक्याचे पशुधन विकास अधिकारी, डॉ भगवान पाटील यांचा दिंडोरी तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, व्रणोपचारक, परिचर यांच्या वतीने प्रातिनिधिक स्वरूपात सत्कार करण्यात आला. दुसऱ्यास्थानी देवळा तालुका पशुधन विकास अधिकारी डॉ. पूजा घाडगे व तिसऱ्यास्थानी मालेगाव येथील डॉ. मयुरा अरबट व डॉ. मच्छिंद्र झाल्टे यांचा सत्कार करण्यात आला.

> प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन नाशिक विभाग डॉ. बी. आर. नरवाडे, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त डॉ. प्रशांत धर्माधिकारी, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संजय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यातील तांत्रिक कामकाजाचे लक्षांकानुसार सूक्ष्म पद्धतीने मासिक, वार्षिक नियोजन केले. त्यामुळे जिल्ह्यामध्ये दिंडोरी तालुक्याचे प्रथम क्रमांकाचे तांत्रिक कामकाज झाले. याचे सर्व श्रेय तालुक्यातील सर्व पशुधन विकास अधिकारी, सहाय्यक पशुधन विकास अधिकारी, पशुधन पर्यवेक्षक, व्रणोपचारक, परिचर यांना जाते.
>
> – **डॉ भगवान पाटील,** तालुका पशुधन विकास अधिकारी दिंडोरी



## हल्ल्याच्या निषेधार्थ ओझरला निषेध सभा

**ओझर : वार्ताहर**

पहेलगाम येथे पर्यटकावर झालेल्या भ्याड खुनी हल्ल्याचा ओझर येथील नागरिकांनी समाजमित्र नानासाहेब अक्कर चौकात एकत्र येत निषेध केला. यावेळी महिलांनी देखील आपल्या भावना व्यक्त करत त्या नराधमांना फाशी देण्याची मागणी केली.

येथील समाजमित्र नानासाहेब अक्कर चौकात निषेध सभा घेण्यात आली. यावेळी निवृत्त सैनिक श्रीराम आढाव, पिंपळगाव बाजार समितीचे संचालक यतीन कदम, ओमको चेअरमन राजेंद्र शिंदे, माजी सरपंच हेमंत जाधव, शाही मज्जीदचे इमाम मौलाना अन्वर रजा, भारत पगार, प्रशांत अक्कर, कांचन हुजरे, आलिया शेख, प्रशांत पगार, बाबा पठाण, धमेंद्र जाधव आदिंनी घटनेचा निषेध करत सरकारने हल्लेखोरांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

या श्रध्दांजली सभेस ओझर नागरी पतसंस्थेचे चेअरमन जंगल शिंदे, व्हा. चेअरमन श्रीकिशन धामट, दिलीप लड्ढा, अबू अत्तार, अरूण पवार, नितीन जाधव, रऊफ पटेल, भारत आहेर, राजेंद्र सोनवणे, स्वप्नील केदारे, श्रीकांत अक्कर, कामेश शिंदे, राकेश जाधव, किशोर कदम, कादीर शेख, नितीन काळे, अश्पाक बागवान, मतीन शेख, लतिफ खाटीक, महेश कुलकर्णी, अन्सार कुरेशी, एस. पी. आहेर, दिलीप पवार, डॉ. आरिफ, काशिनाथ मंडलिक, अन्वर शेखर, फिरोज मंन्सुरी, राजेंद्र आहेर, नारायण अक्कर, बापू चौधरी, इकलाक अत्तार, विपीन जाधव, समीर अत्तार, पुष्कर जाधव, संदीप अक्कर, शब्बीर खाटीक, के. टी. मंडलिक, अशोक शेलार आदी उपस्थित होते. प्रशांत अक्कर यांनी सुत्रसंचलन केले. तसेच ओझर भगवा चौक, विश्वसत्य कॉलेज तांबट लेन व नानासाहेब अक्कर चौक येथे भारतीय सकल हींदू समाजातर्फे अतिरेकी भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ श्रद्धांजली सभा झाली.

### बागलाण तहसीलमध्ये राज्यसेवा हक्क दिन

**सटाणा :** बागलाण तहसील कार्यालयात सोमवार दिनांक २८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता राज्य सेवा हक्क दिनाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी उपविभागीय अधिकारी कल्पना ठूबे, तहसीलदार कैलास चावडे आणि सर्व विभागाचे विभाग प्रमुख यांच्या उपस्थितीत हा राज्यसेवा हक्क दिन साजरा होणार आहे. यावेळी मुदतीत आणि उत्कृष्टपणे सेवा देणाऱ्या कर्मचाऱ्यांचा तसेच सीएससी सेंटर चालकांचा सत्कार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांना सेवेची शपथ देण्यात येणार असून उत्कृष्ट कर्मचाऱ्यांना प्रशस्तीपत्र देऊन त्याचा सन्मान करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे राज्यसेवा हक्क या हक्का अंतर्गत येणाऱ्या सेवांचा तपशील जाहीर केला जाणारा असून त्याचे फलक सार्वजनिक ठिकाणी लावण्यात येणार आहे या कार्यक्रमात सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन तहसीलदार कैलास चावडे यांनी केले आहे.

## बिबट्याचा बंदोबस्त न केल्यास शेतकरी कायदा हातात घेतील

### शिवसेनेचे माजी गटनेते जाधव यांचा इशारा

**म्हेळुस्के : प्रतिनिधी**



वणारवाडी येथे बिबट्याच्या हल्ल्यात युवतीचा दुर्दैवी मृत्यू झाला. यास सर्वस्वी वनविभाग जबाबदार असून दिंडोरी तालुक्यातील बिबट्यांच्या हल्ल्याची ही पहिलीच घटना नाही.

यापूर्वीही म्हेळुस्के, लखमापूर, परमोरी, वणारवाडी या ठिकाणी नरभक्षक बिबट्याने बालकांना भक्ष केले आहे. त्यामुळे नरभक्षक बिबट्याचा बंदोबस्त करण्याची गरज आहे. यासाठी वनविभागाने विशेष पथक, स्पेशल स्कॉड नेमून या नरक्षक बिबट्यांचा कायमस्वरूपी बंदोबस्त करावा. तसे न झाल्यास शेतकरी कायदा हातात घेतील. यास फक्त वनविभागाग जबाबदार असेल, असा इशारा शिवशेनेचे ज्येष्ठ नेते, माजी. जि. प. गटनेते प्रवीण जाधव यांनी दिला आहे.

ते पुढे म्हणाले की, सदर परिसर सदाहरित असल्यामुळे येथे बिबट्याना लपण्यास जागा आहे. हे बिबटे नरभक्षक झाले आहेत. दिवसाढवळ्या शेतकरी, शेतमजूर, बालके, पशुधन यांना आपले लक्ष बनवत आहेते. तालुक्यात मागील वर्षभरात सुमारे २० ते २५ घटना घडल्या असून साधारणतः मागील काही काळामध्ये तालुक्यात ८ ते १० बळी गेले आहेत. अशा घटनांमुळे शेतकरी व ग्रामस्थ भयभीत झाले आहेत, याला आळा घालण्यासाठी लवकर उपाययोजना करणे गरजेचे आहे. याचा पाठपुरावा वनमंत्रांपर्यंत करणार आहे, परंतु तालुका वनविभागाने सुद्धा अजून जीव जाण्याची वाट न पाहता ठोस पावले उचलून नरभक्षक बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी प्रवीण जाधव यांनी केली आहे.



## ओझरच्या कचरा डेपोत बायो कल्चर फवारणी

**ओझर : वार्ताहर**

येथील ओझरनगरपरिषदेच्या कचरा डेपोत साठलेल्या कचऱ्याचे लवकर विघटन होण्यासाठी नगरपरिषदेतर्फे बायो कल्चरची फवारणी करण्यात आली.

सरकारवाड्यालगत व बाणगंगा नदी किनारी असलेल्या ओझरनगरपरिषदेच्या कचरा डेपोतील कचऱ्याचा वास अथवा दुर्गंधी सुटून त्याचा जवळपास राहणाऱ्या नागरिकांना त्रास होत असतो. हा त्रास होऊ नये म्हणून साठलेल्या कचऱ्याचे लवकर विघटन व्हावे, कचऱ्याचा वास अथवा दुर्गंधी सुटू नये यासाठी ओझर नगरपरिषदेतर्फे ओझोन जेट वाहनाच्या माध्यमातून कचरा डेपोत साठलेल्या कचऱ्यावर बायो कल्चरची फवारणी करण्यात आली. फवारणी कामात मुकादम राहुल शेलार, ओझोन जेट वाहन ड्रायव्हर सतीश कटारे, कर्मचारी भीमा मोंडे व महेंद्र शार्दुल हे सहभागी झाले.

## कोटमगावला देवीचे येथे विणकर मेळावा

**येवला : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोटमगाव देवीचे येथे विणकरांचा मेळावा झाला . भारत सरकारच्या अनेक योजना विणकर बांधवासाठी आहेत, पण ते सर्वसामान्य विणकर बांधवांपर्यंत पोहोचत नाही. या योजना विणकर बांधवांपर्यंत पोहोचाव्या व त्याचा लाभ होतकरू विणकर बांधवांना मिळावा तसेच यावेळी परिसरातील विणकारांना विणकर कार्डासह योजनांची माहिती देण्यात आली.

मेळाव्याचे आयोजन पैठणीचे राष्ट्रीय पुरस्कार विजेते रमेश परदेशी, भाजपचे प्रा. नानासाहेब लहरे यांच्या पुढाकाराने करण्यात आले. मेळावासाठी भारत सरकार विणकर सेवा योजना कार्यालय मुंबई येथील अधिकारी रोहीला व तानाजी उपस्थित होते. त्यांनी सरकारच्या योजनाची माहिती दिली. या सर्व



योजनांचा लाभ घ्यायचा असेल तर सर्व प्रथम भारत सरकारचे विणकर कार्ड काढून घेणे गरजेचे आहे. या कार्डाचा माध्यमातून वस्त्रोद्योग मंत्रालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ मिळेल. त्यासाठी विणकारांनी योजना देखील माहिती करून घ्याव्यात, असे आवाहन यावेळी अधिकाऱ्यांनी केले. केंद्र सरकारच्या वतीने विणकरांसाठी अनेक हिताच्या योजना राबविण्यात आल्या आहेत. त्याच धर्तीवर राज्य सरकारने देखील वीज बिलात सवलत, प्रोत्साहन भत्ता भेट आदींसह विविध योजना राबविल्या आहेत. त्या माध्यमातून हातमागावरील विणकाम करणाऱ्यांना अधिक प्रोत्साहित केले जात असल्याचे यावेळी भाजपाचे नानासाहेब लहरे, रमेश परदेशी यांनी सांगितले.

याप्रसंगी अमोल भोसले, भाऊसाहेब माळी, अंबादास पर्वत, सुनील लहरे, संतोष भोपळे, ललित लहरे, चेतन पुणेकर, अनिल लहरे, विशाल लहरे, मोईन काद्री, मोबीन काद्री, भूषण चव्हाण, आदेश कोल्हे, वैभव लहरे, ओम कोटमे, गणेश कोल्हे, राहुल रक्ताटे, सागर रक्ताटे, पांडुरंग लहरे, जावेद मोबीन, अनिकेत उकिरडे, अमोल गायकवाड, अजय भागवत, सुजित गारे, अविनाश गायकवाड, किरण सोनवणे, मनोज माळी, सुनील घोडेराव, अनिल घोडेराव, आदिसह विणकर बांधव उपस्थित होते.

# चारा पाण्याचे शोधार्थ मेढपाळांचा गोदाकाठला डेरा

## शिवार गजबजले दुभत्या जनावरांनी

**निफाड : आनंदा जाधव**

उन्हाची तीव्रता वाढत असतानाच नदी नाले कोरडेशुष्क होत असून जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर बनल्याने चांदवड, मालेगाव नांदगाव, सिन्नर येवला तालुक्यातील मेढपाळांनी निफाडच्या गोदाकाठ भागात डेरा टाकला आहे.

यावर्षी मार्चपासूनच सूर्य आग ओकत असल्याने एप्रिलच्या मध्यावर तापमानाचा पारा चाळीशी पार गेला आहे. झाडांची पानगळ झाल्याने सावली गायब झाली आहे. जिल्ह्याचे अनेक तालुक्यात ओला संपुष्टात आला असतानाच वाळलेला चारा देखील मिळणे दुरापास्त झाले आहे. नदी नाले कोरडेठाक पडल्याने जनावरांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनल्याने दुभती जनावरे सांभाळणे अवघड बनले आहे. साहजिकच शेळ्या, मेंढ्या, गाई, म्हशी घेऊन मेंढपाळ निफाडच्या गोदाकाठ भागात दाखल झाले आहेत.



तालुक्यात सध्या उन्हाळ कांदा काढण्याचे काम अंतिम टप्प्यात आल्याने शिवार मोकळा झाल्याने या कांद्याचे शेतात हे मेंढपाळ मुक्कामी थांबत आहेत. नदी- नाले याच्याकडेला दिवसभर जनावरे चारायची किंवा कांद्याची पात शेळ्यामेढ्यांना चारा म्हणून द्यायची अन् या शेळ्या मेंढ्यांचे निघणारे दूध जवळच्या डेअरीवर घालायचे, असा या मेंढपाळांचा दिनक्रम. त्यामुळे कुटुंबासह डेरेदाखल झालेले हे पशुपालक गोदाकाठच्या शिवारात जागोजागी थांबल्याचे दिसत आहेत. निफाडच्या विशेषता शिवरे. खानगाव थडी, नांदुरमध्यमेश्वर, करंजगाव, म्हाळसाकोरे, कोठुरे, दिंडोरी, काथरगाव, सायखेडा, चांदोरी, चितेगाव, गोंडेगाव, तामसवाडी, तारुखेडले, रसलपूर, निफाड, जळगाव, या गावांच्या शिवारात हे पशुपालक, मेंढपाळ वास्तव्यास असल्याचे दिसत आहे.

> आमच्या आजे पणजोबा पासून आम्ही मेंढ्या पाळतो. आम्हाला जमीन नाही .आत्ता नाही पण पावसाळ्यात जनावरे चरण्यासाठी जास्त.अडचण येते त्यामुळे सरकारने आहे ते डोंगर मोकळे केले पाहिजे आम्ही सिन्नर आणि निफाड तालुक्यात जास्त करून वास्तव्य करतो.आमची मुले देखील आमच्यासोबतच असतात कारण शिकून नौकरी मिळत नाही.सध्या आम्ही कुटुंबासह शिवरे शिवारात वास्तव्यास असून पोटासाठी वर्षभर आमची भटकंती सुरु असते.
>
> – **दादाजी कांदळकर,** उमराणे

जोपर्यंत पाऊस पडत नाही तोपर्यंत हे मेंढपाळ दरवर्षी याच परिसरात राहतात. चरताना या शेळ्या मेंढ्या यांचे खत शेतात पडते म्हणून शेतकरी या मेंढपाळाना त्यांचे शेतात काही दिवस थांबण्याचा आग्रह करतात. त्याबदल्यात या मेंढपाळ यांना धान्य किंवा ठराविक रक्कम देखील दिली जाते. जनावरांनी जास्त दूध द्यावे यासाठी त्यांना पुरक आहार दिला जातो. सध्या चाऱ्यासाठी ऊस, मका, कांदा, भाजीपाला आदी पिकांचे क्षेत्र मोकळे होत असल्याने या शेतात ही जनावरे चरताना दिसत आहेत. सध्या निफाड, सिन्नर आणि दिंडोरी तालुक्याचा काही भाग अश्या ठिकाणी मालेगाव, नांदगाव, येवला, चांदवडचा पूर्व भाग या परिसरातून पशुपालक मोठ्या प्रमाणात कुटुंबासह दाखल झाले असून याच परिसरात बिबट्याचां वावर देखील मोठ्या प्रमाणात असल्याने अनेकवेळा या कुटुंबांना रात्र जागून कुटुंबासह जनावरांचे रक्षण करावे लागत आहे. एकूणच सध्या निफाडचा शिवार या दुभत्या जनावरांनी गजबला असल्याचे दिसत आहे.

## महत्त्वाचे




### फिरते विज्ञान केंद्र सनराईजच्या दारी

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाज संचलीत सनराईज स्कूलच्या विद्यार्थ्यांनी नुकताच विज्ञान प्रदर्शनाचा आनंद लुटला. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इंजि. पोपटराव पाचोरकर, शाळेचे प्राचार्य डी. बी. ढिकले व नीता पवार यांनी फिरते विज्ञान प्रदर्शन बसचे स्वागत केले. याप्रसंगी इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांना वैज्ञानिक जादूचे प्रयोग दाखविण्यात आले. तसेच इयत्ता सहावी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी मोबाईल सायन्स कार्यशाळा बसला भेट देऊन विज्ञानाचे चमत्कार, विज्ञान प्रदर्शन बघितले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी ही एक सुवर्णसंधी होती . या कार्यशाळेमुळे विद्यार्थ्यांचे शिकणे मजेदार व आकर्षक बनले. नेहरू विज्ञान केंद्र, मुंबई व मविप्र माजी विद्यार्थी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने नाशिकमधील विविध शाळांमध्ये फिरते विज्ञान प्रदर्शन मोफत बघण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली आहे.

### समद मनियारची स्पर्धेसाठी निवड



**नाशिक :** मविप्र संचलित दिंडोरी येथील होरायझन अकॅडमीतील समद मनियार या अष्टपैलू खेळाडूची गोवा येथे होणाऱ्या १४ वर्षांखालील टी-१० या राष्ट्रीय स्तरावरील क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली असून, मविप्र पदाधिकाऱ्यांसह सर्व संचालक मंडळाने समदच्या निवडीचे स्वागत केले आहे. गोंदिया जिल्ह्यातील हलबीटोला येथील पूजा शारीरिक महाविद्यालयात दि. १८ ते २० एप्रिल दरम्यान पार पडलेल्या १४ वर्षे वयोगटाखालील चौथ्या राज्य सबज्युनियर/ज्युनियर टी-१० क्रिकेट चॅम्पियनशिपमध्ये समद मनियारने अष्टपैलू कामगिरी करीत राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक मिळविला. समदच्या या अष्टपैलू कामगिरीमुळे गोवा येथे होणाऱ्या टी-१० या राष्ट्रीय स्तरावरील क्रिकेट स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. या विद्यार्थ्याला शाळेच्या प्राचार्या निर्मला जाधव, क्रीडाशिक्षक रुपेश गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. या विद्यार्थ्याचे सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. मराठा विद्या प्रसारक समाजाचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे व पदाधिकारी तसेच दिंडोरी-पेठ मविप्र संचालक प्रवीण जाधव, शिक्षणाधिकारी डॉ. के. एस. शिंदे, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रदीप घोरपडे, रणजित देशमुख, सुजित मुरकुटे, भारत खांदवे आदींनी या विद्यार्थ्याच्या निवडीचे स्वागत करून त्याला भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.




### मविप्र सनराइजमध्ये इंग्रजी भाषा दिन

**नाशिक :** मविप्र सनराइज स्कूलमध्ये इंग्रजी भाषा दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.सर्वप्रथम शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष इंजि.पोपटराव पाचोरकर, चांदवड तालुका शिक्षण विस्तार अधिकारी वसंतराव खैरनार, प्राचार्य डी. बी. ढिकले यांनी विल्यम शेक्सपियर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. इयत्ता पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेमध्ये विविध उपक्रम विद्यार्थ्यांसमोर सादर केले. विद्यार्थ्यांसमोर नाटिका सादर करून अतिशय सोप्या पद्धतीने इंग्रजी भाषा तसेच व्याकरणाचे महत्त्व विशद केले. प्राचार्य डी. बी. ढिकले म्हणाले, इंग्रजी भाषेचा सराव केल्यास ती सहजच आत्मसात होऊ शकते, सर्व विद्यार्थ्यांनी इंग्रजीचा सराव करून ती आत्मसात करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, तसेच विल्यम शेक्सपियर यांचे पुस्तके वाचा हेदेखील त्यांनी सांगितले. इयत्ता सातवीचा विद्यार्थी कु. सिद्धेश वाकचौरे याने इंग्रजी भाषा दिनाची माहिती सांगितली. कु.अथर्व आथरे, कु.सिद्धेश वाघ यांनी सूत्रसंचालन केले. इयत्ता दहावीचा विद्यार्थी कु. कृष्णा वक्ते याने आभार मानले. इंग्रजीच्या शिक्षिका श्वेता माळोदे, सारिका चित्ते,पूजा गायकवाड, शालन पाटील, उषा जाधव, योगिता जाधव, जयश्री निकम, संगीता जाधव, नयना रुपवते तसेच शिक्षकेतर कर्मचारी सचिन भवर, रेश्मा चौधरी उपस्थित होते.

### सिडकोत संत गोरा कुंभार पुण्यतिथी साजरी



**सिडको : विशेष प्रतिनिधी** संत शिरोमणी गोरोबाकाका समुपदेशन केंद्र व अर्जुन प्रभात शाखेच्यावतीने संत गोराकुंभार पुण्यतिथी बडदे हॉल, जुने सिडको येथे उत्साहात झाली. प्रारंभी संयोजक प्रा. वसंत चव्हाण यांनी प्रास्ताविक भाषण करून संत गोरा कुंभार यांच्या जीवनावरील स्वरचित कविता सादर केल्या. विशेष अतिथी शिवसेना महानगर प्रमुख प्रवीण तिदमे यांच्या हस्ते संत गोरा कुंभार यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी तिदमे यांनी संत गोरा कुंभार यांच्या भक्तिमार्गावर मार्गदर्शन केले. प्रा. चव्हाण व सौ. चव्हाण यांच्या हस्ते तिदमे व मान्यवरांना गोरोबाकाकांनी मानवाला दिलेले दान म्हणजे मडकं, लाकडी फलाटी व दगडी गुंडी भेट देऊन सत्कार केला. कुंभार समाज बांधवांसह सर्व उपस्थितांना संत गोरा कुंभार हे सावळीराम तिदमे लिखित पुस्तक भेट देण्यात आले. कृष्णराव बेदडे यांनी स्वागत तर अविनाश चव्हाण यांनी सूत्रसंचालन, प्रकाश काळे यांनी आभार मानले. नारायण सोनवणे, प्रकाश चित्ते, सुरेश ढोबळे, प्रमिला शिंदे, अनिल मोरे, रंजना मोरे, पुंडलिक सोनवणे, लक्ष्मीकांत शिंदे, शरद जाखडे व पंडित पाटील यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

### कराडमध्ये कारने सात वाहनांना उडवले

**कराड :** राज्यात अपघाताचे प्रमाण वाढले आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून अपघाताच्या घटना उघडकीस येत असतात. अशातच आता कराडमधून अपघाताची एक मोठी बातमी समोर आली आहे. कराड शहरानजीकच्या विद्यानगर, कृष्णा कॅनॉल बाजूकडून शहरात जाणाऱ्या ईको कारने सुमारे ३०० मीटर अंतरात सात वाहनांना उडविल्याची थरारक घटना घडली आहे. शुक्रवार (दि. २५) रोजी दुपारी चारच्या सुमारास हा अपघात झाला आहे. यामध्ये ईको कारसह चार दुचाकी, दोन रिक्षा व एका कारचे मोठे नुकसान झाले. अपघातात सहाजण जखमी झाले असून त्यांच्यावर उपजिल्हा रूग्णालय व खाजगी रूग्णालयात उपचार सुरू आ-हेत. या अपघातात संजय पवार, सुषमा पवार यांच्यासह रफिक मुजावर (वय ३४, रा. चौंडेश्वरीनगर), विशाल उथळे (वय २२), कल्याण बेडके (वय ३४, रा. सैदापूर), समीर चौधरी (वय २६, रा. सातारा), शिवानी भोसले (रा. खोडशी) जखमी झाले आहेत.

# केबल चोरी प्रकरणी पाच जणांची टोळी जेरबंद

## तीन लाखांचा मुद्देमाल जप्त, गुन्हे शाखा युनिट -२ ची धडक कारवाई

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

**एमआयडीसी अंबड येथील गोडाऊनमध्ये घडलेल्या कॉपर केबल वायर चोरी प्रकरणाचा पर्दाफाश करत गुन्हे शाखा युनिट २ च्या पथकाने पाच आरोपींच्या टोळीला अटक केली आहे. एकूण ३ लाख १० हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**



अंबड पोलीस ठाणे येथे दाखल असलेल्या गुन्ह्याचा समांतर तपास करत असताना गुन्हे शाखा युनिट २ ला मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे आरोपी सुखदेव उर्फ हरी संतु झोले यास सातपूर परिसरातून ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्याने गुन्हा कबूल केला असून, त्याने साथीदार कृष्णा वाकळे, योगेश मरळ, राजू काशीद यांच्या मदतीने केबल चोरी करून ती जाळून कॉपर वायर स्वरूपात अंबडगाव येथील भंगार व्यापारी संजय सकट याला विकल्याची कबुली दिली.

या टोळीच्या ताब्यातून चोरीस गेलेली कॉपर वायर, वापरण्यात आलेली पल्सर मोटारसायकल, मोबाईल फोन तसेच रिक्षा चालक प्रमोद म्हस्के याच्याकडून गुन्ह्यात वापरलेली रिक्षा व मोबाईल असा एकूण ३ लाख १० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

गुन्हे शाखेच्या पथकात सपोनि हेमंत तोडकर, डॉ. समाधान हिरे, यशवंत बेंडकोळी, मुक्तारखान पठाण, बाळू शेळके, नंदकुमार नांदुर्डीकर, महेश खांडबहाले, अतुल पाटील, प्रकाश महाजन, संजय पोटींदे यांचा सहभाग होता. तसेच तांत्रिक विश्लेषण विभागाच्या सहायक पोलीस निरीक्षक जया तारडे व त्यांच्या टीमचेही या यशस्वी कारवाईत मोलाचे योगदान मिळाले.



## सिमेन्स वर्क्स युनियनचा उपक्रम
## कोजोली शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सामाजिक कर्तव्याच्या भावनेतून सिमेन्स वर्क्स युनियनच्या वतीने त्र्यंबकेश्वर तालुक्यातील कोजोली येथील जि.प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय उपयोगी वस्तू व खाऊ वाटप करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन युनियनचे सेक्रेटरी गिरीश अष्टेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. नाशिक विभाग सचिव प्रशांत तांबट व कमिटी पदाधिकारी प्रितीश केंगे, दयालसिंग जयस्वाल यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी युनियनचे माजी सचिव अशोक घुगे तसेच नवनिर्वाचित पदाधिकारी संजय ठाकुर, देवीदास देऊळगावकर, संतोष देशमुख, विनायक होडावडेकर, दामोदर विसे यांच्यासह अनेक कामगार बंधू उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी अतिथींचे स्वागत करत त्यांच्या भेटीचा आनंद व्यक्त केला. यावेळी शाळेच्या वतीने मुख्याध्यापक प्रतीक पाटील यांनी युनियनच्या सामाजिक उपक्रमाबद्दल आभार मानले.

# मुंबई-नाशिक महामार्गावर बसचा भीषण अपघात

## ८ वर्षांच्या चिमुकलीने गमावला जीव; १२ जण गंभीर जखमी

**शहापूर : प्रतिनिधी**

मुंबई-नाशिक महामार्गावर भिवंडीजवळ बसला भीषण अपघात होऊन यामध्ये ८ वर्षांच्या मुलीने जीव गमावला आहे.

या अपघातात दहा ते बारा जण जखमी झाले असून त्यांच्यावर नजीकच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. भिवंडीजवळील पडघा गावाजवळ हा अपघात घडला. पिकनिकसाठी गेलेल्या कुटुंबावर काळाने घाला घातला असून ८ वर्षांच्या मुलीचा मृत्यू झाला. जखमींपैकी ३ जणांची प्रकृती गंभीर असल्याचे समजते. अपघाताचे वृत्त समजाताच पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत मदकार्य सुरू केले.

मिळालेल्या माहितीनुसार, महामार्गावरील पडघा वडपे गावाजवळ हा अपघात घडला. बसचालक वेगात असल्याने त्याचे बसवरील नियंत्रण सुटले आणि बस थेट उड्डाणपुलाखालील बोगद्याला धडकली. अपघातावेळी बसमध्ये २० प्रवासी होते.

भिवंडीतील काही कुटुंबीय खडवली येथे पिकनिकसाठी गेले होते. मात्र परत येताना रात्री त्यांच्या



बसला अपघात झाला. यामध्ये एकाच कुटुंबातील १० ते १२ जण जखमी झाले. या अपघातामध्ये जखमी झालेल्या नागरिकांना उपचारासाठी तातडीने भिवंडी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यापैकी तिघांची प्रकृती अतिशय गंभीर असल्याची माहिती समोर आली आहे. भिवंडी पूर्वचे आमदार रईस शेख हे देखील रुग्णालयात दाखल होऊन त्यांनी जखमींची विचारपूस केल्याचे समजते. याप्रकरणी पोलिसांकडून अधिक तपास करण्यात येत आहे

## पहलगाम हल्ल्याच्या निषेधार्थ पाकचा झेंडा जाळला

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

काश्मीर पहलगाम येथे भारतीय नागरिक पर्यटकांवर झालेला भ्याड हल्ल्याच्या निषेधार्थ संभाजी ब्रिगेड नाशिकच्या वतीने पाकिस्तानचा प्रधानमंत्री शहेबाज शरीफ व पाकिस्तानचा झेंडा असलेले पोस्टर्स फाडून व जाळून निषेध व्यक्त करण्यात आला.

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या स्मारकासमोर संभाजी ब्रिगेडच्या कार्यकर्त्यांनी पाकिस्तान मुर्दाबाद, शेहबाज शरीफ मुर्दाबाद, मोदी शाह होश में आओ होश मे आओ, होश मे आके बात करो बात करो हे प्रश्न आंदोलनावेळी करण्यात येवून मृताना श्रद्धांजली वाहण्यात आली. जिजाऊ, शिवराय, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या नावाचा जय घोष करून पाकिस्तान व शेहबाज शरीफ यांचा तीव्र निषेध करण्यात आला. देशाच्या प्रधानमंत्र्यांनी व



गृहमंत्र्यांनी बोलून नव्हे तर कृती करून बदला घेणे अपेक्षित आहे त्याच बरोबर कोणत्याही रिऍलिटी शो मध्ये कोणतेही क्रिकेटर अथवा सिंगर आणि ॲक्टरला भारतात काम करण्याची संधी देऊ नये, असे आंदोलनावेळी तीव्र भूमिका मांडण्यात आली.

या आंदोलनाला उपस्थित संभाजी ब्रिगेडचे जिल्हाप्रमुख प्रफुल्ल वाघ, सचिव अनिल आहेर, उपजिल्हा प्रमुख विक्की गायधनी, उपजिल्हा प्रमुख बळीराम घडवजे, उपमहानगर प्रमुख नितीन काळे, प्रसिद्धी प्रमुख मंदार धीवरे, वैद्यकीय आघाडीचे निलेश गायकवाड, संघटक अक्षय आठवले शहर प्रसिद्धी प्रेम भालेराव, संयोजक अनिल नन्नावरे, रवी गायकवाड, गणेश पाटील, अमोल जाधव, निखिल साळुंखे, संविधान गायकवाड, महेंद्र बहरे, लकी बावस्कर, राकेश जगताप, हरेश्वर पाटील, वैभव पवार, प्रतीक जाधव, सनी ठाकरे, गणेश सहाने, प्रथमेश पाटील, सुधाकर चांदवडे, मदन गांगुर्डे, संजय पांगारे, सुनील शेलार, आर आर पाटील, मंगेश पाटील, निखिल उगले, चंद्रशेखर पाटील, सुभाष पोद्दार, पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



## शिवसेवा युवक मित्र मंडळातर्फे पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध

**नाशिक : वार्ताहर**

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ शिवसेवा युवक मित्र मंडळाच्या वतीने मेन रोड गाडगे महाराज चौक येथे जोरदार आंदोलन करण्यात आले.

यावेळी संतप्त कार्यकर्त्यांनी भारत माता की जय वंदे मातरम ''पाकिस्तान मुर्दाबाद'च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला. आंदोलनादरम्यान पाकिस्तानचा ध्वज जाळण्यात आला. तसेच रस्त्यावर पाकिस्तानचा ध्वज चिकटवून देशभक्त नागरिक त्यावर चालत निषेध करत होते.

यावेळी शिवसेवा युवक मित्र मंडळाचे संस्थापक माजी महापौर विनायक पांडे, सचिन बांडे, संदेश फुले, अनिल क्षत्रिय, दीपक चौघुले, निलेश कुसमोडे,रोहितसिंग(शिवा) चौहान, दीपक जाधव, गोकुळ मोरे, रमेश आघाव, चेतन दाते, प्रमोद नाथेकर, बाबा चव्हाण, संदेश चव्हाण, गोरख पाटील, ओंकार जाधव, अंकुश राऊत, कृष्णा जाधव, विक्की अंबरपुरे, कमलाकर नागपुरे, मनोज गायकवाड, चंद्रकांत सुर्वे, पप्पू बकरे, सागर वाघ, ललित भोई, भरत बोरकर, नादिश शेख, सोनू शेख, धीरज शाह, राहुल गवळी, महेश केकाणे, विक्की रासकर, गणेश सोळशे, राजेश भालेराव, ललित भोई, राहुल कांकरिया, किरण शेळके, संतोष अंबरपुरे, राजु वाघ आदीसह कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

## 'केटीएचएम'मध्ये 'आपली शक्ती, आपला ग्रह'

**नाशिक :** वसुंधरा दिन हा केवळ एक औपचारिक दिवस नसून पृथ्वीवरील जीवनाच्या शाश्वततेसाठी आपली जबाबदारी समजून घेण्याचा आणि कृतीशील होण्याचा दिवस आहे. पृथ्वीवरील निसर्ग, जैवविविधता, वनसंपदा, जलसंपदा हीच खरी संपत्ती असून, हवामान बदल, जंगलतोड, जलप्रदूषण, प्लास्टिकचा सुळसुळाट यावर मात करण्यासाठी सर्वांनीच आपापल्या पातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन हिरे महाविद्यालयातील भूगोल विभागप्रमुख डॉ. राकेश पाटील यांनी केले.

मराठा विद्या प्रसारक समाजाच्या केटीएचएम महाविद्यालयातील भूगोल विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने वसुंधरा दिनानिमित्त ''आपली शक्ती, आपला ग्रह'' या थिमवर आधारित कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. 'केटीएचएमचे प्राचार्य डॉ. एस. एस. काळे यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली सदर कार्यक्रम झाला. प्रारंभी भूगोल विभागप्रमुख डॉ. ज्ञानेश्वर पवार यांनी प्रास्ताविक व स्वागतपर भाषण केले.

## वकिलांनी कायदेशीरदृष्ट्या अद्ययावत रहावे : जैन

### मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायधीशांची नाशिकरोडला भेट

**नाशिक : प्रतिनिधी**

गतिमान न्यायदान करताना वकिलांनी चौकस राहून वेळोवेळी कायद्यात होणाऱ्या बदलांचा सखोल अभ्यास करावा व अद्ययावत राहावे, असे प्रतिपादन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती तथा नाशिक जिल्ह्याचे पालक न्यायमूर्ती जितेंद्र शां. जैन यांनी केले.

न्यायमूर्ती जैन यांनी शनिवारी (दि. २६) नाशिकरोड न्यायालयास सदिच्छा भेट दिली. यावेळी बार रूममध्ये झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी न्या. जैन म्हणाले की, न्यायदान प्रक्रियेत वेगवेगळ्या प्रकरणांत निकाल दिले जातात. त्या निकालांचा वकिलांनी अभ्यास करावा. तसेच दरमहा एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण निकालावर बार असोसिएशनच्या माध्यमातून चर्चासत्राचे आयोजन करण्याचे आवाहन त्यांनी केले. याप्रसंगी नाशिकरोड बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. सुदाम गायकवाड यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. न्या. जैन यांनी येथील वकीलांना दैनंदिन कामकाजात येणाऱ्या समस्या व अडचणी जाणून घेतल्या. नाशिकरोड येथे दोन महिन्यांपुर्वी अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायालय आणि दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर या दोन न्यायालयांचे कामकाज सुरू



झाले आहे. तथापि अपुऱ्या कर्मचारी संख्येमुळे अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने ॲड. सुदाम गायकवाड यांनी वाढीव कर्मचाऱ्यांची मागणी करून तसे आदेश जिल्हा न्यायाधीशांना देण्याची विनंती केली. यावेळी वकिलांनी उपस्थित केलेल्या समस्या व प्रश्नांना न्या. जैन यांनी समाधानकारक उत्तरे दिले. त्यानंतर नाशिकरोड कौटुंबिक न्यायालयातही न्या. जैन यांनी भेट देत तेथील अडचणींचा आढावा घेतला. यावेळी ॲड. चैताली कुटे यांनी येथील कौटुंबिक न्यायालयाच्या स्थलांतरास विरोध करताना या न्यायालयास नाशिकरोड हेच सर्वाथनि कसे योग्य आहे याबाबत अभ्यासात्मक विवेचन करून सोदाहरण स्पष्ट केले. येथील रेल्वे कनेक्टिव्हीटी, इतर सुविधा व पक्षकारांच्या दृष्टीने असणाऱ्या सर्व सोयींबाबत अँड. वर्षा देशमुख यांनी न्यायमूर्तीसमोर बाजू मांडली. नाशिकरोड येथे अतिरिक्त कौटुंबिक न्यायालयास मंजूरी मिळालेली असून कोर्ट हॉल देखील तयार आहे, केवळ त्याचे अधिकृत उदघाटन बाकी असल्याने ते लवकरात लवकर करावे, अशी विनंती ॲड. सुदाम गायकवाड यांनी केली.

याप्रसंगी नाशिकचे प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीचंद जगमलानी, नाशिकरोड जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश जे. एम. दळवी यासह नाशिकरोड न्यायालयातील सर्व न्यायाधीश आदींसह नाशिकरोड बार असोसिएशनचे अँड. बी.बी. आरणे, ॲड. संग्राम पुडे, ॲड. प्रमोद कासार, ॲड. मनीषा बेदरकर, ॲड. दमयंती दोंदे यांच्यासह ज्येष्ठ वकील सुहास पाठक, चंद्रभान पुंडे, योगेश सारडा, राजेंद्र बघडाणे, शिरीष पाटील, विजय शिंदे, संजयकुमार मुठाळ, ब्रिजेश रामराजे, दीपक बर्वे, धम्मपाल रुपवते, अभय परदेशी, नीता शेलार, जयंत शेलार, संदीप बनसोडे, अनिकेत वाडेकर, प्रेमनाथ पवार, पौर्णिमा पगारे, विद्या जाधव आदी वकील सभासद व न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन ॲड. उमेश साठे यांनी केले.

# म्हसोबा महाराजांच्या यात्रेला प्रारंभ

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

नंदिनी नदीच्या तिरावर असलेल्या आणि गर्द हिरव्या महाकाय वटवृक्षाच्या छायेत स्वयंभू उंटवाडीचा राजा अतिप्राचीन म्हसोबा महाराजांच्या दोन दिवशीय यात्रेला प्रारंभ झाला.

उंटवाडीचा राजा अतिप्राचिन म्हसोबा महाराज यात्रेनिमित्त ''श्रीं'' ना अभ्यंगस्नान घालण्यात आले. त्यानंतर म्हसोबा महाराज यात्रा पंचकमेटीच्यावतीने जलाभिषेक आणि तळी भरण्यात आली. सकाळी ११ वाजता सत्यनारायण पूजन करण्यात आले. यात्रेनिमित्त दिवसभर देवदर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. यावेळी महाप्रसादाचेही वाटप करण्यात आले तर सायंकाळी बहुचर्चित छावा चित्रपट दाखविण्यात आला. यावेळी मोठी गर्दी झाली होती.



दरम्यान, श्री म्हसोबा महाराज देवस्थान समितीच्या माध्यमातून पूर्वापार चालत असलेली यात्रेची परंपरा आजतागायत जोपासली जात आहे, या ठिकाणी होणाऱ्या यात्रेमध्ये उंटवाडीसह मोरवाडी, अंबड, पाथर्डी, वडनेर, सातपूर, पिंपळगाव खांब, गौळाणे, दाढेगाव आदी भागातून पुर्वीच्याकाळात बैलगाडीतून भाविक यात्रेसाठी येत होते. मात्र काळानुसार बदल झाला असला तरी यात्रोत्सव पूर्वीसारखाच आजही कायम ठेवत यात्रेच्या समाप्तीनिमित्त अतिप्राचीन म्हसोबा महाराज यात्रा कमेटीच्या वतीने कुस्त्यांची दंगल भरविण्याची परंपरा कायम ठेवत यंदाही कुस्तीप्रेमींसाठी अतिप्राचीन श्री म्हसोबा महाराज यात्रा कमेटीच्या वतीने २७ एप्रिल रोजी सिटी सेंटर मॉल नजीक महाकाय आणि विशाल वटवृक्षाच्या छायेखाली अतिप्राचीन म्हसोबा महाराज मंदिराच्या प्रांगणात कुस्त्यांची दंगल भरविण्यात येणार आहे. कुस्तीगीरांसह कुस्ती प्रेमींनी उपस्थित रहाण्याचे आवाहन अतिप्राचीन म्हसोबा महाराज यात्रा कमेटीचे अध्यक्ष फकिरराव तिडके, माजी अध्यक्ष मधुकर तिडके यांच्यासह सदाशिव नाईक, अंबादास जगताप, रामचंद्र तिडके, बाजीराव तिडके, आण्णा पाटील, दत्ता पाटील, विलास जगताप, विष्णू जगताप, एकनाथ तिडके, जगन्नाथ तिडके, राजेश गाढवे, सुरेश जगताप, संतोष कोठावळे, बाळासाहेब तिडके, राम पाटील, प्रवीण जगताप, दत्तात्रेय तिडके आदीनी केले आहे.

श्री नेमिनाथ जैन ब्रम्हचर्याश्रम संचलित
**श्री नेमिनाथ जैन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,**
**मिनगर, चांदवड, जि. नाशिक. फोन क्र. -**
02556-252124, 297045 ईमेल-snjhchanwad@gmail.com
**(अल्पसंख्यांक संस्था)**

| अ. क्र | पदाचे नाव | पात्रता | पद संख्या (पूर्णवेळ) |
|---|---|---|---|
| १ | क. लिपिक | बी.कॉम, टंकलेखन मराठी-३०, इंग्रजी- ३०, ४०, एमएससीआयटी, संगणकीय कामकाजाचा अनुभव | ०१ |
| २ | प्रयोगशाळा सहाय्यक | एसएससी प्रथम श्रेणी, एचएससी विज्ञान शाखा | ०१ |
| ३ | ग्रंथपाल | एसएससी, एचएससी, बी. लिब | ०१ |

या विद्यालयाच्या अनुदानित / अशतः अनुदानित माध्यमिक विभागाकडे खालीलप्रमाणे शासकीय नियमानुसार पदे भरावयाचे आहे.

वरील पात्रताधारक उमेदवारांनी समक्ष मुलाखतीसाठी दि १६.०५.२०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता स्वरवचनि सर्व मूळ कागदपत्रांसह विद्यालयात उपस्थित राहावे.

**( श्री. शिंदे एस डी )** — प्राचार्य
**(बेबीलाल केशरमल संचेती)** — चेअरमन

# स्वच्छ-सुंदर सिन्नरसाठी, घर परिसर स्वच्छ ठेवा : खा. वाजे

## सिन्नरला वसुंधरा नवरात्रोत्सव महोत्सवानिमित्त स्वच्छता मोहीम

**सिन्नर : प्रतिनिधी**

सिन्नर शहर हरित करण्यासाठी वनप्रस्थ फाउंडेशन चांगले कार्य करत असून शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी नागरिकांनी आपले घर, परिसर स्वच्छ ठेवावा. उघड्यावर कुठेही कचरा न टाकता नगर परिषदेच्या घंटागाडीकडेच कचरा द्यावा असे आवाहन खासदार राजाभाऊ वाजे यांनी केले.

जागतिक वसुंधरा दिनानिमित्त २२ एप्रिल ते १ मे महाराष्ट्र दिन या कालावधीत साजऱ्या होणाऱ्या वसुंधरा नवरात्रोत्सव महोत्सवांतर्गत सिन्नर नगरपरिषद आणि वनप्रस्थ फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने, आणि सिन्नर शहरातील विविध सामाजिक संस्थांच्या सहकार्याने काल (दि.२५) सरदवाडी रोड परिसरातील ग्रीन जिम येथे स्वच्छता मोहीमेचा शुभारंभ खा. वाजे यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.



यावेळी माजी नगराध्यक्ष किरण डगळे, माजी नगरसेवक पंकज मोरे, श्रीकांत जाधव, सिन्नर नगरपरिषदेचे आरोग्य निरीक्षक रविंद्र देशमुख, शहर अभियान व्यवस्थापक अनिल जाधव, शहर समन्वयक सायली बाविस्कर, वनप्रस्थ फाउंडेशनचे अध्यक्ष अभिजित देशमुख, क्रेडाई सिन्नरचे अध्यक्ष समाधान गायकवाड आदी उपस्थित होते. सिन्नर शहरातील विविध सामाजिक संस्थांसह नागरिकांनी उस्फूर्त सहभाग नोंदवत आपले सिन्नर शहर स्वच्छ सुंदर व्हावे यासाठी स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतला. मुख्याधिकारी रितेश बैरागी यांचे मार्गदर्शनाखाली सिन्नर नगर परिषदेचे स्वच्छता विभागाचे कर्मचारी, विविध सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी व सिन्नर शहरातील नागरिक महिलांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला. यावेळी तीन ट्रॅक्टर घनकचरा गोळा करण्यात आला. सदर मोहीम १ मे २०२५ पर्यंत चालू राहणार असून या मोहिमेत सिन्नर शहरातील नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन नगरपरिषद व वनप्रस्थ फाउंडेशन द्वारे करण्यात आले. प्रभाग क्रमांक १२ मधील ग्रीन जिम, सरदवाडी रोड येथून स्वच्छता मोहीम सुरू करून रस्ते, सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. ९ दिवस चालणाऱ्या या वसुंधरा नवरात्रोत्सव महोत्सवात पाण्याचे जलस्त्रोत पुनर्जीवित करणे, वृक्षारोपण करणे, शहरातील विविध भाग स्वच्छ करणे, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे इ.बाबत शाळा, महाविद्यालयात निबंध स्पर्धा घेणे व महाराष्ट्र दिनी उल्लेखनीय कार्य केलेल्या व्यक्तींचा संस्थेचा सन्मान करण्यात येणार आहे. यावेळी दत्तात्रय बोऱ्हाडे, राजेंद्र क्षत्रिय, डॉ म हावीर खिंवसरा, संदीप खर्डे, किरण खिंवसरा, सचिन आडणे, शिरीष ठाणेकर, नितीन खिंवसरा, संजय पवार, योगेश खर्डे, सोपान बोडके, समाधान बोडके, विनोद रोकडे,संजय विशे, सचिन कासार, दीपक भंडारी, विद्या सोनवणे यांचे सह सिन्नर नगर परिषदेचे स्वच्छता कर्मचारी, नागरिक महिला उपस्थित होते.



# केबीटी अभियांत्रिकीच्या दोनशे विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

**नाशिक : प्रतिनिधी**

येथील मराठा विद्या प्रसारक समाज संचलीत, कर्मवीर बाबुराव गणपतराव ठाकरे अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे आयोजीत प्लेसमेंट ड्राईव्हमधून दोनशेपेक्षा अधिक विद्यार्थांची बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये यशस्वी निवड करण्यात आली.

महाविद्यालयातील आयटी, मेकॅनिकल, इंस्ट्रुमेंटेशन अँड कंट्रोल, ई अँड टीसी, सिव्हिल आणि एमबीए यासह विविध शाखांसाठी नियमितपणे प्लेसमेंट ड्राईव्ह आयोजित केले जाते. त्यामध्ये सन २०२४-२५ साठी सहभागी होणाऱ्या कंपन्यांच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. फोर्स मोटर्स, बॉश, कॉग्निझंट, रोबोयो ग्लोबल, इमर्सन, टेक महिंद्रा, अरेस सॉफ्टवेअर, विनजीत, जेएनके इंडिया, एल.टी. आय माइंड्ट्री , एच.एफ.एफ. सी, आय.सी.आय.सी.आय बँक आणि टोयो इंजिनीअरिंग या प्रमुख नामांकीत कंपन्या यावर्षी सहभागी होत्या.

या यशस्वी विद्यार्थ्यांचे मविप्र समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, अध्यक्ष डॉ. सुनील ढिकले, उपाध्यक्ष विश्वास मोरे, चिटणीस दिलीप दळवी, उपसभापती देवराम मोगल, नाशिक शहर संचालक ॲड. लक्ष्मण लांडगे, आदींनी कौतुकास्पद कामगिरीसाठी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाप्रसंगी शिक्षणाधिकारी डॉ. डी. डी. लोखंडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीश आर देवणे, उपप्राचार्य डॉ. एस.जे. कोकाटे, रजिस्ट्रार सृष्टी शिंदे, ट्रेनींग अँड प्लेसमेंट ऑफिसर महेश आडके व सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

> स्वायत्त संस्थेचा दर्जा मिळाल्यापासून महाविद्यालयाच्या यशाचा आलेख दुप्पट गतीने वाढतो आहे. महाविद्यालय आपल्या विद्यार्थ्यांना प्लेसमेंटच्या उत्कृष्ट संधी उपलब्ध करून देण्यात यशस्वी ठरले आहे. पदवीच्या शेवटच्या परीक्षेआधीच हातात नोकरीचे पत्र मिळणे विद्यार्थ्यांसाठी अत्यंत आनंद आणि अभिमानाची गोष्ट आहे आणि अशा दर्जेदार संधी विद्यार्थ्यांना सदैव उपलब्ध करून देणे हे आमचे उद्दिष्ट आहे. कॉलेज व्यवस्थापनाला यशस्वी विद्यार्थ्यांचा अभिमान आहे.
>
> – **ॲड. नितीन ठाकरे,** सरचिटणीस, मविप्र नाशिक

पान १ वरून....

## सराईत गुंड कांदळकरचा खून

केंद्रात आणि त्यानंतर सिन्नर ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. मात्र रस्त्यातच त्याची प्राणज्योत मालवली होती. याप्रकरणी त्याची आई विजया कांदळकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून १४ जणांवर खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. एमपीडीए तथा महाराष्ट्र धोकादायक क्रियाकलाप प्रतिबंधक कायदा, १९८१ अन्वये कांदळकर याच्यावर कारवाई करण्याचा प्रस्ताव डिसेंबर २०२४ मध्ये वावी पोलिसांनी पाठवला होता. जिल्हाधिकाऱ्यांनी त्यात काही त्रुटी काढल्याने त्याची पूर्तता वावी पोलिसांनी केली होती. त्यामुळे हा प्रस्ताव मंजुरीच्या अंतिम टप्प्यात असल्याचे वावी पोलिसांनी सांगितले. तत्पूर्वीच भैया कांदळकरचा गेम झाला. घटनेनंतर गावात तणावाचे वातावरण असून सिन्नर, एमआयडीसी व वावी पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला आहे. अधिक तपास हेड कॉन्स्टेबल शहाजी शिंदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश शिंदे करत आहे.

**सोळापेक्षा अधिक गुन्हे**

तडीपार असतानाही भैय्या कांदळकर गावात येऊन सर्रास गुन्हे करत होता. तालुक्यात आणि शहा परिसरात त्याची प्रचंड दहशत होती. त्यामुळे पोलीस यंत्रणाही हतबल झाली होती. दोन वर्षांपूर्वी तडीपार असताना तो गावात आला होता. वावी, मुसळगाव आणि सिन्नर पोलिसांनी त्याला पकडण्यासाठी शहा येथील घराभोवती सापळा रचला होता. यावेळी त्याने पोलिसांवर बंदूक रोखली होती. पोलीस कारवाईला अडथळा केला म्हणून त्याची पत्नी, वडील आणि आई यांनाही जेलची हवा खावी लागली होती. वावी पोलिसात त्याच्यावर १६ पेक्षा अधिक गुन्हे दाखल आहेत. मुसळगाव पोलीसातही एटीएम लुटीचा प्रयत्न केल्याप्रकरणी गुन्हा दाखल आहे.

**वह बंदूक और गोली भी हमारी होगी....**

हम तुम्हे जरूर मारेंगे, लेकिन वह बंदूक भी हमारी होगी उसकी गोली भी हमारे होगी, और वक्त भी हमारा होगा, ही भैया कांदळकरची फेसबुक स्टोरी भलतीच चर्चेत होती. गेल्या आठवड्यात भैयाने एका हाणामारीच्या घटनेनंतर बीके कंपनी, सुट्टी नाही कोणालाच! दिला ना भाऊ रिप्लाय, असे स्टेटस ठेवले होते. त्यामुळे पोलिसांचाही त्याच्यावर वॉच होता.

## मधुकर झेंडे यांचे निधन

ते मानद अधिकारी म्हणून कार्यरत होते. भूतपूर्व नगरपालिका तसेच १९८२ पासून स्थापित झालेल्या नाशिक महानगरपालिकेच्या अनेक स्थित्यंतरांचे मधुकर झेंडे साक्षीदार होते. १८५ वर्षांपूर्वी स्थापित झालेल्या सार्वजनिक वाचनालय नाशिक या संस्थेच्या प्रगतीमध्ये झेंडे यांचा सिंहाचा वाटा आहे. सामान्य कार्यकर्ता ते सावानाचे अध्यक्ष अशी ४० वर्षांची प्रदीर्घ कामगिरी झेंडे यांनी केली. सन २००८ ते २०१२ या कार्यकाळात त्यांनी वाचनालयाचे अध्यक्षपद भूषविले. नाशिकच्या महाकवी कालिदास कलामंदिराच्या स्थापनेमध्ये महत्वपूर्ण भूमिका बजाविणाऱ्या मधुकर झेंडे यांनी अ. भा. मराठी नाट्यपरिषद नाशिक शाखेचे अध्यक्षपद देखील भूषविले होते. १०१ वर्षांची अभिमानास्पद वाटचाल करणाऱ्या नाशिक वसंत व्याख्यानमालेचे कार्याध्यक्ष पद देखील झेंडे यांनी भूषविले होते.

भद्रकाली मार्केट परिसरात अत्यंत गरीब परिस्थितीत वाटचाल करणाऱ्या झेंडे यांनी लहानपणी मोहन मास्तर तालीम येथे व्यायाम करून शरीर कमावले आणि अनेक कुस्त्यांचे फडदेखील गाजविले. लोकरंजन कलाकेंद्राची स्थापना करून अनेक नाट्य कलावंतांना घडविण्याचे काम केले. लहानपणी विविध मेळयांमध्ये सहभागी होऊन झेंडे यांनी रंगमंच देखील गाजविला. लोकहितवादी मंडळ, कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाईंड यासारख्या असंख्य सामाजिक संस्थांशी झेंडे यांचा निकटचा संबंध होता. आण्णा अशी ओळख असलेल्या झेंडे यांनी नाशिकच्या चौकांचा इतिहास हे संदर्भ कोष ठरलेले पुस्तक देखील लिहिले. लोकशाहीर गजाभाऊ बेणी आणि मित्रमंडळींच्या सहकार्याने झेंडे यांनी १९६१ साली नाशिकच्या शिवाजी उद्यानामध्ये मास्टर दिनानाथ मंगेशकर यांचा अर्धपुतळा उभारला होता. तेव्हापासून त्यांचे लता मंगेशकर आणि कुटुंबियांशी जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले होते. सुप्रसिद्ध संगीतकार कल्याणजी आनंदजी, बिनाका गीतमालाचे प्रसिद्ध निवेदक अमीन सायानी यांसह अनेक दिग्गजांशी झेंडे यांचे घरोब्याचे संबंध होते. नाशिकच्या सहा कुंभमेळ्यांचे ते साक्षीदार होते. झेंडे यांच्या निधनामुळे समाजातील विविध स्तरातील नागरिकांनी शोक व्यक्त केला आहे. अंत्यविधी प्रसंगी माजी मंत्री बबनराव घोलप, माजी महापौर दशरथ पाटील,ओबीसी महामंडळाचे माजी अध्यक्ष कैलास कमोद, सावाना अध्यक्ष दिलीप फडके, वसंत व्याख्यानमालेचे अध्यक्ष श्रीकांत बेनी, माजी नगरसेवक नाना महाले, पद्माकर पाटील, साहित्यिक मुक्तेश्वर मुनशेट्टीवार, माजी नगराध्यक्ष हरिश्चंद्र शेलार गणेश बर्वे, संजय करंजकर सोमनाथ मुठाळ, प्रशांत कापसे,देवदत्त जोशी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक व मित्र परिवार उपस्थित होता.

## दहशतवाद्यांना धडा शिकवणे आमचा धर्म

झाला. ही हिंसा नाही अहिंसा आहे. अहिंसा आपला धर्म आहे. पण अत्याचार करणाऱ्याला धर्म शिकवणे अहिंसाच आहे. आम्हाला आमच्या शेजारील देशाचे नुकसान करायचं नाही. यानंतरही कोणी चुकीच्या रस्त्याने जाताना दिसले तर राजाचे कर्तव्य प्रजेचे रक्षण करणे आहे. हा हल्ला धर्म आणि अधर्म यांच्यामधील लढाई आहे, याची आठवण करून देतो. लोकांना धर्माबद्दल विचारण्यात आले आणि नंतर त्यांना मारण्यात आले. हिंदू असे कधीच करणार नाहीत. हे आपले स्वरूप नाही. द्वेष आणि शत्रूत्व जसे आपल्या संस्कृतीत नाही. तसेच शांतपणे नुकसान सहन करणे हे ही आपल्या संस्कृतीत नाही. आपल्या सर्वांच्या हृदयात वेदना आहेत. आपण सारे संतापलो आहोत. वाईटाचा नाश करण्यासाठी आपल्याला आपली ताकद दाखवावी लागेल रावणाने आपला विचार बदलण्यास नकार दिल्याने त्याला रामाने मारले. पण त्यालाही सुधारण्याची संधी देण्यात आली. त्याने सुधारणा केली नाही तेव्हा त्याला मारण्यात आले. मोहन भागवत यांनी पहलगाम हल्ल्यावर आम्हाला कठोर उत्तराची अपेक्षा असल्याचे म्हटले आहे. खऱ्या अर्थाने अहिंसक व्यक्तीनेही बलवान असले पाहिजे. ताकद नसेल तर पर्याय नाही पण जेंव्हा ताकद असेल तेंव्हा गरज पडेल तेव्हा ती दिसली पाहिजे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

# नांदगाव-मनमाडमध्ये महायुतीत त्रिकोणी संघर्षाची नांदी

( पान १ वरून )

झालो होतो, असेही त्यांचे म्हणणे आहे. त्यांचा राजीनामा पक्षाने स्वीकारला नसल्याचे छगन भुजबळ यांचेही म्हणणे आहे. यावरुन त्यांचे पक्षात पुनर्वसन करण्याचे प्रयत्न होत आहेत. दुसरीकडे समीर भुजबळ हे पक्षात आहेत की नाहीत? हे अजित पवार यांनी स्पष्ट केले पाहिजे. अजित पवार तसे स्पष्ट करत नसले, तरी मंत्रीपद न मिळाल्याने आधीच नाराज असलेल्या भुजबळांना ते नाराज करण्याची शक्यता कमीच दिसते.

**धात्रकांचे भाजपाला बळ**

शिवसेना-उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे शिबिर नाशकात झाल्यानंतर काही दिवसांतच ग्रामीण जिल्हा प्रमुख गणेश धात्रक पक्ष यांनी पक्ष सोडला. ते पक्षाला सोडचिठ्ठी देण्याची चर्चा तशी होतीच. त्यांनी भाजपात प्रवेश करुन सुहास कांदे यांनाही धक्का दिला आहे. ठाकरे गटाचे नेते, कार्यकर्ते सहसा शिंदे गटात प्रवेश करतात. परंतु धात्रक यांनी भाजपात प्रवेश केला. या प्रवेशाने भाजपाला मोठे बळ मिळाले आहे. नांदगाव नगरपालिका आणि पंचायत समिती तसेच मनमाड नगरपालिकेत आतापर्यंत भाजपाचा एकही सदस्य नाही. गणेश धात्रक सलग सहा वेळा नगरसेवक झालेले आहेत. त्यांच्यासोबत बाजार समितीचे माजी सभापती दीपक गोगड, माजी नगरसेवक ड सुधाकर मोरे, प्रमोद पाचोरकर, संजय मिश्रा, लियाकत शेख, अकबर सोनावाला, संतोष जगताप, चंद्रकांत परब, आनंद बोथरा, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अशोक जाधव आदींनी प्रवेश केल्याने भाजपाचे बळ नक्कीच वाढले आहे. या बळावर भाजपा सुहास कांदे यांना आव्हान देऊ शकेल. महायुतीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत जागावाटपावरुन फिस्कटले, तर सुहास कांदे यांना भुजबळ यांचा सामना करताना भाजपाशीही दोन हात करावे लागतील.

**महायुतीतच चढाओढ**

महाविकास आघाडीचा घटक पक्ष असलेल्या काँग्रेसचे बहुतेक नेते कांदे यांच्यासोबत गेले आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाचे नांदगावमध्ये फारसे नेटवर्क राहिलेले नाही. गणेश धात्रक यांनी पक्ष सोडल्याने ठाकरेंची शिवसेना कमकुवत झाली आहे. अशा परिस्थितीत नांदगाव आणि मनमाडमध्ये आपलेच वर्चस्व असल्याचे सिद्ध करण्यासाठी एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार कांदे, सारी ताकद पणास लावण्यास सज्ज झाले आहेत. अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या माध्यमातून समीर भुजबळ हेही पुन्हा सक्रिय होत आहेत. गणेश धात्रक यांच्या बळावर भाजपाही आपली ताकद वाढविण्याच्या प्रयत्नात आहेत. ही परिस्थिती लक्षात घेता महायुतीतच त्रिकोणी संघर्ष होण्याची चिन्हे आहेत.

# २०१९ च्या बॅचचे १२० विद्यार्थी झाले एमबीबीएस

**नाशिक :** मराठा विद्या प्रसारक समाजाच्या आडगाव येथील डॉ. वसंतराव पवार वैद्यकीय महाविद्यालयातील एमबीबीएस बॅच २०१९ चा पदवीदान समारंभ हॉटेल गेट वे नाशिक येथे संपन्न झाला. पदवीदान सोहळ्यासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, सभापती बाळासाहेब क्षीरसागर, शिक्षणाधिकारी डॉ. ज्ञानेश्वर लोखंडे, अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे व विविध विभाग प्रमुखांची उपस्थिती होती. या पदवीदान सोहळ्यामध्ये एकूण १२० विद्यार्थ्यांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाची एमबीबीएस ही पदवी प्रदान करण्यात आली.

महाविद्यालयातील इंटर्नशिप विभागाच्या प्रमुख प्रा. डॉ. सुनिता पवार यांनी पाहुण्यांचे स्वागत तर अधिष्ठाता डॉ. सुधीर भामरे यांनी पदवीप्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक करत वैद्यकीय व्यवसायाची मूल्ये प्रामाणिकपणे आणि समर्पणाने जपण्याचे आवाहन केले. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. चारुदत्त शिंदे यांनी विद्यार्थी आणि पालकांचे अभिनंदन करून पदवी घेऊन बाहेर पडताना रुग्णसेवा देताना करुणा आणि सचोटीने समाजाची सेवा करण्याचे सांगत शुभेच्छा दिल्या. ॲड. नितीन ठाकरे, बाळासाहेब क्षीरसागर, डॉ. अशोक वनकुंद्रे यांनीही मनोगत व्यक्त करत पदवीधर विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. एमबीबीएस २०१९ बॅचच्या विद्यार्थ्यांना यावेळी प्रमुख पाहुणे आणि विविध विभाग प्रमुखांच्या हस्ते स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र प्रदान करण्यात आली. यावेळी विभागप्रमुख प्रा. डॉ. श्रिया कुलकर्णी, प्रा. डॉ. रवींद्र सोनवणे, प्रा. डॉ. मानसी कटाळे, प्रा. डॉ. प्रीती बजाज, प्रा. डॉ. कैलास मोगल, प्रा. डॉ. निलेश चौधरी, प्रा. डॉ. सुरेखा नेमाडे, प्रा. डॉ. जितेंद्र कोडीलकर, प्रा. मिलिंद देशपांडे आदींसह विविध विषयांचे शिक्षक उपस्थित होते.

## मुक्त विद्यापीठाच्या 'यशवाणी'वर विज्ञान-गणित संकल्पना काव्यवाचन

**नाशिक :** यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या 'यशवाणी' वेबरेडिओवर विज्ञान गणितातील सुत्र संकल्पनांवर आधारित काव्याचे वाचन करण्यात आले. विद्यापीठाचे मा. कुलगुरू प्रा. संजीव सोनवणे यांच्या कल्पक मार्गदर्शनानुसार हा सहावा ऑनलाईन कार्यक्रम होता. विद्यापीठाच्या महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनातर्फे अध्यासन प्रमुख प्रा. विजयकुमार पाईकराव यांनी या कार्यक्रमाचे संयोजन केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी विज्ञान व गणितीय सूत्र-संकल्पना काव्याचे अध्यापनातील महत्व विषद केले. या कार्यक्रमात कवयित्री श्रीमती मनीषा पाटील यांनी शोध व संशोधक, जैवतंत्रज्ञान, गणितीय संच आदी तर कवी डॉ. राजेंद्र बगाटे यांनी विज्ञानाचे साक्षात्कार, विद्युत प्रभार, विज्ञान थोरवी आदी कविता सादर केल्या. विद्यापीठाच्या दृक्श्राव्य केंद्राचे प्रकाश सापनर व गिरीश गवळी यांनी या कार्यक्रमासाठी तंत्रसहाय्य केले. रसिकांना सदर कार्यक्रम आपल्या सवडीने व आवडीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून श्रवण करता येईल.

## कृषी महाविद्यालयात पदवीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**नाशिक :** विद्यार्थ्यांनी गेल्या चार वर्षांत महाविद्यालयात घेतलेले शिक्षण आणि अनुभवाचा फायदा आपल्या शेतकऱ्यांना, कृषी क्षेत्राला आणि पर्यायाने देशविकासाला हातभार लावण्यासाठी कसा होईल, याकडे लक्ष द्यावे. स्वतः च्या जीवनाचे पुस्तक भविष्यात स्वतःच्या कर्तृत्वाने लिहिले गेले पाहिजे, असे काम करा. जिद्द व चिकाटी असेल तर यशाची शिखरे गाठणे अवघड नाही, असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बापूसाहेब द. भाकरे यांनी केले. भावी आयुष्यात येणाऱ्या आव्हानांना आत्मविश्वासाने सामोरे जाण्यासाठी अनुभवाचे बोल सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना जागतिक पुस्तक दिनाच्या शुभेच्छाही दिल्या. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि अंतिम वर्षाचे विदयार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


दि.२३/०४/२०२५

**वावी पोलीस ठाण्यात बेवारस व अपघातग्रस्त वाहनांचा लिलाव**

वावी पोलीस ठाणे आवारामध्ये वर्षानुवर्षापासुन बेवारस व गुन्ह्यातील तसेच अपघातग्रस्त दुचाकी व चारचाकी वाहने मोठ्या प्रमाणात पडलेले आहेत सध्या **मा.मुख्यमंत्री सो, यांचा १०० दिवसाचा कृती आराखडा अंतर्गत** पोलीस ठाणे आवारातील निर्गती करणेबाबत मा.वरीष्ठांकडुन आदेश निर्गमीत झाले आहे. तरी वावी पोलीस ठाणे अंतर्गत व इतरत्र राहणारे वाहन मालक यांना कळविण्यात येते की, वावी पोलीस ठाणे आवारात वर्षानुवर्षापासुन पडुन असलेले बेवारस व गुन्ह्यातील तसेच अपघातग्रस्त वाहनांची आपण कागदपत्रे घेवुन येवुन कागदपत्राची पडताळणी करुन आपआपले वाहन **दि.२८/०४/२०२५** रोजी पावेतो घेवुन जाणे अन्यथा सदर वाहनांचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी ठरवुन दिलेल्या मानंकाप्रमाणे लिलाव करण्यात येणार आहे याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी सदरची माहीती सहा.पोलीस निरीक्षक गणेश शिंदे, वावी पोलीस ठाणे यांनी सांगितली आहे.

* संपर्क *
१) स.पो.नि./ गणेश शिंदे (मो.नं. 9702231818)
२) पोलीस अंमलदार इल्हे (मो.नं. 9657631837)
वावी पोलीस ठाणे



**गांवकरी Classified** जाहिरातीसाठी संपर्क 9404434628

**पाहिजेत**

राणेनगर येथील टू व्हीलर व फोर व्हीलर शोरूमसाठी CRM/ DBM रिसेप्शनिस्ट, मेकॅनिक, सर्विस ॲडव्हायझर, स्पेअर पार्ट मॅनेजर, टेलीकॉलर, हाऊस कीपिंग, ऑफिस बॉय, वॉशिंग बॉय, अकाउंटंट त्वरित पाहिजेत. **संपर्क :** ९२७२०९१४२५

---

दुकान कामासाठी मुले व मुली पाहिजे.श्री गिफ्ट ॲण्ड टॉईज, कानडे मारुती लेन, नाशिक. **संपर्क-** ९८९००१३१३६

---

गंगापूररोड, पाईपलाईनरोडयेथील कन्स्ट्रक्शन कंपनीला कार्यालयीन कामकाजाकरिता १० वी-१२ वी पास-नापास ऑफिसबॉय पाहिजे. ८२३७३११२११

---

नामांकित बँकेच्या वसुलीसाठी डीआरए परीक्षा पास झालेले महिला व पुरुष उमेदवार पाहिजेत: संपर्क ९९६०३५०००५

**पाहिजेत**

महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त कंपनीसाठी,आडगाव विंचूर गवळी शिवार नाशिक येथे कायमस्वरूपी कामासाठी फील्ड ऑफिसर पाहिजे. शिक्षण किमान १० वी पास, वय २१ ते ६५. **संपर्क** ९२२०२४२५५५

---

कोहिनूर ज्वेलर्स, पखाल रोड, अशोका मार्ग, १२ वी पास मुलगी पाहिजे. **संपर्क-**९८६०१३६५३६

**महिला व पुरूष पाहिजेत**

Draftsman part time आटोक्याड नॉलेज-१, ऑफिस कामासाठी-४, कोर्ट व महापालिकेच्या कामासाठी-२, ड्रायव्हर-१, वकील पार्ट टाइम-१, अकाऊंटंट पार्ट टाइम-१, भटजी देवपूजा करण्यासाठी-१ **एन.एन. असोसिएटस्**, तिसरा मजला, आय. डी.बी.आय. बँकेच्यावर, साठे बाग, एम.जी.रोड, नाशिक. वेळ- सकाळी १२ ते ५. संपर्क- 8668862801

**विकणे आहे**

शरदचंद्र पवार फ्रुट मार्केट यार्डच्यामागे, विबगोर शाळा रोड, नाशिक येथील 2BHK फर्निचरनी सुसज्ज फ्लॅट त्वरित विकणे आहे. **संपर्क-** ७२०८४९८५२३

पाथर्डी फाटा, ज्ञानेश्वरनगर, साईसंकल्प बिल्डींग फ्लॅट विकणे आहे. पहिला मजला **संपर्क:** ९९७००३९०४६

**जमीन विकणे आहे**

मंजूर तालुका कोपरगाव, जिल्हा अहिल्यानगर येथे जमीन विक्री करणे आहे, शिर्डी-लासलगाव हायवेजवळ/गोदावरी गंगा नदीचे पासून १.५ किलो मीटर अंतरावर ८ एकर विहीर बागायती जमीन विक्री करणे आहे. गट नंबर २८४/२,३,४,५ शिर्डीपासून २८ किलोमीटर मागे. **संपर्क-** ८७८८०९२४१५


# शेतकरी-व्यापाऱ्यांसाठी विकसित केली 'ॲग्रीबिड ट्रॅकर' प्रणाली..!

## मविप्र राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निकच्या विद्यार्थिनींचे अनोखे संशोधन

**नाशिक :** शेतकऱ्यांच्या शेती मालाला खुली, निष्पक्ष आणि प्रभावी बाजारपेठ मिळावी, योग्य बाजारभाव मिळावा आणि शेतकऱ्यांची फसवणूक टळावी या उद्देशाने मविप्र संस्थेच्या राजर्षी शाहू महाराज पॉलिटेक्निकमधील डिप्लोमाच्या तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनींनी ॲग्रीबिड ट्रॅकर ऑनलाइन प्रणाली विकसित केली आहे. या प्रणालीद्वारे शेतकऱ्यांना घरबसल्या लिलावामध्ये सहभागी होता येणार असून, स्वतंत्रपणे बोलीदेखील लावता येणार आहे. त्यामुळे ही प्रणाली शेतकरी आणि व्यापाऱ्यांना जोडणारा एक महत्वाचा दुवा ठरणार आहे. आजच्या बाजारपेठांमध्ये कृषी उत्पादने खरेदी आणि विक्री करण्याच्या पारंपरिक पद्धती शेतकरी आणि व्यापारी या दोघांसाठीही अनेकदा अडचणीच्या ठरतात. सध्याच्या बाजार यंत्रणेत बाजारपेठेतील मर्यादित उपलब्धता आणि पारदर्शकतेचा अभाव यासारख्या त्रुटींमुळे कृषी मालाच्या खरेदी-विक्रीमध्ये अडथळा निर्माण होतो. शिवाय, शेतकऱ्यांना अनेकदा त्यांचा माल ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी संघर्ष करावा लागतो. साहजिकच शेतकऱ्यांना त्यांच्या कृषिमालाचा योग्य भाव मिळत नाही आणि बाजारपेठेत अकार्यक्षमता निर्माण होते. 'ॲग्रीबिड ट्रॅकर' या ऑनलाइन प्रणालीच्या माध्यमातून थेट लिलावाद्वारे शेतकरी आणि व्यापारी जोडले जाणार आहेत.



**युरेका आयडिया पिचिंग' स्पर्धेत प्रथम**

या प्रकल्पासाठी तृतीय वर्षाच्या रिया भामरे, सिद्धी बागूल, सिद्धी चोथे व अनुश्री जाधव या विद्यार्थिनींनी साकारलेल्या प्रकल्पासाठी प्राचार्य प्रशांत पाटील, प्रकल्प समन्वयक रचना पाटील, विभागप्रमुख प्रसाद बोरस्ते यांचे मार्गदर्शन लाभले. पीव्हीजी कॉलेजमध्ये आयोजित 'युरेका आयडिया पिचिंग' स्पर्धेमध्ये ॲग्रीबिड ट्रॅकरने प्रथम क्रमांक मिळवला. तसेच या विद्यार्थिनींना आयआयटी बॉम्बे येथे त्यांचा प्रकल्प सादर करण्याची संधी मिळाली आहे.


**जाहीर नोटीस / समन्स**

**ॲड. सी. एस. शिरसाट**
आर. टी. एस. अपील ७१/२४

**मे. उपविभागीय अधिकारी दिंडोरी भाग दिंडोरी यांचे न्यायालय**

**श्रीमती राधाबाई रामचंद्र वाघमारे ....वादी**

**विरुध्द**

**श्री. चिंतामण हरी पवार व इतर ...प्रतिवादी**

याकामी अपीलकार यांनी मौजे फणसपाडा, ता. पेठ, जि. नाशिक येथील **शेतमिळकत गट नं. ५५, यासी क्षेत्र ०० हे ३४.४० आर, पो.ख. ०० है ०६.१० आर आकार रू. ००१.३१ यासी चतुः सिमा गावनकाशाप्रमाणे...** या मिळकतीवर मा. तहसीलदार साहेब पेट यांचेकडील रस्ता केस नं. ५/२२ मधील दि २८/१२/२०२३ रोजीच्या आदेशा विरूद्ध अपिलकार यांनी नाराज होवुन मे उपविभागीय अधिकारी साहेब, दिंडोरी न्यायालयात अपील दाखल केले आहे.

सदरील अपीलात **सामनेवाले क्र. २ श्री. परशराम हरी पवार, सामनेवाले क्र. ३ श्री. मनोहर हरी पवार, सामनेवाले क्र. ४. महादु हरी पवार, सामनेवाले क्र. ५ श्रीमती तुळसाबाई हरी पवार, सामनेवाले क्र. १६ रघुनाथ काशिराम बाम्हणे, सामनेवाले क्र. १८ श्रीमती लंका काशिराम बाम्हणे, सामनेवाले क्र. १९ श्रीमती छबीबाई काशिराम बाम्हणे, सामनेवाले क्र. २६ श्रीमती अनिबाई चंदर जामकर, अ.क्र. २ ते ५ व १६, १८, १९, २६ रा. फणसपाडा (को) ता. पेठ, जि. नाशिक, सामनेवाले क्र. २७ श्री. तानाजी हरी नामाडे, सामनेवाले क्र. २८ सुरेश हरी नामाडे अ.क्र. २७ व २८ रा. महाराष्ट्र शासन नर्सरी गंगापुर कॅनल रोड, मु.पो मखमलाबाद ता. जि. नाशिक, सामनेवाले क्र. २९ माया राहुल भावसार, रा. महाले चाळ, नवनाथ नगर पेठ रोड, नाशिक, ता. जि. नाशिक** यांना समन्स / नोटीस बजावणी तपास करुनही झालेली नाही. त्यामुळे सदरील सामनेवाले यांना सदरील जाहीर नोटीसीने कळविण्यात येत की, त्यांनी वरील मे. कोर्टात **दिनांक ०८/०५/२०२५** रोजी सकाळी ०३.०० वाजता स्वतः अगर वकिलामार्फत हजर राहून पुराव्यासह आपली बाजु मांडावी अन्यथा आपल्या विरुध्द एकतर्फा कामकाज चालविण्यात येवन पुढील हुकुम करण्यात येईल.

ही जाहीर नोटीस **दि. २५/०४/२०२५** रोजी माझे सही व मे. न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली आहे.

**ठिकाण :- दिंडोरी**
**दिनांक :- २५/०४/२०२५**

शिक्का

**सही/-**
**(डॉ. आप्पासाहेब शिंदे)**
**उपविभागीय अधिकारी**
**दिंडोरी उपविभाग दिंडोरी**

## महत्त्वाचे

### अंबडमध्ये हॉटेलसमोर हाणामारी
चार जणांविरोधात गुन्हा दाखल

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

अंबड परिसरातील हॉटेल महाराजाच्या बाहेर सिगारेट व लायटरच्या पैशांवरून वाद निर्माण होऊन झालेल्या हाणामारीत एका तरुणास गंभीर मारहाण करण्यात आली आहे. हॉटेल मालक, मॅनेजर, वॉचमन व टपरी चालक यांनी संगनमताने ही मारहाण केल्याची फिर्याद अंबड पोलीस ठाण्यात दाखल झाली असून, चारही आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की ही दिनांक २४ एप्रिल २०२५ रोजी रात्री ११:३० वाजता घडली. फिर्यादी अक्षय मधुकर पवार (वय २५, रा. दत्त नगर, अंबड) यांनी दिलेल्या माहितीनुसार, सिगारेट व लाईटरच्या पैशांवरून वाद निर्माण झाल्यानंतर हॉटेल मालक सूर्या महापात्रो याने 'तू जास्त भाई झाला का?' असे म्हणत, फिर्यादीच्या चारचाकी वाहनातील जॅक पाना काढून त्यांच्या हातावर व पाठीवर मारहाण केली. यावेळी त्यांचे मित्र सर्जेराव मोरे, वैदांत रोकडे व बाळू मोरे हे सोबत होते. त्यांनाही हॉटेल मॅनेजर, वॉचमन व टपरी चालक यांनी बेदम मारहाण केली. या घटनेत सर्वांना दुखापत झाली असून, फिर्यादीस गंभीर जखम झाली आहे.या प्रकरणी अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी पुढील तपास एमआयडीसी चुंचाळे पोलीस चौकीचे प्रभारी पोलिस निरिक्षक मनोहर कारंडे कारंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेवाळे करीत आहेत पुढील कारवाई सुरू आहे.

### गौतम गोदावरी प्रतिष्ठानतर्फे पुरस्कार जाहीर

**नाशिक :** महर्षी गौतम गोदावरी वेद विद्या प्रतिष्ठानतर्फे दक्षिणाम्नाय श्री शृंगेरी शारदापीठाधीश्वर जगदगुरू शंकराचार्य श्री भारती तीर्थ महास्वामी यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त दिनांक ३० रोजी पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे. पाठशाळेच्या वतीने धर्मगुरू स्वामी श्री अमृताश्रम महाराज यांचे प्रवचन व समाजामधील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान सोहळा होणार आहे. कुर्तकोटी शंकराचार्य जुना गंगापूर नाका नाशिक सभागृह या ठिकाणी हा कार्यक्रम होत आहे. यावेळी श्रीमती लीना हुन्नरगीकर नाशिक (संस्कृत सेवाव्रती पुरस्कार), हरिश्चंद्र महाराज पंडित गुरुजी नाशिक ,(वारकरी जीवनगौरव पुरस्कार) समीर शेटे (समाजसेवा व्रती पुरस्कार) नाशिक, ज्योतिषाचार्य प्रकाश भूधर (ज्योतिष जीवनगौरव पुरस्कार) शुभदा पुराणिक चाळीसगाव ( संस्कृत सेवा जीवनगौरव पुरस्कार) यांचा सन्मान करण्यात येणार आहे. स्वामी अमृताश्रम महाराज यांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण होणार आहे. यावेळी नाथ परंपरा व परंपरेचा विकास या विषयावर त्यांचे प्रवचन होणार आहे. प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय संस्कृत विश्वविद्यालय नाशिक परिसरचे डायरेक्टर राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त डॉ. नीलाभ तिवारी, शृंगेरी मठाचे व्यवस्थापक राम गोपाल अय्यर उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन वेदाचार्य रवींद्र पैठणे गुरुजी यांनी केले आहे.

### विषारी औषध फवारणीमुळे लाखोंचे नुकसान



**देवळाली कॅम्प :** लहवित येथील वाडीच्या मळे परिसरातील अज्ञात व्यक्तीने मक्याच्या पिकावर विषारी औषधची फवारल्याने पिके उद्ध्वस्त झाले. शेतकरी तुकाराम ढेरिंगे यांच्या एक एकर मक्यावर अज्ञात व्यक्तीने गुरूवारी रात्री ते शुक्रवारी सकाळ दरम्यान राऊंडअप मारून अंदाजे एक लाख रूपयांचे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे. ढेरिंगे यांच्या मळ्यात यापूर्वीही असच खोडसाळपणा करत कोणीतरी पाण्याची पाइपलाइन तोडून नुकसान केले होते.अज्ञात व्यक्ती विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज देण्यात आला असून, पोलिसांनी कारवाई करण्याची मागणी परिसरातील शेतकरी करू लागले आहे.

### मुंडे अभियांत्रिकी महाविद्यालयात ए.आय कार्यशाळा

**नाशिक :** येथील के .व्ही.एन.नाईक शिक्षण संस्थेच्या लोकनेते गोपीनाथजी मुंडे अभियांत्रिकी महाविद्यलयात ए.आय व जनरेटीव मॉडेल्स या विषयावर २१ ते २५ एप्रिल दरम्यान राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात १५० हून अधिक शिक्षकांनी सहभाग घेतला, ज्यात ए.आय आणि जनरेटिव्ह मॉडेल्स चे शैक्षणिक , व्यावसायिक, औद्योगिक क्षेत्रातील महत्व यावर सविस्तर चर्चा झाली. कार्यक्रमाच्या उदघाटन सत्रात प्रमुख वक्ते म्हणून पुणे विद्यापीठाच्या सायन्स ॲण्ड टेक्नोलोंजि विभागाचे डीन डॉ.प्रमोद पाटील उपस्थित होते. डॉ.पाटील यांनी आर्टिफिशियल इंटेलिजन्सच्या तंत्रज्ञानावर प्रकाश टाकला.तसेच या तंत्रज्ञानाच्या शैक्षणिक वापराचे विविध पैलू सुस्पष्टपणे स्पष्ट केले आणि जनरेटिव्ह मॉडेल्स टूल्सचा शिक्षकांच्या कामकाजात कसा उपयोग होईल यावर मार्गदर्शन केले.इतर सत्रात डॉ. परीक्षित महल्ले, डॉ.प्रमोद बिडे , कल्याण दाणी,योगेश जाधव,स्वप्नील पवार यांनी आर्टिफिशिअल इण्टेलिजन्स तंत्रज्ञानाच्या विविध पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष कोंडाजीमामा आव्हाड उपाध्यक्ष उदय घुगे,सरचिटणीस हेमंतअप्पा धात्रक, सहचिटणीस दिगंबर गिते यांच्यासह विश्वस्त व संचालक यांनी कार्यशाळेला शुभेच्छा दिल्या तसेच भविष्यात असेच नाविन्यपूर्ण उपक्रम घ्यावेत यासाठी प्रोत्साहन दिले.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. के.व्ही. चंद्रात्रे यांनी या कार्यक्रमाचे महत्व स्पष्ट केले. कार्यशाळेचे यशस्वी नियोजन डॉ. विशाल पाटील आणि डॉ.बाजीराव शिरोळे यांनी केले त्यांना महाविद्यालयाच्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट सेल व आय.आय.सी सेल चे सहकार्य मिळाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.एच. आर. कुलकर्णी, डॉ.आर.आर. चकुले,डॉ सारिका पाटील, डॉ.डी.एस.पाटील , डॉ. योगेश पवार, डॉ.बाविस्कर आणि प्रा.श्रीकांत पवार यांनी परिश्रम घेतले.

### धामोरीत श्री गोरोबा काका पुण्यतिथी साजरी

**धामोरी :** दत्तात्रय घुले कोपरगाव तालुक्यातील धामोरी येथील श्री संत शिरोमणी गोरोबा काका मित्र मंडळाच्या संयुक्त विद्यमाने आज धामोरी येथे श्री संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या ७०८ व्या पुण्यतिथी निमित्ताने सकाळी ८ ते १० या वेळेत भव्य दिव्य पालखी प्रतिमा मिरवणूक सोहळ्याचे फटाक्यांचा आतिशबाजी करत आयोजन करण्यात आले होते. यावेळी श्री संत शिरोमणी गोरोबा काका मंदिरापासुन धामोरी बस स्टँड परिसर ,श्री संत सावता महाराज मंदिर,श्री भैरवनाथ महाराज मंदिर,श्रीराम मंदिर,श्री खंडेराव महाराज मंदिर अशा विविध भागातून भव्य दिव्य अशी पालखी मिरवणुक काढण्यात आली होती. तसेच या कार्यक्रम आयोजन प्रसंगी १० ते १२/३० या वेळेत वाणीभुषण हरिभक्त परायण चेतनजी महाराज बोरसे (मालेगावकर) यांचे सुश्राव्य असे कीर्तन सोहळ्याचे ही आयोजन करण्यात आले आहे. तसेच महाप्रसादाचे ही आयोजन करण्यात आले होते.या वेळी धामोरी व परिसरातील

# जीएसटी अभय योजनेस मुदतवाढ द्या

## निमा अध्यक्ष आशिष नहार यांचे केंद्रीय अर्थमंत्र्यांना निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

**उद्योजकांच्या हिताच्यादृष्टीने जीएसटी अभय योजनेची कालावधी तीन महिन्यांनी वाढवून मिळावी अशा आशयाची मागणी करणारे निवेदन नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (निमा) चे अध्यक्ष आशिष नहार यांनी केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांना दिल्ली येथे प्रत्यक्ष भेटीच्या वेळी दिले.**

जीएसटी अभय योजनेची अंतिम मुदत ३१ मार्च २०२५ पर्यंत होती. मात्र ती संपली आहे. सीजीएसटी कायद्याच्या कलम १२८ए अंतर्गत सुरू केलेली ही माफी योजना गत कर कालावधीसाठी जीएसटीआर-३८ न भरलेल्या करदात्यांना दिलासा देण्यासाठी सरकारचा एक प्रशंसनीय उपक्रम होता.त्यामुळे अनुपालनाचा भार कमी होण्यास मदत झाली.

विशेषतः सीजीएसटी कायद्याच्या कलम ७३ अंतर्गत व्याज आणि दंड माफ झाल्याने अनेक थकबाकीदारांना त्यांचे फायलिंग नियमित करता आले आणि त्यांचे आर्थिक व्यवहार पुन्हा रुळावर येऊ शकले. मोठे तसेच लघु व मध्यम उद्योजकांनी या योजनेचे स्वागत केले आहे आणि त्याचे फायदे घेण्यासाठी सक्रियपणे काम केले. तथापि गत सामंजस्यांमधील गुंतागुंत, कागदपत्रांच्या आव्हानांमुळे लघु आणि मध्यम उद्योजक अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जात आहेत. अजूनही अनेक जण त्यातून सावरलेले नाहीत.त्यामुळे अनेकांना निर्धारित अंतिम मुदतीपर्यंत आवश्यक प्रक्रिया आणि देयके पूर्ण करता आली नाहीत. वरील बाबी लक्षात घेता केंद्रीय वित्त खात्याने जीएसटी माफी योजनेची अंतिम मुदत किमान ३ महिन्याने वाढविण्याचा विचार करावा,अशी आमची आपणास कळकळीची विनंती असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

जीएसटी माफी योजनेची मुदत वाढल्यास सामान्य करदात्यांना मोठा दिलासा मिळेल.सर्वच अनुपालन करू इच्छितात परंतु औपचारिकता पूर्ण करण्यासाठी त्यांना थोडा जास्त वेळ लागतो. मुदतवाढीमुळे योजनेचा सकारात्मक परिणाम आणि महसूल प्राप्ती वाढेल असे निवेदनात शेवटी नमूद करण्यात आले आहे.

आपल्या मागणीबाबत जातीने लक्ष घालून जीएसटी कौन्सिलकडे ते विचारार्थ पाठविले जाईल असे आश्वासन केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी दिल्याचे नहार यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.




# पहलगाम येथील हल्ल्याचा देवळाली कॅम्प येथे निषेध

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**

पहलगाममध्ये झालेल्या भ्याड दहशतवादी हल्ल्याचा येथील ग्रामस्थांसह राजकीय पक्षांच्या पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिकांनी छत्रपती शिवाजी चौकात एकत्र येत निषेध नोंदविला. या हल्लयात मृत पावलेल्या भारतीय पर्यटकांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

नागरिकांनी भारत माता की जय, वंदे मातरम, पाकिस्तानचा धिक्कार असो, पाक मुर्दाबाद, अशा घोषणांनी चौक दणाणून सोडला. या हल्ल्यास जबाबदार असलेल्या अतिरेकी संघटनांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. या आंदोलनात मधुकर कापसे, सुभाष जाधव, संग्राम गायकवाड, मनोज कुवर, काकासाहेब देशमुख, विक्रम सोनवणे, प्रसाद आडके, विशाल बलकवडे, अनाजी कापसे, नीलेश हासे, राजू ओहळ, पांडुरंग ओहोळ, संभाजी देशमुख आदींसह नागरिक उपस्थित होते.



# ग्रंथ तुमच्या दारी आता अमेरिकेतील फिलाडेल्फियात

**नाशिक : प्रतिनिधी**

कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे वाचन संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी आणि मराठी साहित्याचा गंध जगभर दरवळावा, या उद्देशाने वाचकांसाठी मराठी दर्जेदार साहित्याच्या विविधतेने नटलेली ग्रंथपेटी उपलब्ध करून देण्यासाठी योजनेचे प्रणेते विनायक रानडे यांच्या संकल्पनेतून 'ग्रंथ तुमच्या दारी' ही वाचकप्रिय अभिनव योजना सुरू केली.

आजमितीस जगभरातील १६ देशात विस्तारलेल्या या योजनेद्वारे अंदाजे ४ कोटींहून अधिक मूल्य असलेली अमूल्य ग्रंथसंपदा वाचनासाठी उपलब्ध होत आहे. मागील महिन्यात अमेरिकेतील फिलाडेल्फिया शहरातील पुलस्ती चौधरी यांनी विनायक रानडे यांच्याशी संपर्क साधून या योजनेची विस्तृत माहिती घेतली. आणि फिलडेल्फिया येथे मराठी ग्रंथसंपदा वाचनासाठी उपलब्ध होण्यासाठी पुढाकार घेतला. अल्पावधीतच फिलाडेल्फिया येथील मराठी साहित्यावर प्रेम करणारी अनेक वाचक कुटुंबे या योजनेत सहभागी झाले आहेत. नाशिकमधील मीरा तुषार शिंगोटे यांच्या स्नुषा शिवानी रत्नपारखी-शिंगोटे यांनी हिरीरीने सहभागी होऊन प्रत्यक्ष ग्रंथ पेट्या उपलब्ध होण्यासाठी मोलाची मदत केली. अर्थातच कुसुमाग्रज प्रतिष्ठानसोबत बऱ्याच वर्षापासून जोडल्या गेलेल्या नाशिकच्या मीरा शिंगोटे यांनीही सक्रिय साथ दिली. सर्व सहभागी वाचक कुटुंब यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्यामुळे मोठ्या वाचकांसाठी १९ ग्रंथ पेट्या आणि त्यासोबतच बाल वाचकांमध्ये वाचन संस्कृती रुजविण्यासाठी नाशिकच्या अशोका ग्रुपचे संचालक संजय लोंढे यांच्या देणगीतून पुरस्कृत ४ बाल ग्रंथपेट्या कुसुमाग्रज प्रतिष्ठानद्वारे फिलाडेल्फिया येथे रवाना झाल्या.

# हिरे महाविद्यालयात इनोफेस्ट स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**नाशिक : प्रतिनिधी**

लोकनेते व्यंकटराव हिरे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, पंचवटी, नाशिक येथे लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित इनोफेस्ट हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.



प्राचार्य डॉ. बी. एस. जगदाळे यांच्या अध्यक्षतेखाली व प्रमुख अतिथी म्हणून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य व के. टी. एच. एम. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संपत काळे व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य व मालेगाव कॅम्प फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र भांबर यांच्या हस्ते उदघाटन झाले. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राजेंद्र भांबर यांनी देखील संशोधनाचे महत्त्व व विद्यार्थ्यांना नवनवीन संशोधन करावे, याविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. टी. बी. पवार यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन डॉ. मनीषा गायकवाड यांनी केले. आभार डॉ. नूतन सदगीर यांनी केले. या कार्यक्रमासाठी परीक्षक म्हणून डॉ. महेंद्र शिंदे, डॉ. अतुल बेलारे, डॉ. मेश्राम, डॉ. राजेंद्र झोळेकर, डॉ. श्रीराम मांजरेकर उपस्थित होते. लोकनेते व्यंकटराव हिरे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय पंचवटी नाशिक येथे लोकनेते व्यंकटराव हिरे यांच्या जयंतीनिमित्त आयोजित इनोफेस्ट २०२५ संशोधन स्पर्धेचा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. संस्थेचे समन्वयक डॉ. अपूर्व हिरे व प्रमुख मान्यवरांच्या उपस्थित झाला. याप्रसंगी डॉ. हिरे यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतामध्ये या संशोधन स्पर्धेमध्ये भाग घेतलेल्या ३०० विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून विद्यार्थ्यांना संशोधनासाठी तत्पर राहण्याचे व मोठे स्वप्न पाहण्याचे आवाहन केले. समन्वयक डॉ. टी. बी. पवार यांनी आपल्या मनोगतात इनोफेस्ट २०२५ संशोधन स्पर्धा आयोजनामागील हेतू व उद्देश स्पष्ट केला. या फेस्टिवलचे परीक्षक म्हणून डॉ. महेंद्र शिंदे डॉ. अतुल बेलारे, डॉ. मेश्राम डॉ. राजेंद्र झोळेकर, डॉ. श्रीनाथ मांजरेकर यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. सूत्रसंचालन डॉ. नेरकर या आभार प्रदर्शन डॉ. नूतन सदगीर यांनी केले. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थी उपस्थित होते.

# पवननगर येथे विद्यालयात विद्यार्थिनींमध्ये फ्री स्टाइल

## शालेय परिसरात गोंधळ; कबड्डी स्पर्धेनंतर निर्माण झालेल्या वैमनस्याचे हिंसक रूप

**सिडको : विशेष प्रतिनिधी**

सिडको परिसरातील पवननगर येथील एका खासगी शैक्षणिक संस्थेच्या विद्यालयात दोन विद्यार्थिनी गटांमध्ये फ्री स्टाइल हाणामारी झाल्याची खळबळजनक घटना घडली आहे.

शाळेच्या प्रांगणात आयोजित कबड्डी स्पर्धेनंतर निर्माण झालेल्या वादाचे पर्यवसान थेट शारीरिक मारहाणीत झाल्याने परिसरात काही वेळ गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, कबड्डी स्पर्धेत एका गटातील विद्यार्थिनीने उत्कृष्ट कामगिरी करत अव्वल क्रमांक पटकावला. मात्र या विजयामुळे दुसऱ्या गटातील विद्यार्थिनींनी नाराजी व्यक्त करत दोन दिवसांनी पेपर सुटल्यावर मुद्दाम कुरापत काढून संबंधित विद्यार्थिनीवर हल्ला चढवला. पाहता पाहता दोन्ही गटांमध्ये जोरदार मारहाण सुरू झाली. या झटापटीचे दृश्य पाहण्यासाठी शाळेच्या प्रांगणात विद्यार्थ्यांची मोठी गर्दी जमली होती.या फ्री स्टाइल हाणामारीचे येणाऱ्या जाणा-यांनी मोबाइलद्वारे चित्रीकरण करुन सोशल मीडियावर टाकल्यानंतर खरा काय तो प्रकार उघडकीस आला आहे

दरम्यान, या घटनेमुळे शाळेतील शिस्त व सुरक्षिततेबाबत गंभीर प्रश्नचिन्हं उपस्थित झाले आहेत. काही दिवसांपूर्वी सिडकोतील काही शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या बॅगमध्ये धारदार शस्त्रे, फायटर आणि जाड लोखंडी कडे आढळून आल्याचे उघड झाले होते. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाढती आक्रमकता ही चिंतेची बाब ठरत आहे. या प्रकारावर शाळा प्रशासन काय भूमिका घेते आणि संबंधित विद्यार्थिनींच्या पालकांची प्रतिक्रिया काय असेल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शाळा व्यवस्थापन, शिक्षक व पालक यांनी एकत्रितपणे अशा घटनांना आळा घालण्यासाठी कठोर उपाययोजना राबवणे अत्यंत गरजेचे आहे. अन्यथा शाळेतील अनुशासन धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही.शाळा म्हणजे विद्यार्थ्यांच्या घडणीचे केंद्र असते, मात्र अशा प्रकारच्या घटनांनी शिक्षणाच्या पवित्र वातावरणावर गालबोट लागण्याची भीती व्यक्त होत आहे. यावर त्वरित कारवाई व दीर्घकालीन उपायांची आवश्यकता निर्माण झाली आहे.

# शहरातील अतिक्रमण हटविण्यासाठी खासगी ठेका देण्याच्या मनपाच्या हालचाली

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक महानगरपालिकेने अतिक्रमण विभागामध्ये कर्मचाऱ्यांची कमतरतेमुळे खासगी ठेकेदाराच्या माध्यमातून नाशिक शहरातील अतिक्रमण काढण्याकरता खासगी ठेकेदारा मार्फत अतिक्रमण काढण्याचे नियोजन महानगरपालिका करू पाहत आहे. परंतु राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंतर्गत सर्वप्रथम नाशिक शहरांमध्ये बायोमेट्रिक झालेले या हॉकर्स पथविक्रेत्यांना हॉकर्स झोन निर्माण करून देणे हे कायद्यामध्ये असतानाही तसे नाशिक महानगरपालिकेकडून न करता फक्त शहरातील अतिक्रमण नको म्हणून खासगी ठेकेदाराला ठेका देण्याचा घाट महानगरपालिकेच्या विशिष्ट अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सुरू आहे.

नाशिक शहरातील हॉकर्स पथविक्रेते यांना हॉकर्स झोन निर्माण करून दिले तर शहरांमध्ये अतिक्रमणाचा प्रश्नच उद्भवणार नाही. दुसरीकडे नाशिक महानगरपालिकेचे लाखो करोडो रुपयांचे उत्पन्नामध्ये ही वाढ मोठ्या प्रमाणात होईल परंतु महानगरपालिकेच्या उत्पन्न वाढवण्याच्या दृष्टिकोनातून महानगरपालिकेकडून पाऊल उचलल्या गेल्या पाहिजे होते तसे गेल्या काही वर्षांपासून दिसत नाही आणि महानगरपालिकेचे कोटी रुपयांचे उत्पन्न जे पथ विक्रेते यांच्या माध्यमातून मिळणार होतो त्याच्यावर महानगरपालिकेने पाणी सोडले आहे.

येत्या काळामध्ये राष्ट्रीय फेरीवाला धोरण २०१४ च्या अनुषंगाने महानगरपालिकेने लवकरात लवकर शहरातील नव्याने हॉकर्स झोनचा सर्वे करून स्थानिक भूमिपुत्र असलेले हॉकर्स पथविक्रेते यांना जागा निश्चित करून द्यावे व नाशिक शहरामध्ये २०१७ नंतर हॉकर्स बायोमेट्रिक नोंदणी झालेली नाही ती त्वरित सुरू करण्यात यावी आणि नाशिक महानगरपालिकेने अतिक्रमण विभागाचे खाजगीकरण केलं तर महानगरपालिकेच्या महसुलामध्ये वाढ न होता स्थानिक भूमिपुत्र असलेले हॉकर्स पथ विक्रेते यांच्यावर ठेकेदार मनमानी कारभाराने कर वसुली करणे आणि दादागिरी गुंडगिरी याला प्रोत्साहन मिळेल म्हणून आम्ही आपल्याला श्रमशक्ती कामगार संघटनेच्या माध्यमातून नम्र विनंती करतो की आपण या अतिक्रमण विभागाचे खाजगी ठेकेदाराला न देता सर्वप्रथम हॉकर्स झोन निर्माण करावे जेणेकरून शहरांमध्ये अतिक्रमणाचा प्रश्नच उद्भवल्या जाणार नाही, खासगीकरण केल्यास श्रासमशक्ती कामगार संघटना रस्त्यावर उतरून मोठ्या प्रमाणात आंदोलन छेडल्याशिवाय राहणार नाही

असा इशारा श्रमशक्ती कामगार संघटनेचे अध्यक्ष वसंत ठाकूर यांच्यासह. संतोष दाते, अक्षय परदेशी, संजय पारखे, धोंडीराम बोडके, दत्ता कासार, मिलिंद वाबळे, संतोष हिवाळे, देविदास वाबळे, विजय गोसावी, रणजीत परदेशी, अनिल आंबेकर, अधिपदाधिकाऱ्यांनी दिली.

### नागशेवडी येथे युवकाचा झाडावरच मृत्यू

**सुरगाणा :** नागशेवडी येथे राब भाजणी करीता शेतातील निलगिरीच्या झाडावर चढून फांद्याची कु-हाडीने छाटणी करतांना बोरगाव ते सुरगाणा या अतिउच्च दाब वीज वाहिनीवर झाडाची फांदी अडकून आलेल्या वीज प्रवाहाने शुभम भास्कर पालवा (१९) रा. नागशेवडी या युवकाचा विजेच्या तीव्र धक्क्याने साधारणपणे तीस फूट उंचीवर असलेल्या झाडावरच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना दुपारी अकरा वाजेच्या दरम्यान घडल्याची माहिती नागशेवडीचे पोलिस पाटील पंढरीनाथ पालवा यांनी दिली आहे.

# पालिकेची घडी बसविण्याचे मुख्याधिकाऱ्यांपुढे आव्हान

**देवळाली कॅम्प : प्रतिनिधी**



**भगूर येथील नगरपालिकेच्या मुख्याधिकारी म्हणून नव्याने कारभार हाती घेतलेल्या सचिन पटेल यांच्यासमोर भगूर शहराची विस्कटलेली घडी बसविण्याबरोबरच शहरातील समस्या सोडविण्याचे मोठे आव्हान त्यांच्यासमोर आहे.**

भगूर शहराचा कारभार हा गत दोन दशकानंतर प्रथमच पुरुष मुख्याधिकारी सचिनकुमार पटेल यांच्याकडे आला आहे. यापूर्वी सन २०१० पासून महिलांनीच पालिकेचे मुख्याधिकारी म्हणून काम पाहिले. परंतु प्रशासनावर पकड निर्माण करता न आल्याने पालिकेच्या कारभाराची घडी पूर्णपणे विस्कटली होती. आता पटेल यांची नियुक्ती झाल्याने येथील अतिक्रमणांसह इतर विषय देखील मार्गी लागण्याची अपेक्षा नागरिकांतून व्यक्त होत आहे.

कामकाजात पारदर्शकता आणण्याबरोबरच गेल्या काही वर्षांत येथील विकासाची गती कमालीची मंदावली आहे. त्यामुळे ॲक्शन मोडवर येण्याबरोबरच पालिकेच्या कारभारात सुधारणा व्हावी, अशी अपेक्षा स्थानिकांनी व्यक्त केली आहे. गावगाडयाची धुरा सांभाळताना जनतेच्या पायाभूत सुविधांना प्राधान्य देण्याची गरज आहे. सध्याच्या परिस्थितीत मूलभूत सुविधांची वाणवा असून, विस्कटलेली घडी सुरळीत करण्यासाठी मुख्याधिकारी पटेल यांना तारेवरची कसरत करावी लागणार असल्याच बोलले जात आहे. मुख्याधिकारी यांनी नुकताच पदभार स्वीकारून पालिकेच्या सर्व विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्याकडून आढावा घेतला. अधिकारी वर्गाला मार्गदर्शन करण्याबरोबरच पालिकेच्या कामकाजाला गती देण्याबरोबरच महसूल वाढीलाही प्राधान्य देण्याची अपेक्षा त्यांच्याकडून आहे.

गत काही काळापासून स्वातंत्र्यवीर सावरकर उद्यान, पालिकेच्या मार्फत सुरु असलेली कामे रखडलेली आहेत. मार्केट उदघाटनाअभावी बंद आहे. आठवडे बाजारात देखभाल अभावी मोठ्या प्रमाणात कचरा साचला आहे. वसुली होत नसल्याने महसूलमध्ये कमालीची घट आली आहे. पालिकेच्या मालकीच्या गाळयाचे नूतनीकरण व पोट भाडेकरू अशा विविध समस्यांनी गुरफटल्याने महसूलमध्ये घट झाली. त्यामुळे पालिकेच्या तिजोरीत खडखडाट निर्माण झाला आहे. त्याचा परिणाम कामगारांचे वेतन वेळेवर होत नसल्याची ओरड आहे. नवनियुक्त मुख्याधिकारी पटेल यांना कारभार हाकताना विविध समस्यां मार्गी लावण्याबरोबरच गावाचा विकास करण्यासाठी काही कठोर निर्णय घेणे अपेक्षित आहे. शहरातील सावरकर उद्यान, छत्रपती शिवाजी महाराज चौकातील अतिक्रमण ठेकेदाराकडून अवाजवी वसुली यावर लक्ष केंद्रीत करावे लागणार आहे. पालिकेचा आर्थिक कारभार सुधारण्याची गरज असून, पटेल यांच्याकडून पारदर्शक कारभाराबरोबरच समस्या दूर करण्याची अपेक्षा भगूरकर जनता व्यक्त करीत आहे.

## महत्त्वाचे

### वरखेडा येथे हनुमान मंदिर जीर्णोध्दार नूतन मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा

**दिंडोरी :** दिंडोरी तालुक्यातील वरखेडा येथे श्री हनुमान मंदिर जीर्णद्वार व नूतन मूर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्ताने सोमवार २८ रोजी ते सोमवार दि.५ रोजी पर्यंत अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असून बुधवार दि.३० रोजी अक्षयतृतीयेला कलशारोहण संत जनार्दन स्वामी आश्रम त्रंबकेश्वर येथील महंत रामप्रसाद गिरीजी महाराज व महंत परमेश्वर गिरीजी महाराज ओझर आश्रम तसेच महंत चरणदास महाराज श्री क्षेत्र करंजाळी (ता.पेठ) यांच्या हस्ते होणार आहे. या सप्ताह काळात विविध धार्मिक कार्यक्रम होणार असून दि. २८ रोजी श्री हनुमान मंदिर जिर्णोद्धार व प्राणप्रतिष्ठा नूतन गणपती सरस्वती तसेच प्रभु श्रीराम मंदिर,श्री विठ्ठल रुक्मिणी,प्राणप्रतिष्ठा सोहळा बुधवार दि.३० रोजी अक्षयतृतीया मुहूर्तावर आयोजित करण्यात आला आहे, याशिवाय सप्ताह काळात दिपप्रज्वलन, कलशपूजन,ग्रंथपूजन, साहित्य पूजन, ध्वजपूजन, विनापूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.सकाळी १० ते१२ वा.गाथा भजन,६ ते ७ वा. हरिपाठ,रात्री.९ ते ११ वा. हरीकीर्तन होणार आहे, या सोहळ्यामध्ये महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकार आपली हरीकिर्तने करणार असून आहे.सोमवार दि. २८ रोजी ह.भ.प.श्रावण महाराज आहिरे (कुकाणेकर),मंगळवार दि.२९ रोजी ह.भ.प.एकनाथ महाराज (चत्तर), बुधवार दि.३० रोजी ह.भ.प. विश्वनाथ महाराज वारिंगे (मुंबई), गुरुवार दि.१ रोजी ह.भ.प.बाळू महाराज गिंरगावकर (बीड),शुक्रवार दि.२ रोजी ह.भ.प.शिवा महाराज बावस्कर (बुलाढाणा),शनिवार दि.३ रोजी ह.भ.प.श्रावण महाराज जगताप (येवला),रविवार दि.४ रोजी ह.भ.प. पांडूरंग महाराज गिरी (वावीकर), दुपारी ३ ते ६ या वेळेत भव्य दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला आहे. सोमवार दि.५ रोजी ह.भ.प. प्रभाकर नाना झोलकर यांचे सकाळी १० ते१२ काल्याचे किर्तन होवून महाप्रसादाने या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता होणार आहे. पंचक्रोशीतील भाविकांनी या हरीकिर्तनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन भजनी मंडळ,स्वाध्याय परिवार,जय बाबाजी भक्त परिवार, गणेश मित्र मंडळ व ग्रामस्थांनी केली आहे.

### जंगम यांची जन्म नोंद अधिकारी म्हणून निवड

**लासलगाव :** लासलगाव ग्रामपंचायतचे ग्रामविकास अधिकारी




लिंगराज ज्योतिर्लिंग जंगम यांना जन्म नोंद अधिकारी म्हणून २०२४-२५ सालचा आणि निफाडचे सहाय्यक गट विकास अधिकारी सुनील निंबा पाटील यांना उत्कृष्ट प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून पुरस्कार जाहीर झाला असून, आज नाशिक येथील विशेष कार्यक्रमात दोन्ही अधिकाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे. जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अमिषा मित्तल यांनी ग्रामपंचायत विभागाकडून सन २०२४-२०२५ या कालावधीत सेवा पुरविण्याचे प्रमाण १००% असलेल्या ''अत्युत्कृष्ट'' काम करणाऱ्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची नावे मागविण्यात आली होती.त्यानुसार '' सेवा दिलेल्या ''महाराष्ट्र लोकसेवा हक्क अत्युत्कृष्ट सेवा देणाऱ्या अधिकारी यांना सन्मानित केले जाणार आहे.

### येवल्यात सोमवारी सेवा हक्क दिन बैठक

**येवला :** येवला तहसील कार्यालय येथे सोमवार दिनांक २८ एप्रिल रोजी सेवा हक्क दिन साजरा करण्यात येणार आहे. त्या निमित्ताने दिनांक२८ सोमवारी रोजी येवला येथील तहसील कार्यालयात उपविभागीय अधिकारी बाबासाहेब गाढवे यांचे अध्यक्षतेखाली कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. नागरिकांनी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन या द्वारे करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्यातील नागरिकांना शासनामार्फत व शासनाचे अधिनस्त सर्व सार्वजनिक प्राधिकरणांमार्फत दिल्या जाणाऱ्या अधिसुचित सेवा पारदर्शक गतिमान व विशिष्ट कालमर्यादेत देण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २८ एप्रिल २०१५ पासून लागू करण्यात आला आहे. त्यानुसार २८ एप्रिल २०२५ रोजी सदर कायद्यास १० वर्षे पूर्ण होत आहे. सदर कायद्याच्या जनजागृती आणि प्रसिद्धीसाठी २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन साजरा करणे बाबत महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोगाने निर्देशित केले आहे. त्यानुसार २८ एप्रिल रोजी येवला तहसील कार्यालय येथे सेवा हक्क दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. येवला तालुक्यातील नागरिकांनी सदर कार्यक्रमास उपस्थित रहावे, असे आवाहन एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे करण्यात आले.

### चालकाची गळफास घेऊन आत्महत्या

**चांदवड :** चांदवड तालुक्यातील आडगाव टप्पा शिवारात गुरुवारी (दि. २५ एप्रिल) एका ट्रक चालकाने गळफास घेऊन आत्महत्या केली. अल्ताफ रुस्तम पठाण (वय ३०, रा. भावनगर, गुजरात) असे आत्महत्या केलेल्या चालकाचमे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आडगाव टप्प्यावरील हॉटेल स्वागतच्या पार्किंगमध्ये ट्रक क्रमांक जी.जे. ०१/ सी. झेड. ४१४० उभा होता. दुपारी एक वाजेच्या सुमारास या ट्रकच्या कॅबिनमध्ये अल्ताफने शिडीला दोरीच्या साहाय्याने गळफास घेतला. या घटनेची माहिती असरार अश्रफ मालपीया यांनी चांदवड पोलीस स्टेशनला दिली. पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह खाली उतरवला आणि चांदवड उपजिल्हा रुग्णालयात आणला. पोलिसांनी या प्रकरणी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार ए.जी. शिरसाठ पुढील तपास करत आहेत. आत्महत्येचे नेमके कारण अद्याप अस्पष्ट आहे.

## निधन वार्ता

### सर्वज्ञ चोभे



**निफाड :** कोठुरे येथील मृदंगाचार्य ह.भ.प. सर्वज्ञ संतोष चोभे (१२) याचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्याच्या पश्चात आजी-आजोबा, आई - वडील, काका-काकू, बहीण असा परिवार आहे. बालवयात पंचक्रोशीत भजन, कीर्तन यात पखवाज व मृदंग सेवा देण्याचे कार्य करत असे. त्याच्या निधनाने आध्यात्मिक क्षेत्रात पोकळी निर्माण झाली आहे.

### हाजी अब्दुल गफ्फार



**जुने नाशिक :** येथील चौक मंडई भागातील सामाजिक कार्यकर्ते फारुक शेख व मुस्तफा शेख यांचे वडील तथा वडाळागाव येथील रहिवासी हाजी अब्दुल गफ्फार अब्दुल रहमान शेख उर्फ बाबू भाई (९०) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### नानासाहेब चिखले

**कसबे सुकेणे :** निफाड तालुक्यातील मौजे सुकेणे येथील



प्रगतिशील शेतकरी नानासाहेब दगुजी चिखले (८७) यांचे वृद्धापकाळाने निधन झाले, त्यांच्या पश्चात एक मुलगा, दोन बहिणी, पुतण्या, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे, निफाड न्यायालयातील प्रसिद्ध विधीज्ञ ॲडव्होकेट उत्तमराव चिखले यांचे ते वडील होत.

# जिल्हा बँकेने शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे

## शेतकरी, आदिवासी संघटनांच्या बैठकीत निर्णय




**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेने सक्तीचे कर्जवसुली बंद करावी तसेच शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे व व्याज शासनाने भरावे, या मागणीसाठी शेतकरी समन्वय समिती व ९३८ आदिवासी सहकारी सं स्था तसेच जिल्ह्यातील शेतकरी संघटना यांनी नाशिक येथे झालेल्या हुतात्मा स्मारक येथील बैठकीत निर्णय घेतला.

या बैठकीस भगवान बोराडे, कैलास बोरसे, दिलीप पाटील, दगाजी आहेर, रमेश बोरस्ते, बाळासाहेब बोरस्ते, मारुती घारे, पी. डब्ल्यू. अहिरे, शांताराम माळोदे, सुवर्ण सोळुंके, भाऊसाहेब गारे, नथा उदार, कुंडलिक जाधव, सोमनाथ साळवे उपस्थितीत होते. बैठकीत राज्य सहकारी बँकेचे प्रशासक विद्याधर अनासकर यानी११ एप्रिल रोजी जिल्हा मध्यवर्ती बँकेमध्ये शेतकऱ्यांच्या बैठकीत शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमाफी द्यावी, शेतकऱ्यांचे संपूर्ण व्याज माफ करावे व मुद्दलाचे १० हप्ते करून द्यावे याविषयी व कर्ज वसुलीस कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी दिलेल्या स्थगिती तसेच मुंबई येथे झालेल्या माणिकराव कोकाटे यांचे निर्णयावर शेतकरी ठाम असल्याचे सांगितले. अजित दादा पवार यांनी २३ एप्रिल रोजी झालेल्या बैठकीत एक लाखापर्यंत दोन टक्के व्याज, दोन ते तीन लाखापर्यंत तीन टक्के व्याज, पाच ते दहा लाखापर्यंत चार टक्के व्याज व दहा लाखाच्या पुढे पाच टक्के व्याज आकारले जाईल असे सांगितले होते. यास सर्व शेतकऱ्यांनी विरोध केला.

शेतकऱ्यांचे संपूर्ण व्याज माफ करावे, शेतकऱ्यांच्या मुद्दलाचे दहा हप्ते करून द्यावे व अल्पभूधारक शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज माफ करावे असे ठरविण्यात आले. याबाबत लवकरच मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री, सहकारमंत्री, आदिवासी विकासमंत्री यांचे भेट घेण्याचे ठरले.

# पोकलेन चालवल्याने मालमत्तेचे नुकसान, चालकावर गुन्हा दाखल

**चांदवड : वार्ताहर**

तालुक्यातील न्हनावे ते काजीसांगवी रोडवर एका मशिन चालकाने निष्काळजीपणे पोकलेन चालवल्याने त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना २५ एप्रिल रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, शुभम आहेर (रा. हिवरखेडे, ता. चांदवड) याने त्याच्या ताब्यात असलेले व्हीवो कंपनीचे ई.सी. २१० मॉडेलचे पोकलेन मशिन न्हनावे शिवारात विहीर खोदकामासाठी नेत असताना निष्काळजीपणा दाखवला. नियमानुसार हे अवजड मशिन ट्रक किंवा ट्रेलरच्या सहाय्याने वाहतूक करणे आवश्यक होते. मात्र, त्याने तसे न करता न्हनावे ते काजीसांगवी या सार्वजनिक डांबरी रोडवरून सुमारे एक किलोमीटरपर्यंत चालवले.

यामुळे डांबरी रोड खराब झाला असून, त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. यामुळे वाहनचालकांसाठी धोकादायक परिस्थिती निर्माण झाली असून, अपघाताची शक्यता वाढली आहे. याची जाणीव असूनही शुभम आहेरने सार्वजनिक रोडवर पोकलेन चालवून मानवी जीव धोक्यात घातला आणि सार्वजनिक मालमत्तेचे सुमारे एक लाख रुपयांचे नुकसान केले, असे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.याप्रकरणी सुनील मारुती आंधळे (प्रोजेक्ट मॅनेजर, इंजिनिअरींग अँड कॉन्ट्रक्टर) यांनी पोलिसात फिर्याद दाखल केली आहे. त्यांनी शुभम आहेरने फोनवरून दमदाटी केल्याचाही आरोप केला आहे.

चांदवड पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून, पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार गंभीरे पुढील तपास करत आहेत.



# त्र्यंबकेश्वर येथे उष्माघात कक्ष कार्यान्वित

**त्र्यंबकेश्वर : प्रतिनिधी**

उन्हाचा तडाखा वाढतो आहे. त्र्यंबकेश्वर येथे दर्शनासाठी व पूजा विधीसाठी भाविक पर्यटकांचा ओघ वाढला आहे. या महिन्यात ३८ सेल्सिअस पर्यंत उच्चांकी तापमान नोंदवले गेले आहे.

आलेल्या भाविक पर्यटकांना तसेच शहर व ग्रामीण भागातील नागरिकांना उष्माघात पासून बचाव करण्यासाठी त्र्यंबकेश्वर उपजिल्हा रुग्णालयात स्वतंत्र उष्माघात कक्ष कार्यांन्वित केला आहे. या कक्षात ऊन लागल्याने घायाळ झालेल्या रूग्णांना तातडीने अत्यावश्यक उपचार उपलब्ध होतील याची व्यवस्था करण्यात आली आहे.या कक्षात पंखा, एसी, एअर कुलर, आणि तत्सम आवश्यक सुविधांबरोबरच ओ. आर. एस. ची व्यवस्था करण्यात आली आहे. नागरिकांनी काळजी घ्यावी, दुपारच्या वेळेस शक्यतो बाहेर पडणे टाळावे, उन्हात जास्तवेळ थांबू नये, भरपूर पाणी प्यावे, अस्वस्थ वाटल्यास तातडीने उपजिल्हा रुग्णालयात संपर्क करावा.

# दिंडोरी नगरपंचायतीतर्फे २८ ला सेवा हक्क दिन



**दिंडोरी : वार्ताहर**

दिनांक २८एप्रिल १०१५ पासून महाराष्ट्र लोकसेवा अधिनियम १०१५ ची महाराष्ट्र राज्यात सर्वत्र अंमलबजावणी करण्यात आलेली आहे, ''महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ '' द्वारे राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक , कार्यक्षम आणि विशिष्ट कालावधीत सेवा प्राप्त करून घेण्याचा हक्क प्राप्त झालेला आहे .दिंडोरी नगरपंचायत दिंडोरी कार्यालय मार्फत अधिसूचित केलेल्या सेवा विशिष्ट कालावधीत देण्याबाबतचे उत्तरदायित्व असल्याने नगरपंचायत मार्फत २८ एप्रिल हा दिवस सेवा हक्क दिन व २८ एप्रिल पासून सेवा हक्क पंधरवडा साजरा करणे येणार आहे,

यादरम्यान नगरपंचायत शहरातील बस स्टॅन्ड तसेच बाजार पटांगण व इतर गर्दी च्या ठिकाणी बॅनर लावून जनतेला दिसेल आणि वाचता येईल अशा रीतीने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाच्या जाहिरातीचे फलक लावणार असून सदर फलकावर अधिसूचित सेवांची परिपूर्ण माहिती समाविष्ट असलेला कोड उपलब्ध करण्यात येणार आहे,

नागरिकांमध्ये जास्तीत जास्त अधिनियमाची जनजागृती करण्याकरिता पथनाट्य आयोजन, विशेष सभेचे आयोजन, विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करिता विशेष स्पर्धेचे आयोजन,२८ एप्रिल या दिवशी सकाळी ११ वाजता गर्दीच्या ठिकाणी तसेच सभेदरम्यान शपथ कार्यक्रम आयोजित करणे व विविध प्रसारमाध्यमांचा / सोशल मीडिया चा वापर करून सर्व नागरिकांना लोकसेवा हा अधिनियम २०१५ बाबत माहिती देण्यात येणार आहे. यापूर्वी देखील नगरपंचायतीने सदर कायद्याची जास्तीत जास्त प्रसिद्धी व्हावी याकरिता आदेशचित केलेल्या सेवांची अधिसूचना शासन दास पत्र भाग एक यात प्रसिद्ध केलेली आहे तसेच स्थानिक वृत्तपत्रात वेबसाईटवर प्रसिद्ध दिलेली आहे,

नगरपंचायतीस लागू असलेल्या सेवांची यादी नगरपंचायतीच्या नोटीस बोर्डवर प्रवेशद्वारा जवळ दर्शनीय भागावर लावण्यात आलेली आहे. सेवा देण्याचा कालावधी, आवश्यक कागदपत्रे , शुल्क, पद निर्देशित अधिकारी,




# निफाड महाविद्यालयात जागतिक पुस्तक दिन

**निफाड : विशेष प्रतिनिधी**

ग्रंथ हे ज्ञान माहिती देत असतात ग्रंथातूनच प्रेरणा मिळत असते विविध आत्मचरित्र चरित्र ऐतिहासिक ग्रंथ विज्ञान विषय ग्रंथ माहिती तंत्रज्ञान या सगळ्याच ज्ञान ग्रंथरूपाने आपल्याला वाचायला मिळते म्हणून आयुष्याला दिशा मिळण्यासाठी ग्रंथ हे एका मार्गदर्शकासारखे काम करीत असतात म्हणून प्रत्येकाने नियमित वाचन केलं पाहिजे असे मत प्राचार्य डॉ. ज्ञानोबा ढगे यांनी व्यक्त केले.

मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या कर्मवीर गणपत दादा मोरे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात ग्रंथालय शास्त्र विभागातर्फे आयोजित जागतिक पुस्तक दिन समारंभ प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर प्रा डॉ प्रवीण ढेपले ग्रंथालय विभाग प्रमुख प्रा दिपाली शेंडे,श्री राजेंद्र मत्सागर आदी उपस्थित होते

प्राचार्य ज्ञानोबा ढगे पुढे म्हणाले की यावर्षीचा जागतिक ग्रंथ दिनाचा विषय 'रीड युवर वे' म्हणजेच आवडेल ते वाचा याविषयी माहिती देताना, विद्यार्थ्यांनी प्रथमतः वाचनाची आवड निर्माण होण्यासाठी वर्तमानपत्रातील छोट्या, मोठ्या बातम्या वाचायला सुरुवात करा, विषय तज्ञ संपादकीय लेख वाचा. मोबाईल च्या डिजिटल युगात वाचन संस्कृती टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांमध्येच निश्चित आहेच, फक्त वाचनाकडे एक पाऊल टाकण्याची कृती व मानसिक तयारी सर्वांनी या निमित्ताने करावी आणि ग्रंथालयीन पुस्तकांचा जास्तीत जास्त उपयोग करावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी महाविद्यालय ग्रंथालयात संदर्भ व क्रमिक पुस्तकांचे प्रदर्शन भरविण्यात आले. या

# मातोश्रीच्या निधनानंतर रक्षाचा उपयोग वृक्षारोपणासाठी

## निफाडच्या भोसले परिवाराकडून सामाजिक संदेश

**निफाड : विशेष प्रतिनिधी.**

श्रद्धा आणि भावनेला काही मोल नसते. भारतातून नाशिक येथे श्री क्षेत्र रामकुंड यथे व्यक्तीच्या निधनानंतर गोदावरीत अस्थि विसर्जन करण्यासाठी देशभरातून हजारो भाविक येतात.

निफाड येथील ॲड. समीर भोसले व ॲड स्मिता उत्तम कदम यांच्यासह त्यांच्या परिवाराने आपल्या मातोश्रींच्या निधनानंतर गंगेत रक्षाविसर्जन न करता वृक्षारोपणाच्या माध्यमातून रक्षा विसर्जन करून एक नवीन सामाजिक उपक्रम केला आहे.

दु:ख झाले असले तरी पुढील पिढीचे सुख शोधण्याचा हा प्रयत्न वेगळा आहे. गंगेत रक्षाविसर्जन झाल्यानंतर मोठे पुण्य मिळते, हा समज असला तरीही आजची पिढी नव्या विचाराने प्रेरित होऊन वृक्षारोपणाला महत्त्व देत आहे. निफाड येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. अण्णासाहेब भोसले यांच्या पत्नी शशिकला यांचे निधन झाले. त्यांची रक्षा गंगेत विसर्जित न करता घराजवळच वृक्षारोपण करून वापरण्यात आली. अनोखा उपक्रम राबविला.



> माझ्या पत्नीच्या निधनानंतर रक्षा कोणत्याही गंगेत विसर्जन न करता वृक्षारोपणाच्या रूपाने आमच्या घराजवळच राहणार आहे. त्यामुळे माझ्या पत्नीच्या आठवणी भविष्यातही घराजवळच दिसून येतील. नवविचाराच्या माझ्या मुलांच्या या विचाराला मी माझे मन म्हणत नसतानाही होकार दिला आहे.
>
> – **अण्णासाहेब भोसले** ज्येष्ठ विधीतज्ज्ञ, निफाड न्यायालय

# चांदवड शहरात कडकडीत बंद

## हल्ल्याच्या निषेधार्थ सकल मराठा समाजाचा मूक मोर्चा



**चांदवड : वार्ताहर**

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या निषेधार्थ आज चांदवडमध्ये सकल मराठा समाजाने उत्स्फूर्तपणे मूक मोर्चा काढला. या मोर्चामुळे चांदवड शहरात कडकडीत बंद पाळण्यात आला होता.

सकाळच्या सुमारास शहरातील अहिल्यादेवी होळकर रंगमहालाजवळ मराठा समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने एकत्र जमले. त्यानंतर सकाळी ९ वाजता मूक मोर्चाला सुरुवात झाली. हा मोर्चा शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत नगरपालिका, श्रीराम रोड, शिवाजी चौक, सोमवार पेठ, आठवडे बाजार तळमार्गे चांदवड पोलीस ठाण्यापर्यंत गेला आणि तिथे त्याची सांगता झाली.

शिवाजी चौकात मोर्चादरम्यान संतप्त कार्यकर्त्यांनी पाकिस्तानचा ध्वज जाळून तीव्र निषेध व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांनी 'निमक पत्ता कडवा है, पाकिस्तान भडवा है', 'वंदे मातरम', 'भारत माता की जय' अशा घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

मोर्चाच्या सांगतेवेळी चांदवड पोलीस ठाण्यात पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली वाहण्यात आली. ह.भ.प. महाराज कैलास ढगे (देणेवाडी) आणि सोपान बाळासाहेब बोरसे यांनी या घटनेची अधिक माहिती दिली.


चांदवड पोलीस निरीक्षक कैलास वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय आखेगावकर आणि चांदवड पोलीस कर्मचाऱ्यांनी तसेच आर.सी.एफ.च्या जवानांनी चोख बंदोबस्त ठेवल्यामुळे मोर्चा शांततेत पार पडला.

# 'माती मागतेय पेनकिलर'ला राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार

**चांदवड : वार्ताहर**

तंत्रज्ञानाच्या युगात मातीतून अंकुरलेली कविता आणि शोषितांच्या व्यथांना शब्दरूप देणाऱ्या युवा कवी सागर जाधव जोपुळकर यांच्या 'माती मागतेय पेनकिलर' या प्रभावी काव्यसंग्रहास प्रतिष्ठित 'लोककवी विठ्ठल वाघ राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार' जाहीर झाला आहे. साहित्यिक कवी संदीप जगताप आणि शिवव्याख्याते प्रा. जावेद शेख यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या पुरस्काराने युवा कवी सागर जाधव जोपुळकर यांच्या साहित्य प्रवासातील महत्त्वपूर्ण योगदानाला सन्मानित केले आहे.

यावर्षीच्या पुरस्कारासाठी दीडशेहून अधिक काव्यसंग्रहांमधून 'माती मागतेय पेनकिलर' या संग्रहाची निवड झाली. निवड समितीचे अध्यक्ष कवी लक्ष्मण महाडिक यांनी पुरस्काराची घोषणा करताना सांगितले की, ''शेतकरी, श्रमिक आणि भूमिपुत्रांच्या कष्टाच्या कहाण्यांना एका नव्या दृष्टिकोनातून मांडणारी ही कविता केवळ सामाजिक जाणीवच नाही, तर ती एक वैशिष्ट्यपूर्ण साहित्यिक ओळख निर्माण करते.''




मॅग्नस फार्म येथे लवकरच आयोजित होणाऱ्या समारंभात हा पुरस्कार प्रदान केला जाईल. पुरस्काराचे स्वरूप अकरा हजार रुपये रोख, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल आणि श्रीफळ असे आहे.

'माती मागतेय पेनकिलर' या काव्यसंग्रहात कवी सागर जाधव जोपुळकर यांनी ग्रामीण जीवनातील दु:ख आणि अडचणींचे हृदयस्पर्शी चित्रण केले आहे. पेरणीपासून ते आत्महत्येच्या कठीण वाटेवर असलेल्या भूमिपुत्रांच्या वेदनांना त्यांनी प्रभावीपणे व्यक्त केले आहे. त्यांच्या कवितेतील प्रतिमा, भाषिक प्रयोग आणि ग्रामीण बोलीतील जिवंतपणा वाचकांना आकर्षित करतात.

या महत्त्वपूर्ण सन्मानाबद्दल राज्यातील अनेक साहित्यिक, समीक्षक आणि रसिकांनी कवी सागर जाधव जोपुळकर यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. हा पुरस्कार त्यांच्या संवेदनशील लेखणीचा आणि समाजातील महत्त्वाच्या विषयांना वाचा फोडण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचा गौरव आहे.

## महत्त्वाचे

### देशवंडी-नायगाव शिवारातून १ लाखाच्या ॲल्युमिनिअम तारा चोरीला

**सिन्नर :** तालुक्यातील देशवंडी-नायगाव शिवारातून अज्ञात चोरट्यांनी सुमारे ९०० मिटर लांबीच्या १ लाख ८ हजार रुपये किंमतीच्या ॲल्युमिनिअम तारा चोरुन नेल्या. आकाश राहुल खरात (३१) यांनी याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ९०० मीटर लांबीच्या ॲल्युमिनीअम तारा, इको डॉक कंडक्टर असा ऐवज अज्ञात चोरट्यांनी देशवंडी शिवारातील खिंड येथून व नायगाव शिवारातील कॅनॉल येथून चोरुन नेला. हवालदार शिंदे अधिक तपास करीत आहेत.

### अपघातातील जखमीचे निधन

**सिन्नर :** सिन्नर-शिर्डी महामार्गावर अपघातात जखमी झालेल्या इसमाचे शिर्डी येथे उपचार सुरु असतांना निधन झाले. संजय यादव डांगे (४८) रा. पोहेगाव यांचा सिन्नर-शिर्डी महामार्गावर दातली शिवारात अपघात झाला होता. डांगे यांच्यावर शिर्डी येथील श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये उपचार सुरु होते. उपचार सुरु असतांना त्यांचे निधन झाले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात अपघाताची नोंद करण्यात आली असून हवालदार चकोर अधिक तपास करीत आहेत.

### पाथरे बु चिनेवस्ती येथे निरोप समारंभ




**वावी :** येथून जवळच असलेल्या पाथरे बु येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिनेवस्ती येथील इयत्ता चौथीचा निरोप समारंभ मोठ्या उत्साहात झाला. कार्यक्रमाचा प्रारंभ सरस्वती मातेच्या पूजनाने करण्यात आला त्यानंतर चौथीतील विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणींना उजाळा देत मनोगते व्यक्त केली.शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष संपत चिने,सुरेखा जोरे,पगार यांनी भाषणे केली.मुख्याध्यापक निमसे यांनी विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आणि शाळेच्या सुवर्णक्षणांची आठवण करून देत विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व सांगितले. यावेळी रामनाथ सुडके, अनिकेत नरोडे, दत्तात्रय जोरे, दिनेश राशिनकर, विलास घोलप, रामकृष्ण जोर्वेकर, विद्या राशिनकर, सुवर्णा सोमवंशी, जयश्री ढवण, मनिषा चिने आदिसह पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिन्नर पालिकेचे मजिप्रच्या अभिप्राय अहवालाकडे दुर्लक्ष

## शिवडे गावातून टाकलेली जलवाहिनी गावाबाहेरुन टाकण्याच्या मजिप्रचा अभिप्राय

**सिन्नर : प्रतिनिधी**

**शिवडे गावाच्या गावठाणातून गेलेली नगरपालिकेच्या कडवा योजनेची जलवाहिनी स्थलांतरीत करण्याच्या मुद्द्यावरुन सिन्नर नगरपालिका आणि शिवडे ग्रामस्थांमध्ये उद्भवलेल्या वादामुळे जलवाहिनीची गळती काढण्याचे काम पूर्ण होऊ शकले नाही. विशेष जलवाहिनी स्थलांतरीत करण्यासंदर्भात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे पालिकेने मागविलेल्या अभिप्राय अहवालानुसार मजिप्रने जलवाहिनी गावाबाहेरुन असलेल्या नाल्याजवळून टाकावी असा अभिप्राय दिलेला असताना नगरपालिका प्रशासनाकडून त्याकडे अक्षम्य दुर्लक्ष झाल्याचे दिसते.**

कडवा धरणातून सिन्नर शहरासाठी राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेची ६०० मीमी व्यासाची उर्ध्वजलवाहिनी शिवडे गावातून टाकण्यांत आलेली आहे. पाईपलाईन टाकलेल्या जागेवर शिवडे ग्रामपंचायतीने ग्रामपंचायत इमारतीचे काम सुरु केले, सदर कामास नगरपालिकेने ना हरकत प्रमाणपत्र न दिल्याने तेव्हापासून जलवाहिनीच्या वादाने डोके वर काढले. यासंदर्भात सिन्नर नगरपालिकेने महाराष्ट्र जीवन प्रधिकरणाला पत्र देऊन शिवडे गावातून टाकलेली जलवाहिनी स्थलांतरणासंदर्भात अभिप्राय मागितला होता. त्यानुसार मजिप्रच्या उपअभियंता यांनी प्रत्यक्ष भेट देऊन दि. ०६/१२/२०२३ रोजी अभिप्राय अहवाल दिलेला आहे.

मजिप्रने दिलेल्या अभिप्राय अहवालानुसार सिन्नर नगरपालिकेतर्फे सिन्नर शहर वाढीव पाणी पुरवठा योजनेअंतर्गत शिवडे गावातुन ६०० मीमी व्यासाची मुख्य उर्ध्ववाहिनी टाकण्यांत आलेली आहे. या कामासाठी म हाराष्ट्र जीवन प्राधिकरण पीएमसी नाही तर नगरपरिषद स्तरावर नेमणुक करण्यांत आलेली डी. आर. ए कन्सल्टंट लि. नागपुर हे पीएमसी म्हणून कार्यरत होते. त्यांनी सुपरविजनचे काम करतांना त्यांच्या ११/११/२०२२ च्या पत्राप्रमाणे शिवडे गावठाणातून शासकीय मालकीची १२.५ मीटर जागा उपलब्ध नसल्याने ग्रामपंचायतीच्या मालकीच्या जागेतुन ६०० मीमी व्यासाचे एम.एस. पाईप जम ीनीखाली टाकण्यांत आली आहे. तसेच सदर पाईप टाकांना कॉंक्रीट कास्टीग केल्याचे पत्रात नमुद असून उपविभागाच्या पहाणीतही ६०० मीमी व्यासाच्या एमएस पाईपलाईनवर कॉंक्रीट कास्टीग केल्याचे निदर्शनास आले आहे.

कॉंक्रीट कास्टीग केलेल्या पाईपलाईनवर शिवडे ग्रामपंचायतीने ग्रामपंचायत कार्यालयाचे बांधकाम सुरु केल्याचे दिसुन आले. मात्र ६०० मीमी व्यासाच्या एमएस पाईपलाईनवर कॉंक्रीट कास्टीग केल्यामुळे या पाईपलाईनला ग्रामपंचायतच्या प्रस्तावित बांधकामामुळे धोका नाही. तथापी सदरच्या कामाचा संकल्पन कालावधीचा विचार करता तुटफ ुट तसेच देखभाल दुरुस्तीच्या अनुषंगाने भविष्यात अडचण येऊ नये किंवा लीकेजेस इत्यादी कामांमध्ये खबरदारी म्हणून जम ीनीखाली टाकलेली ही उर्ध्ववाहिनी पर्यायी मार्गाने गावाबाहेरुन असलेल्या नाल्याजवळून टाकावी असा अभिप्राय मजिप्रने दिला. तथापि नगरपालिका प्रशासनाने या अहवालाकडे दुर्लक्ष केल्याचे शिवडे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. मजिप्रच्या अभिप्राय अहवालानुसार जलवाहिनी स्थलांतरीत केल्यास वाद मिटण्यासोबतच नगरपालिकेला जलवाहिनीच्या गळती, दुरुस्तीची कामे करण्यास कोणतीही अडचण येणार नाही असे शिवडेकरांचे म्हणणे आहे.

## सिन्नर सायकलिस्टतर्फे कॅंडलमार्च

**सिन्नर : प्रतिनिधी**




जम्मु-काश्मिर मधील पहलगाम बार्शियन खोरे येथे पर्यटनासाठी आलेल्या निष्पाप निरपराध, निशस्त्र २७ हिंदू पर्यटकांवर मंगळवारी (दि.२२) झालेल्या अमानवीय अतिरेकी हल्ल्याचा सिन्नर सायकलिस्टतर्फे कॅंडल मार्च काढून निषेध करत मृतांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

पहलगाम बार्शियन खोरे येथे पर्यटनासाठी आलेल्या पर्यटकांवर पाक पुरस्कृत आतंकवादी संघटना टीआरएफने अंदाधुंद गोळीबार केला. या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झालेल्या पर्यटकांना सिन्नर सायकलिस्टच्या सदस्यांनी हुतात्मा चौक येथे जम वून मेणबत्ती पेटवून श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सरकारने दहशदवादी व त्यांना मदत करत असलेल्या पाकिस्तान ला जशास तसे उत्तर द्यावे. तसेच कारवाई करून आतंकवादी तळ उद्धवस्त करण्यात यावे ही अपेक्षा व्यक्त करण्यात आली. यावेळी सिन्नर सायकलिस्टचे अध्यक्ष योगेश शिंदे, माजी अध्यक्ष नितीन जाधव, सूरज देशमुख, सुभाष कुंभार, प्रकाश मोरे, रवी कुलकर्णी, संतोष कदम, डॉ. दिलीप गुरुळे, विनोद गवळी, डॉ. सोपान दिघे, मोगल, राजेंद्र हंडोरे, नाईकवाडी आदीं उपस्थित होते.

## मुसळगावात पहिल्यांदाच भरला आठवडे बाजार

### व्यापारी-ग्राहकांचा उदंड प्रतिसाद

**सिन्नर : प्रतिनिधी**



तालुक्यातील मुसळगाव येथे ग्रामस्थांच्या अनेक दिवसांच्या मागणीनुसार गुरुवारी प्रथमच आठवडे बाजार भरविण्यात आला. या आठवडे बाजाराला व्यापाऱ्यांसह पंचक्रोषितील शेतकरी, ग्राहकांनी उदंड प्रतिसाद दिला.

सिन्नर शहरापासून साडेपाच-सहा किमी अंतरावर असलेल्या मुसळगावच्या शिवारात सिन्नर तालुका औद्योगिक वसाहतीमुळे मोठ्याप्रमाणात लोकवस्ती वाढलेली आहे.

मुसळगावात आठवडे बाजार भरत नसल्याने परिसरातील ग्रामस्थांना भाजीपाला तसेच दैनंदिन गरजेच्या वस्तुंची खरेदी करण्यासाठी सिन्नरला यावे लागते. त्यामुळे येण्या-जाण्याचा खर्च आणि वेळही वाया जात असल्याने मुसळगाव येथे आठवडे बाजार भरविण्याची अनेक दिवसापासून ग्रामस्थांसह परिसरातील रहिवाशांकडून मागणी होत होती.

राष्ट्रवादी कॉंग्रेसचे तालुकाध्यक्ष संतोष कदम, उपसरपंच सचिन शिरसाट यांच्यासह ग्रामस्थांच्या पुढाकारातून आठवडे बाजार भरविण्याचा निर्णयघेण्यात आला. गुरुवारी आठवडे बाजाराचा शुभारंभ करण्यात आला. याप्रसंगी राष्ट्रवादीचे तालुका अध्यक्ष संतोष कदम, उपसरपंच सचिन शिरसाट, ग्रामपंचायत सदस्य दत्तू ठोक, रवींद्र शिंदे, सोमनाथ जाधव, सुदाम शिरसाठ, रवींद्र रेवगडे, भरत जोंधळे, संपत शिरसाट, अतुल शिंदे, बबन शिरसाट, अरुण सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते.

पहिल्याच आठवडे बाजारास व्यापाऱ्यांसह ग्राहकांनी भरभरुन प्रतिसाद दिला. परिसरातील शेतकऱ्यांनी प्रारंभ थोड्या प्रमाणात भाजीपाला तसेच शेतमाल बाजारात विक्रीसाठी आणला होता. मात्र ग्राहकांची गर्दी उसळल्यामुळे काही शेतकऱ्यांकडील भाजीपाला व शेतमाल हातोहात विकला गेला. दुपारनंतर काही शेतकऱ्यांनी पुन्हा घरी जाऊन भाजीपाला व शेतमाल विक्रीसाठी आणला व सायंकाळपर्यंत तोही विकला गेला त्यामुळे ग्राहकांसह शेतकरी, व्यापाऱ्यांनी समाधान व्यक्त केले. आता दर गुरुवारी आठवडे बाजार भरणार असल्याने मुसळगावसह परिसरातील नागरिकांची गैरसोय दूर होणार आहे.

## ठाणगावच्या जनसेवा संस्थेच्या माध्यमातून पाडळी विद्यालयाला डिजिटल रूम

**ठाणगाव : वार्ताहर**

येथील जनसेवा सेवाभावी संस्थेच्यामाध्यमातून पाडळी येथील पाताळेश्वर माध्यमिक विद्यालयाला भारतीय जनता पार्टी भटके विमुक्त आघाडी महाराष्ट्र उपाध्यक्ष मुकुंद काकड यांच्या आर्थिक मदतीतून डिजिटल रूम उपलब्ध करुन दिली असून या डिजीटल रुमचे उद्घाटन नुकतेच रयत शिक्षण संस्थेचे म हाराष्ट्र उपाध्यक्ष ॲड.भगीरथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी माजी शिक्षक आमदार सुधीर तांबे, युवा नेते उदय सांगळे, जनसेवा सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व अटल फाउंडेशन जिल्हाध्यक्ष रामदास भोर, कार्याध्यक्ष बबन दादा काकड, विद्यालयाचे मुख्याध्यापक एस बी. देशमुख, प्रा. तानाजी रेवगडे, विश्राम शेळके, माजी सरपंच शोक रेवगडे, चंद्रभान रेवगडे, भगीरथ रेवगडे, नाना रामभाऊ पाटोळे आदी उपस्थित होते. पाचवी ते दहावीपर्यंत डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवस्थित



शिक्षण घेता येईल, यापुढेही आमच्या शाळेच्या विद्यार्थ्यांना तुमच्या संस्थेच्या माध्यमातून अशीच मदत करावी अशी अपेक्षा देशमुख यांनी व्यक्त केली. यावेळी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## तर मी स्वत: वाळूच्या गाड्या पेटवून देईल : आ.काळे

### अवैध वाळू तस्करी विरोधात पुकारला एल्गार

**वावी : वार्ताहर**

अवैध वाळू तस्करीबाबत असंख्य नागरिकांच्या तक्रारी आहेत. नियम धाब्यावर बसवून प्रचंड प्रमाणात वाळू तस्करी होत आहे. याबाबत अनेकवेळा महसूल आणि पोलीस प्रशासनाला सूचना केल्या परंतु त्यांच्याकडून सोयीस्करपणे दुर्लक्ष करण्यात आल्यामुळे आपला संयम आता संपला आहे. वेळप्रसंगी कायदा हातात घेवून मी स्वत: वाळूच्या गाड्या पेटवून देईल असा ईशारा देत आ.आशुतोष काळे यांनी अवैध वाळू तस्करीविरोधात एल्गार पुकारला आहे.

कोपरगाव तालुक्यात सुरु असलेल्या अवैध वाळू व्यवसायाबाबत पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर आ. आशुतोष काळे यांनी आपली रोखठोक प्रतिक्रिया दिली आहे. यावेळी त्यांनी सांगितले की, शासकीय वाळू लिलावातून शासनाला महसूल मिळतो हे मान्य आहे. परंतु हा वाळू उपसा करीत असतांना त्यासाठी महसूल व पर्यावरण विभागाने काही नियम घालून दिलेले आहेत.मात्र हे नियम धाब्यावर बसवून प्रचंड वाळू उपसा केला जात असून शासकीय वाळू लिलावाबरोबरच अवैध वाळू व्यवसाय देखील मोठ्या प्रमाणात सुरु आहे.

वाळूच्या अवजड वाहनांमुळे रस्त्याची तर वाट लागलीच आहे. परंतु स्व.कर्मवीर शंकररावजी काळे साहेब यांच्या सहकार्यातून व माजी आमदार अशोकराव काळे यांच्या अथक प्रयत्नातून उभ्या राहीलेल्या ज्या धारणगाव-कुंभारी पुलाने कोपरगाव शहराची बाजारपेठ फुलविण्यास मदत केली त्या पुलाच्या पायाजवळून दिवसा ढवळ्या सुरु असलेला वाळू उपसा महसूल आणि पोलीस प्रशासन उघड्या डोळ्यांनी पाहत आहे हि चीड आणणारी बाब आहे. जर या पुलाच्या पायाजवळ सुरु असलेल्या वाळू उपश्यामुळे पुलाला काही धोका झाला तर काय परिणाम होवू शकतात याचे किंचितही गांभीर्य महसूल आणि पोलीस प्रशासनाला नाही.त्याबाबत अनेकवेळा महसूल आणि पोलीस प्रशासनाला सूचना केल्या परंतु त्यांच्याकडून हा वाळू उपसा थांबविला गेला नाही. त्यामुळे मी स्वत: वाळूच्या गाड्या पेटवून देईल असा गर्भित इशारा त्यांनी दिला आहे.

## गोंदेश्वर रोटरीतर्फे वाजे विद्यालयास पोडियम भेट

**सिन्नर : प्रतिनिधी**




सामाजिक, वैद्यकिय आणि शिक्षण क्षेत्रात कायमच अग्रेसर असणाऱ्या रोटरी क्लब ऑफ गोंदेश्वरच्यावतीने लोकनेते शंकरराव बाळाजी वाजे विद्यालयास पोडियम भेट दिले.

विद्यालयास प्रत्येक वर्गात शिक्षकांना पोडियमची गरज असते. शिक्षकांसोबत असलेले पुस्तक, काढलेल्या नोट्स, खडू, डस्टर ठेवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांसम ोर उभे राहून शिकविण्यासाठी या पोडियमचा उपयोग होतो. विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशमुख यांनी यासाठी पाठपुरावा केला त्यास क्लबच्या सदस्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

रोटरी क्लबचे सदस्य सतिश नेहे यांनी मदत केली. याप्रसंगी रोटरी क्लबचे अध्यक्ष सुरेश जोंधळे, सेक्रेटरी दत्ता नवले, वाजे विद्यालयाचे मुख्याध्यापक बाळासाहेब देशम ुख, उपमुख्याध्यापिका श्रीमती हांडे आदींसह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.



## बस डेपोबरोबरच चार्जिंग स्टेशनचे काम शीघ्र गतीने पूर्ण करा : आ.काळे

**वावी : वार्ताहर**

कोपरगाव शहरातील छोट्या मोठ्या व्यावसायिकांसाठी आशेचा किरण असलेल्या कोपरगाव शहरातील बस डेपो, व्यापारी संकुलाबरोबरच चार्जिंग स्टेशनचे काम शीघ्र गतीने पूर्ण करा अशा सूचना आ. आशुतोष काळे यांनी कोपरगाव आगार प्रमुख अमोल बनकर यांना दिल्या.

कोपरगाव शहराच्या एस.टी. बस आगारामध्ये सुरु असलेल्या वर्कशॉप, चार्जिंग स्टेशन व व्यापारी संकुलाची आ. आशुतोष काळे यांनी पाहणी करून कामाचा आढावा घेतला. यावेळी कोपरगाव बस आगाराला मिळालेल्या नवीन पाच बसचे आ. आशुतोष काळे यांच्या हस्ते विधिवत पूजन करण्यात येवून लोकार्पण करण्यात आले.

यावेळी सुरु असलेल्या कामाबाबत सूचना करतांना ते बोलत होते. यावेळी आ. आशुतोष काळे म्हणाले की, व्यापारी संकुलाच्या कामाला गती देवून हे व्यापारी संकुल लवकरात लवकरात जनसेवेत रुजू करा. जेणेकरून छोट्या-मोठ्या व्यावसायिकांना या व्यापारी संकुलाच्या माध्यमातून लवकरात लवकर व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील. पुढील वर्षी नासिक येथे होणाऱ्या कुंभ मेळाव्याच्या पार्श्वभूमीवर कोपरगाव बस स्थानकातून नासिक येथे जाणाऱ्या येणाऱ्या प्रवासी बांधवांना कोणत्याही प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागणार नाही याची काळजी घेवून सुरु असलेली कामे वेळेत पूर्ण करा. भविष्यात इलेक्ट्रिक बस ची संख्या वाढणार आहे त्यामुळे जास्तीत जास्त बस कोपरगाव डेपोत चार्जिंगसाठी येणार असून निश्चितच बसची संख्या वाढल्यामुळे प्रवाशांची संख्या वाढणार आहे व त्याचा परिणाम कोपरगावच्या व्यवसाय वाढीसाठी पूरक ठरणार आहे. त्यामुळे कोपरगाव बस डेपो आगारात सुरु असलेल्या बस चार्जिंग स्टेशनचे काम देखील लवकरात लवकर पूर्ण करा. कोपरगाव बस डेपोला पाच नवीन बस मिळाल्या असून अजून पाच बस मिळणार आहे त्यामुळे प्रवाशांच्या अडचणी सुटण्यास मदत होणार असून यापुढील काळातही प्रवाशांच्या अडचणी सोडवण्यासाठी कोपरगाव बस आगाराला सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले.

यावेळी आगार प्रमुख अमोल बनकर, महावितरणचे उपकार्यकारी अभियंता धनंजय धांडे, सहाय्यक अभियंता अतुल खंदारे, महापारेषणचे उपकार्यकारी अभियंता विजय गोसावी, सहाय्यक अभियंता अशोक राख, स्थापत्य शाखेचे कनिष्ठ अभियंता संजय दरेकर, विद्युत विभागाचे कनिष्ठ अभियंता

## सिन्नरमधील २६ क्षयरोगमुक्त ग्रामपंचायतींचा सन्मान

**सिन्नर : प्रतिनिधी**

**राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सिन्नर तालुक्यातील २६ टी.बी. मुक्त (क्षयरोग मुक्त) ग्रामपंचायतींना पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. तीन ग्रामपंचायती रौप्य तर २३ ग्रामपंचायती कांस्य पदकाच्या मानकरी ठरल्या.**



येथील पंचायत समितीच्या लोकनेते गोपिनाथ मुंडे सभागृहात राष्ट्रीय पंचायत दिवसाचे औचित्य साधून आयोजित कार्यक्रमात सेंट्रल टी.बी. डिव्हीजन यांच्या मार्गदर्शक सुचनेप्रमाणे टी.बी.मुक्त ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामविकास अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सेवक यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. रविंद्र चौधरी, गटविकास अधिकारी अशोक भवारी, सिन्नर ग्रामीण उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षिका डॉ. निर्मला गायकवाड, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोहन बच्छाव, सहाय्यक गटविकास अधिकारी विजयकुमार ढवळे, तालुका क्षयरोग अधिकारी प्रकाश जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

क्षयरोग मुक्तीसाठी लोकसहभाग महत्वाचा असून यासंदर्भात जनजागृती करून जनतेला या रोगापासून दूर ठेवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे गरजेचे असल्याचे मत डॉ. रविंद्र चौधरी यांनी व्यक्त केले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. मोहन बच्छाव यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक श्रीमती साधना बच्छाव यांनी केले तर प्रयोगशाळा पर्यवेक्षक जयराम सोनवणे यांनी आभार मानले. कार्यक्रमास तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्रांचे वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक, ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामविकास अधिकारी, सदस्य उपस्थित होते.

### या ग्रामपंचायती कास्यपदकाच्या मानकरी

धुळवड, खंबाळे, नांदूरशिंगोटे, कोमलवाडी, औंढेवाडी, पांढुर्ली, सरदवाडी, वडगाव पिंगळा, सोनांबे, वडगाव-सिन्नर, विंचूर दळवी, भरतपूर, किर्तांगळी, शहा, सोमठाणे, पिंपळे, रामनगर, भोकणी, पाथरे बुद्रुक, पिंपरवाडी, पांगरी खुर्द, सायाळे, वारेगाव या ग्राम पंचायती क्षयरोग मुक्त झाल्याने त्यांना मान्यवरांच्या हस्ते कांस्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले.

### तीन ग्रामपंचायतींना रौप्य पदक

सलग दुसऱ्या वर्षी क्षयरोगमुक्त राहणाऱ्या ग्रामपंचायतींना रौप्यपदक देऊन सन्मानित करण्यात येते. यंदा तालुक्यातील देवपूर प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत फर्दापुर, पांढुर्ली प्राथमिक आरोग्य केंद्रांतर्गत आगासखिंड आणि दापूर प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत दोडी खुर्द या तीन ग्रामपंचायतींना रौप्य पदक देऊन गौरविण्यात आले.



« चांदवड शहरात कडकडीत बंद « पान ६

उत्तर महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक

# गांवकरी



» पशुसंवर्धन विभाग तांत्रिक कामकाजामध्ये दिंडोरी तालुका प्रथम » पान २

■ gavakari.in ■ gavkarinews.com ■ नाशिक, रविवार, दि. २७ एप्रिल २०२५

# गोदावरीचे पाणी वापरण्यासाठी अयोग्य ;बंदी आणा

## महापालिकेविरोधात पंडीत यांची उच्च न्यायालयात याचिका

**नाशिक : प्रतिनिधी**

**उच्च न्यायालयाने या आधीही गोदावरीचे पाणी वापरण्यास अयोग्य असल्याचे फलक गोदाकाठी लावण्याची सूचना केली होती. त्याची अंमलबजावणी झालेली नाही. मागील जनहित याचिकेनुसार न्यायालयाने पाण्याची तपासणी करण्यासाठी नीरी संस्थेची नेमणूकही केली होती. त्या संस्थेने नोंदवलेले निष्कर्षही विचार करायला लावणारे आहेत. तसेच उच्च न्यायालयाच्या आदेशाचे योग्य पालन होत नसून त्याचे पालन करण्यासह गोदावरीचे पाणी वापरण्यास बंदी घालण्यात यावी, अशी मागणी करणारी याचिका नाशिकचे पर्यावरणप्रेमी राजेश पंडित यांनी उच्च न्यायालयात दाखल केली आहे.**



सदर याचिकेत अंमलबजावणीसाठी कालमर्यादा आखून देण्यासह दर महिन्याला अहवाल सादर करावा, जोपर्यंत आदेशाचे पालन होत नाही तोपर्यंत गोदावरीच्या पाणी वापरावर बंदी आणावी, या मागण्या करण्यात आल्या आहेत. याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. निखिल पुजारी यांनी ही याचिका दाखल केली आहे. दरम्यान सिंहस्थ कुंभमेळा जवळ येतो आहे. गोदावरीचे पाणी वापरण्यायोग्य नसल्याचा अहवाल 'नीरी'ने दिल्यानंतरही त्यावर आवश्यक त्या उपाययोजना झालेल्या नाहीत. त्यामुळे किमान येणाऱ्या सिंहस्थासाठी तरी आवश्यक ती उपाययोजना केली तर शाहीस्नानात अडचण येणार नाही. त्यासाठी ही याचिका दाखल केली आहे.

सोमवारी (दि. २८) पुढील प्रक्रिया होणार असल्याचे पंडित यांनी सांगितले. या याचिकेत म्हटले आहे की, विभागीय आयुक्तांच्या आदेशाखाली नेमण्यात आलेल्या समितीचे कामकाज नियमाप्रमाणे होत नसून त्याचा अहवालही न्यायालयाला सादर होत नाही. न्यायालयाच्या सूचनेनुसार गोदावरी स्वच्छतेसाठी निधीही आला; परंतु त्याचा योग्य विनियोग झाला नाही, असा आरोप करण्यात आला आहे. मागील सिंहस्थाच्या कालावधीत आलेल्या आदेशाचे पालन न झाल्याने ही वेळ आल्याचे म्हटले आहे.

## महत्त्वाचे



### खासगी क्लासेस सोबत टायअप महाविद्यालयांची मान्यता रद्द करा

#### महाराष्ट्र नवनिर्माण सेनेची मागणी

**नाशिक : प्रतिनिधी**

खासगी क्लासेससोबत टायअप केलेल्या महाविद्यालयांची मान्यता रद्द करा, अशी मागणी करणारे निवेदन मनसेच्या वतीने शिक्षण विभागाच्या दीपाली पाटील यांना दिले. निवेदनात म्हटले आहे की. शिक्षण हे विकले जात नाही, एकदा शिकवणे म्हणजेच दोनदा शिकणे आहे. शिक्षण हे विकले जात नाही तर ते ज्ञानदानाप्रमाणे दान केले जाते. आणि त्याचा फायदा पुढील पिढीला व्हावा, असा त्याचा उद्देश आहे.पूर्वीपासून शिक्षण हे पवित्र समजले जात आहे. शिक्षण देताना कधीही पैशांचा विचार केला गेला नव्हता. परंतु आत्ताच्या आधुनिक काळात मोठमोठ्या शिक्षण संस्था या ओस पडलेल्या असून, खासगी क्लासेसचे पेव फुटले आहे. आता नवीनच प्रकार सुरू झाला असून, सरकारी अनुदानित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घ्यायचा आणि त्या महाविद्यालयाने एका खासगी क्लासेसशी संगनमत करून टायअप करायचे. विद्यार्थी नावाला त्या कॉलेजमध्ये असून, पूर्ण वेळ त्या क्लासेसमध्ये शिकण्यासाठी जात आहे, असे नाशिक जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांमध्ये दिसून येत आहे. ही खरच खूप गंभीर बाब असून महाविद्यालयातील शिक्षक बसून पगार घेत आहे का? अशी शंका येत आहे. शिवाय महाविद्यालयाची पाच आणि सहा हजार फी असून वर्षभर ते शिक्षक शिकवत असतात. परंतु खासगी क्लासेसची फी ही दीड ते दोन लाख रुपये असते.तरीसुद्धा पालक एवढे पैसे देऊन आपल्या मुलाला खासगी क्लासेसमध्ये ढकलत आहेत.असे दिसून येते. तरी या खासगी क्लासेसच्या नावाने शिक्षणाचा बाजारीकरण सुरू झाले आहे. महाराष्ट्र शासनाने याकडे गंभीरपणे लक्ष घालून होणाऱ्या शिक्षणाच्या बाजारीकरण करणे थांबवावे व महाविद्यालयातच दर्जेदार शिक्षण मिळेल. याची दक्षता घ्यावी. अशा महाविद्यालय आणि खासगी क्लासेसवर बंदी आणून त्यांची मान्यता रद्द करावी. त्यांची चौकशी करण्यात यावी,अशी आज महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने विनंती करण्यात आली आहे. यावेळी मनसे विद्यार्थी सेनेचे शहराध्यक्ष ललित वाघ, प्रदेश कार्यकारणी सदस्य शशिकांत चौधरी, जिल्हाध्यक्ष गणेश मोरे, उप जिल्हाध्यक्ष नितीन धानापुणे, विभाग अध्यक्ष मेघराज नवले, संदिप आहेर, मोहित पाटील, वैभव शिंदे, दर्शन बोरसे, तेजस पाटील आदी उपस्थित होते.

# नंदिनीच्या पात्रातील पाचशे किलो कचरा जमा

## नदी संवर्धनासाठी कटिबद्ध : अतिरिक्त आयुक्त नायर

**नाशिक : प्रतिनिधी**




नदी आपली जीवनदायिनी असून तिचे रक्षण करणे आपली सामूहिक जबाबदारी आहे, महानगरपालिका नदी संवर्धनासाठी कटिबद्ध असून, नागरिकांना देखील नदी स्वच्छतेमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन अतिरिक्त आयुक्त करिश्मा नायर यांनी केले. महानगरपालिका शिक्षण विभाग व स्वच्छता विभाग यांच्या सहकार्याने १०० हून अधिक स्वयंसेवकांनी नंदिनी नदीपात्रातील तब्बल पाचशे किलोपेक्षा अधिक कचरा गोळा केला. संकलित कचऱ्याची विल्हेवाट महानगरपालिकेच्या माध्यमातून करण्यात आली.

नाशिक महानगरपालिकेची नंदिनी स्वच्छतेसाठी वसुंधरा सप्ताह स्वच्छता मोहीम उत्साहात राबवण्यात आली. नाशिक महानगरपालिकेने जागतिक माझी वसुंधरा सप्ताह साजरा करताना वसुंधरा वाचवा, वसुंधरा सजवा या ब्रीदवाक्यानुसार माझी नंदिनी, माझी जबाबदारी ही विशेष नदी स्वच्छता मोहीम राबवली. मोहिमेमध्ये इलाइट क्लब ऑफ नाशिक या सामाजिक संस्थेने पुढाकार घेतला. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी अतिरिक्त आयुक्त करिष्मा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी व स्वयंसेवकांनी माझी वसुंधरा, माझी जबाबदारी या संकल्पनेखाली पर्यावरण संरक्षणाची प्रतिज्ञा केली. यावेळी त्यांनी पर्यावरण संवर्धन, स्वच्छ व हरित जीवनशैली आणि आगामी हरित कुंभबाबत मोलाचे मार्गदर्शन केले. ही संपूर्ण मोहीम कर उपायुक्त तथा घनकचरा व्यवस्थापन संचालक अजित निकत व उपायुक्त पर्यावरण तथा गोदावरी संवर्धन नितीन पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी महानगरपालिका शिक्षण विभाग, घनकचरा विभाग व मनपाचे विविध विभागाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

नाशिक महानगरपालिकेच्या या उपक्रमामुळे नंदिनी नदी स्वच्छतेबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण झाली असून, पर्यावरण रक्षणासाठी नागरिकांमध्ये जागृत निर्माण झाली असल्याचे दिसून आले.



# बेकायदेशीर शाळा तत्काळ बंद करा

## आदिवासी विकास परिषदेचे निवेदन

**नाशिक : प्रतिनिधी**

दिंडोरी तालुक्यातील मानोरी गावात श्री चैतन्य टेक्नॉ स्कूल या संस्थेने शासनाची कोणतीही परवानगी घेतलेली नसून या संस्थेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची व पालकांची मोठ्या प्रमाणात फसवणूक होत आहे. भविष्यात ही शाळा बंद झाल्याने विद्यार्थी व पालकांचे मोठे नुकसान होणार आहे. त्यामुळे शाळेची तत्काळ चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी अखिल भारतीय आदिवासी विकास परिषदेचे युवा अध्यक्ष लकी जाधव यांच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी जलज शर्मा यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

ही शाळा आंध्र प्रदेशातील असून ६० हजाराच्या आसपास विद्यार्थी प्रवेश फी आहे.शाळेला मान्यता नसतानाही त्यांनी बेकायदेशीर स्टँप बनवला आहे. शाळेची माहिती चेक केली तर ही शाळा ऑनलाइन सुध्दा दिसत नाही.शाळेने शासनाची मान्यता नसून शासनाचे कोणतेही नियमांचे पालन केलेले नाही.

> सदर संस्थेबाबत या पूर्वी अनेकदा तक्रारी आल्या आहेत. परंतु कोणतीही कार्यवाही झाली नाही. याबाबत तत्काळ योग्य ती कार्यवाही न झाल्यास तीव्र आंदोलन करण्यात येईल. पुढील काळात विद्यार्थ्यांचे भविष्य धोक्यात येऊ शकते. जिल्ह्यात अशा प्रकारच्या बेकायदेशीर शाळांची शासनाने चौकशी करण्याची गरज आहे.
> **– लकी जाधव**, युवा अध्यक्ष अ.भा. आदिवासी विकास परिषद

त्यामुळे बेकायदेशीर शाळेच्या संस्था चालकावर गुन्हा दाखल करण्यात यावा. बेकायदेशीर सुरू असलेल्या शाळेसाठी स्वतंत्र चौकशी समिती स्थापन करावी. शाळेकडून विद्यार्थी व पालकांना फसवणूक टाळावी. प्रशासनाने याबाबत कार्यवाही न झाल्यास शाळेच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी परिषदेचे पदाधिकारी उपस्थित होते.

# त्र्यंबकचा सुधारित तीर्थक्षेत्र विकास आराखडा सादर करा

## मुख्य सचिव यांचे जिल्हा प्रशासनाला आदेश

**नाशिक : प्रतिनिधी**

सिंहस्थ कुंभमेळ्यासंदर्भात त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील कुशावर्ताप्रमाणे निर्मिती करण्यात येणारे पाच कुंड, मंदिराभोवतीची विकासकामे, इतर मंदिरांचे व्यवस्थापन, दर्शनमार्ग तसेच पार्किंगव्यवस्थेबाबत नव्याने आराखडा सादर करावा, अशा सूचना मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी दिल्याचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सांगितले.

सिंहस्थ कुंभमेळा २०२७ साठी जिल्हा प्रशासनाकडून १८०० कोटींचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. यास त्र्यंबकेश्वर तीर्थक्षेत्र विकास आराखडा नाव देण्यात आले आहे. या विकास आराखड्यामुळे त्र्यंबकेश्वरचा संपूर्णत: कायापालट होणार आहे. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक यांच्याकडून जिल्हा प्रशासनाने तयार केलेल्या त्र्यंबकच्या तीर्थक्षेत्र विकास आराखड्याचा आढावा घेण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी त्र्यंबकेश्वरमधील मुख्य मंदिराभोवतीची विकासकामे, भाविकांच्या स्नानासाठी त्र्यंबकमध्ये विविध ठिकाणी उभारण्यात येणार असलेली विविध कुंडे, गर्दीचे व्यवस्थापन, इतर मंदिरांची विकासकामे आणि व्यवस्थापन, दर्शनमार्ग तसेच त्र्यंबकेश्वरमध्ये येणाऱ्या भाविकांच्या वाहनांसाठी उभारण्यात येणाऱ्या पार्किंग व्यवस्थेचा आराखडा सादर करण्यात आला.

यावेळी मुख्य सचिवांनी त्र्यंबकच्या विकास आराखड्यात काही बदल सुचवित नव्याने विकास आराखडा सादर करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्याप्रमाणे बदल करुन पुन्हा नव्याने आराखडा सादर करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी जलज शर्मा यांनी सांगितले.

### शाहीमार्गावरील नियोजित घनकचरा प्रकल्प हटवा

त्र्यंबकेश्वर शाहीमार्गावरील शासनाकडून मंजूर करण्यात आलेला नियोजित घनकचरा प्रकल्प हटवा या मागणीचे निवेदन श्री पंच दशनाम जूना आखाड्यातर्फे हरीगिरी महाराज यांच्या आदेशाने नीलकंठगिरी महाराज, शिवानंद पुरी महाराज यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिले. त्र्यंबकेश्वरसाठी शासनाकडून त्र्यंबकेश्वर शाहीमार्गावील श्री पंचदशनाम जूना आखाडा–कुंभ छावणी – पिंपळद या रस्त्यावर घनकचरा प्रकल्प उभारण्यात येत आहे. शाहीमार्गावर हा प्रकल्प झाल्यास साधुसंतांसाठी हा प्रकल्प डोकेदुखी ठरणार आहे. कचरा आणि दुर्गंधीमुळे परिसरात अस्वच्छता निर्माण होऊ शकते. यामुळे त्र्यंबकेश्वरच्या माहात्म्यावर आघात होऊ शकतो. त्र्यंबकनगरपालिकेच्या मालकीच्या कोजुळी येथील गट नं.४९ वर हा कचरा प्रकल्प उभारण्यात यावा अशी मागणी यावेळी श्री पंचदशनाम आखाड्यातर्फे करण्यात आली आहे.



# संत गोरोबा काका पुण्यतिथी उत्साहात

**नाशिक : प्रतिनिधी**

नासिक जुन्या नाशिक भागामधील कुंभारवाडा येथे श्री स्वामी समर्थ मंदिर मध्ये श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी व संत गोरोबाकाका पुण्यतिथी निमित्य विविध धार्मिक कार्यक्रमांचा आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये सकाळी श्रींचे पूजन अभिषेक सनई वादन हरिपाठ भजन कीर्तन प्रवचन विविध धार्मिक कार्यक्रम झाल श्री राष्ट्रीय भोलेनाथ भजनी मंडळाचा कार्यक्रम संपन्न झाला यावेळी राष्ट्रीय भोलेनाथ भजनी मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रघुनाथसिंग परदेशी श्री स्वामी समर्थ मंदिर जुना कुंभारवाडा संचालक गणेश सोनवणे, रामेश्वर वाघ वसंत ठाकूर तानाजी अष्टेकर विष्णुपंत गायकवाड श्अविनाश कडवे, श्रीपाद डोळस,अनंत बिडवे, चंद्रकांत छगनराव तरोडे, विजय अरोरा, यश सोनवणे, श्रद्धा सोनवणे, साई भालेराव, निहांक, अरुण सोनवणे, मल्हार डरांगे, आदी भावी उपस्थित होते.

# लोखंडे मळ्यात म्हसोबा यात्रोत्सव

**नाशिकरोड** : जेलरोड-उपनगर मार्गावरील लोखंडे मळ्यातील म्हसोबा महाराजा यात्रोत्सवाला सोमवारपासून (दि.२८) सुरूवात होणार आहे. सोमवारी सायंकाळी सहाला प्राचार्य पांडुरंग जाधव यांचा भजन संध्या कार्यक्रम होईल. मंगळवारी (दि.२९) सकाळी नऊला मांडव डहाळे, सकाळी दहाला होम-हवन, सकाळी ११ ते ३ दरम्यान रक्तदान शिबीर होईल. सायंकाळी सहाला मिरवणूक निघेल. त्यानंतर महाप्रसाद वाटप होईल. नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन म्हसोबा महाराज यात्रा उत्सव समिती आणि म्हसोबा महाराज मित्र मंडळाने केले आहे.

# कुंभमेळ्यात मल्टी ट्रान्सपोर्ट हब प्रकल्प

**नाशिक : प्रतिनिधी**

नाशिकमध्ये २०२६-२८ च्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी आणि समन्वय केंद्र निर्माण करण्याच्या उद्देशाने नाशिकरोड रेल्वे स्थानकाजवळ ४० एकर जागेवर मल्टी मॉडेल ट्रान्सपोर्ट हब उभारण्याची घोषणा झाली आहे. या प्रकल्पात तळमजल्यावर न्यू मेट्रो, रेल्वे, हायस्पीड रेल्वे, शहर बस टर्मिनस, तर वरच्या मजल्यांवर हॉस्पिटल, शॉपिंग मॉल, मल्टिप्लेक्स आणि आयटी पार्क अशी संकल्पना आहे.

हा प्रकल्प पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप अंतर्गत उभारला जाणार असून, रेल्वे, नाशिक महानगरपालिका आणि एसटी महामंडळाच्या जागेच्या संयुक्त वापरातून साकारला जाईल.

पंतप्रधान कार्यालयाने कुंभमेळ्याच्या तयारीसाठी हा प्रकल्प आणि नाशिक विमानतळ विस्ताराचे निर्देश दिले होते. सध्यस्थिती: जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत प्रकल्पाची प्रगती जाणून घेण्यात आली.

मंजुरी आणि निधीची तरतूद यांसारख्या प्रारंभिक टप्प्यांवर काम सुरू आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित विभागांना प्रगती अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

# प्रवाशांच्या १८४ मौल्यवान वस्तू केल्या परत

## सिटीलिंक कर्मचाऱ्यांचा प्रामाणिकपणा

**नाशिक : प्रतिनिधी**

**सिटीलिंक बसमधून प्रवास करतना नकळतपणे बसमध्ये मौल्यवान वस्तू प्रवाशांकडून विसरून गेल्याचे प्रकार घडत असतात. गेल्या चार वर्षांत बसमध्ये विसरुन गेलेल्या तब्बल१८४ मौल्यवान वस्तू चालक व वाहकांनी परत केल्या आहेत.प्रामाणिकतेचे कौतुक होत आहे.**

गर्दी, कधी घाई गडबड तर कधी विसर पडल्यामुळे अनेक प्रवासी महत्वाच्या वस्तू बसमध्येच विसरून जातात. मोबाईल, पर्स, महत्वाचे कागदपत्रे, रोख रक्कम अशा वस्तू बसमध्ये राहिल्यामुळे प्रवासी देखील घाबरुन जातात. मात्र सिटीलिंक कर्मचाऱ्यांना अशा वस्तू आढळून आल्यास त्या प्रवाशांना परत केल्या जात आहे.

जानेवारी ते एप्रिल दरम्यान १२ मौल्यवान वस्तु सिटीलिंक कर्मचाऱ्यांनी परत केल्या आहेत. नाशिक महानगर परिवहन महामंडळ लि. अर्थातच सिटीलिंक नाशिककरांची जीवनवाहिनी रोज हजारो नाशिककर सिटीलिंक बसने प्रवास करतात कधी गर्दी, कधी घाई गडबड तर कधी विसर पडल्यामुळे अनेक प्रवासी आपल्या वस्तू बसमध्येच विसरून जातात. परंतु प्रवाशांचे हित जपणाऱ्या, त्यांच्या प्रवासाची काळजी घेणाऱ्या सिटीलिंकने आजवर शेकडो राहिलेल्या वस्तू प्रवाश्यांना परत केल्यात. सिटीलिंकच्या प्रामाणिक कर्मचाऱ्यांमुळे प्रवाशांना परत मिळाल्याने प्रवाश्यांनी सिटीलिंकवर विश्वास कायम राखला आहे.

| परत केलेल्या वस्तुंची आकडेवारी | |
|---|---|
| सन २०२२ | १२ |
| सन २०२३ | ३२ |
| सन २०२४ | ४८ |
| सन २०२५ | १२ |



प्रवाश्यांना बसमध्ये राहिलेल्या वस्तू परत करण्याची पद्धती प्रवाश्याकडून एखादी वस्तू बसमध्ये राहून गेल्यास व सदर वस्तू चालक, वाहक किंवा अन्य सिटीलिंक कर्मचाऱ्यांना आढळून आल्यास ते सदर वस्तू निमाणी, नाशिकरोड बस स्टँड किंवा डेपोमध्ये जमा करतात.

त्यानंतर सदर वस्तूची रीतसर नोंद करण्यात येते. शक्य असल्यास संबंधित प्रवाश्यासोबत संपर्क साधण्यात येऊन व संपूर्ण शहानिशा करण्यात येऊन ती वस्तू प्रवाशास परत करण्यात येतात. अथवा तक्रार घेऊन आल्यास हरविलेली वस्तू व सापडलेली वस्तू यांची तुलना करण्यात येते. प्रवाशांनी सांगितलेली सर्व माहिती हरविलेल्या वस्तू सोबत मिळतीजुळती असल्यास खात्री करून सदर वस्तू परत करण्यात येते.

आतापर्यंत शेकडो वस्तू प्रवाश्यांना परत करण्यात आल्याने प्रवाशांनी सिटीलिंक कर्मचाऱ्यांच्या या प्रामाणिकपणाचे कौतुक केले जात आहे.

रविवार गांवकरी
# आस्वाद
रविवार, दि. २७ एप्रिल २०२५

पहलगाम येथे निष्पाप पर्यटकांवर हल्ला करुन देशाचे २७ नागरिक मारण्यात आले. याला लगोलग माध्यमांनी हिंदू मुस्लिम भेदावर आणले. पंतप्रधानांनीही आपला दौरा अर्धवट सोडून तातडीने बिहारच्या निवडणूक प्रचारात भाग घेत अतिरेक्यांवर कारवाई करणार असल्याची घोषणा केली. पुलवामा हल्ला व त्याचा तपास अद्यापही पूर्ण झालेला नाही. त्या पार्श्वभूमीवर या हल्ल्यामध्ये जे जबाबदार आहेत. त्या सर्वांना अद्दल घडेल, अशी शिक्षा द्यायला हवी. केंद्र सरकार कदाचित जम्मू काश्मीरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करुन हा प्रश्न सोडवेलही पण त्याने काही होणार नाही. त्यावर निर्णायक व ठोस कारवाई व्हायला हवी.



## पाकची जलकोंडी



**प्रासंगिक**

**समाधान कदम**

जम्मू-काश्मीरच्या पहलगाम येथे दि. २३ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्याने देशभर हळहळ व्यक्त झाली. या हल्ल्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला आणि पुन्हा एकदा पाकिस्तानप्रेरित अतिरेकी कारवायांचा विषय ऐरणीवर आला. या घटनेच्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने घेतलेला सिंधू जल करार तात्पुरता निलंबित करण्याचा निर्णय हा केवळ जलधोरणाशी संबंधित नसून, व्यापक राजनैतिक अर्थ असलेला ठरतो.

**जल कराराची पार्श्वभूमी**

फाळणीनंतर भारताच्या भूभागातून उगम पावणाऱ्या सिंधू नदी प्रणालीवर दोन्ही देशांमध्ये तणाव वाढला. या तणावाचा शांततामय मार्ग काढण्यासाठी जागतिक बँकेच्या मध्यस्थीने १९६० मध्ये तत्कालीन पंतप्रधान जवाहरलाल नेहरू आणि पाकिस्तानचे अध्यक्ष अयुब खान यांच्यात सिंधू जल करारावर स्वाक्षऱ्या झाल्या. या करारानुसार सिंधू नदी प्रणालीतील सहा नद्यांचे वाटप करण्यात आले. पूर्वेकडील नद्या- रावी, बियास आणि सतलज भारताला.पश्चिमेकडील नद्या सिंधू, झेलम आणि चेनाब पाकिस्तानला. भारताला पश्चिमेकडील नद्यांवर मर्यादित प्रमाणात पाणी वापरण्याचा अधिकार आहे. पण नदीचा प्रवाह अडवता येत नाही. गेल्या सात दशकांपासून हा करार दोन्ही देशांनी पाळलेला असून, तो आंतरराष्ट्रीय शांततावादाचा एक उदाहरण मानला जात होता. पुन्हा एकदा पाकिस्तानमधून चालवली जाणारी दहशत भारताच्या भूमीवर थैमान घालते, तेव्हा भारताला नुसती निषेधाची भूमिका घेण्यापलीकडे कठोर निर्णय घ्यावे लागत आहे. परिणामी सिंधू जल करार निलंबित करण्याचा निर्णय भारत सरकारने घेतला.भारताने एक प्रकारे पाकिस्तानला कडक इशारा दिला आहे. पाकिस्तानमध्ये सिंधू नदीच्या पाण्यावर कृषी, पिण्याचे पाणी आणि जलविद्युत प्रकल्प मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहेत. त्यामुळे भारताने पाण्याचा पुरवठा थांबवण्याची शक्यता जरी व्यक्त केली तरी त्याचे गंभीर स्वरूपाचे परिणाम होऊ शकतात.

पाकिस्तानचा दावा आहे की, भारताने करार मोडला आहे. पण आंतरराष्ट्रीय करारांमध्येही काही तरतुदी असतात. जसे की जर एखादी बाजू सातत्याने कराराचे मूळ उद्दिष्ट धोक्यात आणत असेल. उदाहरणार्थ की भारताच्या अंतर्गत सुरक्षिततेला पाकिस्तान नेहमी बाधा पोहोचत असेल- तर दुसऱ्या बाजूला कराराच्या अंमलबजावणीपासून माघार घेण्याचा नैतिक आणि कायदेशीर अधिकार भारताला प्राप्त होतो. तसेच त्याला तसे आंतरराष्ट्रीय समर्थन देखील मिळते.

**भारताच्या दृष्टीने मार्ग**

या जलकरारासंदर्भात भारतापुढे पुढील तीन पर्याय उपलब्ध आहेत. १. करार पूर्णतः रद्द करणे. २. केवळ निलंबन करून दबाव तंत्र वापरणे. ३. नवीन अटींसह कराराचा पुनर्विचार .../-२

# थेट कारवाई हवी



या हल्ल्यामुळे संपूर्ण देशात संतापाची एक लाट उसळली आहे. त्यात संघाच्या सेलनेही मुस्लिमांना जबाबदार धरत त्यांच्या विरोधात समाजमाध्यमावर वातावरण चांगलेच तापवले आहे. त्याचा फायदा त्यांना बिहार निवडणुकीत होणार आहे. या पलिकडे जाऊन देश म्हणून या प्रश्नांकडे पाहावे लागणार आहे. या हल्ल्याने भारत व काश्मीर प्रश्नाकडे वेगळ्या पद्धतीने पाहावे लागणार आहे. या हल्ल्याच्या निमित्ताने निर्माण झालेल्या विविध प्रश्नांकडे तज्ञ व सैनिकी कारवाईचा ज्यांना अनुभव आहे अशा लोकांना विश्वासात घेऊन एक धडक मोहीम राबवावी लागणार आहे. त्यात कोणा सत्तालोलुपाचा समावेश केला तर त्याचा केवळ सत्तेसाठी कसा फायदा उचलायचा? यावरच चर्चा होईल. त्यामुळे लष्करी तज्ज्ञांकडे हा प्रश्न सोपवावा. सारा देश यावेळी सरकारच्या मागे आहे. सरकार कोणाचेही असो जेव्हा देशाच्या स्वाभिमानावर असा हल्ला होतो तेव्हा सारा देश एक होऊन जातो. आज तसेच काही झाले आहे. यातील प्रत्येक स्थितीचे वस्तुनिष्ठ परीक्षण करावे लागणार आहे.

यातील प्रत्येक गोष्ट, गेल्या काही दिवसांपासून जम्मू काश्मीरमधील स्थिती सामान्य होती. सर्वोच्च न्यायालयाच्या कठोर भूमिकेमुळे तिथे निवडणुका झाल्या. त्यानंतर ओमर अब्दुल्ला यांचे सरकार आले. गेल्या काही दिवसांमध्ये काश्मीरमध्ये येणाऱ्या पर्यटकांचे प्रमाण वाढले. त्यामुळे कोणाचे नुकसान झाले. कोणाचा धंदा बसला म्हणून त्यांनी यावेळी केवळ पर्यटकांनाच लक्ष्य केले. आतापर्यंत काश्मीरमध्ये झालेले हल्ले हे सैनिकी स्वरुपाचे होते. काश्मीरवरील गरज नसतांना हक्क सांगण्याच्या पाकिस्तानच्या भूमिकेमुळे काही माथेफिरू तरुणांना त्यांनी त्यांच्याकडे ओढले होते. त्यांनी काश्मीर खोऱ्यात दहशतवादाचा राक्षस पोसला होता. नव्या तरुणपिढीला जागतिक भान आहे. त्यामुळे त्यांना वैश्विक विषय लक्षात येतात त्यामुळे त्यांनी दहशतीचा मार्ग सोडून आर्थिक उन्नतीचा मार्ग निवडला होता. त्यालाच या हल्ल्यामुळे मोठी ठेच पोहोचली आहे. काश्मीरमध्ये स्थिती सामान्य होत आली म्हणजे सारे काही आलबेल आहे असा एक गैरसमज आपल्याही सरकारने करुन घेतला. त्यामुळे नेमक्या पहलगाममध्येच त्याच वेळी कोणतीही सुरक्षा नव्हती अशी माहिती अनेक पर्यटकांनी दिली. जेव्हा जेव्हा संख्या वाढते तेव्हा तेव्हा सुरक्षा सेवेची जबाबदारीही वाढत असते. त्यात काश्मीरमध्ये झालेली ही वाढ त्यांनी गृहित धरायला हवी होती. हल्ला झाल्यानंतर माध्यमांवर या हल्ल्याच्या व त्याविरोधात केलेल्या कारवाईपेक्षा राजकीय प्रसिद्धी मोठ्या प्रमाणात सुरू झाली. देशातील नागरिकांवर झालेला हल्ला यापेक्षा हिंदूंवरझालेला हल्ला हा मुख्य दृष्टीकोन निर्माण झाला. त्यामुळे पुढे या हल्ल्याचे गांभीर्यच कमी करण्याचा प्रयत्न आपल्याच वाहिन्यांकडून झाला की काय? अशी स्थिती निर्माण झाली आहे.

पहलगाम येथील हल्ला झाल्यानंतर अवतीभवतीच्या प्रतिक्रिया या फार गंभीरपणे न येता अगदीच उथळ स्वरुपाच्या आल्या. असे होता कामा नये. यासारख्या घटना या देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून फार महत्त्वाच्या आहेत. सैन्यातील अनेक दिग्गज अधिकारी व अनुभवी सैनिक अधिकारी यामध्ये सामील असतात. त्यांच्या कामामध्ये किंवा त्यांच्या अधिकारात ढवळाढवळ करणे चुकीचे ठरते. त्यांना ज्या गोष्टी माहित असतात. ज्यासाठी त्यांचे प्रशिक्षण झालेले असते तसे प्रशिक्षण इतरांचे झालेले नसते. त्यांना केवळ वरवरच्या गोष्टी माहिती असतात. त्यामुळे अशा स्थितीत आपल्या लष्करी सामर्थ्यावर विश्वास ठेवून त्यांना त्यांच्या कामासाठीचे योग्य सकारात्मक वातावरण निर्माण करणे आपले कर्तव्य आहे. हे भान स्वतःला फार मोठ्या वृत्त वाहिन्या समजणाऱ्या कंपन्यांनीही ठेवले पाहिजे. एका वाहिनीवर लष्कराच्या शोध मोहिमेचे थेट प्रक्षेपण केल्यासारखी दृश्ये तयार करण्यात आली. त्यात एका पाण्याच्या टाकीत दहशतवादी लपून बसल्याचे काल्पनिक चित्र दाखवण्यात आले. हे हास्यास्पद आहे. त्यात आपल्याच सैन्य दलाचे महत्त्व कमी होत असते. याचे भान ठेवावे.सैन्य दलातील सर्व अधिकाऱ्यांना अशा स्थितीत कशी कारवाई करायची, कोणाला कसे कोंडीत पकडायचे याचे चांगलेच भान असते.




**वेध**

**राजेश शिरभाते**
९८६९५७८७२९
८८५०६७९५८६

जेव्हा अशा प्रकारचा कोणताही हल्ला होतो. तेव्हा संपूर्ण देश म्हणून तो लढावा लागतो. काही लोकांनी तर यात पक्षीय राजकारणही खेळायचा प्रयत्न केला. सत्ताधारी असो किंवा विरोधी पक्षातील दोन्ही याच देशाचे आहेत. बाहेरच्या शत्रूबरोबर लढतांना आपण सारे केवळ भारतीय आहोत. केवळ तुम्ही या बाजूचे आहात म्हणून हे व दुसऱ्या बाजूचे आहात म्हणून ते असे होत नाही. या हल्ल्यानंतर सर्वच भारतीयांनी प्रगल्भ विचार करणे आवश्यक आहे. आपण जर त्यांच्या सारखाच विचार केला तर आपल्यामध्ये व त्यांच्यामध्ये फरक तो काय राहणार. देश हा इतर सर्व गोष्टींपेक्षा मोठा आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणावरही या हल्ल्याचे मोठे प्रतिसाद उमटणार आहेत. जर पाकिस्तानचा यात थेट सहभाग असेल तर त्याला चोख प्रत्युत्तर देण्यास भारत समर्थ आहे. याच भारताने पाकिस्तानचे दोन तुकडे करुन दाखवले आहेत. हे पाकने नेहमी लक्षात ठेवावे.








# दहशतवादी हल्ल्यांतून धडा कधी घेणार?

**सरहदों पर बहुत तनाव है**
**पता करो कहाँ चुनाव है...**

राहत इंदौरी यांची शायरी आठवण्याचे कारण म्हणजे पहलगाम येथे झालेला हल्ला. तत्पूर्वी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर व्लादिमीरोविच पुतीन यांच्या एक जुना किस्सा नमूद करावासा वाटतो. जो रशिया येथे घडला होता. त्यावेळी पुतीन यांचा कार्यकाळ संपणार होता. पुढील निवडणूक जिंकणे कठीण जात आहे असे त्यांना स्पष्ट दिसत होते. मग पुतीन यांनी एक धाडसी पण धूर्त राजकारणाचा एक डाव आखला. पुतीन यांनी त्यांच्या देशातील विरोधकांना संपवण्यासाठी दहशतवादी संघटनांशी हातमिळवणी करुन स्वतःच्या राष्ट्रात अतिरेकी हल्ले घडवून आणले होते. त्यानंतर रशियात अतिरेकी हल्ला झाल्यानंतर लोकांच्या मनात जनआक्रोश निर्माण केला गेला. मोर्चे, जनआंदोलन, निषेध यात्रा काढल्या गेल्या.

देशात निर्माण झालेल्या या जनआक्रोशाच्या फायदा घेत पुतिन यांने त्या दहशतवादी संघटनेच्या वास्तव्याचे ठिकाण असलेल्या भागात रॉकेटने प्रतिहल्ले (सर्जिकल स्टाइक) घडवून आणले. त्यांच्या बंदोबस्त केला. हल्ला करतांना घडलेली एक-एक गोष्ट जनतेला न विसरता दाखविली गेली. जनतेच्या मनाचे पूर्ण समाधान केले गेले. आणि रशियन भाषेत देश मजबूत हातात आहे असे ठणकावून सांगितले. याचा परिणाम म्हणजे व्लादिमीर पुतीन मोठ्या मताधिक्याने रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुन्हा निवडून आले. हा किस्सा आठवण्याचे कारण म्हणजे आपल्या देशात ज्या ज्या वेळी असे हल्ले घडतात, त्या वेळी ही गोष्ट मला सहज आठवते. आता बिहार या राज्यात आगामी निवडणुका आहेच. सीमेवर शहीद होणाऱ्यांमध्ये बिहारी तरुणांची संख्या जास्त आहे. असे बिहारच्या एका कार्यक्रमात पंतप्रधानांनी म्हटलेच आहे. परंतु, असे असले तरी या घटनेचा आणि बिहारच्या निवडणुकांचा काहीही संबंध नाही. हे मी स्पष्टपणे नमुद करु इच्छिते.

आता मुद्दा दहशतवादी हल्ल्याचा. जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २८ निरपराध पर्यटकांचा मृत्यू झाला, ही बातमी वाचून अंतः करण हेलावले. पण त्याचबरोबर संतापाने मेंदू पेटला. कारण हे काही नवीन नाही. या देशात नागरिक मेल्याचे दुःख क्षणिक असते.पण त्या नागरिकांचं संरक्षण करणाऱ्या व्यवस्थेचा ढिसाळपणा मात्र दीर्घकालीन ठरतो. पहलगामसारख्या पर्यटनस्थळी स्फोट घडवणारे हे रक्तपिपासू दहशतवादी कुठून आले? कसे आले? कोणत्या बुद्धिवैभवाने पोलीस, लष्कर, आणि गुप्तचर यंत्रणांना फसवलं? आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे केंद्र सरकार कुठे होतं?

ही केवळ हल्ल्याची बातमी नव्हे. ही एका अपयशी यंत्रणेची कबुली आहे. २०१४ पासून आतापर्यंत जम्मू-काश्मीरमध्ये दहशतवादी हल्ल्यांची संख्या ८०० च्या घरात आहे. त्यामध्ये सुमारे ६०० पेक्षा अधिक सुरक्षादलाचे जवान आणि ३०० पेक्षा जास्त सामान्य नागरिक हकनाक मृत्युमुखी पडले आहेत. केवळ २०२४ मध्ये ५६ पेक्षा जास्त हल्ले झाले. आणि या वर्षाच्या पहिल्या चार महिन्यांतच सुमारे १२ हल्ले झाले. हे आकडे पाहिल्यानंतर, जम्मू-काश्मीरमध्ये सामान्य स्थिती' आल्याचा दावा किती कोलमडलेला आहे, हे स्पष्ट होते. हे आकडे म्हणजे सरकारच्या 'नवीन काश्मीर'च्या गाजरगप्पांची पोकळता दर्शवणारे जिवंत पुरावे आहेत.

काश्मीरमधून ३७० कलम हटवल्यानंतर 'सगळं आलबेल' असल्याचा दावा सरकारनं केला होता. पण सत्य काय? दहशतवादी हल्ल्यांची तीव्रता वाढली. गुप्तचर यंत्रणा नामशेष झाल्या, आणि सामान्य नागरिक मृत्युमुखी पडत राहिले. २०१४ अगोदरचे सत्ताधीश हे अल्पसंख्यांकाचे लांगूनचालन करत असल्यामुळे जम्मू-काश्मीरसारख्या राज्यात काही समाधानकारक कामगिरी करु शकले नाहीत. हे एकवेळ मान्य. पण २०१४ नंतरच्या दहशतवादी हल्ल्यांचा आढावा घेतल्यास काय दिसते? पठाणकोट (२ जानेवारी २०१६), आणि त्याच वर्षी उरी (१८ सप्टेंबर २०१६), बारामुल्ला (१३ ऑक्टोंबर २०१६), अमरनाथ यात्रेवर हल्ला (२ जुलै २०१७), पुलवामा (१४ फेब्रुवारी २०१९) आणि आता पहलगाम? पुलवामा हल्ला झाला. त्यामधून सरकारने काय धडा घेतला? दहशतवादी हल्ला होऊ नये म्हणून काय उपाययोजना केली? या प्रश्नांची उत्तरे सरकारने जनतेला देणे आवश्यक आहे. ती किती प्रामाणिकपणे दिली जातात. हा प्रश्न खरा आहे.



**जीवनगाणे**

**सीमाताई मराठे**
९०२८५५७७१८

या हल्ल्यांचे मूळ कारण म्हणजे, भारताची सडलेली सुरक्षा यंत्रणा आणि सरकारची सुरविषयक ढिसाळ धोरणे. शत्रू सीमारेषेवर नसतो, तो आपल्या प्रशासकीय दुर्लक्षात लपलेला असतो. सीमेवरच्या गावांमध्ये तुटपुंजे सैन्य, हतबल पोलीस, आणि नाक्यावर पथके नसल्याने दहशतवाद्यांना अंगण मोकळे झाले आहे. सीमेवर संरक्षण व्यवस्था वाढवणे म्हणजे केवळ सैनिक पाठवणे नव्हे. तर तिथल्या नागरिकांच्या, पर्यटकांच्या आणि सुरक्षा यंत्रणांच्या दैनंदिन सुरक्षेची हमी देणे हे सरकारचे कर्तव्य असते. दुसरीकडे, राज्यपाल, आमदार, खासदार, मंत्री आणि 'व्हीआयपी' म्हणवणाऱ्यांच्या संरक्षणासाठी केंद्राचे असोत की राज्याचे यांना दिली जाणारी सुरक्षा पाहिल्यास, हा देश केवळ राजकीय व्यक्तींनाच सुरक्षित ठेवण्यासाठी धडपडतोय असे वाटते. एका खासदाराच्या संरक्षणासाठी १५ जवान, एका मंत्र्यासाठी झेड प्लस दर्जाची सुरक्षा, कमांडो, बुलेटप्रूफ गाड्या. आणि त्याच वेळेस देशाचा सामान्य पर्यटक, जो कर भरतो, तो मात्र बिनधास्त नक्षलवाद, दहशतवाद, फुटीरतावाद यांच्या सापळ्यात सापडतो. हीच आपल्या व्यवस्थेची क्रूर शोकांतिका आहे. जनतेचे पैसे खर्च होतात जनतेच्या सुरक्षेसाठी नव्हे, तर सत्ताधाऱ्यांच्या 'भयविना भक्ती न होय' या सूत्रासाठी! हा खर्च किती आहे? फक्त केंद्र सरकारने 'व्हीव्हीआयपी' सुरक्षेसाठी २०२४ मध्ये खर्च केलेली रक्कम ८०० कोटी रुपये होती. राज्यसरकारांचे आकडे धरले तर हा खर्च हजार कोटींपर्यंत जातो. आणि दुसरीकडे, सीमाभागांमध्ये सीमेवरील खेड्यांमध्ये प्राथमिक आरोग्य सुविधा नाहीत, गावात रस्ते नाहीत, मोबाइल नेटवर्क नाही आणि मूलभूत सुरक्षा यंत्रणाही नाहीत.

गुप्तचर संघटनांचे काय? गुप्तचर संस्था, जी देशाच्या सुरक्षेचा कणा आहे. त्या संस्थांचे अपयश हा गंभीर चिंतेचा विषय आहे. पहलगामसारख्या पर्यटनस्थळी पर्यटकांची सतत ये-जा असते. अशा ठिकाणी जर सुरक्षा यंत्रणांना हल्ल्याची चाहूलही लागत नसेल, तर त्यांच्या अस्तित्वाचा उपयोग काय? 'रॉ', 'आयबी', 'एनआयए' 'एनएसए' या संस्थांचे कार्य आज 'सुस्त' झालंय. हल्ला झाल्यावर बैठका होतात. गुप्तचर अहवाल मागवले जातात. आणि शेवटी त्या कागदांवर फाईल ठेवल्या जातात. पण हल्ला रोखणे, त्याचं पूर्वाभान ठेवणे, आणि साखळी उद्ध्वस्त करणे या मूलभूत गोष्टींसाठी आवश्यक असलेली शिस्त, तंत्र आणि इच्छाशक्ती कुठे दिसते? हल्लेखोर बॉम्ब घेऊन देशाच्या हृदयात शिरतात आणि पर्यटकांच्या जिवावर उठतात!

२०१९ चा पुलवामा हल्ला आपण विसरलो नाही. त्या दिवशी चाळीस सीआरपीएफ जवान शहीद झाले. त्यावेळी सरकारने मोठ्या तोऱ्यात सांगितले होते आता आम्ही शांत बसणार नाही. मग पुढे काय केले? हल्ला रोखणारी व्यवस्था निर्माण केली का? बॉर्डरवर तंत्रज्ञान, सुरक्षा, मानवी चौकशी या तिन्ही पातळ्यांवर काही नवीन घडले का? की केवळ निवडणुकीच्या मोसमात त्या शहिदांच्या नावाने घड्याळाचे काटे फिरवले? आज सरकारने प्रामाणिकपणे उत्तर द्यावे पहलगाम हल्ला टाळता आला असता का? काश्मीरमधील वाढती अस्वस्थता, दहशतवाद्यांचे नव्या पिढीला गंडवण्याचे प्रयत्न, आणि सीमापार चालणारी घातक घुसखोरी. यांचे समाधानकारक उत्तर, उपाय आणि आराखडा सरकारकडे आहे का? की फक्त 'सर्जिकल स्ट्राइक'च्या भावनिक गोंजारण्यावर जनतेचे लक्ष विचलित करण्याचा डाव पुन्हा खेळायचा आहे? 'शांततेचा मार्ग' म्हणून सरकार सध्या एक नवाच प्रपंच मांडत आहे. 'काश्मीरमध्ये पर्यटकांची संख्या वाढली आहे. याचा अर्थ स्थिरता आली. अरे पण ती स्थिरता २८ मृतदेहांच्या ढिगाऱ्यावर उभी आहे. शतकानुशतके सौंदर्याचे प्रतीक राहिलेले हे नंदनवन आज रक्ताने माखलं जातेयं, आणि सरकार मात्र 'सेल्फी पॉइंट' उघडण्यात गर्क आहे. या सगळ्याचा हिशेब जनतेला विचारण्याचा अधिकार आहे. प्रत्येक पर्यटकाच्या मृत्यूची जबाबदारी .../-२

## हल्ल्यांची जबाबदारी कोण घेणार?

या देशात हल्ल्यानंतर दोनच गोष्टी घडतात. एक, मृतदेहांवर तिरंगा पांघरला जातो. दोन, राजकारण्यांच्या तोंडावर बिनहिशेबी आश्वासनांचा झगमगाट रंगवला जातो. यात देश, जनतेचा जीव, आणि मानवी शोकांतिका यांचे मूल्य काय? सरकारच्या दृष्टीने फक्त 'मतांचं'!आज फक्त केंद्रच नव्हे, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेने आत्मपरीक्षण करावे. कारण २७ पर्यटक गेले नाहीत - २७ स्वप्नं, २७ कुटुंबं, २७ जिवंत विचार संपलेत. आणि जर हे सरकार खरंच जनतेचं असेल, तर त्याने उत्तर द्यावं - असल्या हल्ल्यांची जबाबदारी कोण घेणार?.

# TECH - वारी

**W**isdom through wellness and Work-life Balance | **A**wareness of Emerging technologies | **R**eform in Governance Practices | **I**nformed and Inclusive Workforce

## महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागातर्फे टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक हा ५ ते ९ मे २०२५ दरम्यान आयोजित केला आहे त्यानिमित्त...

# टेक वारी
## महाराष्ट्र टेक लर्निंग वीकचे आयोजन

**विशेष**
**संध्या गरवारे**
**विभागीय संपर्क अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

बदल हा निसर्गाचा नियम आहे. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात काळानुरूप बदल स्वीकारत काम करणे आवश्यक असते. हे काम त्या काळाला अनुरूप असेल तर ते अधिक गतीमान होते. प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांना प्रशासकीय कामामध्ये कुशलता वाढवून कामांची गुणवत्ता वाढवणे, समाजाप्रती आपले उत्तरदायित्व जोपासणे, कमी कालावधीत अधिक अचूक काम करणे व लोकाभिमुख असणे ही काळाची गरज आहे.

आज काळानुरूप तंत्रज्ञानात आणि आपल्या सभोवतालच्या परिस्थितीत झपाट्याने बदल होत आहे. हे लक्षात घेता प्रशासकीय अधिकारी यांना या प्रशिक्षणातून गतिमानतेने प्रशासकीय कामकाज व्हावे, काम करत असताना येणाऱ्या ताण - तणावाचे व्यवस्थापन याबाबींचे मार्गदर्शन मिळत राहणे गरजेचे आहे.

यातून तणावरहीत कार्यपद्धती आत्मसात करणे शक्य होते. त्यातून कामाप्रती असलेली बांधिलकी जपली जाते आणि लोकसेवेच्या व्यापक भावनेतून, प्रशासकीय कामकाजात अधिक गुणवत्ता वाढविण्यासाठी शासन वेळोवेळी अनेक उपक्रम राबवत असते.हेच लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या Integrated Government online Training (iGOT) प्रणालीवर उपलब्ध असलेले प्रशिक्षण राज्यातील अधिकारी यांनी घ्यावेत यासाठी सामान्य प्रशासन विभागाने सर्व विभागांना सूचना केल्या आहेत.

**नवीन कल्पनांचा संगम**

महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी यांच्या कौशल्य विकासासाठी प्रशिक्षण संस्कृती निर्माण करण्यासाठी राज्य शासनातर्फे टेक वारी : महाराष्ट्र टेक लर्निंग वीक हा ५ ते ९ मे २०२५ दरम्यान आयोजित केला आहे. महाराष्ट्र शासन आयोजित आधुनिक तंत्रज्ञान व नवीन कल्पनांचा संगम असलेली टेक वारी म्हणजे पहिली डिजिटल वारी असून, टेक वारी ही मंत्रालयातून सुरू होऊन महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांच्या कानाकोपऱ्यात तंत्रज्ञानाचा प्रसार करुन त्यामधून आधुनिक तंत्रस्नेही महाराष्ट्र घडविण्याची सुरुवात आहे.

### १५ लाख रूपयांची मदत

'टेक वारी' मध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन, सायबर सुरक्षा इत्यादी तंत्रज्ञानाबाबत सत्रे तसेच तणाव व्यवस्थापन, आरोग्यदायी जीवनशैली, ध्यानधारणा याबाबतच्या कार्यशाळा आयोजित करण्यात येणार आहेत. मंत्रालयातील त्रिमुर्ती प्रांगण आणि परिषद सभागृह सातवा मजला येथे विविध व्याख्यांनाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच विविध क्षेत्रातील २४ स्टार्टअप्सचे सादरीकरण होणार असून निवड झालेल्या कल्पनांना १५ लाख रूपयांची मदत दिली जाणार आहे.

**- व्ही. राधा, अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग**

'टेक वारी' म्हणजे काय तर (Wisdom through wellness and Work-life Balance) निरोगीपणा आणि जीवनातील कामकाज संतुलन,(-wareness of Emerging technologies) उदयोन्मुख तंत्रज्ञानाची माहिती व जनजागृती,(Reform in Governance Practices) प्रशासनाच्या कामकाजात अधिक गतीमानता आणणे,(Informed and Inclusive Workforce) जाणकार आणि समावेशक कुशल अधिकारी व कर्मचारी यासाठी प्रयत्न करणे यासाठी टेक वारी असे या कार्यक्रमाला नाव देण्यात आले आहे.

**आय गॉट प्लॅटफॉर्मवर महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर**

केंद्र शासनाच्या आय गॉट (iGOT) प्रणालीवर विविध क्षेत्रांतील प्रशिक्षणे उपलब्ध आहेत. हे प्रशिक्षण मिशन कर्मयोगी अंतर्गत विकसित केलेले आहे,जे सरकारी कर्मचाऱ्यांच्या क्षमता वाढवण्यासाठी आहे. आय गॉट मध्ये वेगवेगळ्या विषयांवर आधारित ऑनलाइन प्रशिक्षण मॉड्यूल्स उपलब्ध आहेत. आय गॉट मध्ये प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर प्रमाणपत्र दिले जाते, जे सरकारी कर्मचाऱ्यांच्या सेवा पुस्तकाला जोडले जाणार आहे. १०० दिवसाच्या कार्यक्रमांतर्गत सामान्य प्रशासन विभागाने केंद्र शासनाच्या आय गॉट प्रणालीवर तीन महिन्यात राज्यात ९ हजारावरून ५ लाख कर्मचाऱ्याची नोंदणी केली आहे. आय गॉट प्लॅटफॉर्मवर महाराष्ट्र देशात दुसऱ्या क्रमांकावर आहे.

टेक वारी असेल अथवा आय गॉट प्रणाली शासनातील अधिकारी व कर्मचारी यांना आपल्या व्यस्त दिनचर्येतून स्वयंविकासासाठी असलेले हे व्यासपीठ शासनातील अधिकारी व कर्मचारी यांच्या वैयक्तिक विकासा सोबतच त्यांच्याकडून देण्यात येणाऱ्या विविध नागरी सेवा अधिक लोकाभिमुख होतील. महाराष्ट्र शासनाच्या वेगवेगळ्या आस्थापनातील अधिकारी आणि कर्मचारी यांनी आय गॉटवर प्रशिक्षण घ्यावेच सोबत टेक वारीतही सक्रीय सहभाग नोंदवण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाकडून सर्वांना आवाहन करण्यात आले आहे.

# झाडे लावा वसुंधरा वाचवा

आजच्या वाढत्या उष्णतेला कारणीभुत दुसरे तिसरे कुणी नसून मानव आहे आपण बघतोय दिवसेंदिवस उष्णता ही आगीचे रूप धारण करते आहे. झाडेझुडपेच नव्हे तर माणूस देखिल होरपळून निघतोय प्राणीपक्षी बेजार झाले गाव,शहर,नगर उन्हाच्या तडाख्यात सापडून त्रस्त झाले आहे. या परिणाम जनजीवन विस्कळीत होताना बघावयास मिळते.सकाळी नऊ वाजेला घरातून बाहेर निघावेसे



वाटत नाही. याला कारण झाडे तोड मानवाने आपल्या हव्यासापोटी झाडे हटवली आणि त्याजागी आपली घरे नटवली सिमेंटचे जंगलच जंगल उभी केली आणि थंडावा देणारी झाडांची जंगल होत्याचे नव्हते केली. परिणाम आपण आज उष्णतेच्या स्वरूपात भोगतो आहे.प्रदूषण वाढले त्यामुळे ओझोन वायूचे प्रमाण कमी झाल. सूर्याची प्रखर किरणे थेट जमिनीवर करू लागली. जमिनींची प्रतवारी खालावली पिक प्रमाणही कमी झाले. जमिन निकस होऊ लागली. या सर्वस्वी मानवंच जबाबदार आहे.

मानवाने आपल्यालाच हाताने आपल्यालाच पायावर दगड पाडून घेतलाय प्रायश्चित्त म्हणून आणि पुढच्या येणाऱ्या पिढीला जर उष्णता या महाभयंकर संकटातून वाचवायचे असेल तर आपणा सर्वांसमोर एकच पर्याय आह. तो म्हणजे प्रत्येकांने निर्धारपूर्वक येणाऱ्या पावसाळ्यात एका घरात एका कुटुंबात जेवढे माणसे आहे. तेवढी झाडे लावायचीच नुसती लावायची नाही. तर त्याचे पोटच्या मुलासारखे पालनपोषण संगोपन करून आपली वसुंधरा हिरवीगार मदत करूया तेंव्हा कुठे सर्वच प्राणीमात्रांना उष्णता सारख्या भस्मासुरापासून सुटका मिळे. चला तर मग येणाऱ्या पावसाळ्यात झाडे लावू झाडे जगवू वंसुधरा वाचवू.

**- प्रा. कावेरी पगारे**
८२०८४३११५९

# आजीच्या डायरीतून...

**मनातलं**
**विशाखा बल्लाळ**




शाळेतून आल्या आल्या घर उघडे असते. आणि स्कूल बॅगमधून किल्ली काढून दार उघडावे लागत नाही. हा एक मोठ्ठा फायदा आजी घरी असण्याचा....

तसे बरेच फायदे आहेत म्हणा... ममी पापा बाहेर जाताना... तू घरीच राहा रे... स्टडी करत बस... नाहीतर टिव्ही पहा..आम्ही अर्ध्या तासात जावून येतो... मग त्या अर्ध्या तासाचे एक तास कसे होतात ते आई पप्पांना समजत नाही... अशा वेळेस तर आज्जी म्हणजे मित्रच वाटते यार... तिच्याशी गप्पा मारता येतात.. ती काहीतरी पटकन खायला करून देते... कपडे आवरून देते... कधी कधी आई पप्पांच्या शाब्दिक तडाख्यातून वाचवते तर कधी कधी उन्हातून आलं की मस्त गार गार पन्हं करून देते....

पण अगदी नॅचरल आणि उत्स्फूर्त प्रतिक्रिया... म्हणजे.... रोज खायला छान छान पदार्थ ताटात पाहिले... की...आणि आवडीचे की...

गरम गरम पाकपुरी तोंडात टाकून खुश आणि तृप्त मनाने... नातवाने...

ए आज्जी... तू टू thousand वर्षपर्यंत राहा ग... किती सहज आणि अगदी मनाच्या तळापासून.. बेंबीच्या देठापासून आलेली ही प्रतिक्रिया.....



हसूच आले तिला...

बरं बरं राहीन हं.. दोन हजार वर्ष पर्यंत... मायेने त्याच्या केसातून हात फिरवत...हा प्रसंग तिने आपल्या मैत्रिणींना सहज बोलता बोलता गप्पांच्या ओघात सांगितला..

म्हणजे तुझ्या मुलांना... नातवंडांना पण खावू घालायचं की काय मी.

नको रे बाबा इतके आयुष्य... काय करायचे आहे.. मला तर आत्ताच कंटाळा आलेय... तू लाख म्हणशील रे... त्याच्या मनात काय आहे काय माहिती...आकाशाकडे तोंड आणि वर हात करून... आपल्या हातात काही नाही बरं... फक्त इच्छा बोलून दाखवायची...

......

का बरं मीच जगायचे एवढं तुला खावू घालण्यासाठी.... मम्मीला करता येत नाही.... शिकता येत नाही...

ती या सगळ्या प्रतिक्रियांकडे एका तटस्थपणे पाहत....

तिला स्वतःला मात्र नातवाचे हे बोलणे ऐकल्या बरोबर..

दोन हजार वर्ष जगल्याचे समाधान... काठोकाठ... मनाच्या गाभाऱ्यात .....ओसंडून वाहत असलेले जाणवले...मनातून जाणवले....

# दहशतवादाविरुद्ध सर्व राष्ट्रांनी एकत्र यावे

**विश्ववेध**
**श्याम ठाणेदार**
९९२२५४६२९५



जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे दहशतवाद्यांनी केलेल्या भ्याड हल्ल्यात २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला. या हल्ल्याने भारतातच नव्हे जगभर जगभर खळबळ माजली. या हल्ल्याची जशी भारतात निंदा होत आहे. तशीच निंदा जगभर होत आहे. संपूर्ण जग या भ्याड हल्ल्याने हादरून गेले आहे. जगाला हादरवून सोडणाऱ्या या घटनेचे तीव्र पडसाद उमटले आहेत. भारताने दहशतवाद्यांची कोंडी करण्यासाठी ठोस पावले उचलली आहेत. इतकेच नाही. तर या हल्ल्यास ठोस प्रतिउत्तर देण्याची तयारीही भारताने सुरू केली आहे. जर भारताने या हल्ल्यास जशास तसे उत्तर दिले आणि दहशतवाद्यांचे अड्डे असलेल्या पाकव्याप्त काश्मीरमध्ये सैन्य घुसवले किंवा सार्जिकल स्ट्राईक केला तर जग भारताच्या बाजूने उभे राहील का? भारताच्या कारवाईला जगाचा पाठिंबा मिळेल का? असा प्रश्न विचारला जात आहे. जर भारताने दहशतवाद्यांविरोधात कारवाई केली तर भारताला जगाचा पाठिंबा निश्चितपणे मिळेल कारण दहशतवादाने फक्त भारतच नाही तर सारे जग पोळून निघाले आहे. केवळ भारतच नाही जगातील सर्वच प्रमुख देशांना दहशतवादाने ग्रासले आहे. सर्व प्रमुख देशांत दहशतवाद्यांनी केव्हातरी हल्ला केला आहे. मागील वर्षीच रशियाच्या मॉस्को शहरात दहशतवाद्यांनी मोठा हल्ला घडवून आणला होता. रशियाच्या निवडणुकीत पुतीन यांचा एकतर्फी विजय झाल्याच्या काही तासातच रशियाची राजधानी असलेल्या मॉस्को शहरात मोठा दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्यात रशियाच्या १३३ निरपराध नागरिकांना जीव गमवावा लागला होता. या हल्ल्यात हजारो नागरिक जखमी झाले होते. इसीस या दहशतवादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली होती. पुतीन यांनी पाचव्यांदा विजय मिळवताच दहशतवाद्यांनी त्यांना ही भेट दिली होती. रशियात झालेला या भीषण हल्ल्याने संपूर्ण जगात चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते कारण इसीसच्या दहशतवाद्यांनी थेट मॉस्को शहरात घुसून हा हल्ला केला होता. रशियाच्या पोलादी सुरक्षेला भेदून दहशतवाद्यांनी हा हल्ला केल्याने रशियाच्या सुरक्षेव्यवस्थेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते जर राशिया सारख्या अभेद्य सुरक्षा व्यवस्था असलेल्या देशात इतका मोठा दहशतवादी हल्ला होऊ शकतो तर मग जगातील कोणत्याची देशात घुसून दहशतवादी हल्ला करू शकतात. अशीच चर्चा जगभर होऊ लागली होती आणि त्याची प्रचिती अवघ्या वर्षभरात आली. पाकपुरस्कृत दहशतवाद्यांनी भारतीय हद्दीत घुसून भारतीय पर्यटकांना ठार केले. वर्षभराच्या अंतरात जगातील प्रमुख देश असलेल्या या दोन्ही देशात झालेल्या या दहशतवादी हल्ल्यांनी जगभर भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जगात दहशतवाद पुन्हा डोकेवर काढत आहे. हेच या हल्ल्याने सिद्ध होत आहे. अर्थात दहशतवाद्यांनी आताच हल्ले सुरू केले आहेत असे नाही. या आधीही दहशतवाद्यांनी अनेक देशात दहशतवादी हल्ले केले आहेत. भारत तर नेहमीच दहशतवाद्यांच्या हिट लिस्टवर राहिला आहे. दहशतवादाची सर्वाधिक झळ भारतालाच बसली आहे. दहशतवादामुळे भारताने दोन पंतप्रधान गमावले आहेत. भारतावर झालेला २६ / ११ चा दहशतवादी हल्ला तर संपूर्ण जगाने पहिला आहे. भारताला जेव्हा जेव्हा दहशतवादाची झळ बसली तेंव्हा तेव्हा संपूर्ण जगाने एकत्र येऊन दहशतवादाचा मुकाबला करावा असे आव्हान भारताने जगाला केले. मात्र जगाने त्याला प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे दहशतवाद्यांचे धारिष्ट्य वाढत गेले. दहशतवाद्यांनी केवळ भारतालाच नाही तर अमेरिकेसारख्या महासत्तेला देखील तडाखा दिला आहे.भारत, रशिया, अमेरिका, फ्रान्स, जर्मनी, स्पेन, इस्राईल, जपान, दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया इतकेच नाही तर पाकिस्तानला देखील दहशतवादाची झळ बसली आहे. मध्यंतरी काही काळ शांत असलेले दहशतवादी आता पुन्हा एकदा सक्रिय झाले आहेत. दहशतवादी सर्वच देशात दहशतवादी कारवाया करीत आहे. त्यामुळे दहशतवाद ही आता एका देशाची समस्या राहिली नसून ती वैश्विक समस्या बनली आहे.

दहशतवादापासून कोणताच देश अलिप्त राहू शकत नाही. त्यामुळे याचा मुकाबला सर्व देशांनी मिळून करायला हवा. भारताने दहशतवादाविरोधात कारवाई केली तर संपूर्ण जगाने भारताने पाठिंबा द्यायला हवा. दहशतवादा विरोधातील भारताच्या मोहिमेस जगाने पाठबळ द्यावे. दहशतवादा विरोधात संपूर्ण जगाने एक व्हायला हवे. जोवर दहशतवादाविरोधात संपूर्ण विश्व एक होत नाही तोवर दहशतवादाचा हा भस्मासूर रोखणे कठीण आहे. दहशतवादी म्हणजे मानवतेचे शत्रू आहेत. या शत्रूविरुद्ध लढण्यासाठी सर्व राष्ट्रांनी एक होणे ही काळाची गरज आहे.

पान १ वरून

## पाकची जलकोंडी

करणे. या पैकी तिसरा पर्याय सर्वाधिक वास्तववादी ठरू शकतो. नवीन अटींमध्ये जलविद्युत प्रकल्पांवर अधिक अधिकार, दहशतवादाला प्रोत्साहन न देण्याच्या अटी, आणि पारदर्शक जलमापन यंत्रणा यांचा समावेश होऊ शकतो.सिंधू जल करार हा गेली अनेक दशके भारताच्या उदारमतवादी आणि शांततावादी धोरणाचा दाखला म्हणून टिकून आहे. मात्र, राष्ट्रीय सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर त्याचे अंधपणे पालन करणे आज अयोग्य वाटते. भारताने आता आपल्या जलहक्कांचा पुनर्विचार करून एक सशक्त धोरण मांडणे आवश्यक झाले आहे - जे फक्त देशाच्या हिताचेच नव्हे, तर दहशतवादाला उत्तर देणाऱ्या व्यापक रणनीतीचेही एक अंग ठरेल. म्हणूनच आता योग्य वेळ आली आहे दहशतवादाचा अड्डा असणाऱ्या पाकिस्तानची योग्य ती कोंडी करून भारताच्या व्यापक आंतरराष्ट्रीय हिताचे आणि अंतर्गत सुरक्षिततेचे योग्य पद्धतीने संरक्षण झाले पाहिजे.

## धडा कधी घेणार?

कोण घेणार? प्रत्येक आईच्या अश्रूंना उत्तर कोण देणार? फक्त देशभक्तीच्या घोषणा आणि विरोधकांवर आरोप करून सरकार किती काळ नजरा चुकवत राहणार? आता वेळ आली आहे की सरकारने पारदर्शकपणे स्वतःचे अपयश मान्य करावं, आणि फक्त निवडणूक जिंकण्यासाठी नव्हे, तर देशवासीयांच्या खऱ्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलावीत. एखाद्या आमदाराला गाडी द्या की नाही याचा निर्णय घेण्यापूर्वी पहलग्राममधील प्रत्येक पर्यटक सुरक्षित का राहिला नाही, हा प्रश्न आधी सोडवायला हवा. कारण एक गोष्ट सरकार विसरतंय. 'राष्ट्रीय सुरक्षेचं राजकारण' हे केवळ फसवे घोषवाक्य असू शकतं. पण त्यातून देश सुरक्षित राहत नाही. त्या दिशेने खऱ्या अर्थाने प्रयत्न व्हावेत. हीच त्या २८ मृत पर्यटकांची खरी श्रद्धांजली ठरेल.

# साप्ताहिक राशिभविष्य

**पुरुषोत्तम नाईक** | दि. २७ ते ३ मे २०२५

### मेष : यशप्राप्ती होईल

या सप्ताहात गुरू अनुकूल आहे. रवी, मंगळ, बुध, शुक्र, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च वाढतील. पैशांची आवक वाढेल. आर्थिक दिलासा मिळेल. नोकरदारांचे मनसुबे अडचणीत येतील. व्यापारी, व्यावसायिकांचे निर्णय चुकतील. शासकीय कोर्ट कचेरीच्या कामात यशप्राप्ती होईल.

### वृषभ : आर्थिक प्रगती

या सप्ताहात मंगळ, बुध, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. गुरू संमिश्र आहे. रवी प्रतिकुल आहे. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च वाढतील. प्रवास लाभदायी ठरतील. नवीन मित्रमैत्रिणी भेटतील. नोकरदारांवर वरिष्ठ खूष राहतील. व्यापारी, व्यावसायिकांची आर्थिक प्रगती होईल.

### मिथुन : धनचिंता सतावतील

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र, शनि अनुकूल आहेत. मंगळ, गुरू, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक अडचणी सतावतील. धनचिंता सतावतील. नोकरदारांना अडचणीतून मार्ग काढावा लागेल. व्यापारी, व्यावसायिकांनी कुणावर विसंबून निर्णय घेणे टाळावे. आरोग्याकडे लक्ष द्या.

### कर्क : भाग्योदय होईल

या सप्ताहात बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. रवी, मंगळ प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च आटोक्यात राहतील. नोकरदारांची वाटचाल कठीण होईल. व्यापारी, व्यावसायिकांचा भाग्योदय होईल. धार्मिक कार्यात सहभागी व्हाल. शेअरमध्ये विचारपूर्वक गुंतवणूक करा. मनावर संयम ठेवा.

### सिंह : प्रवास टाळा

या सप्ताहात रवी अनुकूल आहे. गुरू संमिश्र आहे. मंगळ, बुध, शुक्र, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात प्रवास टाळा, वाहन जपून चालवा. बांधकाम व्यवहार अडकतील. नोकरदार व्यापारी, व्यावसायिकांना अडचणी सतावतील. आरोग्यप्रश्न सतावतील. काळजी घ्या.

### कन्या : आनंदवार्ता कळतील

या सप्ताहात बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू अनुकूल आहेत. रवी, मंगळ, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती चांगली राहील. खर्च वाढतील. धनचिंतांना उतार पडेल. नोकरदारांच्या कामातील अडचणी दूर होतील. व्यापारी, व्यावसायिकांना कठोर परिणाम घ्यावे लागतील. आनंदवार्ता कळतील. प्रकृती जपा.

### तूळ : व्यवहारावर लक्ष ठेवा

या सप्ताहात बुध अनुकूल आहे. रवी, मंगळ, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. नोकरदारांचे वरिष्ठांशी वितुष्ट येण्याची शक्यता नाकारता येत नाही. व्यापारी, व्यावसायिकांना फारच हुशारीने व्यवहार करावे लागतील. प्रकृती जपा.

### वृश्चिक : सुखवार्ता कळतील

या सप्ताहात बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. मंगळ प्रतिकुल आहे. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च आटोक्यात राहील. शेअरमध्ये लाभ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नोकरदारांना विरोधक त्रस्त करतील. व्यापारी, व्यावसायिकांना सुखवार्ता कळतील. प्रकृती चांगली राहील.

### धनु : सतर्क रहा

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र अनुकूल आहेत. गुरू संमिश्र आहे. मंगळ, शनि, राहू, केतू प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे प्रतिकुल आहेत. या सप्ताहात आर्थिक अडचणी सतावतील. खर्च वाढतील. प्रवास टाळा, वाहन जपून चालवा. बांधकाम व्यावसायिकांनी सतर्क रहावे. विरोधक षडयंत्र रचतील. आरोग्याची काळजी घ्या.

### मकर : बढती मिळेल

या सप्ताहात बुध, गुरू, शुक्र, शनि, राहू, केतू अनुकूल आहेत. रवी, मंगळ प्रतिकुल आहेत. चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च नियंत्रणात राहतील. नोकरदारांना बढती मिळेल. व्यापारी, व्यावसायिकांची व्यवसायवृध्दी होईल. शासकीय, कोर्ट कचेरीच्या कामात यशपाप्ती होईल. आरोग्याची काळजी घ्या.

### कुंभ : धनलाभ होईल

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र अनुकूल आहेत. शनिची साडेसाती, मंगळ, गुरू, राहू, केतू प्रतिकुल आहेत.चंद्रभ्रमणे संमिश्र आहेत. या सप्ताहात आर्थिक परिस्थिती संमिश्र राहील. खर्च वाढतील. नोकरदारांना अडचणींना तोंड द्यावे लागेल. व्यापारी, व्यावसायिकांना धनलाभ होईल. खर्च वाढतील. आरोग्याची काळजी घ्या.

### मीन : अडचणींवर मात कराल

या सप्ताहात रवी, बुध, शुक्र अनुकूल आहेत. शनिची साडेसाती गुरू संमिश्र राहील. चंद्रभ्रमणे अनुकूल आहेत. या सप्ताहात आर्थिक अडचणींवर मात कराल. खर्च वाढतील. नोकरदारांवर कामाचा ताण पडेल. व्यापारी, व्यावसायिकांच्या इच्छा पूर्ण होतील. कौटुंबिक वाद सामंजस्याने सोडवा. प्रकृतीची काळजी घ्या.

गांवकरी
शब्द तुमचे-आमचे
रविवार विशेष

**‘लोहा गरम है, मार दो हथौडा’, ‘आता आरपारची लढाई होऊ द्या’, अशा विविध अराजकीय व राजकीय प्रतिक्रिया पहलगाम येथील दहशतवादी हल्ल्यानंतर देशभरातून उमटत आहेत. मात्र एकंदरीत आंतरराष्ट्रीय परिस्थिती पाहता पुलवामा हल्ल्याचा बदला म्हणून बालाकोटवर करण्यात आलेल्या हवाई हल्ल्याप्रमाणे भारत पुन्हा एखादा पाकिस्तानवर हल्ला करेल, असे सध्यातरी वाटत नाही. या हल्ल्यानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर पाकिस्तानला पुन्हा एकदा एकाकी पाडण्यात व देशांतर्गत सर्वपक्षीयांचा पाठिंबा मिळवण्यात सरकारला यश आले असले तरी जसास तसे उत्तर देण्याऐवजी पाकिस्तानची सर्वबाजुंनी नाकेबंदी करण्याची तयारी भारताकडून सुरू असल्याचे दिसते. त्यामुळेच सिंधू जल करार रद्द करून भारतातील पाकिस्तानी उच्चायुक्तासह पाकिस्तानी नागरिकांना भारत सोडून जाण्याचे आदेश मोदी सरकारने दिले आहेत. एकप्रकारे पाकिस्तानशी असलेले सर्व संबंध तोडण्याचे भारताने जाहीर केले आहे. अर्थात ही सर्व तयारी म्हणजे मोदी सरकारच्या पुढील रणनितीचा भाग देखील असू शकतो. कारण पंतप्रधान नरेंद मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या रणनितीचा ठाव अद्याप कोणाला लागलेला नाही. त्यामुळेच भारतीय राजकारणाप्रमाणे आंतरराष्ट्रीय पातळीवर या दोघांच्या विजयाच्या वारुचा लगाम कोणाला धरता आलेला नाही.**

# तुला शिकविन चांगलाच धडा !



पहलगाम हल्ल्यावेळी पंतप्रधान मोदी मुस्लिम राष्ट्र सौदी अरेबियाच्या दौऱ्यावर होते. तेथील मुस्लिमबांधव मोदींसमोर भारताचे गोडवे गात असताना नेमका त्याचवेळी दहशतवाद्यांनी काश्मिरमधील गैरमुस्लिम पर्यटकांवर हल्ला केला. अर्थात हा हल्ला केवळ गैरमुस्लिम पर्यटकांवर झाला असे म्हणता येणार नाही. कारण या हल्ल्याला विरोध करणाऱ्या सय्यद अली हुसेन शहा या स्थानिक मुस्लिम युवकाला देखिल या दहशतवाद्यांनी सोडले नाही. या अतिरेक्यांचा राग हा पंतप्रधान मोदी आणि तेथे आलेल्या हिंदू पर्यटकांवर होता, हे त्यांच्या बोलण्यावरून स्पष्ट झाले आहे. पण यावेळी या अतिरेक्यांनी महिला आणि मुलांवर देखिल हल्ला केला नाही. त्यामुळे ‘धर्म विचारला, जात नाही’ हा वाद येथे निरर्थक म्हणावा लागेल. पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांनी भारत-पाकिस्तान वादाला धार्मिकतेचा रंग दिला असला तरी या संघर्षाचे खरे कारण हे काश्मिर नावाचे नंदनवन आहे. त्यातच कलम ३७०, तिहेरी तलाक, वक्फ बोर्डातील सुसुत्रीकरण यासारखे सुधारणावादी धोरण मोदी सरकारने आखले. यामुळे पाकिस्तानातील कट्टरवाद्यांचा जळफळाट सुरू आहे. केंद्रातील भाजपच्या सत्तेनंतर काश्मिरमधील दहशतवाद देखिल कमी झाला आहे. तेथील जनता आता भारताच्या मुख्य प्रवाहात सहभागी होत असताना हा हल्ला करून दहशतवाद्यांनी एकप्रकारे काश्मिरच्या वाढत्या पर्यटनाला, तेथील रोजगारवाढीला नख लावले आहे. काश्मिरमध्ये भारताची ढवळाढवळ नको, येथील तरुणांना रोजगार उपलब्ध होता कामा नये, ही या पाकपुरस्कृत दहशतवाद्यांची भुमिका राहिली आहे. कारण काश्मिरमधील बेरोजगार तरुण ही त्यांच्यासाठी दहशतवादाकडे ओढता येणार घटक ठरत आहे. त्यामुळेच यावेळी दहशतवाद्यांनी पहलगाम व तेथे आलेल्या पर्यटकांना आपले लक्ष्य बनवले.

अनपेक्षित झालेल्या या हल्ल्यामुळे मोदी सरकार आता ॲक्शन मोडवर आलेले दिसते. बिहारच्या राजकीय रणांगणावर पंतप्रधान मोदी यांनी सीमापार दहशतवाद्यांना कल्पनेपलिकडची शिक्षा देणार, आता त्यांना जमिनीत गाडण्याची वेळ आली आहे. अशा इशारा देत सिंधू जल करार रद्द केल्याची घोषणा केली आहे. त्यांच्या या घोषणेने पाकिस्तानी लष्कराच्या घशाला कोरड पडली असली तरी तेथील नागरिकांवर याचा किती परिणाम होणार, हे पाहावे लागणार आहे. सिंधू नदी ही तिबेटमध्ये उगम पावते आणि भारतातून प्रवाहित होत पाकिस्तानमध्ये पोहचते. या दरम्यान सहा नद्या सिंधू नदीला येऊन मिळतात. स्वातंत्र्यानंतर निर्माण झालेल्या तणावाच्यावेळी भारताने १९४८ साली या नदीचे पाणी अडवले. त्यानंतर १९५१ साली पाकिस्तानने हे प्रकरण संयुक्त राष्ट्रसंघासमोर नेले. जागतिक बँकेच्या मध्यस्थीने १९ सप्टेंबर १९६० रोजी भारत आणि पाकिस्तानमध्ये या नदीच्या पाणी वाटपासंदर्भात जो करार झाला त्यालाच ‘सिंधू जल करार’ असे नाव देण्यात आले. या अंतर्गत २० टक्के पाण्याचा वापर हा भारताला आणि ८० टक्के पाण्याचा वापर हा पाकिस्तानला करता येणार होता. पाकिस्तानमधील बहुतांश शेती आणि जलविद्युत प्रकल्प या सिंधू नदीच्या पाण्यावर अवलंबून आहेत. त्यामुळे भारताने सिंधू नदीचे पाणी रोखले तर याचा परिणाम पाकिस्तानी नागरिकांवर होणार आहे. अर्थात बोलल्याप्रमाणे लागलीच सिंधू नदीच पाणी भारताला रोखता येणार नाही. यासाठी भारताला धरणे, बांध यासारख्या बांधकामांवर कोट्यावधी रुपये खर्च करावे लागणार आहेत. त्यासाठी काही कालावधी लागणार आहे. सिंधू नदीचे पाणी रोखून भारताकडून पाकिस्तानमध्ये राजकीय अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न दिसतो. पण यामुळे भारत पाकिस्तान वाद हा पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय स्तरावर जाणार, हे निश्चित.

**विशेष**
**चंद्रशेखर शिंपी**
९६८९५३५७३८

भारताने सिंधू करार रद्द करण्याची घोषणा केल्यानंतर पाकिस्तानने देखील सिमला करारासह सर्व द्विपक्षीय करार रद्द करण्याची धमकी दिली आहे. सिंधू नदीचे पाणी रोखल्यास हे ‘युद्ध कृत्य’ मानले जाईल, असे सांगून भारताला कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला आहे. सिमला करारानुसार भारत-पाकिस्तान यांच्यातील मतभेद, तंटे शांततेच्या मार्गाने, संवाद आणि परस्पर सहमतीने सोडवण्याचे निश्चित करण्यात आले. म्हणजे यात कोणताही तिसरा देश हस्तक्षेप करणार नाही. आता भारताने सिंधू जल करार व पाकिस्तानने सिमला करार मोडला तर हा प्रश्न पुन्हा एकदा आंतरराष्ट्रीय पातळीवर जाऊ शकतो. सध्या जग हे डोनाल्ड ट्रम्प यांनी लागू केलेल्या टॅरिफ वॉरमध्ये गुरफटले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी व ट्रम्प यांचे सुमधूर सबंध असताना देखील ट्रम्प यांनी भारतावर २६ टक्के टॅरिफ आकारले आहे. त्यातच पहलगाम हल्ल्यावर ट्रम्प यांनी दिलेली प्रतिक्रिया म्हणजे त्यांना या वादात पडायची अजिबात इच्छा नाही, अशीच दिसते. ट्रम्प यांनी या वादाला पूर्वापार चालत आलेला वाद म्हटले आहे. भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांशी मैत्रीपूर्ण संबंध असल्याचे सांगून यातून दोन्ही देश काहीतरी मार्ग काढतील, अशी आशा त्यांनी व्यक्त करत आपले हात झटकले आहेत. दुसरीकडे काही मुस्लिम राष्ट्रांनी पाकिस्तानच्या बाजुने या तणावावर तोडगा काढण्यासाठी मध्यस्थीची भुमिका स्वीकारली आहे. ट्रम्प यांच्या टॅरिफ वॉरमुळे एकाकी पडलेल्या चीनने आता पाकिस्तानली शस्त्ररुपाने मदत पोहचवण्यास सुरवात केली आहे. पुलवामा घटनेनंतर भारताने बालाकोटवर केलेला हवाई हल्ला पाहता पाकिस्तान पहलगामच्या हल्ल्यानंतर सतर्क झाला आहे. सीमेवर गोळीबार करत त्यांनी भारताची छेड काढणे सुरूच ठेवले आहे. दुसरीकडे भारताने देशांतर्गत सर्वपक्षीयांची बैठक घेऊन पाठिंबा मिळवला असला तरी आंतरराष्ट्रीय पातळीवरून भारताच्या समर्थनार्थ कोणताही देश उघड पाठिंबा देताना दिसत नाही. बालाकोट हल्ल्यासाठी जी अनुकूल परस्थिती होती त्याच्या विरूद्ध स्थिती सध्याची आहे. भारताचे हा हल्ल्याविरोधात आंतरराष्ट्रीय पातळीवर पाठिंबा मिळवण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भारतीय परराष्ट्र खात्याने अमेरिका, चीन, रशिया, कॅनडा, इंग्लंडसह विविध देशांच्या राजदूतांशी चर्चा केली आहे. मात्र यातील तपशील अद्याप उघड झालेले नाहीत. भारताने स्वतःहून आंतरराष्ट्रीय द्विपक्षीय कायदे मोडले तर ही पाकिस्तानसाठी संधी ठरू शकते. पाकिस्तानने हल्ल्यानंतर केलेली शस्त्रसज्जता पाहता सर्जिकल स्ट्राइकसारखे प्रयोग यशस्वी तर होतील पण यात भारताचे देखिल नुकसान होऊ शकते. त्यातून विरोधीपक्ष पुन्हा मोदींवर निशाणा साधून नामानिराळे राहतील. कारण मागीलप्रमाणे यावेळी पाकिस्तान गाफिल राहिलेला नाही. त्याने आपल्या शस्त्रसज्जतेचे दर्शन घडवत आंतरराष्ट्रीय पातळीवर आपली कोल्हेकुई सुरूच ठेवली आहे.

भारताने दोनवेळा पाकिस्तानशी युद्ध पुकारले असले तरी आंतरराष्ट्रीय पातळीवर राजकीय विजय हा पाकिस्तानचाच झाला आहे. सिमला करार व दिल्ली करार ही त्याची जिवंत उदाहरणे आहेत. पहलगाम हल्ल्याच्या पाच दिवसानंतर एकही हल्लेखोर जिवंत अथवा मृत भारताच्या हाती सापडलेला नाही. त्यामुळे या हल्ल्यामागे पाकिस्तानचा हात आहे हे सिद्ध करणे भारताला आजतरी शक्य नाही. सामान्य लोकांच्या आडून काही राजकारणी पंतप्रधान मोदी यांना तुम्ही करोंडोंची शस्त्रे घेतली, विमान, पाणबुड्या घेतल्या याचा उपयोग काय? तुम्ही ॲक्शन कधी घेणार असे विचारत असले तरी ही वेळ लष्करी कारवाईची नाही तर मुत्सद्देगिरीचे धोरण आखण्याची आहे. भारत-पाकिस्तान पारंपारिक शत्रू असले तरी काश्मीर भूभाग हा आंतरराष्ट्रीय प्रश्न बनला आहे. बालाकोटच्या अनुभवावरून धडा घेत मोदी-शहा यांनी यावेळी विरोधी पक्षांना विश्वासात घेत रणनिती आखणी सुरू केली आहे. मात्र आंतरराष्ट्रीय पातळीवर आपण आजतरी एकांकी दिसतो. ही वेळ बदला घेण्याची नाही तर पाकिस्तानला चोहोबाजूने कोंडीत पकडून तुला शिकवीन चांगला धडा, असे म्हणण्याची आहे. सीमापार दहशतवाद्यांना कल्पनेपलिकडची शिक्षा देण्याचे मोदींनी जाहीर केले आहे, हा त्यातीलच एक भाग असू शकतो. शत्रुला घेरण्याआधी घरातील शत्रुंचा सफाया करावा लागतो आणि शत्रुंच्या मित्रपक्षांचा कानोसा घ्यावा लागतो. सध्या भारताकडून हीच रणनिती आखली जात असावी. त्याचे दृश्य-अदृश्य परिणाम काही दिवसांनी दिसून देखिल येतील.

**प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभात कोटयवधी भाविकांनी हजेरी लावून त्या दिव्य सोहळ्याचे साक्षीदार झाले. नाशिक-त्र्यंबकमध्ये २०२७ साली सिंहस्थ होत असून, प्रयागराजच्याच धर्तीवर हा उत्सव साजरा करण्याचा उद्देश राज्य शासनाचा आहे. सिंहस्थासाठी अवघ्या दोन वर्षांचा कालावधी शिल्लक असताना अद्यापही आराखडा गुलदस्त्यात आहे. शासन चर्चेच्या गुऱ्हाळात अडकले असून, त्यातून बाहेर कधी पडणार? आणि सिंहस्थ आराखडयावर निर्णय कधी घेणार? याचे उत्तर सद्या कुणाकडेच नाही. बैठकांशिवाय काहीच होत नसल्याने अधिकारीही त्रासून गेले आहेत. साधू-महंतांची नाराजी वाढू लागली आहे. बटेंगे तो कटेंगे, एक है तो सेफ है अशा घोषणा नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत चांगल्याच गाजल्या. तथापि, ज्या पक्षाच्या नेत्यांकडून या घोषणा दिल्या जात होत्या. आता त्याच पक्षाचे केंद्र व राज्यात सरकार आहे. असे असूनही सिंहस्थ आराखडयाबाबत कुठलीही कार्यवाही होत नसल्याने यातून नाशिकची उपेक्षा केली जात आहे का? अशी चिंतित करणारी सल नाशिककरांच्या मनात घोंगावू लागली आहे. विशेष म्हणजे मध्यप्रदेशची धार्मिक राजधानी असलेल्या उज्जैन येथे नाशिकच्या सिंहस्थानंतर वर्षभराने कुंभमेळा होणार आहे. तरीही तेथील राज्य सरकारकडून कुंभमेळ्याची जय्यत तयारी सुरू आहे. त्यातुलनेत नाशिकमध्ये काहीच घडताना दिसत नाही. शहरात भाजपचे तीन आमदार असले तरी शासनस्तरावर त्यांचे कितपत चालेल. हा संशोधनाचा भाग आहे. आतापर्यंत सिंहस्थ आराखडा मंजूर होण्याची अपेक्षा असताना तसे न झाल्याने आणि पुढेही असेच चित्र राहिल्यास याचा फटका नियोजित कामांवर होण्याची भीती आहे. त्यामुळेच सिंहस्थाचे नियोजन प्रत्यक्षात येण्याची अपेक्षा आहे.**

# सिंहस्थाचे कागदावरील नियोजन कृतीत उतरू द्या!



सिंहस्थ कुंभमेळयासाठी महापालिकासह इतर यंत्रणांनी पंधरा हजार कोटींचा आराखडा शासनाला सादर केला आहे. मुळात राज्यात आणि केंद्रात भाजपचे सरकार असताना सिंहस्थाच्या आराखडयासाठी एवढी ओढाताण का करावी लागतेय. हा प्रश्न प्रत्येकालाच पडलेला असेल. राज्य शासनाची आर्थिक स्थिती नाजूक असल्याची चर्चा वारंवार होते. लोकसभा निवडणुकीत अपेक्षित यश न आल्याने महायुतीने विधानसभेच्या तोंडावर लोकप्रिय घोषणांचा पाऊस पाडला. त्यामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण चांगलीच लोकप्रिय ठरली. त्यानुसार २१ ते ६० वर्षापर्यंतच्या महिलांना दर महिन्याला पंधराशे रुपये देण्याचे शिवधनुष्य राज्य सरकारला उचलावे लागत आहे. वर्षाकाठी राज्यावर या योजनेसाठी ४६ हजार कोटींची तरतूद करावी लागत आहे. मात्र, यामुळे तर सिंहस्थ आराखडा मंजुरीसाठी अडचण येत नाही ना? अशी चर्चा होऊ लागली आहे. भाजपचे तीन आमदार असून आ. सीमा हिरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे विविध समस्यांबाबत बैठक घेऊन त्यावर तोडगा काढावा.यासाठी मुंबईत बैठकीचे आयोजन केले असता पहलगाम येथे दहशतावाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला. ना. शिंदे श्रीनगरकडे रवाना झाले. त्यामुळे ही बैठक होऊ शकली नाही. परंतु आ. हिरे यांची ही बैठक फक्त सिंहस्थासाठी नव्हती तर शहरातील वेगवेगळ्य समस्यांवर होती. त्यामुळे आ. देवयानी फरांदे, आ. राहुल ढिकले व आ.सीमा हिरे यांनी सिंहस्थ आराखडयाला होणाऱ्या दिरंगाईवरुन एकत्रित येऊन नाशिकचे प्रतिनिधी म्हणून शासनाकडे ठोस भूमिका मांडणे आवश्यक आहे.

विधानसभेचा निकाल लागून पाच ते सात महिने होऊनही नाशिककरांना अद्यापही पालकमंत्री नसल्याचे वास्तव आहे. शिवसेनेच्या विरोधामुळे पालकमंत्री नियुक्तीला स्थगिती दिली. मात्र पक्षीय राजकारणाच्या स्वार्थामुळे मतदारांनी दिलेल्या मतदानाची सताधाऱ्यांकडून पायमल्ली होत आहे. सिंहस्थ आराखडयावर निर्णय का होत नाही? यावरुन वेगवेगळे अंदाज व्यक्त केले जात आहे. त्यात शहर जिल्हयाला पालकमंत्री नसणे यावरही चर्चा होते आहे. एकीकडे सिंहस्थासाठी




**लक्ष्यवेध**
**॥ गोरख काळे**
९५४५६१५३५५

आराखडा मंजूर होत नसताना दुसरीकडे जिल्हयाला पालकत्वच नसल्याचे दिसतेय. मुंबईत सिंहस्थावर बैठक होते, सूचना केल्या जातात. तर इकडे स्थानिक पातळीवर जिल्हाधिकारी कार्यालयात दर मंगळवारी सिंहस्थ नियोजन बैठक होऊन विविध विभागाचा आढावा घेऊन उहापोह केला जातो आहे. सिंहस्थ कामासाठी प्रशासनाच्या हातात दीड वर्षच असल्याने नियोजित कामे वेळेत होण्यासाठी शासन सिंहस्थासाठी निधी कधी मंजूर करणार? याची प्रतीक्षा महापालिकेसह सार्वजनिक बांधकाम विभागाला आहे.

२०१५ साली झालेल्या सिंहस्थाच्यावेळी अडीच वर्षापूर्वीच निधी मंजूर होऊन कामाला सुरुवातही झाली होती. विशेष म्हणजे त्यावेळी राज्यात व देशात काँग्रेसचेच सरकार होते. मात्र तत्कालीन सरकारने सिंहस्थासाठीच्या आराखड्याला तत्काळ मंजुरी दिल्याचे चित्र होते. सद्या राज्यात व देशात हिंदुत्ववादी म्हणवणाऱ्या पक्षाचे सरकार असूनही आराखडा मंजूर करण्यास एवढा विलंब का? असा प्रश्न केला जातो आहे. राज्य शासनाला प्रयागराजच्या धर्तीवर सिंहस्थ कुंभमेळा करायचा असल्याने त्यासाठी बारकाईने नियोजन सुरू आहे. विशेष म्हणजे गेल्यावेळेस २२०० कोटींचा आराखडा असताना तो यंदा महापालिकेच्या साडेसात हजार कोटींसह इतर यंत्रणांचा मिळून असा पंधरा हजार कोटींपर्यत पोहोचला आहे. या आराखड्यातून भाविकांना सोयीसुविधा देण्याबरोबरच साधूग्राम, सुरक्षा, कायदा आणि सुव्यवस्था, परिसर सुशोभीकरण, गोदावरी नदीचे संवर्धन, घनकचरा व्यवस्थापन, आरोग्य आणि इतर अनुषंगिक कामांचा समावेश आहे. महापालिकेने ४३ विभागांकडून प्रस्तावित कामांची यादी मागितली असता मात्र काही प्रस्तावांमध्ये अवास्तव गोष्टी असल्याने, विभागांना सुधारित आराखडा सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. महापालिकेत प्रशासक राजवट असून लोकप्रतिनिधींची सत्ता नसल्याने त्याचाही फटका बसतो आहे. शहरातील भाजप-शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादी या पक्षाच्या आमदारासह पदाधिकाऱ्यांनी सिंहस्थाबाबत शासनाकडे आतातरी आग्रही भूमिका मांडण्याची वेळ आली आहे.

## आयुष्य संपते, कार्य नाही...

**नाशिकच्या सांस्कृतिक क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व आणि नाशिकचा चालता बोलता इतिहास मुखोद्गत असलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे मधुकर झेंडे उपाख्य अण्णा. यांचे काल निधन झाले. त्यांच्या आठवणींचा हा गहिवर...**



नाशिकच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाच्या जतनासाठी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित करणारे आदरणीय श्री. मधुकर अण्णा झेंडे यांचे स्मरण करताना, त्यांच्या कार्याची व्यापकता आणि सखोलता शब्दांत मांडणे ही एक मोठी जबाबदारी आहे.

**आदरांजली**
**चेतन राजापूरकर**
**इतिहास अभ्यासक**

मधुकर अण्णा हे नाशिकच्या जडणघडणीचे साक्षीदार नव्हतेच फक्त, तर त्यांनी त्या घडामोडींना आपल्या शब्दांत अजरामर केले. जुन्या घाटांचे ऐश्वर्य, ऐतिहासिक वाड्यांचे वैभव, शहराच्या धार्मिक-सांस्कृतिक प्रवाहातील सूक्ष्म बदल - या सर्वांचा त्यांनी आपुलकीने, तपशीलवार अभ्यास केला आणि जतन केले. त्यांच्या लेखनातून नाशिकचा इतिहास फक्त सांगितला गेला नाही, तर तो जिवंत झाला.

त्यांनी लिहलेल्या नासिकवरील पुस्तकाच्या माध्यमातून मधुकर अण्णांच्या अमूल्य कार्याचा आणि त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा आदरपूर्वक गौरव करण्याचा प्रयत्न करत आहोत. या ग्रंथात त्यांच्या लेखनातील निवडक उतारे, त्यांच्या आठवणींवर आधारित किस्से, सहवासात आलेल्या व्यक्तींच्या प्रतिक्रिया आणि त्यांचे योगदान उलगडून दाखवले आहे.

मधुकर अण्णांचा साधा, पण प्रभावी स्वभाव, नाशिकच्या संस्कृतीबद्दलची अपार निष्ठा आणि इतिहासावरील नितांत प्रेम यांचा प्रत्यय प्रत्येक पानावर येतो. त्यांनी दिलेला ऐतिहासिक ठेवा भविष्यातील पिढ्यांसाठी दीपस्तंभ ठरेल, याबद्दल कोणतीही शंका नाही.

या ग्रंथाच्या माध्यमातून त्यांचे कार्य आणि विचार हे स्मरणात राहण्यासाठी नाही तर प्रेरणास्थानी राहण्यासाठी उभे केले आहेत. त्यांच्या लेखणीतून उमटलेले नाशिक आजही आपल्याला आपली मुळे आठवण करून देतो, आणि हेच नत्यांच्या कार्याचे खरे यश आहे.

# माणसा तुझा रंग कोणता



मनमोकळे
अंजली रहाणे-थेटे



निर्दयी,निर्लज्ज, क्रूर जंगली , निश्चल वृत्ती बाळगनारे दहशती नालीतले किडे ज्यांना मानवी आणि अमानवी ह्या दोहींतला फरक समजत नाही असे निष्ठुर दानवी कृत्य करतात आणि परिणाम निष्पाप निरागस निरपराध लोकांचे बळी घेतात. दहशत आतंक पसरवून भारत भूमीचा व्यवहार करू पाहणाऱ्याची वेळीच नांगी ठेचायला हवी. तापलेल्या ज्वालामुखीतून कधी जिव्हाळ्याचा आणि समतेचा झरा वाहणारच नाही तरीही तिथं इतक्या गाढ झोपेत असल्यासारखे राहतात कसे? जिथं मातीशी नाळ असलेलाच मातीशी बेइमानी करतो तेव्हा पारतंत्र्य पाठलाग करत पाठीत खंजीर खुपसायला सज्ज होतो. तिथं फक्त दहशत आतंक पसरवून नागरिकांना हतबल करायचं नाही तर तिथल्या परिसरात स्वतः चे झेंडे गाडून घाणेरड्या अमानुष व्यवस्थेला प्रशासनात आणायचं आहे. घरातल्या चार गोष्टी बाहेर माहिती झाल्या की बाहेरचे काड्या करुन मज्जा पाहतात आणि त्याचप्रमाणे अनिष्ट मनसुबे ठेवून शिरकाव करणारा पाकिस्तान आपल्या देशातल्या नागरिकांना हाताशी घेत जनजीवन विस्कळित करू पाहत आहे. क्षणभर प्रलोभनाचे बळी पडत आपल्याच राष्ट्राला आपणच भ्रष्ट करण्यात कसले समाधान मिळणारं शेवटी न जाणो!

दरवेळी कुठेतरी हे नीच हल्ला झाल्यावर त्यातून थोडे दिवस यंत्रणा, प्रशासन, राजकारण हे त्यावर उपाययोजना करणार हे अनेक वर्षानुवर्षे आपण पाहत आलेलो आहोत. आपणही मेणबत्त्या लावून मदत पोहचवून किंवा भावपूर्ण श्रद्धांजली चे बॅनर लावून शोक व्यक्त करायचा. यापलीकडे जाऊन आपण नक्की विचार करतो का? जिथं तुझा धर्म कोणता? असे विचारून गोळ्या झाडल्या जातात ह्यामागे सखोल विचार केलाय का?? दुश्मन येऊन वार करुन निघून जातात पण दुश्मन येऊन धर्म विचारून वार करतो यात काहीतरी पाणी मुरतंय असं नाही का वाटलं कुणाला?

जाती जातीत, गटा गटात, राज्या राज्यात वाद,तेढ, विवाद करत असताना आपला भारताचा हिंदू धर्म कमकुवत होतांना दिसतोय. एकीकडे आपण आपल्याच अहंकाराला कवटाळून बसलो आणि त्यातून समाजकारण राजकारण अश्या विविध भूमिकांमधून सामाजिक बांधिलकीची धज्जी उडवत दशा होताना पाहतोय. तर दुसरीकडे ह्याचा फायदा घेत आतंकवादी, दहशतवादी आपल्याच लोकांना मदतीस घेऊन जनजीवन उद्धस्त करत आहे. नेमकी लोकांनी डोळ्यावर पट्टी बांधली की भात.. कारण जिथं माणसातली एकजुटीची मशाल असायला हवी तिथं जातीय तेढ वाद विवादाच्या जाळात अडकुन होरपळत आहे. आपल्या हिंदुस्थानाच्या हिंदुत्वाचा बुलंद करणारा आवाज दाबन्याचा प्रयत्न पेहलगाम मध्ये आणि विविध ठिकाणी करत आहे.


**बंदूक उचलली ज्याने,**
**त्याचे ही रक्त लाल आहे**
**मग, त्याला नेमकी**
**हा कसला माज आहे?**
**भारत हा एकात्मतेचा,**
**विश्वास प्रचंड आहे...**
**त्यातलाच कुणी मातृभूमीचा**
**असेल गद्दार तर**
**तो मानव जातीतला एक षंढ आहे !**

झालेल्या भ्याड हल्ल्या दरम्यान मृत्युमुखी पडलेल्या व्यक्तींचा बळी गेला परंतु तात्पुरत्या स्वरुपात हळहळ व्यक्त करुन आणि यातून तात्पुरत्या स्वरुपात बदल करणाऱ्या सर्वांना आवाहन हेच की एकदा घडलेली गोष्ट वारंवार होत असेल तर आपण प्रत्येक जण त्या घडलेल्या घटनेला जबाबदार असतो. कारण परिस्थितीच भान नसणारा प्रत्येक गोष्ट डोळ्याआड करत जसा निद्रेत चालणारा माणूस रस्ता भटकतो तसे न करता वेळीच आपल्या सामाजिक बांधिलकीची दुरवस्था न होता एकजुटीचा नारा नेहमीच देत राहिला तरच आपला हिंदुत्व धर्माचा शंखनाद विश्वात घुमत राहील आणि वाईट हेतू बाळगणारे वेळीच साखळदंड स्वतः भोवती बांधून ठेवतील. एकात्मतेचा संदेश देणारा आपला तिरंगा आपल्या रक्ताच्या माणसांना एकत्रित बांधून ठेवेल आणि आपल्या देशातील प्रत्येक माणूस आपल्या कर्तव्याप्रती जागेल...

**तिरंग्याच्या रंगाला**
**इजा पोहचविणारा क्रुर**
**सांग तुझा कोणता रंग आहे..**
**तुझ्याच माणसांना मारुन तू**
**मानवतेचा केलेला एक भंग आहे..!!**

# मी मेलो त्याची गोष्ट

गेल्या दोन वर्षांपासून सुरू असलेला कोरोनाचा धुमाकूळ आणि त्याच्यामुळे बदललेले समाज वास्तव, नीतिमूल्यांचे प्रश्न, जगण्याची अगतिकता आणि त्या अगतिकतेतून येणारी हतबलता यांनी विचारी समाजमन अस्वस्थ झालेले आहे. अनेकांना आर्थिकदृष्टीने डबघाईला घेऊन गेलेला हा राक्षस समाजाच्या सर्वच स्तरावर प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष हल्ला करताना दिसून येते. या आजाराची दृश्य रूपे जेवढी भयानक आहेत, त्याहीपेक्षा याला संधीत रूपांतरित करून आपल्या तुंबड्या भरणारे अनेक महाभाग याच समाजाचे घटक असावेत आणखी भयावह! याच कालखंडाचे भेदक चित्रण आपल्या चित्रदर्शी शैलीत आणि वेगवेगळ्या समाजघटकांच्या प्रत्यक्ष अनुभवांना कलात्मकतेने मांडून डॉ. संजय कळमकर यांनी नुकत्याच प्रकाशित झालेल्या मी मेलो त्याची गोष्ट या कादंबरीद्वारे वैद्यकीय अंत्ययात्रेचा भीषण आरसा आपल्यासमोर उभा केला आहे. यात चरफड आहे, तडफड आहे, फरफट आहे, निगरगट्टपणा आहे, हळवा कंगोरा आहे, तसेच नीतीमूल्यांची पाठराखण आणि भलामण करणारे काही वैद्यकीय व्यावसायिकही आहेत.




**पुस्तकाचे नाव : मी मेलो त्याची गोष्ट**
**लेखक: डॉ. संजय कळमकर**
**प्रकाशक : अक्षरवाड्.मय प्रकाशन, पुणे**

या कादंबरीत 'मी मेलो त्याची गोष्ट' सांगताना संजय कळमकर यांनी कोरोनाने निर्माण केलेल्या वास्तवाचा अन् कोरोना झालेल्या व्यक्तीच्या मनोविश्वाचा नेमका वेध घेतला आहे. संथ चालू असलेल्या मानवी जीवनव्यवहाराला कोरोनाच्या साथीने अनेक हादरे दिले. आजवरच्या मानवी वाटचालीत निर्माण झालेल्या जीवनमूल्यांचा पुनर्विचार करायला भाग पाडले. प्रथमपुरुषी आत्मनिवेदन पद्धतीने आणि काहीशा विसंगत वाटणाऱ्या तुकड्यातुकड्यांनी सुरू होणाऱ्या या कादंबरीचा कथानायक आहे पुंडलिक गव्हाणे.

काही व्यक्ती उशिरा मरतात, काही फार लवकर मरतात. योग्य वेळी मरावे..! असे फ्रेडरिक नीश्ते चे भाष्य कथानकाच्या सुरुवातीलाच येते आणि ही कथा अकाली मरणाच्या उंबरठ्यावर आतबाहेर करणाऱ्या पुंडलिकची श्वासकहाणी आहे याची लख्ख जाणीव वाचकांना करून देते.

सुरुवातीची काही वाक्येच पहा- शुभ्र हॉल. भीतीने पांढऱ्या पडलेल्या चेहऱ्यासारखा. सुतकी. निरागस. उदास. दिवस संपून रात्र सुरू झाली की रात्र संपून दिवस उगवला. काही समजत नाही.

हे काहीच न समजणारे ज्यांना समजले त्यांनी बऱ्या अर्थाने आपले हात कोरोना लाटेत धुवून घेतलेत. चाराछावण्यांसारखे कोविड सेंटर्स जागोजागी सुरू झाले. कुणी

समीक्षा
शशी त्रिभुवन
७०६६७६५९२७


कुणी अगदी मनोभावे माणूसकी जागती ठेवून रुग्णांची आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची काळजी घेतली. पण असे अपवाद थोडेसेच दिसले. कोरोना का कसा कुठून आला, कसा पसरला, अगदी गाव-खेड्यात घुसून त्याने गावातल्या नितळ माणसांचं जगणं कसं उध्वस्त केलं याची ही मेल्याची गोष्ट करुण कहाणी आहे. पुंडलिक हा अशाच खेड्यातील एक प्रातिनिधीक तरुण. उपचारासाठी दवाखान्यात असतानाची त्याची स्मरणसाखळी त्याची जीवनकथा पुढे पुढे नेते; तीही तुटक तुटक अर्धवट ग्लानीत असलेल्या आणि आयसीयु रूमच्या त्या भयावह वातावरणातील गुदमरस्वरात!

या गोष्टीतील घटनाप्रसंग आपल्या अवतीभवती घडलेले आहेतच इतकी ही कादंबरी सच्ची आणि वास्तवाच्या पातळीवर जाणारी आहे, पण म्हणून हे फक्त विवेचन नाही, सरळधोपट पद्धतीने केवळ सांगणे नाही, तर व्यवस्थेला पिंजऱ्यात उभे करून मानवी जगणे, मूल्ये, सामाजिक प्रश्न आणि गरिबी-श्रीमंतीतील अधिकच खोल होत जाणारी दरी यांच्याबद्दल जाब विचारणारी, विचारी माणसाला हलवून आणि हादरवून सोडणारी ही गोष्ट आहे. लेखक डॉ. संजय कळमकर यांनी कथनशैलीचा अनोखा आविष्कार करीत, नगरी भाषा आणि बोलीसह कधी अस्वस्थ करीत, कधी प्रश्न विचारण्यास भाग पाडून आणि कधी आजच्या विकल समाजवास्तवात आपण नेमके कुठे आहोत, यासंबंधाने वाचकवर्गाला विचार करायला लावला आहे.

पुण्याच्या अक्षरवाड्.मय प्रकाशनाने प्रकाशित केलेली आणि सुप्रसिद्ध चित्रकार धनंजय गोवर्धने यांनी मुखपृष्ठ केलेली ही उच्च निर्मितीमूल्ये रंगनाथ पठारे म्हणतात तसे ही कादंबरी मानवी विश्वाची कोविडने घेतलेली झाडाझडती व बदललेले जगण्याचे संदर्भ समर्थपणे सांगताना दिसते. संपूर्ण जग कोविडच्या सावटाखाली जसे आले, कसे घुसमटून-कुचंबून गेले याविषयीचे तळकोपरे सांगण्यात ही कादंबरी यशस्वी ठरली आहे.

हे लेखक म्हणून संजय कळमकर यशस्वी ठरले आहेत. पण एकूणच मानवी मूल्यांबाबतीत त्यांनी उभे केलेले प्रश्न विवेकीसमाजमन घडविण्यासाठी जागल्याचे काम करू शकेल हा विश्वास वाटतो.

# मी सिनेमा!



आरसा
मयूर बागूल
७२१८८३६६०१



मला ओळखलत का?.. तसं तर ओळखतात तुम्ही मला पण तरीही ओळख पटवून देतो. मी सिनेमा! मला चित्रपट म्हणुन पण संबोधतात. तशी तर विविध नावे आहेतच की माझी. पण जीव मात्र एकचं आहे. तुम्हाला माहित आहे का लेखक आणि दिग्दर्शक माझे आई वडील आहेत. कलाकार आणि इतर मंडळी माझं कुटुंब समान आहे आणि प्रेक्षक माझी अंतरात्मा!.. दिवसेंदिवस बदलत गेले आणि मी मोठा होतं गेलो. माझ्या आई वडिलांनी मला जसं घडवलं अगदी तसाच घडत गेलो मी. मी तुमचाच अनुभव आहे. मी तुमचीच तर प्रतिमा आहे. मी आरसा आहे समाजजीवनाचा. माझा एक मित्र आहे.

एक सिनेमा चित्रित करणं काही सोपं काम नाहीये. यासाठी संयम - पारदर्शकता आणि परिपूर्ण कल्पकता हवी. यामध्ये टीम मधील प्रत्येक व्यक्तीची एक महत्वपूर्ण अशी भूमिका असते. एक चित्रपट चित्रित करणं म्हणजे एका मध्यम वर्गीय कुटुंबात जसं एका मुलीच्या लग्नासाठी जशी जुळवाजूळव केली जाते अगदी तसंच. त्यामध्ये पाहणी आणि पडताळणी असो! लग्नाआधीची तय्यारी असो! जसं एक बाप आपल्या मुलीच्या लग्नासाठी पाहिजे ते करायला तयार असतो अगदी तश्याच पद्धतीने चित्रपट चित्रित करतांना लेखक - पटकथा लेखक - दिग्दर्शक इ. टीम काम करतं असते. खुप सारी मज्जा - त्याचबरोबर खुप सारं दडपण आणि टेंशनही असतं बरका! पण एवढ्या सगळ्यांवर मात करून प्रेक्षकांना एक सुंदर कलाकृती ते भेट करतं असतात. आता इथून पुढे प्रेक्षक ठरवणार आमच्या कामाची खरी पावती प्रेक्षकच तर देणारं.. प्रेक्षक हसला - रडला - नाचला त्याच्या हृदयापर्यंत आम्ही पोहोचलो म्हणजे आम्हाला आमच्या कामाची पोचपावती मिळाली म्हणुन समजा.. प्रेक्षक आमचा विठ्ठलच तर आहे. धन्यवाद!





# आईबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारी कलाकृती – आक्का

'गे मायभू तुझे मी फेडीन पांग सारे, आणीन आरतीला हे सूर्य, चंद्र, तारे' या पंक्ती वाचल्या की आई आणि मुलाच्या नात्याची आणि आईच्या उपकाराची जाणीव ठेऊन तिच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करतांना प्रत्येक व्यक्तीच्या मनात हीच भावना असते इतक्या प्रभावीपणे या पंक्ती कवी गझलकार सुरेश भटांनी आपल्या गझलेत गुंफल्या आहेत. आईची महती कितीही गायिली तरी तिच्या कर्तृत्वाची महती कमीच राहील आणि ती तेवढ्या शब्दात मांडतादेखील येणार नाही.


प्रत्येकजण आपल्या आईला जपत असतो. साने गुरुजींची शामची आई असेल, जेष्ठ लेखक उत्तमरावजी कांबळे यांची आई समजून घेतांना असेल या कलाकृतीतून आईच्या कर्तृत्वाची निरपेक्ष कृतज्ञता व्यक्त केली आहे असे म्हणता येईल.

कवी यशवंत म्हणतात की - आई! म्हणोनी कोणी। आईस हाक मारी. ती हाक येई कानी। मज होय शोककारी. स्वामी तिन्ही जगाचा। आईविना भिकारी. या कवितेप्रमाणे आई विना भिकारी असलेले लेखक सुहास टिपरे यांची आक्का - झंझावती वादळाची संघर्ष जीवनयात्रा ही साहित्यकलाकृती वाचनात आली. दु:ख, दारिद्र्य आणि संकटे यांचा त्रिवेणी संगम होऊन एका स्त्री जीवनाची होणारी ससेहोलपट या कलाकृतीत मांडली आहे. त्यातूनही परिस्थितीला सामोरे जावून झंझावती वादळाप्रमाणे आयुष्यातील येणाऱ्या संकटांशी संघर्ष करून खंबीरपणे लढा देवून लेखक सुहास टिपरे सारखा मातृत्वाबद्दल कृतज्ञता व्यक्त करणारा अवलिया समाजात उभा केला जातो ही या मातेची खरी ताकद , हेच खरे या मातेने केलेले संगोपन आणि संस्कार आहेत.

लेखक सुहास टिपरे यांनी या कलाकृतीच्या मुखपृष्ठावर आपल्या आईला स्थान देवून तिच्या प्रती सद्भावना व्यक्त केली आहे. आईचा चेहरा सतत नजरेसमोर रहावा, तिचे रोज दर्शन घेता यावे या भावनेने लेखकाने आईचा चेहरा या मुखपृष्ठावर घेतला असावा असे मला वाटते. या चेहऱ्यावरील काही संदर्भ मला भावले आणि त्यावर काहीतरी लिहावे असे मनात आले. या कलाकृतीच्या मुखपृष्ठाचे सूक्ष्म निरीक्षण केले असता त्यातून समस्त आईवर्गाचे व्यक्तिमत्व दिसून येते.




**कलाकृती परिचय:**
**कलाकृती - आक्का**
**साहित्य प्रकार - चरित्र**
**लेखक - सुहास टिपरे - नाशिक**
**लेखकाचा संपर्क क्रमांक - ७५८८१०८६१४**
**प्रकाशक : सुहास हरिश्चंद्र टिपरे, नाशिक**
**मुखपृष्ठचित्रकार - सुविधा प्रिंटर्स, नाशिक**



परिचय
प्रशांत वाघ
७७७३९२५०००

आक्का - झंझावती वादळाची संघर्ष जीवनयात्रा या कलाकृतीच्या मुखपृष्ठावर असलेल्या आईच्या कपाळावर बारीक टिकली आहे, चेहरा आश्वासक असून डोळ्याला चष्मा लावलेला आहे तर गालावर सुरकुत्या असून तोंड बंद करून खंबीर नजरेने समोर पहात आहे. कलाकृतीचे शीर्षक आक्का या शीर्षकाला दोन्ही बाजूला बाण दाखवून त्या अक्षरावर टोपी दिलेली असा संदर्भ असलेला चेहरा पाहिला आणि त्यातून त्या स्त्रीव्यक्तिमत्वाची ओळख दिसून येते.

लेखकाने जरी स्वतःच्या आईची संघर्ष जीवनयात्रा मांडली असली तरी ती पुस्तक रूपाने प्रकाशित झाल्यामुळे ती त्यांची आई राहिली नसून ती एक प्रातिनिधिक दारिद्र्यात पिचलेली, खस्ता खालेल्ली सर्व सामान्य कुटुंबातील एक आई आहे. या आईने नंबरचा चष्मा लावलेला आहे, यावरून दूरचा विचार करून भविष्यात येणाऱ्या अडचणींना कसे तोंड देता येईल या अर्थाने विचार करणारी धाडशी नजर यातून दिसून येते. प्रपंच हाकताना या स्त्रीने कधीच कुणापुढे हात पसरला नाही, आणि यांच्या नजरेला नजर भिडवून कुणाची पाहण्याची, बोलण्याची हिम्मत झाली नसावी इतका खंबीर आणि आश्वासक चेहरा दिसतो आहे. या आईच्या कपाळावर बारीक बिंदी (टिकली) दिसते यावरून असे वाटते की, प्रपंचात सूक्ष्मातिसूक्ष्म बारीक गोष्टीवर लक्ष ठेवून आपल्या मस्तिष्क चेतासंस्थेला जागृत ठेवून बारकाईने प्रपंच केला असावा. मुलांचे उत्तम शिक्षण, त्यांच्यासाठी सुयोग्य सोयरिक, उत्तम नातेसंबंध, उत्तम प्रकारे भविष्यकालीन वाटचालीकडे लक्ष देवून सर्वांची उत्तम भविष्याची सोय करणे यासाठी असलेला प्रचंड आत्मविश्वास, आणि उत्तुंग भरारी मारण्याची जिद्द या व्यक्तीमत्वात दिसून येते.

आक्का - झंझावती वादळाची संघर्ष जीवनयात्रा या कलाकृतीच्या आक्का या शीर्षकाला दोन्ही बाजूला बाण असलेली अक्षरावर टोपी दिलेली आहे. या बाणाचा अर्थ असा आहे की, मातृत्वाची कितीही महती सांगितली तरी ती कमीच आहे. अमर्यादित कष्ट, मुलांचे संगोपन, प्रपंचातील काटकसर, साऱ्या गोष्टी अमर्यादित स्वरूपाच्या आहे. भूतकाळापासून पुढे अमर्यादित भविष्यकाळापर्यंत मातेच्या संघर्षाची, तिने केलेल्या उपकाराची, संस्काराची, वात्सल्याची, खंबीर नेतृत्वाची, रणरागिणीची. आईपणाची महती कितीही लिहली तरी कमीच होईल या अर्थाने आक्का या शीर्षकाला दोन्ही बाजूला बाण असलेली अक्षरावर टोपी दिलेली आहे.


लेखकाने या पुस्तकात आईच्या संघर्षाची कहाणी मांडली आहे, सहा मुले, पाच सुना, एक जावाई, १२ नातवंडे, ८ पणतू-पणती इतका मोठ्या लवाजमा एकटीने सांभाळून, त्यातही कर्ते-सवरते दोन मुलांच्या निधनाने मनावर ताबा ठेवून , संयमाने परिवारावर दु:खाचा परिणाम होणार नाही याची काळजी घेऊन सर्वांना सावरण्याची हिम्मत यातून दिसून येते. २० जानेवारी १९२७ ते २ डिसेंबर २०१९ पर्यंतच्या ९३ वर्षाच्या आईच्या झंझावती वादळाची संघर्ष जीवनयात्रा लेखकाने मांडून आपल्या आईच्या मृत्यूपश्चात तिच्या उपकाराची एक प्रकारे कृतज्ञता व्यक्त केली असली तरी ही संघर्षयात्रा तमाम संघर्ष करीत असलेल्या मातांना समर्पित आहे.

# स्मरण महाराष्ट्राचे... निमित्त भटकंतीचे

महाराष्ट्रातील प्रेक्षणीय, उल्लेखनीय स्थळांचे वर्णन करणारी अनेक पुस्तके आहेत. तसेच प्रत्येक राज्याची ऐतिहासिक व भौगोलिक माहिती देणारी स्थलदर्शन मार्गदर्शिका असते. तरीसुद्धा प्रवास वर्णने प्रकाशित होत असतात. याला कारण एकाच ठिकाणाचे वर्णन प्रत्येकाच्या नजरेतून, अनुभवातून, भाषेतून लिहिलेले असल्याने त्यात वैविध्यता आढळते. त्यातही एखाद्या चित्रकाराच्या, कवीच्या हातून झालेले लिखाण हे काहीतरी वेगळे असणार- या विचाराने स्मरण महाराष्ट्राचे... निमित्त भटकंतीचे हे पुस्तक वाचायला घेतले.

लेखक रामदास खरे यांची सुरुवातीची ओळख म्हणजे कवी, चित्रकार अशी होती. परंतु लेखसंग्रह, चरित्र लेखन, कथासंग्रह, कादंबरी असे वैविध्यपूर्ण लेखन कवितासंग्रहा सह त्यांच्या हातून सातत्याने होत असल्याने लेखक म्हणूनही त्यांचे नाव प्रसिद्ध झाले आहे. आजवर त्यांची १६ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. फोटोग्राफी, दुर्ग भ्रमंती, चित्रकला हे त्यांचे छंद आहेत. त्यामुळे स्मरण महाराष्ट्राचे निमित्त भटकंतीचे हे प्रवास वर्णन एका चित्रकाराच्या, फोटोग्राफरच्या, कवीच्या नजरेतून केलेले आहे. यामध्ये महाराष्ट्रातील विविध स्थळांची माहिती आहे. मंदिरे, प्रार्थना स्थळे, किल्ले, लेणी, कवींचे स्मारक, स्वातंत्र्यवीरांची जन्मभूमी, म्युझियम, राजवाडे, नाट्यगृह, रेल्वे स्टेशन, तलाव अशा विविध स्थळांची माहिती अतिशय मोजक्या शब्दात दिलेली आहे. या लेखांची मालिका वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाली होती. अर्थातच वर्तमानपत्रातील लेखांना शब्द मर्यादा पाळावी लागते. त्यामुळेच लेख अतिशय आटोपशीर आहेत. तरीसुद्धा त्या त्या ठिकाणाची मूलभूत माहिती त्यातून नक्कीच मिळते. दोन विशेष लेख पकडून एकूण ११४ ठिकाणांची माहिती यात दिली आहे. ही माहिती लेखकाने वैयक्तिक अनुभवातून दिलेली असल्याने लेखकाबरोबर आपणही प्रत्यक्ष त्या त्या स्थळांची सहल करत आहोत असा आभास निर्माण होतो.

मला आवडलेल्या स्थळांचा उल्लेख मी या लेखात करणार आहे. 'सिनेगॉग' बने इस्त्रायल यांचे प्रार्थना स्थळ-- याची माहिती वाचताना भारताचे व इस्त्रायलचे मैत्रीपूर्ण संबंध का आहेत याचे कारण समजते. भंडारदर्याजवळ असलेले रतनवाडीचे अमृतेश्वर मंदिर- सुंदर कोरीव कामाने नटलेल्या मंदिराचे वर्णन वाचून नक्कीच तिथे जावेसे वाटेल. नाणेघाटात सातवाहनांचे विविध शिलालेख आहेत. विशेष म्हणजे मराठी भाषेचा शिलालेख २२२४ वर्षांपूर्वीचा तिथे आहे. खरोखर हे वाचून मराठी भाषिकाला




नक्कीच अभिमान वाटेल.

जगप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञ डॉ. जयंत नारळीकर यांनी पुण्यामध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे खगोल भौतिकी संशोधन केंद्र म्हणून 'आयुका' (इंटर युनिव्हर्सिटी सेंटर फॉर ॲस्ट्रोनॉमी अँड ॲस्ट्रो फिजिक्स) ही संस्था स्थापन केली आहे.याची माहिती आहे. मराठी चित्रपट अभिनेते व चित्र तपस्वी चंद्रकांत मांढरे यांच्या

पुस्तक परिचय
यामिनी पानगावकर
९३२४३ ८४५७०

कला संग्रहालयाचे वैशिष्ट्य म्हणजे ते त्यांनी स्वतःच्या बंगल्यात स्वखर्चाने साकारले आहे. कोल्हापूर जवळील खिद्रापूरचे वर्णन वाचून त्याची खूपच ऐतिहासिक माहिती मिळते. डॉ. भाऊ दाजी लाड वस्तू संग्रहालयाबद्दलची माहिती मला अतिशय अनोखी वाटली. गेली ४० हून जास्त वर्षे मी ठाण्यात राहून अनेक वेळा मुंबईला जाऊनही याबद्दल काहीच माहिती नव्हती. अगदी नाव सुद्धा ऐकले नव्हते.

साने गुरुजींचे पालगड- या लेखामुळे अनेकदा त्या मार्गावरून जाऊनही ते ठिकाण कसे समजले नाही याची रुखरुख वाटली. लेख वाचून अनेक जण निश्चितच तिथे जातील याची खात्री वाटते. लेखकाचे मूळ गाव कोकणातले. त्यामुळे कोकणवर प्रेम असल्यास स्वाभाविकच आहे. दापोली, आंजरले, चिपळूण, गुहागर,

**स्मरण महाराष्ट्राचे... निमित्त भटकंतीचे**
**लेखक- रामदास खरे.**
**प्रकाशक- अनघा प्रकाशन.**
**पृष्ठ संख्या १९८ किंमत ३६० रुपये.**

गणपतीपुळे, मालगुंड, रत्नागिरी, संगमेश्वर, राजापूर, देवगड, सावंतवाडी या गावांची वैशिष्ट्यपूर्ण ठिकाणे लेखकाच्या नजरेतून बघायलाच हवीत. या ठिकाणांची वर्णने अधिक उत्तम तऱ्हेने लिहिली असल्याने आपण जणू काही प्रत्यक्ष ते ते ठिकाण बघत असल्याचा भास होतो. जयगड किल्ला व बंदर या लेखात किल्ल्याच्या नावाचा इतिहास वाचायला मिळतो. राजापूरच्या गंगेविषयी ही छान माहिती आहे. अंगणेवाडी येथील श्री भराडीदेवी जगाच्या कानाकोपऱ्यात प्रसिद्ध झाली आहे, तिचा इतिहास थोडक्यात दिला आहे. आरवलीच्या ग्रामदैवता बद्दलची माहिती देताना वेंगुर्ला बंदर, भोगवे व कोंडुरा किनारा याचीही माहिती दिली आहे. सुप्रसिद्ध कवी कै. चिं. त्र्यं. खानोलकर यांची कोंडुरा ही गाजलेली कादंबरी याच परिसरावर आधारित असल्याची ही माहिती मिळते.

या पुस्तकातील दोन विशेष उल्लेखनीय लेख म्हणजे निवासस्थाने- बौद्ध भिक्षूंची व दुसरा दुर्ग संस्कृती- एक मुक्त चिंतन. अतिशय अभ्यासपूर्ण असे हे लेख आहेत. पुस्तकाचे वैशिष्ट्य सांगायचे तर हे नेहमीच्या पठडीतले प्रवासवर्णन नसून भरपूर केलेल्या प्रवासातील काही अनवट ठिकाणांचा परिचय वाचकांना व्हावा या दृष्टीने हे लेखन केले आहे. तसेच नेहमीच्या बघण्यातील किंवा माहितीतल्या ठिकाणांचा उगम कसा झाला किंवा त्यांचे वैशिष्ट्य काय, थोडक्यात इतिहास लेखकाने त्यांच्या नजरेतून व मिळवलेल्या माहितीनुसार दिला आहे. कुठून कसे जायचे,किती अंतरावर आहे या गोष्टींचे मार्गदर्शनही निश्चितच उपयुक्त ठरेल. अनघा प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले आहे. अप्रतिम असे मुखपृष्ठ स्वतः लेखक रामदास खरे यांनीच केले असून पुस्तकातील सर्व उत्कृष्ट फोटोही त्यांनीच काढले आहेत. त्यामुळे पुस्तक अतिशय देखणे झाले आहे. मलपृष्ठावरील मजकूर लेखक, छायाचित्रकार, पत्रकार समीर परांजपे यांनी फारच सुरेख लिहिला आहे. हे पुस्तक वाचून वाचक आधी बघितलेल्या व न बघितलेल्या ठिकाणी नवीन दृष्टी घेऊन निश्चितच जातील.

**मातीतील उपयुक्त जैविक घटक आणि सेंद्रिय कर्ब वाढविण्यासाठी नियमित प्रयत्न करणे आवश्यक आहे. ‘थेंबे थेंबे तळे साचे’ या उक्तीप्रमाणे दैनंदिन प्रयत्नांतून आपण शाश्वत शेतीसाठी माती सुपिक आणि जिवंत ठेवू शकतो.आणि त्यासाठी शेतीतून निघणाऱ्या काडीकचऱ्याचे व्यवस्थापन सुद्धा नियोजनबद्ध पद्धतीने केल्यास तो देखील शेतीसाठी अत्यंत ठरतो हे आपल्या लक्षात येईल.**






# बायोचार

कृषिसाधन
सोनाली कदम
कृषी सहाय्यक



**बायोचार**

कोणतेही बायोमास (जैवकचरा) ऑक्सिजन विरहित वातावरणामध्ये ३५० ते ६०० अंश सेल्सिअस तापमानात गरम केल्यास तो न जळता (पायरॉलिसिस) त्यातून वायू व तेलकट पदार्थ वेगळे होतात. फक्त काळा कोळशासारखा भरपूर कर्बयुक्त पदार्थ मागे राहतो, त्याला 'बायोचार' असे म्हणतात. हा बायोचार मूळ बायोमासच्या वजनाच्या सुमारे ५० टक्के इतका असतो. तो योग्य प्रकारे जमिनीत मिसळल्यास जमिनीची सुपीकता वाढते. जमीन भुसभुशीत राहून त्यात हवा खेळण्याचे प्रमाण वाढते. जमिनीची पाणी धरून ठेवण्याची व झाडांना अन्नद्रव्ये उपलब्ध करून देण्याची शक्ती वाढते. यामुळे अशा जमिनीत पिकाचे उत्पादन व दर्जा वाढतो

**बायोचार तयार करण्याची पद्धत**

बायोचार निर्मिती एक बंदिस्त चुल किंवा लोखंडी ड्रम चा वापर केला जातो. संपूर्ण जैविक घटक या बंदिस्त चुलीत किंवा लोखंडी ड्रम मध्ये टाकून ते हळूहळू जाळले जातात. त्याची पुर्ण पणे राख न करता ठिसूळ कोळसा सदृश पदार्थ तयार करणे हा मुख्य उद्देश असतो. यासाठी तापमान ३५०-५००डिग्री पर्यंत ठेवणे उत्तम असते. कमी प्रमाणात असेल तर चुलीवर देखील बायोचार उत्तम प्रकारे तयार होतो. साधारणता तीन ते पाच तासात ही प्रक्रिया पूर्ण होते. धुर पुर्णपणे कमी झाला की बायोचार तयार झाला असे समजावे. जमिनीत तीरकस खड्डा तयार करुन तो बंद करून देखील बायोचार कमी अग्नी वर तयार करणे शक्य आहे.

**बायोचारचे फायदे**

✻ बायोचारमध्ये जास्त प्रमाणात कार्बन राहते.

✻ गांडूळ खतामध्ये १२ ते १५ टक्के कार्बन असते, तर बायोचारमध्ये ३० ते ६० टक्क्यांपेक्षा जास्त असू शकते. म्हणूनच बायोचार जमिनीमध्ये वापरल्यास जास्त प्रमाणात कार्बन उपलब्ध होऊ शकतो.

✻ जमिनीचा पोत सुधारून उपयुक्त सूक्ष्मजीवांची संख्या वाढते. मात्र सूक्ष्मजीव बायोचारला फारसा धक्का लावत नसल्याने त्यातील कर्ब जास्त काळ मातीत राहते.

✻ बायोचार वापरलेल्या जमिनीतून हरितगृह वायूही जास्त बनत नाहीत.

✻ मातीतील पीएच नियंत्रीत करण्यास मदत होते.

✻ पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते.

**बायोचारचा वापर**

**१. बायोचार चार्ज करणे (सक्रिय करणे):**

बायोचार तयार झाल्यावर तो तसाच वापरू नये.कारण बायोचार सुरुवातीला मातीतील पोषकद्रव्ये (नत्र, स्फुरद, पालाश इ.) शोषून घेतो.

✻ त्यामुळे, बायोचार वापरण्यापूर्वी त्याला जिवामृत, शेणखत, कंपोस्ट स्लरी, गोमूत्र मिश्रण यामध्ये ७-१० दिवस भिजवून ठेवावे. यामुळे बायोचारमध्ये सूक्ष्मजीव वाढतात आणि तो मातीला पोषक ठरतो

**२. बायोचार जमिनीत मिसळणे:**

✻ ५०० किलो ते १ टन बायोचार प्रति एकर असे प्रमाण चांगले असते. जमिनीच्या प्रकारानुसार हे प्रमाण कमी-जास्त होऊ शकते.

✻ बायोचार शेतात विखुरून टाकावे. नांगरट किंवा रोटावेटरच्या साहाय्याने ४-६ इंच खोलवर मातीमध्ये मिसळा.

✻ बायोचार जास्त खोल नाही मिसळायचा, वरच्या मातीच्या थरात असावा.

✻ पाणी देणे:बायोचार मिसळल्यानंतर जमिनीत चांगले पाणी द्यावे.यामुळे बायोचार जमिनीत व्यवस्थित स्थिर होतो आणि मातीतील सूक्ष्मजीवक्रिया सुरू होते.

अशा पद्धतीने शेतातील पिक अवशेषांचा वापर करून खत निर्मिती करणे शक्य आहे सोबतच हे अवशेष शेतातच जाळण्यामुळे शेतीची आणि पर्यावरणाची हानी थांबवणे शक्य आहे.

# अक्षय्यदान...

तरंग
मनीषा कुलकर्णी-आष्टीकर
९५११८७५३५३





झुळझुळ वाहणाऱ्या यमुनेवर आज राधा निघाली होती. मनात कृष्णभेटीची ओढ. ही ओढ असते ना ती माणसाला वेड लावते. असंच वेड मनात घेऊन ती झरझर पावलं टाकू लागली. भेटीच्या त्या सुखानं तिच्या चेहऱ्यावर गोड गुलाबी रंग चढला होता. ही भेट रोजच्यासारखी असली तरी मनात कुठलीतरी आस घेवून ती चालली होती.

आज कुठलातरी खास दिवस. . जो तो एकमेकांना दानाचं महत्त्व सांगत होता. ज्याला जे वाटेल ते दान करत होता. कुणाला काय हवं ते विचारूनही कुणी देत होतं. ज्याची ओंजळ भरलीय त्याचा चेहरा सुखानं माखलेला आणि ज्यानं ती भरलीय तो ही तितक्याच आनंदात!

ही कसली जादू? हे माधवा आज माझ्या हातूनही असंच घडू दे. मला दान करायचंय. . . आज दान केल्यानं अनंत जन्मीचं फळ मिळतं असं ऐकलंय पण मी जे देणार ते अविनाशी. . . अक्षय्य असं हवं. खरंच काय देऊ कान्हाला?माझ्याजवळ काय बरं असं त्याला देण्यासाठी?तो अवघ्या सृष्टीचा दाता!मी दिलेलं दान माझ्या कन्हैय्यास आवडेल ना?आपल्याला सर्वात प्रिय जे काही असेल त्याचाच त्याग करावा ना?त्याचंच दान कान्हाला देईल मी!चल राधे,मग ठरलं तर. . स्वत:शीच आत्मिक संवाद साधत ती गोरी बाला निघाली.

तो मुरलीवाला श्यामसुंदर एका कृष्णखडकावर मुरली वाजवण्यात दंग होता. राधेच्या पैंजणाच्या आवाजानं त्यानं बासरीला जरा बाजूला सारलं. उमनमोहनाच्या दर्शनानं राधा खुलली. कान्हाच्या मिठीत विसावली. रातराणीच्या कळ्या बहरल्या. कान्हाच्या नयनात स्वत:चे प्रतिबिंब पाहत ती म्हणाली,आज तुला काहीतरी द्यायचंय रे कान्हा!त्याचा प्रेमानं स्विकार करशीलराधेच्या मुखावरचे अल्लडसे. निरागस भाव पाहून आपल्या ओंजळी तिच्यापुढे धरत कान्हा हसत वदला,काय देशील बोल राधे?

एका स्त्रीला तिचं अस्तित्व जिवाहूनही प्रिय असतं. आजपासून दिलं तुला माझं सारं अस्तित्व.

**मी न माझी राहिले**
**सारेच तुला वाहिले**

राधेनं स्वत:ला कृष्णार्पण केलं. . जन्मोजन्मीसाठी!

कान्हा काही बोलणार इतक्यात राधेनं त्याच्या ओठावर हात ठेवला. म्हणाली, तुला इतकं देतेय पण मी खूप स्वार्थी आहे रे. . . तुला काहीतरी मागणारही आहे.

'आज राधा काय मागणार मला?'कान्हाच्या मनात सहजच विचार आला. पण त्यादिवशी राधेनं त्याला असं काही मागितलं ते ऐकून तर तो निशब्दच झाला!तो म्हणाला,राधे,माझ्यावर तुझ्याइतकी प्रीत करणारं या अवनीवरती कुणीही नाही गं. खरंच तुला आणि तुझ्या प्रेमाला मी हजारदा वंदन करतो. असं म्हणून कृष्ण राधेचरणी लीन झाला.

राधा कृष्णाच्या या संवादातून राधेनं कृष्णाला काय मागितलं असेल हा प्रश्नच राहिला होता. रेडिओवर एक से बढकर एक जुन्या चित्रपटातील गाणी कर्ण तृप्त करत होती. लतादिदींच्या स्वर्गीय सुरातील

**अगर मुझसे मुहोबत है**
**मुझे सब अपने गम दे दो**
**इन आंखोका हर इक आंसू**
**मुझे मेरे सनम दे दो**

हे गाणं ऐकताना सहजच वाटलं... राधेनं कृष्णाकडं हीच तर मागणी केली नसेल ना?

**तेरे सारे गम मेरे**
**मेरी सारी खुशियां तेरी!**

**२४ नोव्हेंबर १९७१ ची ती संध्याकाळ अमेरिकेच्या इतिहासात एका अनाकलनीय रहस्याने भरली गेली. नॉर्थवेस्ट ओरिएंट एअरलाइन्सचं बोईंग ७२७ हे विमान पोर्टलंडहून सिएटलला निघालं होतं-फक्त अर्ध्या तासाचा छोटा प्रवास. ३६ प्रवासी आणि ६ कर्मचारी यांच्यासह हे उड्डाण अगदी नेहमीचं वाटत होतं. पण या साध्या फ्लाइटमध्ये एक असाधारण व्यक्ती होती– ती म्हणजे डी. बी. कूपर !**



# डी.बी. कूपर: हवेत हरवलेला माणूस

जगावेगळं
अमोल जगताप

आज पन्नास वर्षांनंतरही, त्याचं नाव एक कोडं बनून राहिलं आहे. तो कोण होता? तो कुठे गेला? त्याने मागितलेल्या २००००० डॉलर्सचं काय झाले? या प्रश्नांची उत्तरं आजही हवेतच तरंगत आहेत.. डी. बी. कूपर दिसायला अगदी साधा होता-चाळीशीतला चेहरा, काळा व्यवसायिक सूट, पांढरा शर्ट, टाय आणि एक ब्रीफकेस. तो विमानात शेवटच्या रांगेत जागेवर बसला-जिथून त्याला सगळ्यावर नजर ठेवता येईल. विमानाने उड्डाण केलं आणि काही मिनिटांतच त्याने आपला खेळ सुरू केला. त्याने २३ वर्षीय विमानसेविका फ्लॉरेन्स शॅफनरला एक चिठ्ठी दिली. तिला वाटलं हा माणूस कदाचित तिच्याशी फ्लर्ट करतोय, पण कूपरने गंभीरपणे सांगितलं, चिठ्ठी वाचा, माझ्याकडे बॉंब आहे. त्या चिठ्ठीत नीट अक्षरात लिहिलं होतं, माझ्या ब्रीफकेसमध्ये बॉंब आहे, माझ्याजवळ बस. शॅफनरला विश्वास बसत नव्हता, पण कूपरने ब्रीफकेस उघडून दाखवलं-त्यात लाल सिलिंडर, तारांचा गुंता, एक मोठी बॅटरी- तो खरंच बॉंब होता!

कूपरच्या मागण्या ऐकून कोणाच्याही पायाखालची जमीन सरकली असती: २००००० डॉलर्स रोख (आजच्या काळात सुमारे १.३ दशलक्ष डॉलर्स), चार पॅराशूट्स (दोन प्रायमरी, दोन रिझर्व्ह) आणि विमान उतरताच इंधनाचा ट्रक. त्याने धमकी दिली, मागण्या पूर्ण झाल्या नाहीत तर विमान बॉम्बने उडवेन. प्रवाशांना याची जाणीव होऊ नये म्हणून शॅफनरने हे गुप्त ठेवलं आणि कॉकपिटमध्ये जाऊन वैमानिकांना सांगितलं. दुसरी विमानसेविका, टीना मकक्लो, हिलाही हे कळलं आणि ती कूपरजवळ बसली. या दोन तरुणींनी कॉकपिट आणि कूपर यांच्यात संपर्काचा पूल बनून काम केलं.

वैमानिकांनी हवाई वाहतूक नियंत्रकांना कळवले आणि बातमी एअरलाइनचे अध्यक्ष डोनाल्ड नायरॉब यांच्यापर्यंत पोहोचली. त्यांनी तत्काळ निर्णय घेतला-कूपरच्या मागण्या मान्य करायच्या. का? कारण एक तर प्रवाशांचा जीव वाचवणं महत्त्वाचं होतं आणि दुसरं म्हणजे कंपनीची बदनामी होणे त्यांना परवडणारी नव्हती. ऋइख च्या मदतीने सिएटलमधील एका बँकेतून २००००० डॉलर्स जमा झाले- २० डॉलरच्या १०००० नोटा, ज्यांचे क्रमांक त्यांनी नोंदवून घेतले, जेणेकरून नंतर त्या पैशांचा माग काढता येईल.

मूळ अर्ध्या तासाचा हा प्रवास वैमानिकांनी सिएटलभोवती फिरवून तब्बल तीन तासांचा केला. प्रवाशांना तांत्रिक अडचण असल्याचं सांगितलं गेलं, आणि आश्चर्य म्हणजे कोणालाच संशय आला नाही. शांतपणे गप्पा मारत, कॉफी पित प्रवासी बसले होते, तर मागे कूपर आपल्या बॉंबसह सज्ज होता. शेवटी संध्याकाळी ५.४६ वाजता विमान सिएटल-टॅकोमा आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरलं-मुख्य टर्मिनलपासून दूर, एका निर्जन भागात.

विमान थांबताच एका प्रतिनिधीने कूपरला पैसे आणि पॅराशूट्स दिले. त्याने सर्व प्रवाशांना आणि बहुतेक कर्मचाऱ्यांना सोडलं, फक्त टीना मकक्लो, दोन वैमानिक आणि एक फ्लाइट इंजिनीअर यांना ठेवलं. विमानाला इंधन भरलं गेलं आणि पुन्हा उड्डाण झालं. कूपरने वैमानिकांना स्पष्ट सूचना दिल्या की विमान मेक्सिको सिटीकडे जा, १०००० फूट उंचीवर, १५ अंशांचा फ्लॅप कोन आणि विमानाचा शक्य तितका कमी वेग. वैमानिकांनी सांगितलं, इंधन पुरणार नाही, पण कूपर शांतच राहिला. त्याने टीना मकक्लोला कॉकपिटमध्ये बंद करायला सांगितलं आणि स्वतः मागच्या बाजूला एकटा राहिला. बोईंग ७२७ मध्ये मागे उघडणाऱ्या पायऱ्या होत्या- हा एक खास डिझाइनचा भाग, जो कूपरला माहीत होता. रात्री ८.१३ वाजता विमान अचानक हललं-कूपरने पायऱ्या उघडल्या आणि पैसे व पॅराशूट घेऊन थेट विमानातून उडी मारली! तेव्हा बाहेर काळोख, पाऊस, थंडी आणि ३२० किमी/तास वेग होता. वैमानिकांनी विमान रेनो, नेवाडाला उतरवलं. पोलिसांनी तपास केला-कूपर गायब! फक्त त्याचा टाय, टाय क्लिप, सिगारेटचे तुकडे आणि काही पॅराशूटचे अवशेष विमानात सापडले. बॉंब, पैसे आणि तो माणूस- सर्व काही जणू काही हवेत विरघळून गेलं होत.

FBI ने या प्रकरणाचा तपास तब्बल ४५ वर्षे चालवला-अमेरिकेच्या इतिहासातलं हे सर्वात मोठं आणि सर्वात गुंतागुंतीचं अपहरणाचं प्रकरण. पण कूपर सापडला नाही. १९८९ मध्ये कोलंबिया नदीकाठी एका ८ वर्षांच्या मुलाला ५८०० डॉलर्स सापडले. पोलिसांनी त्याचे नंबर जुळवले तर असे लक्षात आले की त्या सर्व कूपरच्याच नोटा होत्या. पण बाकीचे १९४२०० डॉलर्स कुठे गेले? तिकडे कूपरच्या टायवरून काही सूक्ष्म कण सापडले जे शुद्ध टायटॅनियम, ॲल्युमिनियम चे होते. जे सूचवतात की तो विमान निर्मिती क्षेत्रात, कदाचित बोईंग कंपनीतच, काम करत असेल. त्याच्या चेहर्याचं रेखाचित्र बनवलं गेलं-मध्यम उंची, काळे केस, गडद डोळे, पण त्याची खरी ओळख कधीच उघड झाली नाही.

कूपरच्या उडीबद्दलही अनेक प्रश्न अजून गूढ वाढवणारे आहेत. १०००० फूट उंची, -७ अंश तापमान, पाऊस, अंधार आणि प्रचंड वेग; अशा परिस्थितीत जिवंत राहणं जवळपास अशक्य वाटतं. पण नंतरच्या काळात काही अपहरणकर्ते अशाच परिस्थितीत उड्या घेऊनही जिवंत राहिल्याने कूपरही जिवंत असेल ही शंका होती.

तो पॅराशूट तज्ज्ञ होता का? त्याने हे सगळं आधीच प्लॅन केलं होतं का? की तो फक्त नशिबावर अवलंबून होता?

तिकडे या सगळ्या थरारात टीना मकक्लो ही खरी नायिका ठरली. तिने कूपरला शांत ठेवलं, त्याच्याशी बोलत राहिली आणि परिस्थिती हाताबाहेर जाऊ दिली नाही. तिच्यामुळेच कोणीही जखमी झालं नाही.

कूपरचे ‘डी. बी.’ हे नाव एका चुकीतून आलं. बातमीदार जेम्स लॉंगला त्याचं खरं नाव ‘डॅन कूपर’ असं ऐकायला मिळालं, पण त्याने ते ‘डी. बी.’ असं लिहिलं-आणि त्यामुळे तेच नाव इतिहासात रुजलं.

डी. बी. कूपरचं हे अपहरण आजही अमेरिकेच्या इतिहासातलं एकमेव न सुटलेलं प्रकरण आहे. तो जिवंत राहिला की मेला? तो पैसे घेऊन लपला की जंगलात हरवला? त्याचं खरं नाव काय होतं? हे प्रश्न अनुत्तरीत राहिले आहेत. काहींना वाटतं तो एक हुशार गुन्हेगार होता, तर काही म्हणतात तो एक साहसी माणूस होता ज्याने नशिबाला आव्हान दिलं. त्याची कहाणी चित्रपट, पुस्तकं आणि गाण्यांमध्ये अजरामर झाली आहे.

हवेतून उडी मारून गायब झालेला हा माणूस एक थरारक कथा बनून राहिला-एक रहस्य, ज्याचं उत्तर कदाचित कधीच मिळणार नाही. डी. बी. कूपर हे नाव आजही आपल्याला चकित करतं, आणि त्याची कहाणी पुन्हा पुन्हा ऐकताना तितकीच रोमांच उभा राहतो.

प्रतिबिंब
‖सुजाता येवले





# सिग्नल, ट्रॅफिक सिग्नल

(उत्तरार्ध)

अक्षताने म्हणजे माझ्या शेजारणीने मला लगेच फोन केला. मी लेक्चर मध्ये असल्याने क्लार्कला माहिती नव्हते. ती दुसऱ्या शिफ्टची होती. फक्त मीटिंगसाठी बाहेर जाणार आहे या माहितीच्या आधारावर मी बाहेरच आहे हे तिने अक्षताला सांगितले. घरात पोलिस आहेत हे समजल्यावर ती पण गंभीर झाली. फक्त हंबरडा फोडायचा बाकी होता. तेवढ्यात मी लेक्चर संपवून खाली आले तो ऑफिसमधले गंभीर चेहरे मला बघून 'भूत' बघावे असे दचकले. रमग झाला प्रकार लक्षात येऊन त्यांनी मला घरी पिटाळले. काही न सांगता घरी येऊन बघते तो दारापुढे ही गर्दी विथ पोलीस, म्हणजे सासुबाई!!! पण अशा ठिकाणी पोलीस काय करतील. मी गर्दीच्या मागे उभे राहून घाई घाई स्कार्फ, हेल्मेट, सनकोट काढत घरात शिरले. माझे बाळ भांबावलेले आजीच्या कुशीत होते. माझे डोळे आपोआप स्त्रवायला लागले. पुसण्यासाठी मान वळवली. तो पोलिसांच्या हातात माझी पर्स! हर्ष वायू झाला होता जणू, मग पोलिसांनीच गर्दीला समजावले की पर्स सिग्नल वर पडली, ती त्यांना सापडली. ती उचलून हाक मारेपर्यंत मी तिथून निघून गेली होती. हेल्मेट, स्कार्फ, सनकोट असा जामानिमा, मी कोण त्यांच्या लक्षातय आले नाही. मग त्यांनी पर्स उघडली अर्थात व्हिडिओ काढत, माझे सर्व सामान चेक केले त्यात पत्ता सापडला. आणि अर्थातच त्यांच्या वरिष्ठांच्या परवानगीने ते घरापर्यंत पोहोचले. पर्स माझ्या हवाली करत झाला सर्व प्रकार गर्दीला समजावून सांगितला. सासूबाई जरा नाराजीनेच आत गेल्या. पिल्लू आधी मला चिकटून बसले होते. नंतर शुरवीराचा आव आणून पोलिसांना 'मामा मामा' म्हणत उडया मारू लागले. पोलिसांना चहा पाण्याचा खूप आग्रह केला पण ड्युटीवर असताना आम्ही काही घेत नाही असे म्हणत माझ्या लेकराकडे कौतुकाने बघत ते परत सिग्नल पाशी जाऊन उभे राहिले. अस्सा अभिमान वाटला सिग्नल पोलिसांचा. पर्समधल्या चिठोऱ्यापासून पगार आणि इतर पैसेही सुरक्षित होते. हो फक्त रात्री त्यातले अकरा रुपये कमी होणार होते.

मध्ये केव्हा तरी एबीबी सर्कलला सर्कलमध्ये, आणि सगळ्याच सिग्नल पाशी शाळकरी लहान मुले उभे होते. पोलीस प्रात्यक्षिकासह त्यांना समजावून सांगत होते सोबत त्यांचीही ड्युटी सुरू होती. लहान मुले अत्यंत आनंदाने पोलिसांचे काम समजावून घेत होते. त्याच्यात एक आगावु कार्टे हातातून निसटले आणि पोलिसांसारखे एका गाडीला हात देत आडवे उभे राहिले. दुर्दैवाने शाळेने मुलांच्या पालकांनाही बोलावले होते. मुलगा असा पळाल्याचे बघून भांबावलेले पालक ओरडू लागले. त्या मुलाच्या मागे पोलीस होतेच. पोलीस सिग्नलपाशी उभे असताना गर्दीला एक शिस्त असते. ज्याची भिस्त पोलिसांवरच असते. मुलाला त्यांनी सही सलामत कडेला आणले. पण भांबावलेल्या पालकांनी अद्वातद्वा भाषेत पोलिसांना नंतर शिक्षकांना बोल लावले. मॅनेजमेंटने मौन बाळगून जणू हात वर केले. पोलिसांनी हतबल असल्यासारखे चूक नसताना माफी मागितली. त्यांचा मनापासून वाईट वाटत असतानाही अभिमान वाटला. दुसऱ्या एका प्रसंगात सिग्नल तोडल्यावरून रागावल्यावर एका रईसजादयाने पोलीसाची कॉलर धरलेली बघून मनापासून वाईट वाटले.

हल्ली रात्री ऑफीस किंवा बाहेरगावाहुन उशीरा घरी परतणाऱ्या स्त्रियांना साध्या वेषातले पोलिस घरापर्यंत सोबत करतात म्हणे. कोविडमध्ये घरदार सोडून इतरत्र भटकणाऱ्यांना निवास, खाणेपिणे यांची सोय हे पोलिस मायबाप मोठया प्रमाणावर करत होते. त्या काळात पोलिसांच्या वेषात साक्षात पांडुरंग भासत होता. असंख्य प्रसंग आयुष्यात असे बघितले की 'माझ्या घरी मी सुरक्षित ते केवळ या पोलिस म्हणजे जनतेच्या सेवकांमुळेच'

हल्ली मोबाईलचे व्यसन लागले नाही अशी व्यक्ती शोधणे म्हणजे समुद्रेती परिस शोधण्यासारखे वाटते. याच मोबाईल, लॅपटॉप वर सोशल मिडियावर जे रिल्स येतात त्यात पोलिसांच्या फॅमिलीत वृद्ध किंवा दुर्बलांचा छळ करणाऱ्या बायका दाखवतात. किंवा नवरा ड्युटीवर गेलेला असतांना या बायका वाममार्गाला लागलेल्या दाखवतात. पोलिसदादांनो यात काहीही तथ्य नाही हे माझ्यासारख्या अनेकांना माहित आहे. मग तुम्ही का सहन करत आहात? हे रिल्स बघुन पुढची पिढी पोलिसखात्यासारख्या सेवाभावी आणि देशाप्रती पवित्र कार्य करणाऱ्या संस्थेत जाईल का? खरे तर या सगळ्या गैरप्रकारासाठी तुमच्याकडेच इलाज आहे. सायबर क्राईम खात्याने याबाबत दुर्लक्ष करून कसे चालेल? बाकी पोलिस खात्याला बदनाम करण्यात सिंहाचा वाटा तर बॉलिवुडचाही आहे. खरे काय ते याच बॉलिवुडद्वारे जनसामान्यांसमोर का आणले जात नाही? निदान सामान्य जनमाणूस मनात शंका न ठेवता निर्भिडपणे आपल्या विवंचना घेऊन पोलिसदादांकडे जाईल.

बऱ्याच वेळा कर्णोपकर्णी ऐकलेल्या बातम्यांमध्येदेखील पोलिसांनी लाच घेतली, पोलिसांनी महिलेची छेड काढली वगैरे बातम्या ऐकल्यावर या बातम्या अविश्वासनीय आहेत असे मनापासून वाटते. पण जर खरे असेल तर दाद कोणाकडे मागावी? हे पोलिसांनी सुचवावे कारण दाद मागण्यासाठी सरकारी यंत्रणेतील सर्वात जबाबदारी असलेली आणि जवळची व्यक्ती म्हणजे पोलीसच आहे. इतर सरकारी यंत्रणांविषयी सामान्य माणसाचे सामान्य ज्ञान तर जगातली सर्वात मोठी आणि सर्वात लोकाभिमुख लोकशाही असलेल्या भारत देशात फारच तोकडे आहे. रोजच्या बातम्या बघणे आणि त्यावर टिप्पणी करत आपल्या अज्ञानाचे प्रदर्शन करणे याच्याइतके वाईट काहीच नाही.

नकारात्मकता काहीही असो पण ज्यांच्या जीवावर जनमानस समाजात निर्भयतेने वावरू शकते, ताठ मानेने उभे राहू शकते, जगू शकते, रात्री शांतपणे झोपू शकते, संकटात तारणहार म्हणून आशेचा किरण दाखवु अशा या पोलीसदादांना मनापासून त्रिवार वंदन....

(समाप्त)



पिढीजात मेंढीपालनाचा व्यवसाय, दोन खोल्यांचे घर.. घरात कुणी शिकलेले नाही..रानात मेंढ्या वळणे... जागा दिसेल तेथे बसून अभ्यास करणे...त्यात मोबाइल हरविल्याने झालेली पंचाईत... दोनदा अपयश येऊनही न सोडलेली जिद्द.. अशा मोठ्या संघर्षातून आयपीएस अधिकारी होण्याचे स्वप्न सत्यात उतरविलेला आजच्या तरुणांसाठी आयडॉल ठरेल असा युवक म्हणजे बिरदेव.. तुम्ही गरिबीत जन्माला आला हा तुमचा दोष नाही, परंतु तुम्ही गरिबीतच मेलात तर हा तुमचा दोष ठरेल! या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या ओळी उधृत करत आपल्या यशाबद्दलची पहिली प्रतिक्रिया व्यक्त करणारा बिरदेव सिद्धाप्पा डोणे यूपीएससीमध्ये ५५१ वी रँक मिळवत प्रचंड मेहनतीच्या जोरावर साहेब झाला आहे.



# जिंकलास भावा!

## मेंढरं वळणारा पोरगा सायब झाला !

सोशल मीडियावरील कोणत्याही प्लाटफार्मवर सर्फिंग केल्यावर गेल्या चार दिवसांपासून एकच नाव गाजते आहे ते म्हणजे बिरदेव डोणे. कोल्हापूर जिल्ह्यातील यमगे ता. कागलमधील मेंढरे चारणारा हा मुलगा. काठिण्य पातळी समजल्या जाणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत ५५१ वी रँक प्राप्त करून आयपीएस होण्याची किमया त्याने साधली आहे. तुमची परिस्थिती कशीही असू द्या. मनात जिद्द दुर्दम्य इच्छाशक्ती आणि मेहनतीची तयारी असेल तर यश तुमच्या पायाशी लोळण घेतल्याशिवाय राहणार नाही. याचेच उत्तम उदाहरण म्हणून बिरदेव डोणेच्या यशकथेकडे पाहावे लागेल. परिस्थितीच्या, असुविधांच्या नावाने रडगाणे गात, बोटे मोडत बसणाऱ्या हल्लीच्या पिढीच्या डोळ्यात बिरदेवचे यूपीएससी क्रॅक करणे झणझणीत अंजन घालणारे आहे.

अभ्यास करताना मोबाइल हरवला म्हणून पोलिसांत तक्रार देण्यासाठी गेलेल्या बिरदेवची साधी तक्रारही तेव्हा पोलिसांनी घेतली नव्हती. इतकी इथली व्यवस्था ढिसाळ आहे. आता तोच बिरदेव त्याच पोलिस खात्यात बडा अधिकारी बनला आहे. हा काळाचाच महिमा. कोल्हापूर जिल्ह्यातील यमगे नावाचे गाव. मेंढ्या चारणे हा बिरदेवच्या वडिलांचा मूळ व्यवसाय. बिरदेव पण हेच काम करत असत. पण मेंढ्या चारता चारता शिक्षणाची ओढ स्वस्थ बसू देत नव्हती.

लहानपणापासून अभ्यासात अतिशय हुशार असलेल्या बिरदेवने प्राथमिक, माध्यमिक शिक्षणानंतर पुण्याच्या सीईओपी कॉलेजमध्ये इंजिनीअरिंगला प्रवेश घेता. इंजिनीअरिंग झाल्यानंतर खरे तर बिरदेव कुठे तरी नोकरी करू शकत होता. पण लहानपणापासूनच मोठा अधिकारी बनण्याचे स्वप्न पाहणाऱ्या बिरदेवला आयपीएस होण्याची इच्छाशक्ती होती. त्याच्या वडिलांनी तर कुठेतरी नोकरी कर असा सल्लाही दिला होता. परंतु बिरदेवच्या स्वप्नांना बळ देण्याचे काम त्याच्याच मोठ्या भावाने म्हणजे वासुदेवने केले. बिरदेवने दोन वेळा यूपीएससीची परीक्षा दिली. परंतु दोन्ही वेळेस अपयश पदरी पडले. अपयशामुळे तो हरला नाही. किंवा प्रयत्न करणेही सोडले नाही. मेंढ्या चारता चारता झाडाखाली बसून अभ्यास करत राहिला. नंतर पुण्याच्या सदाशिव पेठेत भाड्याने खोली घेतली. स्वप्न ती नव्हे जी झोपेत बघतात. ही खूणगाठ मनाशी बांधलेल्या बिरदेवने आयपीएस बनण्यासाठी स्वप्नांचा पाठलाग केला. यश मिळवायचेच ही खूणगाठ मनाशी बांधलेल्या बिरदेवला तिसऱ्या प्रयत्नात मात्र यश हुलकावणक्ष देऊच शकले नाही. जेव्हा निकाल लागला तेव्हा बिरदेव हा नेहमीप्रमाणे रानात मेंढ्या चारत होता. त्याच्या देशमुख नावाच्या मित्राने त्याला फोन करून सांगितल्यावर बिरदेवला झालेला आनंद शब्दांपलिकडचा होता. गावात ही वार्ता पसरल्यानंतर निम्मा गाव बिरदेवचा शोध होता आणि बिरदेव बेळगावच्या सीमेवर मेंढ्या चारत होता. धनगर समाजातील एका सामान्य कुटुंबातील मुलगा आयपीएस होणे ही मोठी गोष्ट आहे. वकीलाचा मुलगा वकील, डॉक्टरांचा मुलगा डॉक्टर होणे यात विशेष काहीच नाही. कारण घरातील वातावरण, एकूणच आर्थिक परिस्थिती सर्व प्रकारच्या सोयीसुविधा, महागडे क्लासेस अशा साऱ्या सुविधा पायाशी लोळण घेत असतात. त्यामुळे डॉक्टरांचा मुलगा डॉक्टर झाला तर त्याचे कोडकौतुक ते काय? पण बिरदेवची परिस्थिती सर्वार्थाने वेगळी आहे. घरात ना कसल्या सुविधा, ना शैक्षणिक पार्श्वभूमी ना आर्थिक परिस्थिती. दोन खोल्यांचे घर, पिढीजात मेंढ्या वळणे, घरातील वातावरणही अभ्यासाला पूरक नाही. ना महागडे क्लास, ना पुरेशा सुखसुविदा अशा साऱ्या प्रतिकुल परिस्थितीत कधी घराच्या व्हरांड्यात, कधी आकाश हेच छप्पर असलेल्या रानावनात मेंढ्यांची देखरेख करत करत केलेल्या अभ्यासाच्या जोरावर युपीएससी क्रॅक करुन बिरदेवने परिस्थिती कशीही असू द्या जिद्द जर अंगी बाणवली तर यश मिळतेच. हे सिध्द करुन दाखविले. म्हणूनच बिरदेवने अख्या महाराष्ट्राचे मन जिंकले आहे. सोशल मीडियावर फक्त आणि फक्त बिरदेवच दिसतो आहे. गुरं वळणारा पोरगा आज सायब झाला हेच गाणे गेल्या काही दिवसांपासून ट्रेंडिंगला आहे.



**परामर्श**

**भागवत उदावंत**

यूपीएससी परीक्षेत अथवा कोणतेही यश मिळविल्यानंतर आजवर अनेक मिरवणुका साऱ्यांनीच पाहिल्या असतील. महागड्या सनरुफ गाड्यांमधील मिरवणूक, फुलांचा वर्षाव पण बिरदेवचा साधेपणा, बहिणीच्या डोळ्यातून वाहणारे आनंदाचे अश्रू धनगर समाजाची ओळख असलेला फेटा बांधून वावरणारा बिरदेव पाहिल्यावर किती तो साधेपणा, किती साधी भोळी माणसे. हे पाहून कुण्याही संवेदनशील माणसाच्या डोळ्याच्या कडा आनंदाश्रूंनी पाणावल्याशिवाय राहणार नाहीत. आपल्या यशानंतर भावना व्यक्त करताना बिरदेवने आजच्या तरुणांनाही प्रेरणादायी संदेश दिला. तो म्हणतो, धनगर असल्यामुळे या गावावरुन त्या गावात फिरावे लागते. बकऱ्या, मेंढ्या चारत जातो. निकाल आल्यानंतर भारी वाटले. धनगराचा मुलगा पण इतक्या उंच शिखरावरही जाऊ शकतो. मेंढपाळाचा मुलगा असल्यामुळे अभ्यास करताना थोडा त्रास झाला. हेटाळणी पण वाट्याला आली. पण जिद्द सोडली नाही. अभ्यासाप्रती ओढ असल्यामुळे मार्ग सुखकर बनत गेला.

परिस्थिती कितीही बिकट असू द्या. दृढनिश्चय आणि कठोर परिश्रम करायची तयारी असेल तर तुम्ही कोणतेही ध्येय हमखास गाठू शकता. हे बिरदेवने दाखवून दिले आहे. बिरदेवचे हे ध्येय ग्रामीण भागाबरोबरच यूपीएससी, एमपीएससीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्त्रोत आहे. आज यूपीएससी, एपीएससीचे स्वप्नं पाहणारे अनेक तरुण-तरुणी आहेत. पण महागडे क्लास, खासगी क्लासेसची अवाढव्य फी सामान्य विद्यार्थ्यांच्या मार्गातील मोठा स्पीडब्रेकर आहेत. अनेकजण यावरही मात करतात. या परीक्षेसाठी देशभरातून लाखो गुणवंत विद्यार्थी अधिकारी होण्यासाठी कठोर मेहनत घेऊन आपले नशीब आजमावत असतात. देश पातळीवर सर्वोच्च समजल्या जाणाऱ्या या परीक्षेत बिरदेवचा परीक्षेतील बैठक क्रमांक ६६ लाख ७ हजार ९२५ इतका होता. यावरून ही स्पर्धा परीक्षा किती आव्हानात्मक असते याची प्रचिती येते. त्यात बिरदेवने मिळविलेली रँक पाहता प्रतिकूल परिस्थितीतही तो असामान्य ठरला आहे. त्यामुळेच संपूर्ण महाराष्ट्रातून सध्या कौतुकाचा वर्षाव होत आहे. आकाशाला गवसणी घालायला निघालेल्या पाखरांनी संकटांवर मात करत गरुडासारखी भरारी घ्यायची असते. हे बिरदेवने सिध्द केले. तूच आहे तुझ्या जीवनाचा शिल्पकार असे सद्गुरू वामनराव पै यांनी सांगितलेले आहेच. बिरदेव पण स्वत:च शिल्पकार आहे. कारण स्वत:नेच स्वत:ला नेहमी मोटिवेशन करत वाटचाल करणे गरजेचे आहे. आजकालची अनेक तरुण मुले परिस्थिती असूनही मोबाइलच्या आहारी जात रिल्स तयार करत यूट्यूबच्या माध्यमातून मोठे होण्याचे स्वप्न पाहत आयुष्यातील किंमती वेळ वाया घालवत आहेत. रिल्समध्ये भविष्य शोधत 'रिअल' लाईफकडे दुर्लक्ष करणाऱ्या युवकांसाठी बिरदेव हा खऱ्या अर्थाने 'आयडॉल' आहे. बिरदेव डोणे यांची यशोगाथा विद्यार्थ्यांसाठी आशेचा मोठा किरण आहे. स्वप्नं मोठी पहा, स्वप्नांचा पाठलाग करा, परिस्थितीवर मात करून पुढे जा. परिस्थितीचे भांडवल करू नका. जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर यश नक्कीच मिळेल. हेच बिरदेवने दाखवून दिले आहे. बिरदेवच्या पावलावर पाऊल ठेवत आजच्या तरुणांनी मेहनत घेतली तर तुम्हीही 'बिरदेव' होऊ शकतात. तूर्तास बिरदेवचे मन:पूर्वक अभिनंदन.




# बँक व बाजार समितीत 'शिमगा'

जिल्हा बँक नाशिकची मुख्य अर्थ वाहिनी. शेतकऱ्यांना आधार देणारी हक्काची बँक. पण याच बँकेचा परवाना रद्द होण्याची वेळ आल्यावर धावाधाव सुरू झाली. वेगवेगळे तोडगे निघत आहेत. पण सर्व वाया जाणार आहे. बडे थकबाकीदार महायुतीने निवडणुकीत कर्जमाफी करू या शब्दाला चिकटून बसले आहेत. त्यांना कर्जमाफीशिवाय कोणताच तोडगा मान्य होणार नाही.बँक वाचवायची तर बोटचेपे धोरण वापरून काहीच साध्य होणार नाही. सध्याचे प्रशासक प्रतापसिंह चव्हाण यांनाच सर्व कायदेशीर अधिकार वापरू दिले तरच बँक जगणार आहे. चव्हाणांनी वसुली मोहीम सुरू करतांना पठाणी नव्हे तर नियमांच्या चौकटीतच वसुलीसाठी कडक धोरण स्वीकारले होते. पण राजकीय हस्तक्षेपामुळे त्यांना मनाप्रमाणे काम करू दिले जाणार नाही. त्यांना लवकरच तेथून काढून दुबळा प्रशासक बँकेच्या 'हे राम' साठी बसवला जाईल, असे दिसते. माजी संचालक व अधिकारी यांच्याकडे घेणे असलेले पैसे ते भरत नाहीत, तोपर्यंत थकबाकीदार पैसे भरणारच नाहीत. हे नक्की.बडे थकबाकीदार वजनदार व मातब्बर नेते आहेत. त्यांची पैसे न भरण्याची कठोर भूमिका छोट्या थकबाकीदारांना कर्ज न भरण्याचे बळ देते.

खरे बोलले तर सख्ख्या आईला देखील राग येतो, असे म्हणतात. पण वीस टक्के थकबाकीदार वेगवेगळ्या कारणांनी पैसे भरू शकत नाहीत. वेगळे कारण नैसर्गिक आपत्ती, कुटुंबावर आलेले संकट, आजार,शेतात पिकवले पण उत्पादनात घट,भाव मिळाला नाही. आदी कारणे लहान थकबाकीदारांच्या बाबतीत बरोबर आहे पण मोठी शेती करोडोंचे उत्पन्न राजकारणात दबदबा दरवर्षी संपत्तीत वाढ, ठेकेदारी व्यवसायातून होणारी मोठी कमाई. यामुळे थकबाकी भरायचीच नाही, हे ठरवले असल्याने ना.अजितदादा व ना.माणिकराव कोकाटे यांनी कोणतेही तोडगे काढले तरी मान्य होण्याची शक्यता तशी कमीच आहे. मागच्या काळात कांदा सरासरी चार हजारांनी विकला गेला. यंदा द्राक्षाचे पैसे वाढले असे शेतकरी सुध्दा कर्ज भरणार नाहीत. म्हणून नियमानुसार कडक भूमिका घेणे हाच बँक वाचवायचा तोडगा आहे. बँकेत झालेल्या शेतकऱ्यांच्या बैठकीत शेतकऱ्यांना विचारून तोडगा काढायचा व जिल्हाधिकारी, मंत्री,आमदार खासदार यांच्या बैठकीत शेतकऱ्यांच्या भावना सांगायच्या व तोडगा काढायचा हा बैठकीचा मूळ हेतू होता. थकबाकीदारांचे प्रतिनिधी यांनी अधिकाऱ्यांनाच कडक शब्दांत सुनावले. शेवटी थकबाकी माफीवरच बैठक संपली. याबैठकीत मोठ्या संकटात सापडलेल्या ठेवीदारांना लग्नासाठी, दवाखान्यासाठी बँक त्यांचे दाबून ठेवलेले पैसे देत नाही. जे नियमित कर्ज भरतात ते कर्जापासून वंचित आहेत. त्यांना थोडे कर्ज मिळते पण हातात रूपया न देता ते पैसे फिक्स ठेव म्हणून ठेवले जातात. फक्त शासनाच्या दोन, पाच हजारांच्या व्याज माफीचा फायदा मिळतो.अशा प्रामाणिकांचा विचार मात्र कोणताच नेता करीत नाही. आता ना. अजितदादांनी बरेच तोडगे काढले पण यातून काहीच निघणार नाही हे नक्की. खरे तर थकबाकी वाढण्यास सर्वच सहकारी सोसायट्यांचे संचालक मंडळ पण जबाबदार आहे. माहित असूनही पैसे वेळेवर भरू न शकणाऱ्यांना अनेकांनी बँकेला कर्ज देण्यास भाग पाडले. पण स्वतःच्या सोसायटी सभासदांना समजवत गोड बोलून वसुली करायची जबाबदारी मात्र एकाही सोसायटीच्या संचालकाने पार पाडली नाही. कारण परत सत्ता हवी. कुणाला न दुखवायचे बोटचेपे धोरण सोसायटी संचालकांनी राबवले. त्यामुळेच बँकेला आज हे दिवस आले. आता संचालक ,चेअरमन अदखलपात्र झाले आहेत.

एका सोसायटीच्या वार्षिक सभेत एका सभासदाने संचालक मंडळाला विनंती केली. आपण सर्व एकत्र थकबाकीदारांच्या घरी जा विनंती करा. आपला मान ठेवला जाईल. कर्ज वसूल होईल. परंतु विरोधी गटाच्या एका संचालकाने पैसे भरू नका. कर्जमाफी होणार आहे असे जाहीर आवाहन केले. तर सत्तारूढ गटाचे म्हणाले नाही जाणार वसुलीला. कारण एखाद्याने आत्महत्या केली तर आम्ही अडचणीत येऊ. सोसायटीच्या संचालकांवरच जबाबदारी टाका. बरीच थकबाकी वसूल होऊ शकते. कडक कारवाईपेक्षा हे हत्यार कामात येईल.

रिझर्व्ह बँकेने कर्जमाफीचे नाटक करणाऱ्या सरकारांना पण काळजी घ्यायला सांगितली आहे. आधी पैशांची तरतूद करा नंतरच कर्जमाफीवर बोला. नियमित कर्ज फेडणाऱ्यांना सुद्धा थकबाकीदारांच्या प्रमाणात पैसे द्या, असे केल्यास मुद्दाम थकबाकीदार राहण्याचे प्रमाण कमी होईल. माफी मिळाली ती लाखात,कोटीत व नियमित भरणाऱ्यांना बारीक तुकडा. मग नका भरू कर्ज अशी मानसिकता बळावत चालली आहे.

निवडणूक आल्यावर जे भंपक आश्वासने देतात, तिजोरीचा अभ्यास करीत नाहीत. सत्ता मिळवतात नंतर जनतेला फसवतात याकडे निवडणूक आयोगानेच कडक भूमिका घेऊन बनवाबनवीची आश्वासने देता येणार नाही. अशी तंबीच राजकीय पक्षांना दिली पाहिजे. आश्वासनपूर्ती न करणारे सरकार सहा महिन्यांत बरखास्त करून घरी पाठवले पाहिजे. अशी उपाययोजनाच देशाला तारू शकणार आहे, कृषिमंत्री माणिकराव कोकाटेंनी बँकेत ठेवी ठेवा, या आवाहनाला प्रतिसाद मिळणे अवघड आहे.

### समितीत घोडे'बाजार'

सटाणा कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीत तालुक्यातील काही वजनदार नेत्यांचा पराभव करून संजय सोनवणे व राहुल सोनवणे यांच्या पॅनलने १८ पैकी ९ जागा जिंकत बहुमतापासून एक जागा कमी मिळवली.राघोनाना अहिरे, डॉ.विलास बच्छाव, प्रशांत बच्छाव, नानाजी दळवींनी सहा जागा जिंकल्या. आता संजय सोनवणेच किंग असे वातावरण तयार झाले. पण वजनदारांना हा पराभव जिव्हारी लागला. सोनवणेंना सत्ता मिळू द्यायचीच नाही. हे पहिल्या दिवसापासून ठरवले. व्यापारी गटातील दोन व हमाल मापारी गटातील एक हे संचालक कुणाचेच बांधील नसतात. योग्य वाटेल त्या गटात जायला मोकळे असतात.बरोबर हाच डाव विरोधकांनी टाकला.दोन्ही गटाकडे समसमान नऊ संचालक झाले.कोरमअभावी चेअरमन,व्हा. चेअरमनची निवडणूक स्थगित झाली. हा खरे तर संजय व राहुल सोनवणेंना जोर का झटकाच आहे. आता महागडा घोडेबाजार सुरू होईल. ध्यानीमनी नसलेले चेअरमन,व्हा.चेअरमनचे नाव समोर येईल. खरे तर नामपूरनंतर सटाणा मार्केटमध्ये महिलाराज येणार होते. पण हा अंदाज खोटा ठरला. घोडेबाजार तेजीत झाला म्हणजेच मार्केटचे मरण जवळ येईल. शेवटी केलेला खर्च आधी वसुल करणे हा नियमच झाला आहे. कदाचित अचानक संचालक मंडळच बरखास्त होऊन नव्याने निवडणुका पण होऊ शकतात. चेअरमन निवडणुकीच्या दिवशी एक-एक संचालक पलटी मारून मोकळे झाले. मार्केटचे सचिव भास्कर तांबे हे शिस्त पाळणारे आहेत. संचालकांनी चुकीचा निर्णय घेतला तर ते विरोधात मत नोंदवतात. व संचालकांनी घेतलेला निर्णय वाया जातो म्हणून झालेला खर्च कसा वसुल करावा ही वेगळीच चिंता सर्वांना आहे.

# तारुण्यात मालेगाव मनपाच्या नशिबी वार्धक्याच्या वेदना

**मालेगाव महापालिकेचा जन्म होऊन तब्बल चोवीस वर्षे लोटली. म्हणजे आता खऱ्या अर्थाने मालेगाव मनपा 'तरुण'झाली आहे. परंतु तरुणपणात तरुणीने जसे नटावे, तसे बदल या महापालिकेकडून शहरात अद्याप झालेले नाहीत त्यामुळे तिच्या नशिबी शहराच्या बकालपणाचा शाप काही मिटलेला नाही.**




महापालिका नको नगरपरिषदच हवी म्हणून अट्टाहास करणाऱ्यांनी मात्र महापौर पदवी आरूढ होऊन मिरवून घेतले. मात्र, हवा तसा बदल काही करू शकले नाही ही शोकांतिका म्हणावी लागेल.

माजीमंत्री आणि समाजवादी नेते स्वर्गीय निहाल अहमद यांनीही महापालिका नको म्हणून आग्रह धरला. मात्र राज्यशासनाने मनपा निर्मिती केली त्यावेळी प्रथम महापौर होण्याचा मानही त्यांनी मिळवला. शासन दरबारी वजन असताना फारसे बदल त्यांच्या काळात झाले नाहीत. त्यानंतर आलेल्या शेख रशीद, ताहेरा शेख, आसिफ शेख या एकाच घरातील तिघांनी महापौर भूषविताना काही प्रश्न सोडवले. शहराच्या पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न शेख रशीद यांच्या काळात गिरणा धरणातून पाणी मिळवून सोडविण्यात आला.

राहता राहिला प्रश्न साठवण बंधाऱ्याचा तर विद्यमान शिक्षणमंत्र्यांनी साठवण बंधाऱ्याची खोली वाढवून हातभार लावला.

माजीमंत्री प्रशांत हिरे यांनीही मनपाला विरोध करून दोन स्वतंत्र नगरपालिका निर्मितीचा प्रस्ताव शासनाला दिला होता. अर्थात नदीच्या अलिकडले आणि पलीकडले असा असा त्यांचा प्रस्ताव असताना त्याला काहींनी विरोध केला. तर काहींनी स्वागत केले होते.

आता मात्र नागरिक अजूनही दोन नगरपालिका करण्याची मागणी करीत आहेत. महानगरपालिका तरुण झालेली असताना दीर्घकाळ मंत्रिपद भूषविणाऱ्या मालेगाव



**मालेगावनामा**

**शफिक शेख**
९४२०५८८३६६


बाह्यचे आमदार दादा भुसे यांनी विविध विकासकामे केली असली तरी मनपाच्या माध्यमातून विकास कामे करताना महापालिकाच वादात ठरली आहे. येणाऱ्या आयुक्तांना हाताशी धरत माजी आमदारांकडून टक्केवारी आणि भ्रष्टाचाराचे आरोप वारंवार होत असताना आयुक्त मनपा नगरसेवक आणि राजकारण्यांच्या राजकारणात शहराचा विकास पुरता भाजला गेला आहे. कोणतीही विकासकामे वेग धरत नसल्याने समाजसेवकाना वारंवार मनपासमोर आंदोलने करावी लागत आहेत. वारंवार राज्यपालांकडे समस्या घेऊन जात विकासकामांसाठी साकडे घालावे लागत आहे. आता शहरात लोकप्रतिनिधी असताना राज्यपाल तरी कुठे कुठे लक्ष घालतील आणि चटकी सरशी शहराचे प्रश्न सुटतील हे आज तरी तमाम मालेगावकरांना सांगता येईल, असे वाटत नाही.

आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांकडे राजकीय मंडळी डोळे लावून बसलेली असताना कोण पुन्हा मनपाच्या माध्यमातून शहराला विकासाचा शृंगार करते हे काळच ठरवेल. मात्र मनपा निवडणुका समोर आलेल्या असताना आरोप-प्रत्यारोप यांच्या फैरी एकमेकांवर झडू लागल्या आहेत.आमदारकी हातातून गेली तरी मनपा ताब्यात यावी, यासाठी राजकीय नेते मोर्चेबांधणी करू लागले आहेत. शहराच्या विकासासाठी कुणाला सत्ता सोपवायची इतकेच काय ते होरपळलेल्या शहरवासीयाच्या हातात आहे, एवढे मात्र निश्चित!



समाजभान
अनिल उदावंत
ज्येष्ठ प्रशिक्षक, समुपदेशक व साहित्यिक
९७६६६६८२९५

# कर्मयोग ही सार्वकालिक गरज



जसं प्रत्येक कुटुंबप्रमुख पुरुषाला वाटतं की मी कष्ट करून कमावतोय म्हणून घरातली माणसं सुखानं जीवन जगत आहेत. तसंच प्रत्येक घरातल्या बाईला वाटतं की मी घरातलं काम करते म्हणून घरातली सगळी माणसं खाऊ-पिऊ शकतात, धुतलेले स्वच्छ कपडे घालू शकतात, किंवा त्यांची हौस-मौज करू शकतात. सर्वजण हे बोलून दाखवतात असं नसलं तरी त्यांच्या मनात हा भाव नेहमीच असतो. आता मुळात हे खरं आहे का? हे तपासून पाहिल्यावर आपल्या लक्षात येतं की हे मूळीच खरं नाही. हा त्या त्या लोकांच्या मनातला निव्वळ गैरसमज आहे! असा गैरसमज मनात बाळगून आपण सगळेजण आपलं आयुष्य जगत असतो.

मेहनतीने उभारलेल्या उद्योगांचा सुवर्णकाळ सुरू झालेला असताना माझ्यानंतर या उद्योगाचं कोण पाहील? कोण ही जबाबदारी घेईल? असा विचार काही कर्तबगार पुरुषांना सतावत असतो. किंवा आपलं या आजारपणात काही बरं वाईट झालं तर माझ्या लेकरांचं कसं होईल? हा विचार काही माय-मावल्यांना छळत असतो. बाळाला जन्म देऊन पुढच्याच क्षणी एखाद्या मातेचं दुर्दैवी निधन होतं. म्हणून त्या बाळाचं जगणं थांबतंय का? एखाद्या घरातल्या चालत्या-बोलत्या कर्त्या पुरुषाचं आकस्मिक निधन होतं. तेव्हा त्या घरातल्या इतर कुटूंबियांचं जगणं थांबतं का? थोडीशी उलथापालथ नक्कीच होते. सुरु असलेलं काम कधी कधी बंदही होतं; पण म्हणून मागे राहिलेल्या लोकांचं जगणंच थांबून जाईल असं काही होत नाही. रामकृष्णही आले गेले, त्याविन जग का ओसचि पडले? या कविवर्य भा. रा. तांबे यांच्या काव्यपंक्ती आपल्याला नेमकं हेच सांगत आहेत.

खरंच दरवेळी आपण किती मोठ्या गैरसमजात रहात असतो? बरं, आपला हा फक्त गैरसमज आहे की आणखी काही? याचा विचार आपण करायला हवा की नकोय?

आपण सगळेच हा गैरसमज बाळगून असतो. आपण आपल्या जीवनाबद्दल प्रचंड अज्ञानी आहोत हे याचं खरं आणि सर्वात महत्वाचं कारण आहे. आपण कोण आहोत? आपलं या जगात येण्याचं नेमकं काय प्रयोजन आहे? किंवा आपल्या जगण्याचा खरा हेतू काय आहे? आपल्या आयुष्यात नेमकी हीच माणसं का आली आहेत? किंवा आपण त्या माणसांच्या आयुष्यात का आलो आहोत? या आणि अशा अनेक प्रश्नांची नेमकी किंवा योग्य उत्तरं आपणास ठाऊक नाहीत. त्यामुळं आपलं आयुष्य अतर्क्य आणि अनिश्चित असं बनून राहातं. अशा वेळी आपणास आपण कोणत्या कारणामुळे या अशा गैरसमजाचे बळी होत आहोत? याचा शोध घ्यावा लागतो.

घरातली माणसं जगावीत यासाठी आपली कमाई सुरु असते. घरातल्या त्या माणसांना एकदा सोडून पहा. कदाचित तुमचं काम जाईल! तुमची कमाई गडगडेल! तुम्ही अधोगतीला जाल! तुम्ही त्यांना खायला प्यायला द्यायचं एकदा बंद करुन पहा. तुम्हाला अन्न मिळणार नाही! मिळालंच तर ते गिळणार नाही! तुमचं आरोग्य बिघडेल. तुम्हाला भूक लागणार नाही किंवा तुमची भूक भागणार नाही! मी असं विचित्र लिहून वाचकांना नेमकं काय सांगू पाहतोय? असा प्रश्न एव्हाना वाचकांच्या मनात उभा राहीला नसेल तरच नवल म्हणायचं.


प्रत्येक माणूस बंद मुठी घेऊन जन्माला येतो. त्याच्या त्या बंद मुठीत त्याच्या जगण्यासाठी लागणारी संपूर्ण सामुग्री असते; पण आपल्या मुठीत नेमकं काय दडलं आहे याची नेमकी माहिती कुणालाच नसते. त्यामुळंच माणसाचं संपूर्ण जीवन अनिश्चित आणि आतार्किक होतं. आपली बुद्धी, कल्पनाशक्ती आणि विचारांच्या जोरावर आपल्या बंद मुठीत नेमकं काय दडलं आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न प्रत्येक माणूस करतो. या प्रयत्नात त्याची अठरा-वीस वर्षे खर्च होतात तेव्हा त्याला आपल्या मुठीतली ताकद कळु लागते. काही माणसांना ही ताकद थोडी लवकर कळते, काहींना ती कळायला उशीर होतो तर काहींना शेवटपर्यंत ती ताकद कळतच नाही. आपल्या मुठीतलं सामर्थ्य हे क्वचितच आपल्या उपयोगाचं आणि गरजेचं असतं. बहुधा ते इतर माणसांच्याच अधिक उपयोगाचं आणि गरजेचं असतं. तुमच्याजवळचं हे सामर्थ्य ज्यांच्या उपयोगाचं आणि गरजेचं आहे त्यांच्यापर्यंत पोहोचवणं जास्त महत्त्वाचं असतं. त्यानं एकमेकांच्या गरजांची पूर्तता होऊन समस्त मानवजातीचं कल्याण होणार असतं. प्रत्येक माणसांचं जगणं आनंदी होणार असतं.

सामर्थ्याची ही देवाण-घेवाण प्रत्येकाला करता यावी म्हणून वेगवेगळी माणसं तुमच्या आमच्या आयुष्यात येत असतात. 'अ' च्या आयुष्यात 'ब' आला किंवा 'ब' च्या आयुष्यात 'अ' आला तर 'अ' ने 'ब' चं देणं द्यायचं आहे किंवा 'ब' ने 'अ' चं देणं द्यायचं आहे. हा देण्या-घेण्याचा व्यवहार पूर्ण होईपर्यंत 'अ' आणि 'ब' हे एकमेकांच्या आयुष्यात येत राहतात. ज्या दिवशी त्यांचा हा व्यवहार पूर्ण होतो त्या दिवसानंतर त्यांच्यातलं नातं संपुष्टात येतं. त्यांचं एकमेकांच्या आयुष्यातलं येणं थांबतं. याचा अर्थ इतकाच होतो की, एकमेकांचं देणं देवून किंवा आपल्या मुठीतल्या सामर्थ्याच्या सहाय्याने एकमेकांच्या गरजा भागवून त्यांना आनंदी करण्यासाठीच आपण या जगात येत असतो किंवा आलो आहोत.

याचा अर्थ असा की तुमच्यामुळे कुणी पोटभर खाऊ-पिऊ शकत असतील किंवा तुम्ही कुणामुळे तरी पोटभर खाऊ-पिऊ शकता! तुम्ही कुणावर उपकार करीत नाहीत किंवा अन्य कुणी तुमच्यावर उपकार करीत नाहीत. ही अपूर्णतेकडून पूर्णतेकडे जाणारी वाटचाल म्हणजेच जीवन जगणं आहे.

संपूर्ण आयुष्यात आपण सर्वजण नेहमी दुसऱ्यांकडून अपेक्षा ठेवतो पण त्या पूर्ण होत नाहीत, कारण या जीवनातला आपला वावर आपल्या स्वतःच्या इच्छा किंवा अपेक्षांच्या पूर्तीसाठी नाहीतर आपल्या आयुष्यात आलेल्या इतरांच्या इच्छा किंवा अपेक्षांच्या पूर्तीसाठीच आहे! आपण इतरांच्या इच्छा, अपेक्षा व गरजा जितक्या चांगल्या रितीने पूर्ण करू शकू तितक्याच चांगल्या रितीने आपल्या स्वतःच्या इच्छा, अपेक्षा व गरजा पूर्ण होणार आहेत. हाच खरा कर्मयोग आहे. हा कर्मयोग सर्वांनी नीट समजून घेणं आणि त्याचा थेट अंगिकार करणं हीच सार्वकालिक अशी मोठी गरज आहे.

---



# किनारे मनाचे



मायमराठी समूह
शीतल कुयटे

जीवनात ज्याला न पाहता त्याचे साक्षीने आपण सर्व स्वप्न रंगवत असतो तो आपला साथीदार, दोस्त, सखा म्हणजे आपलं मन.. मनाला आत सुरू असलेली सर्व वादळे माहीत असतात पण कोणत्या वादळांना बाहेर पडू द्यायचे व कोणत्या वादळांना किनाऱ्यावर थोपवून ठेवायचे हे देखील मनचं ठरवते... मनाचे किनारे यात महत्वाची भूमिका बजावतात.. एखाद्या द्वारपालासारखी...

मनाचे किनारे मानवाचे खरे शुभचिंतक... मनातील जे जे उत्तम आहे ते सर्व जगापर्यंत पोहोचविण्यास मदत करतात.. जे वाईट आहे ते बाहेर येऊ नये याची पुरेपूर काळजी हे किनारे घेत असतात... परंतु या किनाऱ्यावर अविवेकी बुद्धीचा आघात झाल्यास बिचारे त्या खाली दबून जातात... अविवेकी लाटा, वादळे किनारे सोडून येऊन बाहेर सर्व काही उध्वस्त करतात...

मनाच्या किनाऱ्यांना विवेकी बुद्धीची साथ म्हणजेच आयुष्य सुंदर होण्याकडे वाटचाल.. या किनाऱ्यांना आयुष्यभर जपावे... हे किनारे आपले सर्व काही निमुटपणे ऐकून आपल्याला सावरत असतात... प्रत्येकाचे आयुष्य सावरण्यासाठी प्रत्येकाला हवा आहे सुंदर असा एक मनाचा किनारा...

---

# वैचारिक प्रगल्भता... डायरीतील एक पान



वेगळे काही
योगिनी पैठणकर

खूप वेळ विचार करुन हा विषय लिहायला घेतला. वैचारीक प्रगल्भता. विचार म्हणजे चिंतन, अवलोकन, निरीक्षण, निष्कर्ष वगैरे. वाचतांनाच जरा अवघड वाटला, पण म्हटलं माणूस हा विचारशील प्राणी आहे, तेव्हा त्या क्षणाला जो विचार येईल त्या दिशेने लिहीत जायचं. वाचक ठरवतील शेवटी. हे विचार योग्य की अयोग्य ते! खूपदा ऐकलंय विचार बदला, नशीब बदलेल. मी यावरही बराच विचार केला. पण नशीबाच माहीत नाही, प्रगल्भता येईल असं नक्की वाटतंय. ते हि जाऊ देत. दृष्टीकोन बदलला तरी पुष्कळ... खूप लोक मला सांगतात, आत्मचिंतन करा, बोलण्यापूर्वी विचार करा, विचारांना योग्य दिशा द्या.

थोडक्यात मानसशास्त्रीय नियमानुसार ग्लास अर्धा भरलाय हे लक्षात ठेवा. माझे विचार माझ्या लेखनात, कवितेत, डायरीत मांडले असतात कित्येकांना आवडतात, कित्येकांना नसतीलही. आपले विचार आपणच ठरवतो कदाचित पूर्वानुभवानुसार किंवा समोर तसे अनुभव आलेले असतील म्हणूनच ना? फक्त विचारांना चालना देण्याचं काम बुद्धी करते तेव्हा सद्सद्विवेक बुद्धी असावी. आपलं मत, आपले विचार सेवुप सारखे झालेले असतात. एकावर दूसरा थर साचत जातो. खाली अडगळ तशीच रहाते. विचारांची पण रद्दी जमते ती वेळच्या वेळी नष्ट करायला हवी. जाळच ते.

कोण कुणाला कधी हा चांगला विचार करतो अशी तक्रार कधीच देत नाही. पण मी बऱ्याच साहित्यिक, लेखक, रिपोर्टर यांच्या वैचारिक प्रगल्भतेविषयी निश्चित सांगू शकते. आपण त्या प्रसंगाला, परिस्थितीला, माणसाला कसं समजून घेतो हे आपले विचारच ठरवतात. निसर्ग नियमानुसार व अनुभवानुसार त्यात तार्किक विचारांची बैठक असते. चांगल्या विचारांना इतरही लोक खतपाणी घालतात. मग ते एकाचे असो या समुदायाचे. लॉकडाऊनमध्ये मी जमेल तेवढ्या गरिबांना मदत केली कदाचित हा चांगल्या विचारांचाच फायदा असेल. थोडं अध्यात्मिक बळ. परिपक्वता व पॉझिटिव्हनेस असावा. चांगले विचार, चांगल्या वाचनातून, कृतीतूनच येतात. इ. तिसरीत श्यामच्या आईने ते संस्कार मनावर रुजवलेत. बिंबवलेत. आजही मन खोटं बोलायला कचरतच.

तसंच अजून एक. सध्या मी अति विचार करू लागलीये असं वाटतंय. घरात, दवाखान्यात, मैत्रिणींत सगळे म्हणतात. शांत रहा, जे होईल ते व्हायचच आहे. नको विचार करू.

तसंच लिखाणाचही. माझी मातृभाषा मराठी, सगळं लेखन शिक्षण मराठीतच झालेलं. तरी पण बोलण्यात, लिखाणात जरा इंग्रजीची कचकच येतेच. मग काही मित्र, वाचक, ओळखीचे सल्ला देतात, मराठीत विचार करुन लिही. तर ते अजून छान वाटेल. बघते प्रयत्न करते. निदान तसा विचार करायला काय हरकत आहे?

आपले विचार सकारात्मक, आनंदी असतील, प्रगतीसाठी असतील तर आपण समोरही ते वातावरण निर्माण करू शकतो. चांगले विचार bounce होऊन परत आपल्याकडेच येतात. जीवनात या विचारांनी माणूस यशस्वी होतो. प्रगती करतो. आनंदी रहातो.

सगळ्यात महत्वाचे विचार व कृती. नाण्याच्या दोन बाजू. खूपदा येतो मनात वाईट विचार, भय, चिंता, राग, मत्सर, विरह, वेदना सगळंच येतं. पण एकेक बाजूला करुन सत्याची कास धरली तर जीवन आनंददायी होतं व हीच विचारांची प्रगल्भता आहे

थोडक्यात काय प्रतिक्रिया किंवा कुठलाही चांगला प्रतिसाद, कृती करण्यासाठी छोट्या-मोठ्या कामाचं कौतुक व चुका दाखवण्यासाठीही वैचारीक धाडस, पाठिंबा व मनोबल लागतेच लागते.



---

# इच्छाशक्ती



संस्कार
नेहा कुलकर्णी -जोशी

आपण जेव्हा एखाद्या कार्यक्रमाला जातो. उदाहरणार्थ एखाद्या संगीताचा कार्यक्रम असेल तुम्ही निरीक्षण केले असेल एक गोष्ट तुमच्या लक्षात आली असेल की, तबला हा इतर वाद्यांपेक्षा बाजूला असणारे वाद्य आहे. म्हणजे इतर वाद्यांच्या साथीचे वाद्य आहे. परंतु, जसजसे तबल्याचे सुर वाचायला लागतात त्या सुराने श्रोते मंत्रमुग्ध होतात.

आपल्या स्वतःमध्ये असणारी इच्छाशक्ती ही या तबल्यासारखी आहे. आपल्या आयुष्याच्या मंचावर ती बाजूला असते. पण तिच्यात प्रचंड ताकद असते.

इच्छाशक्ती हे आपल्याभोवती असणारे भक्कम सुरक्षा कवच आहे.

इच्छाशक्ती भरपूर आहे म्हणून त्याचा कसाही वापर केला असे नाही होऊ शकत. त्याचा योग्य पद्धतीने आणि शहाणपणाने वापर केला पाहिजे.

उदाहरणार्थ तुम्ही ठरवलं की उद्यापासून मला लवकर उठायचे आहे उठण्याची कारण वेगवेगळी असू शकतात. तर आदल्या रात्री उशिरापर्यंत न जागण्याचा विचार करणं इथे तुम्ही इच्छाशक्तीचा वापर करू शकता.

पण माझ्यात प्रचंड इच्छाशक्ती आहे म्हणून आदल्या रात्री कितीही उशिरा झोपलो तरी इच्छाशक्ती मला उठवेल असे होत नाही.

इच्छाशक्ती तुम्हाला कुठे सहाय्य करेल, तर दुसऱ्या दिवशी लवकर उठायचे या दृष्टीने आदल्या रात्री लवकर वेळेत झोपण्यासाठी सहाय्य करेल . म्हणजेच काय तर तिचा योग्य प्रकारे वापर होणे महत्त्वाचे आहे. त्याचप्रमाणे एखाद्या गोष्टीची सुरुवात होण्यासाठी तुम्ही इच्छाशक्तीचा उपयोग करू शकता. तिचं काम खरंतर तिथेच संपलं पाहिजे. तुम्ही जर स्वतः ला त्या कामावर झुकून दिलं तरच यश मिळणार आहे.परंतु त्या कामासाठी कराव्या लागणाऱ्या गोष्टींचा पर्याय म्हणून इच्छाशक्ती असू शकत नाही.

तुमच्या स्वतःच शस्त्र हे तुमच्या स्वतःमध्येच आहे. ते तुमच्या पासून कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. तसेच आपल्या मध्ये असणाऱ्या इच्छाशक्तीचा वापर कसा करायचा किंवा त्याचे काही नियम नाहीत. आपला जन्म झाल्यापासून आपल्या भोवती एक कम्फर्ट झोन आपण स्वतःच तयार करीत असतो. स्वतःच्या कम्फर्ट झोन मध्येच माणसाला राहायला आवडते.

पण मोठे होण्यासाठी आणि आयुष्यात यशस्वी होण्यासाठी कधीतरी यातून बाहेर पडणं गरजेचं असतं. त्यावेळी तुमची इच्छा शक्ती हाच सर्वात शक्तिशाली तुमचा आधार असला पाहिजे. आणि तो असतोच. म्हणून स्वतःच्या इच्छाशक्तीचा योग्य प्रकारे वापर करा आणि स्वतःच आयुष्य स्वतःच्या हाताने यशस्वीरित्या बनवा आयुष्यात अवघड असं काहीच नसतं. केलं तर सगळं शक्य आहे.केलं तर सगळं सोपं आहे.



---

## शब्दकोडे

मित्रांनो,

जीवनात कधी कोणती वेळ येईल ते सांगता येत नाही, अशा वेळी नको त्या गोष्टीला महत्त्व द्यावे लागते. अडचणी सांगून येत नाहीत,पण आल्या तर कधी कधी नको त्या व्यक्तीच्या पाया पडावे लागते. ज्याला कोणी किंमत देत नाही अशा मुर्ख माणसाच्या पुढे पुढे करावे लागते. याच अर्थाची म्हण - अडला हरी गाढवाचे पाय धरी. हे शब्द कोडे ५१ चे उत्तर होते.

### आजचे कोडे क्र. ५२

१ ते १० - अक्षरांत एक म्हण लपली आहे
१,२ - या अक्षरात ईश्वर, प्रभु आहे
३,४ - या अक्षरांत वाचवणारा, तारणहार
५, ६ - या अक्षरात एक सर्वनाम आहे,
७, ८- या अक्षरांत कोनाडा, कोपरा आहे, प्रश्नार्थक व्यक्ती
९,१० - या अक्षरांत एका बिस्कीट कंपनीचे नाव
७,१०- या अक्षरांत स्वच्छ, करकरीत असा बोध होतो
१,४ - या अक्षरात हिंदी उशीर, विलंब आहे
९,६- या अक्षरांत हिंदी हार, माळा आहे
२,१० - या अक्षरांत एक धान्य आहे
३, ६ - या अक्षरांत हिंदी कुलुप, टाळा आहे

- प्रशांत वाघ

(उत्तर पुढील अंकात)

---

## गांवकरी काव्यांगण

### प्रतिकार

आतंक हा भयंकर
जंतू जसा क्षयाचा
नापाक पाक देशा
उद्‌भव तुझ्यात त्याचा

क्षयग्रस्त पाक देशा
खोकू नको असा रे
मम देश हा निरोगी
संसर्ग का तुझा रे

शिरतात रोगजंतू
शरिरात आमच्या का
का भ्याड भामटे हे
देतात नित्य धोका

येते पिडा जरी ही
मम देश पोखराया
पण ही अभेद्य माझी
बलदंड भीम-काया

प्रतिकार-सज्ज पेशी
दिन-रात जागती या
जंतू असो कसाही
ठेचून मारती या

संसर्गजन्य ऐशा
साथी अनेक आल्या
या तेजपुंज देही
निष्प्रभ ठरून गेल्या

मम देश हा चिरायू
त्याला कुणी न मारी
अवतार हा स्वयंभू
साक्षात चक्रधारी

-काशीनाथ महाजन
९८६०३४३०१९





### आपलं प्रेम

प्रेम आपलं जसं,
धरतीच गगना वरी
न भेटताही मिळणार
क्षितिजासम !!!

प्रेम आपलं जसं,
दूरवर अवकाशातील
चंद्र-चांदणींच
शीतल प्रकाशासम!!!

प्रेम आपलं जसं,
उन्हात बरसात
मनमोहक सप्तरंगी
इंद्रधनुष्यासम!!!

प्रेम आपलं जसं,
डोळ्यात आनंदाअश्रुंच
सुख-समाधान एकच
असण्याची अनुभूतीसम!

- श्रध्दा जाधव-बोरसे

### सुखासाठी स्वतःच्या

सुखासाठी स्वतःच्या
डावपेच का आखता
दुसऱ्यांच्या जीवनात
विष किती कालवता

सुखासाठी स्वतःच्या
फसवणूक कशाला
नावं का हो ठेवता
दुसऱ्यांच्या चारित्र्याला

आनंदाला स्वतःच्या
किती महत्त्व देतात
दुसऱ्यांच्या जीवनात
दुःख खुशाल पेरतात

आनंदाने जगण्यासाठी
मरमर किती करता
दुसऱ्यांचे सुख हिरावून
कुत्सितपणे हसता

सुखासाठी स्वतःच्या
चारित्र्य गहाण ठेवता
प्रामाणिक लोकांच्या
चारित्र्यावर संशय घेता

कष्टाच्या कमाईवर
पोटाची खळगी भरते
कष्टाच्या घामाने
सुखाची झोप लागते

लुबाडून दुसऱ्यांना
खरे सुख लाभत नाही
बोटावरचा थुका बदलून
खरा आनंद मिळत नाही

- बबन गुळवे
९५४५४४२६४८.



## सापेक्ष

वासवदत्ता अग्निहोत्री



# तमसो मा ज्योतिर्गमय

प्रकाशाचे महत्वपूर्ण आणि प्रमुख स्रोत सूर्य आहे. पण रोज जेव्हा भास्कर अस्त होतो त्यावेळेस प्रकाशाची कमतरता भासते. फार पूर्वी अग्नि ह्या रात्रीच्या अंधारात प्रज्वलित करून तम दूर करण्यात मानव यशस्वी झाला होता पण अग्नि सोबत अनेक अडचणी ही उद्भवल्या. अग्नि एका स्थानावरून दुसरीकडे ,प्रज्वलित स्वरुपात नेणे अवघड काम होते. दुसरे रात्री एका स्थानावरुन दुसरीकडे जाताना रस्त्यात उजेड मिळत नव्हता. पशू चरबी वापरून मशाल तयार झाल्यावर हा सोपा आणि सोयिस्कर उपाय सापडला. घरात अग्नि प्रज्वलित ठेवण्यास, तितके सरपण असले पाहिजे, त्यापासून होणारा धूर निवासस्थानातून बाहेर निघण्याची सोय असली पाहिजे. तिसरे त्या प्रज्वलित अग्नि ची विशेष काळजी घ्यावी लागत होती. मग तो अग्नि एका कुंडात ठेवून त्यापासून प्रकाश मिळवण्याचा मार्ग शोधला गेला. पण त्यातही अडचण आली असावी कारण कुंड सातत्याने पेटलेले ठेवणे, त्यात वेळेशीर सरपण टाकणे,लाकूड जाळून कोळसा मिळवणे, योग्य वेळेत त्याची राख स्वच्छ करणे हा एक मेहनतीचा कार्यभाग होता. पशू चरबी किंवा तेलाचा वापर सुरू झाल्यानंतर, तेल एका पात्रात भरून, त्याला मोठी वात टाकून प्रथम दिवा तयार झाला असावा. त्यानंतर घरोघरी हा सोयीस्कर दिवा वापरायला सुरुवात झाली असावी. रात्रीच्या अंधारात दिव्याची वात तेलात बुडू नये म्हणून थोडा बुद्धीचा वापर करून माणसाने वातीला कशात तरी अडकवले असेल मग त्याला वाऱ्याने विझूनये म्हणून आडोसा केला असेल. काचेचा आविष्कार झाल्यानंतर, काचेचा आडोसा, दिव्याला जास्त उपयोगी वाटला असेल कारण पारदर्शक किंवा पारभासी काच देखील दिव्याच्या प्रकाशाला जवळपास पसरवू शकत होता.त्यानंतर कंदील हा प्रकार अस्तित्वात आला असेल.मानव विकसित झालेला बघून आज खूप छान वाटते पण त्या काळापासून आजतागायत विकासासाठी त्याची धडपड किती कौतुकास्पद होती.

दिवस आणि रात्र ह्या क्रमात, कार्यभाग उरकणे किंवा क्रियाशील होणे आणि निद्रा किंवा आराम करणे ह्या वेळा माणसानेच निर्धारित केल्या. नैसर्गिक रित्या त्याला रात्रीच्या अंधारात आपले अभिप्रेत कार्य करण्यास निश्चितच खूप खूप असुविधा होत असणार. अग्नि प्रज्वलित मशाल सोबत घेऊन तो आपला मार्ग आक्रमत असेल पण त्यानंतर त्याच्या देहाला आराम हा मिळत नव्हता आणि म्हणूनच त्याने रात्र ही झोपण्यासाठी निर्धारित केली असेल.

आज ही आपण तेव्हा तयार केलेली ही दैनंदिनी पाळतो. वीज कशी हाताळावी हे कळाल्यानंतर, थॉमस एडिसन ने पहिल्या विजेच्या बल्ब चा १८७९ मधे आविष्कार केला आणि मग कृत्रिम किंवा आधुनिक प्रकाश व्यवस्थेला गति मिळाली. बल्ब सोबतच ट्यूब लाईट पासून अनेक पद्धतीचे दिवे आविष्कृत झाले. विजेचा शोध लागल्यानंतर ह्या प्रकाश व्यवसायाचे औद्योगिक रुपांतरण झाले. आता कृत्रिम उजेड हा आपल्या जगण्याचा एक अत्यावश्यक भाग झाला आहे.

प्रकाशाची गति किंवा वेग किती असेल? जेव्हा संशोधकांचे लक्ष गेले तेव्हा ह्या प्रकाशाच्या गतिची आखणी करण्यात आली. १६७६ मधे डेनिस संशोधक, खगोलशास्त्री 'ओले रोमर 'ह्याने प्रकाशाची गति मापायचा प्रयत्न केला. त्याच्या गणनेनुसार प्रकाश गति २१०,००० कि.मी. /सेकंद आहे. पण त्याचबरोबर वर्तमान प्रकाश गति गणना ३००,००० कि. मी. / सेकंद आहे. आधुनिक, विकसित यंत्राद्वारे ही गणना बरीच बरोबर आहे हे सिद्ध होत आहे. प्रकाश हा ज्या कुठल्याही माध्यमातून प्रवास करतो त्या प्रमाणात त्याच्या गतीत अंतर पडते. घनत्व प्रकाशाच्या गतिला प्रभावित करते. हिरा (डायमंड)ह्याचे घनत्व खूप जास्त असल्याने, त्यातून प्रकाश फारच कमी वेगात गति करतो आणि म्हणूनच हिरा खूप चकाकतो. सूर्यापासून पृथ्वीवर प्रकाश येण्यास सुमारे ८:०३ मिनिटे लागतात. प्रकाशाला मापपण्याचे सूत्र 'प्रकाश वर्ष 'असे असते. समुद्रात दूरवर जहाज आणि नाविकांसाठी, पाण्यात 'दीपस्तंभ 'उभारण्यात येतात. रात्री अंधारात, लहान मोठे जहाज, समुद्रात वाट चुकू नयेत,मोठे पाषाण वगैरे वर जहाज आपटून अपघात होऊ नये, म्हणून हे दीपस्तंभ ' लावलेले असतात. हे पूर्वी अग्नि प्रज्वलित करुन प्रकाशित करण्यात येत होते आता नव्याने निघालेल्या अनेक पद्धतीत हे दीपस्तंभ प्रकाशित ठेवण्यात येतात. आजकाल ह्या दीपस्तंभांचा उपयोग कमी होतो कारण जहाज इत्यादी जवळ जी. पी. एस. वगैरे आधुनिक टेक्निक असल्याने, मार्गदर्शकांवरून आपला मार्ग व्यवस्थित शोधून घेतात.

अंतराळात अंधारच असतो. आपले सौरमंडळ सूर्याभोवती आणि सूर्याच्या आकर्षणात असल्याने आपल्याला हे प्रकाशाचे वरदान मिळाले आहे. पृथ्वीवर देखील सहा महीने दिवस आणि सहा महीने रात्र असणारी ठिकाणं आहेत.

उत्तर ध्रुव आणि दक्षिण ध्रुव, अंटार्कटिका येथे, सूर्याच्या परिभ्रमणा मुळे सहा महीने सूर्य दिसतो आणि सहा महीने सूर्याचे दर्शन होत नाही पण तिथल्या रहिवाश्यांनी आपली दैनंदिनी तशीच आखली आहे. चोवीस तासातून किती तास काम करायचे आणि केव्हा काम बंद करून आराम करायचा हे त्यांनी आपल्या पद्धतीने निर्धारित केले आहे त्यामुळे तिथले लोक ह्या खगोलीय प्रक्रियेचे अभ्यासी आहेत.

मातेच्या गर्भात अंधारच असतो. बाळाचा प्रथम परिचय अंधाराशीच होतो म्हणून तो बाहेर आल्यावर प्रकाशाला घाबरून रडतो.

अंधारातून उजेडाकडे हा प्रवास खूप रोचक आहे पण माणसाच्या आयुष्यात अंधाराचे एक निराळे महत्त्व असते. जसा प्रकाश माणसांकरता आवश्यक आहे तसेच अंधार ही तितकाच गरजेचा आहे. किंबहुना अंधार असल्यानेच प्रकाशाचे महत्त्व जाणवते. निसर्गाच्या ह्या अंधार उजेडाच्या खेळात माणूस आपसूकच रमला आहे. आपली रोजनिशी त्याने तशीच आखली आहे.पण त्याच्यात अंधार जास्त आहे. अज्ञानाचा, औदासीन्याचा, असफलतेचा, चुकीच्या परिणामांचा, अभिप्रेत न मिळण्याचा, दोषारोप झाल्याचा, किंकर्तव्यमूढतेचा असे बरेच अंधार माणसाच्या अंतर्मनात असतात. त्यांना तो प्रयत्नपूर्वक दूर करत असतो. अनेकवार तो सर्व अंधार दूर करतो पण बरेच अंधार दूर होण्यास, बराच वेळ घेतात. आपल्या जन्मदात्यांना अंधारात ठेवून, मुलं मुली काही गोपनीय गोष्टीत अडकतात आणि मग लवकरच त्याची फळं भोगतात. कुण्या एका उच्चशिक्षित माणसाने म्हटले होते कि जे अंधारात होते ते पाप असते..... हे म्हणणे अनेकांनी खोडून काढले. पण पाप करणारे उजेड किंवा अंधार ह्याची कधीच पर्वा करत नाहीत. पाप, अंधार देखील लपवू शकत नाही. माणसाला उजेडात रहाणे आवडते. त्यासाठी तो बराच पैसा खर्च करतो. उजेड आणि तो ही आकर्षक असेल तर त्या ठिकाणाची शोभा द्विगुणित होते. आपल्या देशात प्रकाश पर्व साजरे होतात. सर्वच धर्मात आपल्या इष्टदेवते समोर दीप प्रज्वलन करण्याची परंपरा आहे. कार्यारंभ करण्यास दीप प्रज्वलित करतात. अर्थातच प्रकाशाची आपल्याला किती गरज असते हे फक्त चहूकडे पाहूनच लक्षात येते.

**असतो मा सद्गमय,**
**तमसो मा ज्योतिर्गमय.**
**मृत्योर्मा अमृतं गमय**

मुनिवत्सल स्वामींचा हा श्लोक आजही माणसाचे किती मोठे मार्गदर्शन करतो.



## सहजच

मनीषा चौधरी



# नियोजन

फोन दुरुस्तीच्या दुकानात घडलेला हा प्रसंग, एक महिला आपला दुरुस्तीला दिलेला फोन घेण्यासाठी आलेल्या. फोनचा डिस्प्ले तुटल्याने दुरुस्तीसाठी दिलेला फोन घेताना, आलेला खर्च ऐकून महिलेने दुकानदारासोबत युक्तिवाद सुरु केला. दुकानदार सर्वतोपरी समजावून सांगत होता. पण महिलेचा युक्तिवाद होता,कि तिची लहान मुलगी, जी बालगटात आहे, तीला राग आला की ती फोन रागात फेकून देते. शाळेतून घरी आल्यानंतर फोन हातात घेऊन बसल्याशिवाय ती काही खातही नाही. यापूर्वी ही छोट्या मुलीने अनेकदा रागात तो फोन फेकल्यामुळे त्याच्या दुरुस्तीसाठी अनेकदा मोठा खर्च करावा लागला होता. आणी यापुढेही मुलगी फोन फेकू शकते, म्हणून दुकानदाराने दुरुस्तीचा खर्च कमी करावा यासाठी ती महिला हुज्जत घालत होती. दुकानदार बिचारा यावर काय बोलणार? हा सगळा विसंवाद हास्यास्पदच होता. कारण फोन दुरुस्तीसाठी वारंवार होणारा खर्च वाचविण्याचा सर्वात सोपा मार्ग होता, तो म्हणजे त्या महिलेने आपल्या मुलीच्या हातात फोन न देणे. मुलीची फोनची सवय कमी करणे.

पण होतय काय की, फोनमध्ये गुंतलेल्या पालकांना बघून मुलं तरी दुसरे काय शिकणार! लहान मुलं हे अनुकरण प्रिय असतात. आई वडिल सतत ज्या फोनला बघण्यात मग्न असतात, त्यात नेमके आहे तरी काय, याची उत्सुकता लहान मुलांना असणारचं. शिवाय रागात जर आपले मुलं फोन सारखी महागडी वस्तु सहज फेकून देतयं, तर ही सवय त्या बालकाचे भविष्य चुकीच्या सवयींच्या अंधारात घेऊन जाईल. ही जाणीव पालकांना होत नसेल तर ही केवढी गंभीर बाब आहे.

आपल्या मुलांना जगातील सर्व सुखं मिळावी यासाठी प्रत्येक पालक धडपडत असतो. धावत्या वेगवान जगात आपले मुलं मागे राहून जाऊ नये यासाठी त्याला सपोर्ट करणे, प्रोत्साहन देणे ही नक्कीच चांगली गोष्ट आहे.पण चांगल्या वाईट सवयींची वेळीच जाणीव करुन देणे,चांगल्या सवयी रुजविणे हे ही तितकेच महत्वाचे आहे. मुलांचे लाड आणी कौतुक कुठल्या गोष्टी साठी करावं, याची योग्य माहीती पालकांना असली तर मुलांच्या चुकीचे समर्थन केले जाणार नाही.

आता सर्वच शाळांना सुट्या सुरु होत आहेत. फार मोठा रिकामा वेळ मुलांना मिळणार आहे. तेव्हा त्यांच्या या वेळेचे नियोजन ही योग्य रितीने केले तर चुकीच्या सवयी रुजण्यापूर्वीच आपण मुलांचे बालपण वाचवू शकतो. जरी मुलांना सुट्ट्या असल्या तरी पालकांना नसतात, त्यामुळेही पुरेसा वेळ देता न येणे ही एक मोठी समस्या पालकांसमोर असते. आणि सुट्टीच्या कालावधीत घरात मुलांना सांभाळणे ही गोष्ट ही पालकांना तापदायक वाटते. त्यातूनही योग्य नियोजन मुलांचा वर्तमान आणी भविष्य सुरक्षित करु शकते.

मुलांसाठी छंद वर्गाचा पर्याय सहज निवडला जातो. एका शाळेतून दुसऱ्या शाळेत मुलांना डांबल्यासारखा हा प्रकार व्हायला नको. नाहीतर सुट्टीचा आनंद ही मुलांना घेता येत नाही. मोठमोठ्या सहलींना मुलांना नेवून त्यांना खरंच आनंद मिळतो का? याचाही विचार पालकांनी करावा. कधीतरी फक्त आपल्या आवडीनिवडी मुलांवर लादल्या जातात. अशाने मग मुलांची चिडचिड होते. तेव्हा अशा नियोजनात घरातील लहानग्यांचा विचार आवर्जून करावा.

घरातील लहान मोठ्या कामांची वयानुरुप जबाबदारी मुलांवर सोपवली तर नक्कीच आनंदाने मुलं तयार होते.

पालक तासंतास टि.व्ही मोबाईलमधे गुंतलेले असतीन तर घरात सगळे एकत्र असूनही मूलं एकटं पडत. आणी मग ते ही आपला वेगळा मार्ग शोधून त्यात रमण्याचा प्रयत्न करते.आणी मग ते ही कुणाचेच ऐकून घेईनासे होते. कधीकधी एकटे पणामुळे मुलं चिडचिडे होते.

घरातील सर्वांचे लक्ष वेधून घेण्यासाठी मग आदळआपट करणे, नुकसान करणे, किंवा ज्या गोष्टी करण्यास मनाई केली जाते, त्याच गोष्टी मुद्दाम करतात.

अशावेळी सुट्टीत पालकांनी मुलांसाठी आवर्जून, ठरवून वेळ काढून काही गोष्टी करायलाच हव्यात.

१) घरातील सर्व जबाबदारी मधे घरातील मुलांचा सहभाग घ्यावा. २) किमान एक वेळचे जेवण घरातील सर्वांनी एकत्रित करावे. ३) मुलांना मोकळेपणानं बोलू द्यावे, त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेण्याची सवय स्वतःला लावावी. ४)वयाचा एक टप्पा असतो, जेव्हा मुलांना आई वडिलांना सगळ काही सांगायचे असते. म्हणून मोठ्यांनी आपल्या समस्यांचा बाऊ न करता मुलांचे म्हणने ऐकून घ्यावे. वेळीच त्यांना योग्य मार्गदर्शन करावे. ४) दिवसभरात किमान एखादी गोष्ट किंवा माहिती पुस्तकातून वाचण्याची सवय लावावी. त्यासाठी पालकांनी स्वतः वेळ द्यावा. ५) मोकळ्या हवेत फिरणे, छोटे सोपे व्यायाम करणे अशा गोष्टी मुलांना सोबत घेऊन कराव्या. ६) मुलांच्या आवडीनुसार त्यांना थकवा न आणणारी छोटी सहल आयोजीत करावी. ७) मुलांना मोकळ्या मैदानात मोकळे पणाने खेळू द्यावे. ८) खूप नियमांच्या बंधनात मुलांना न ठेवता स्वच्छंदीपणे वावरु द्यावे. ९) मुलांनी केलेल्या चांगल्या गोष्टींचे कौतुक करावे. १०) त्यांच्या आवडीच्या कला, छंद जोपासण्यात मुलांना मदत करावी. ११) त्यांचा उन्हाळी सुट्टीतील अभ्यास सोडविण्यासाठी त्यांना हवे तेथे सहकार्य करावे. १२)पाठांतराची सवय , विचार पूर्वक कृती करणे, उत्तर शोधणे अशा सवयींसाठी त्यांना विविध शब्दकोडी, बौद्धिक खेळ खेळण्यास प्रोत्साहीत करावे. १३) गॅजेट वापरण्यासाठीचे वेळेचे बंधन हे अगदी प्रेमळपणाने रुजवावे. पालकांनीच चिडचिड न करता शांतपणे जबाबदारीने पालकत्व निभावले तर मुलं ही चिडचिड न करता, समजदारीने वागू शकते. आणि सुट्टी आनंदात घालवू शकते.

# जीवन आणि विराम चिन्हे

कसंय जीवनाची प्रत्येक टप्याची सुरूवात एक विरामचिन्हा सारखीच असते. जसे की एखादी नविन योजना सुरू करणे अथवा नविन संबंध जोडणे, करिअर मधे बदल करणे वगैरे. आपल्या जीवनात अनेक प्रश्न ही उद्भवत असतात!

जे आपल्याला विचार करायला भाग पाडतात, तर (?) प्रश्न चिन्ह हे त्या विचारांना दर्शवित असते. असे तुम्हाला नाही का पटत?

तर आयुष्यात आलेले आनंद, दुःख किंवा आश्चर्य चकीत होणारे क्षण आपण ऊद्गारवाचक म्हणजेच (!)आपण दर्शवीत असतोच ना !

अनेक टप्यांवर किंवा काही तरी पुर्ण झाल्यावर आपण पुर्णविराम (.) लावतोच की.

आपल्या या जीवन प्रवासात आपल्या सोबत अनेक जण आपल्या सोबत असतात,पण काहींना आपण, काळानुरूप, गरजेनुसार स्वल्पविरामा द्वारे (,) अर्धविराम द्वारे (;) वेगळे ही करत असतोच की !

तसे पाहू जाता,आपले जीवन व विरामचिन्हे हे एकमेकांशी जोडलेली तर आहेतच आणि म्हणूनच कवी कल्पनेने असे म्हणावेसे वाटतेः



काही तुमची
काही माझी
आयुष्याच्या
लेखामधली
विरामचिन्हे.
जिथे न सुचले
शब्द समर्पक
अथवा होते
रुतले, फसले.
जिथे मनाचे
विचारचक्रच..
तिथे मांडली
आहे काही
आयुष्याच्या
लेखामधली
विरामचिन्हे
अवखळ, अल्लड
हळवी, कातर
उदासीन वा
अनवट, अवघड
फक्त निरर्थक
असती काही
आयुष्याच्या
लेखामधली
विरामचिन्हे....
विरामचिन्हे
वगळुन बघता
आयुष्याला
व्यापुन उरते
अर्थहीनता
आणि व्यर्थता
तेव्हा मग मी
पुन्हा एकदा
पेरत बसतो
मीच जी कधी
अभावितपणे
वेचली जरा..
आणि लपवली
होती काही
आयुष्याच्या
लेखामधली
विरामचिन्हे..
विराम चिन्हे..

**- अनिल देशपांडे**



## शब्द फुलोरा

वैशाली जाधव-शिंदे
९३७११८५७९१



# जगणं अजून बाकी आहे!

सोनू आणि तिचे आईवडील किसनराव व गिरीजाबाई हे आपल्या दोन एकर पण कोरडवाहु शेतावर पडक्या भिंतीच्या, ऊसाच्या पाचाडाचे छत असलेल्या घरात राहायचे. आईवडील अशिक्षित पण चतुर होते. आपल्या एकुलत्या एक लाडक्या लेकीने खुप शिकावं, शिकून सवरून आपले गरीबीचे दिवस संपवावे म्हणून दिनरात कष्ट करायचे, वडील व गिरीजाबाईलाही वाटायचे आमची मेहनत फळाला येईल.

सोनू पायपीट करत रोज मैलभर दूर असलेल्या गावच्या शाळेत जायची. मन लावुन अभ्यास करायची, कष्टकरी आईवडीलांची फरफट तिला रोजच दिसायची. रोज काही बाही खाऊन मिळालेल्या चतकोर भाकरीत त्यांचा संसार तिला डोळ्यासमोरून तरळून जायचा. सोनू दिवसेंदिवस आपल्या अभ्यासात चमकू लागली. हुशार विद्यार्थ्यांमध्ये तिची गणना होऊ लागली. समझदार व हुशार, चतुर, चाणाक्ष सोनू मित्र मैत्रिणींमध्ये, शाळेतील बाई व गुरूजींची पण लाडकी झाली.

दिवसामागून दिवस जात होते. इयत्ता दहावीच्या वार्षिक परीक्षेचा निकाल लागला सोनू पहिल्या क्रमांकाने पास झाली. आईवडिलांचा आनंद गगनात मावेनासा झाला. आपण सोनूला आता पुढच्या शिक्षणासाठी तालुक्याच्या गावी पाठवावे असे मनोमन किसनरावांनी ठरवले. पण गिरीजाबाई मात्र आपल्या पोटच्या गोळ्याला दूर पाठवायला तयार नव्हती. तिला वाटायचे, शहाणी सुरती माझी पोर एकटीने कुठं पाठवू? होस्टेलवर ठेवायला तेवढी पुंजी नव्हती त्यांच्याकडे.

मग काय करणार, कुणी पैसे द्यायला तयार होईना, बँकेत जावून विचारपुस केली तर कोरडवाहू जमिनीवर पुरेसे कर्ज मिळेना. काय करावे, नाईलाजाने किसनराव गावच्या सावकाराकडे गेले, सर्व हकिकत सांगितली व मला लेकीच्या शिक्षणासाठी थोडे पैसे हवेय असं विनवू लागले, सावकाराची नजर किसनरावाच्या पोटच्या गोळ्यावर व जमिनीच्या तुकड्यावर पडली.

सावकाराचा दुष्ट हेतू न समजणारे किसनराव नव्हते, पण काय गरजवंताला अक्कल नसते! कोऱ्या कागदावर अंगठा ठेवून कर्ज घेऊन किसनराव घरी आले. पैश्यांची तजबीज कशी केलीय हे गिरीजाबाईला न कळण्यासारखी ती काही दुधखुळी नव्हती, नवऱ्याला वाईट वाटू नये म्हणून ती पटकन आत गेली, डोळे पुसले, व लेकीच्या जाण्याची तयारी करू लागली.

दुसऱ्या दिवशी भल्या पहाटे उठून किसनराव एसटीने लेकीला सोडवायला निघाले. इकडे गिरीजाबाई रडून रडून हैराण झाली. कितीही केले तरी पोटची लेक दूर जाणार याच कल्पनेनं तिला कापरं भरायचं, पण तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी दोघांनी हा निर्णय घेतला होता.

किसनरावांना आता एकच ध्यास लागला होता, गावच्या सावकाराकडं गहाण पडलेली जमीन सोडवायची कशी? दिनरात दोघे शेतात राबू लागले, अंगमेहनतीने दोघांचीही हाडे दिसू लागली, सापळाच काय तेवढा बाकी शरीराचा! शेतीची मशागत सुरू झाली, नांगरणी, वखरणी करून शेत तयार झाले, पण वरूणराजाचे काही चिन्हं दिसेनात, गावच्या गावं दुष्काळाच्या झळा सोसू लागले. पाण्याचा थेंब कुठंही नाही, मात्र डोळ्याचा थेंब कधी तुटलाच नाही. किसनराव सारखे चिंतामग्न असत, आता काय करायचे?कसे करायचे? कुठे जायचे? की, जीवन संपवायचे!

नाही नाही त्या विचारांचं काहूर माजायचं, पण डोळ्यापुढं लेक व पत्नी दिसायची. कित्येक वेळा अंधाऱ्या खोलीत अश्रुंना वाट मोकळी करू दिली. सगळी सोंगे करता येतात पण, पैसे !जमवायचे कसे ? पाणी पाऊस नाही, उसनं आवसान आणता येत नाही काही. रोज, निरभ्र ढगाकडं वाट, पावसाकडं वाट पाहून सारे शिणले पण पावसाचं काही चिन्हं दिसेना!

दावणीचा लाडका एक बैलही चारा पाण्यावाचून कसायाच्या दारी बांधला, विचाराचं थैमान सुरू झाले, की किसनराव सारखे येरझारे मारत.

गिरीजाबाई तर धन्याच्या अशा वागण्यानं कासावीस होत असे. पण करणार तरी काय? काही पर्यायच नव्हता. दोन दिवसांनी लेकीला भेटून किसनराव रात्री घरी आले, आता ते अधिकच बेचैन दिसू लागले. पावसाचं चिन्ह नाही, पैसाअडका नाही, जमीन गहाण पडलेली, पोरीची पुढची फी, कशी भरायची?

विचारचक्र सारखे चालूच होते. मधल्या मधे कोंडमारा होऊ लागला. अशावेळी जवळचेही पाठ फिरवतात म्हणतात ना, घराचे वासे फिरले की घर ही फिरते, तशी गत झाली किसनरावांची. पण गिरीजाबाई धिराची होती. ती समजून सांगे हेही दिवस जातील आपले, लेक नक्कीच पांग फेडीन आपलं! हे ऐकले की दोघेही गलबलून जायचे. थोड्याच दिवसात सावकाराचे घरी येणे जाणे सुरू झाले, तो पैश्यांचा तगादा लावू लागला. इकडे आड तिकडे विहीर अशी गत झाली किसनरावांची. दोन महिन्यांची मुदत देउन तो माघारी फिरला पण तो शांत बसणारा नव्हता. काहीही करून याची जमीन बळकायचीच हा चंग बांधून बसलेला भुजंग काही डसल्या शिवाय राहणार थोडीच!

म्हणता म्हणता दोन महिने उलटले, पाण्याचा टिपूसही नाही मग शेत पिकेल कसं, वायदा केलेला होता, करणार काय?विवंचना काही संपेना! गिरीजाबाई झोपेतच असतांना किसनरावांनी सर्जाचा दोर घेतला, अन् बांधावरच्या बाभळीच्या झाडाला स्वत:ला लटकवलं.. सकाळी गिरीजाबाई उठली, पाहते तर काय... सगळं संपलेलं.. कुंकवाचा धनी तिला सोडून कायमचाच दूर गेला होता.

होत्याचं नव्हतं झालं, ऊर बडवून बिचारी आक्रोश करू लागली पण.... काही उपयोग होणार होता का?

सोनूने येऊन पित्याला अग्निडाग दिला. मनात फार दु:ख होत होते, पण आईला ती धीर देऊ लागली, आई तुझाच आता मला सहारा, आवर हा शोक सारा, कारण माझ्यासाठी, आपल्या लेकीसाठी, आपल्या भूमीसाठी, येणाऱ्या सुखाच्या दिवसासाठी, आई तुझं जगणं अजून बाकी आहे! जगणं अजून बाकी आहे!!